म. ग्रं. सं. ठाणें
विषय [illegible]
सं. क्र. [illegible]

REFBK-0006973

# रजःकण

लेखक

**नारायण गोविंद चापेकर**

REFBK-0006973

कार्तिक [illegible] शके १८६४

मूल्य दोन रुपये

मुद्रक व प्रकाशक
लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय
१९८/१७ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २

# प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तक समाजशास्त्रविषयक संशोधनाला उपयुक्त होण्यासारखें आहे.

ह्यांतील बरेचसे लेख पूर्वी लोकशिक्षण, पुरुषार्थ, महाराष्ट्र, महाराष्ट्र साहित्य पत्रिका ह्यांत प्रसिद्ध झालेले आहेत. ह्या मासिककारांचा मी आभारी आहें. विविधज्ञानविस्तार बंद झाल्याने संशोधनात्मक लेखांचा एकमेव आधार नाहीसा झाला ह्याचें कोणाला वाईट वाटणार नाही ?

येथे एक माझा अनुभव नमूद करणें अप्रस्तुत होणार नाही. मासिकांत लेख पाठविल्यावर मी तिकडे बघत नाहीं. पाठविलेला लेख प्रसिद्ध झाला आहे एवढेंच मी पाहतों. तो बरोबर छापला गेला आहे कीं नाही हें पाहण्याची दक्षता मी घेत नाहीं. संशोधनात्मक लेखांत कधी आंकडे असतात तर कधी अपरिचित नामोल्लेख असतात. लेख प्रसिद्ध करण्यापूर्वी मुद्रितें लेखकाकडे येत नाहीत. ह्या व दुसऱ्या अनेक कारणांनी छापतांना चुका होण्याचा संभव असतो. कित्येक वेळां मासिकांतील लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची कल्पनाहि नसते. ज्या वेळीं अनेक मासिकांत विखुरलेल्या लेखांचें संकलन करण्याचें मनांत येतें त्या वेळीं लेखक अगदी हतबल होतो. मूळ हस्तलेख त्याच्यापाशीं नसतो. तो राहतो मासिककारांकडे. तेथेहि तो बहुधा फाडणींत जाऊन अग्निसात् होतो. लेखांचें महत्त्व जाणणारे मासिकांचे संपादक सर्व असतात असें नाही. ह्यास्तव संशोधनात्मक लेख लिहिणारांनी मासिककारांकडून हस्तलेख परत मागून घ्यावेत, अस्सलबरहुकूम मजकूर छापला आहे कीं नाही हें तपासून पाहावें. मला ह्या गोष्टी फार नडल्या आहेत.

सामाजिक चालीरीतींचा संग्रह करणें ही सध्या निकडीची गोष्ट झाली आहे. हा संग्रह जर वेळींच झाला नाही तर समाजशास्त्रदृष्ट्या फार मोटी हानि होणार आहे. सामाजिक संशोधकाला हिंदुस्थानासारखें सुपीक क्षेत्र

जगांत अन्यत्र कोठे आढळणार नाही. इंग्रजी शिक्षणाच्या योगाने– विशेषतः स्त्रीशिक्षणाच्या प्रसारामुळे– जुने आचार लुप्त होत आहेत; म्हणूनच त्यांचा संग्रह करण्याची अवश्यकता तीव्रतेने भासते. ह्या विषयाला वाहिलेलें एक मासिक मराठींत निघालें तर कांही कार्य करतां येईल अशी आशा वाटते. परंतु दुर्दैव हें की, ह्या विषयाचें महत्त्वच कोणाला अद्यापि वाटत नाही. अर्थशास्त्रासारख्या विषयांत सुद्धा जर हिंदी अर्थशास्त्र म्हणून कांही आहे असें आग्रहाने प्रतिपादन केलें जातें तर समाजशास्त्राकडे देखील हिंदी दृष्टीनें कां बघतां येऊं नये ? मला वाटतें इंग्रजी पुस्तकें वाचून समाधान मानून स्वस्थ बसणें हानिकारक आहे.

सामाजिक चालीरीति देतांना दोन गोष्टी लक्ष्यांत ठेवावयाच्या असतात. प्रथमतः दिलेली माहिती बिनचूक असावी. तथापि असें आश्वासन देणें कित्येक वेळां कठीण पडतें. बदलापूर पुस्तकांत दिलेल्या माहितीच्या-संबंधाने मला असें आश्वासन देतां येईल. कारण पडताळा पाहण्याला मला तेथे अनुकूल साधनें होतीं. परंतु प्रवासांत भेटलेल्या इसमांकडून मिळविलेल्या माहितीसंबंधाने ती पडताळून पाहणें शक्य नसतें. हें जरी खरें असलें तरी अशी माहिती अविश्वसनीय असते असें समजणें चुकीचें होईल. युरोपियन प्रवासी तरी काय करतात ? त्यांना तर भाषेची आणखी अडचण असते. एलविनसाहेब बायगा लोकांत अनेक वर्षें राहिले; बायगा स्त्री त्यांनी गृहिणी केली; त्यामुळे बायगांची खरीखुरी व इत्थंभूत माहिती त्यांस सागतां आली. परंतु ही गोष्ट सर्वांस शक्य नाही. शिरगणतीच्या वृत्तान्तांतील माहिती तरी सरकारी नोकरींतील अलबत्या गलबत्या असमंजस माणसांकडूनच मिळविलेली असते. सरकारी शिक्क्यामुळे तिच्याबद्दल कोणी शंका घेत नाही इतकेंच.

दुसरी गोष्ट म्हणजे चालीरीतींचीं कारणें सांगणें. हें काम इतक्या घाईने करूं नये असें माझें मत आहे. समग्र माहिती गोळा केल्यानंतरच सोपपत्तिक कारणें देतां येतील व प्राथमिक समाजाच्या मनाचा ठाव काढतां येईल. भाषा हें एक समाजशास्त्राचें अंग आहे असें मी मानतों म्हणून कांही लोकांच्या भाषेची माहिती पुस्तकांत ग्रथित केली आहे.

रेडिओ भाषणें डायरेक्टरच्या परवानगीने दिलीं आहेत. परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. भाषणें ह्या रूपांत दिल्यानंतर बोलण्याची भाषा मधून मधून डोकावल्यास आश्चर्य नाही. कालमर्यादेमुळे जो मजकूर तेथे गाळावा लागला तो येथे घेतला आहे. असा मजकूर थोडा आहे.

नाग लोकांची माहिती फार वर्षांपूर्वी लिहिलेली माझ्यापाशीं होती तिचा पुस्तकांत समावेश केला आहे. ही माहिती पूर्वी कोठे प्रसिद्ध झाली होती कीं काय ह्याचें मला आता स्मरण नाही.

पुस्तकांत जाड ठशाचीं वाक्यें मधून मधून डोकावतात त्याची जबाबदारी ग्रंथकारावर पडूं नये. मासिकाच्या संपादकांची ती निवड आहे. नजरचुकीने त्याच स्वरूपांत ती ह्या पुस्तकांत छापली गेली.

बदलापूर
वैशाख वा। १२ शके १८६५

ना. गो. चापेकर

## शुद्धिपत्र

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ५२ | ९९३९ | ९३९ |
| ५९ | ९०७ | १०७ |

# अनुक्रमाणिका


| | विषय | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | नामकरण ... ... ... ... ... | १—१४ |
| २ | गणेशपुराणांतील सामाजिक माहिती ... ... | १५—२२ |
| ३ | बडोदें खानेसुमारींतील कांही माहिती ... | २२—५६ |
| ४ | भावनगर संस्थानची खानेसुमारी ... ... | ५६—६५ |
| ५ | त्रावणकोर संस्थानांतील वन्य जाती ... ... | ६५—८३ |
| ६ | कित्येक डोंगरी लोकांच्या चालीरीति ... ... | ८४—९२ |
| ७ | विशिष्ट जातींतील चालीरीति ... ... ... | ९२-१०२ |
| ८ | लोककथा ... ... ... ... ... | १०२-११८ |
| ९ | इतर सामाजिक माहिती ... ... ... | ११८-१२९ |
| १० | अस्पृश्यतेचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार ... | १२९-१३५ |
| ११ | रजस्वलेचा विटाळ ... ... ... ... | १३५-१४० |
| १२ | जगांतील कांही जातींची माहिती ... ... | १४०-१७४ |
| १३ | उपसंहार ... ... ... ... | १७४-१८३ |

# र जः क णः

# रजःकण

*

## नामकरण*

**नामकरणाचें महत्त्व.** सर्व चराचरसृष्टि नामरूपात्मक आहे. जगांतील यच्चयावत् वस्तूंना मनुष्यप्राणी नांव ठेविल्यावांचून राहत नाही. नदी-निर्झर, सरोवर-सागर, डोंगर-पर्वत, वृक्ष-लता, पशु-पक्षी, कांहीहि त्याच्या दृष्टिपथांत येवो, त्याचें पहिलें काम त्या वस्तूचें नामकरण करणें हें असतें. मग स्वतः मनुष्यप्राणी तेवढाच नामकरणावांचून कसा राहील ? ह्याकरितां भारतीयांनी ह्या नामकरणाचें महत्त्व ओळखून त्याची संस्कारांत गणना केली आहे. नांवाविना व्यवहार अडून राहील, सर्व कार्यकलाप बंद पडेल आणि मनुष्याची प्रगति खुंटेल, ह्यासाठीच पशुपक्ष्यांना व वृक्षांनासुद्धा नांवें देण्याची अवश्यकता माणसाला भासत असते. ही अवश्यकता मनुष्य त्यांना आपल्या कामाला राबवितो तेव्हाच उत्पन्न होते. जोपर्यंत प्राणी अथवा पदार्थ त्याच्या उपयोगाला येत नाही तोपर्यंत त्याला नांव ठेवण्याच्या भरीस तो पडत नाही. रानांतल्या गुरांना किंवा वृक्षांना अथवा हवेंत उडणाऱ्या पक्ष्यांना व्यक्तिशः नांवें दिलीं जात नाहीत. परंतु मनुष्याने रानां-

---

* प्रस्तुत लेखाला श्री. पां. वा. काणे, एम्. ए., एल्एल्. एम्. यांच्या एतद्विषयक इंग्रजी लेखाचा (इंडियन् हिस्टॉरिकल् क्वार्टर्ली, १९३८) आधार असून यांतील बरेचसे प्रमाणनिर्देश त्यांतूनच उद्धृत केले आहेत.

तलें जनावर आपल्या गोठ्यांत आणून बांधिलें, एखादा पक्षी पिंजऱ्यांत घातला, अथवा बागेंत झाड लाविलें, की लगेच त्याला नांव द्यावें लागतें. ह्यावरून व्यवहारार्थ नांवाची आवश्यकता उत्पन्न होते हें सिद्ध आहे.

२. **विषयमर्यादा.** येथे वैयक्तिक नांवाचाच विचार कर्तव्य आहे. व्यक्ति ज्या जातीची असेल त्या जातीच्या नांवाचा विचार येथे आपण करीत नाहीं. समुद्र, जमीन, झाड, हीं नांवें कशीं पडलीं हा भाषाशास्त्राचा विषय येथे अप्रस्तुत आहे. परंतु तांबडा समुद्र, ताडीचें शेत, पोपट्या आंबा, मोत्या, हीं वैयक्तिक नांवें आपणांस विचारांत घ्यावयाचीं आहेत, तरीसुद्धा इतका मोठा व्याप सोडणें सोईच्या दृष्टीने भाग आहे. मनुष्येतर प्राणी अथवा जड वस्तु ह्यांचें नामकरण मनुष्याइतकें कुतूहलास्पदहि नाही. वरील विवेचनाचा उपयोग इतकाच की, प्रत्येक प्राण्याला जातीय व वैयक्तिक अशीं दोन नांवें असतात हें ध्यानांत यावें. अन्य जातीपासून भिन्नता दाखविणारें जातीय नांव असतें, तर जातींतील अन्य व्यक्तींपासून निराळेपणा सूचित करणारें वैयक्तिक नांव असतें. प्रत्येक निराळेपणाला किंवा व्यक्तिमत्वाला स्वतंत्र नांव असणें अवश्यक आहे हें ह्यावरून दिसून येईल. अशा नांवांच्या अभावीं प्रगतीचा मार्ग निरुद्ध होतो; उदाहरणार्थ, निरनिराळ्या सुवासिक पदार्थांचे वास निरनिराळे असतात. गुलाबाचा वास निराळा, चमेलीचा निराळा परंतु हे निरनिराळे वास व्यक्त करण्यास भाषेंत शब्द नाहीत; एवढ्यापुरती भाषा दरिद्री आहे असेंच म्हणावें लागतें. नुसत्या एका सुगंध शब्दावर भागवून घ्यावें लागतें.

३. **जन्मनाम आईबाप ठेवितात.** मनुष्यास नांव कोणाकडून मिळतें हें आता पाहूं. नांव हें व्यक्ति ओळखण्याकरिता व व्यवहाराकरिता असतें. जन्मल्याबरोबर मुलाचा संबंध घरांतल्या माणसांशीं, विशेषतः आईबापांशीं येतो; आणि पुढे तो मोठा झाल्यावर बाहेरच्या लोकांशीं येतो. ह्यामुळे जन्मास आलेल्या ह्या माणसाला नांव देण्याचे प्रयत्न दोघांकडून होत असतात. प्रथमतः आईबापांकडून नांव मिळणें स्वाभाविक आहे. हें आईबापांनी ठेविलेलें नांव कोणत्याहि कारणाने बाहेरच्या लोकांस अज्ञात राहिल्यास ते स्वतःच जगांत नवीन आलेल्या ह्या माणसास तो निर्दिष्ट करितां येईल अशा रीतीने नामांकित करितात. पहिलें नांव आईबापांकडून मिळतें

असें तैतिरीयसंहितेंत स्पष्ट म्हटलें आहे; उदाहरणार्थ, "मम नाम प्रथमं जातवेदः **पिता माता च** दधतुः।" (१·५·१०-१). बृहदारण्यकोपनिषदांतहि मूल जन्मल्यावर त्याचें नामकरण बाप करितो असें म्हटलें आहे; उदाहरणार्थ, "अथास्य नाम (पिता) करोति।" (६-४-२६).

**४. गुह्यनाम.** सर्व व्यवहाराची इमारत नांवावर उभारलेली असते. कोणाचें वाईट करावयाचें झालें तर त्यासाठी नांवाची जरूरी वाईट करणाऱ्याला असणारच. अगदी प्राथमिक अवस्थेंतील मनुष्याला भूतपिशांचांची भीति वाटत असे. पिशाच्च हा त्याचा देव, पण तो दुष्ट देव. सर्व संकटें त्याच्यामुळे ओढवतात ही ह्या प्राकृत माणसाची समजूत झालेली असते. म्हणून पिशाचाला नांव कळूं न देण्याची त्याला बुद्धि होते. मुलाचें नांव इतरांस समजलें तर कोणी मूठ मारील, शाप देईल, अशीहि आणखी भीति तो बाळगून असतो. रानटी समाजांत जारणमारणविद्येचा प्रभाव फार असतो; म्हणून आईबापांनी ठेवलेलें नांव गुप्त राखिलें जातें. मागे बृहदारण्यकोपनिषदांतील वचनाचा निर्देश केला आहे त्यांत बाप जन्मतःच जें नांव देतो तें गुह्यच असावें असें सांगितलें आहे; उदा० "अथास्य नाम करोति......तदस्य गुह्यमेव नाम भवति।" जन्मनाम हें गुह्य नांव असतें असें आपस्तंबाचेंहि म्हणणें आहे; उदा० "जातं वात्सप्रेणाभिमृश्य...नक्षत्रनाम निर्दिशति तद्रहस्यं भवति।" (गृ. सू. ६-१५-१ ते ३ व ८ ते ११) शांखायन, गोभिल व खादिर ह्यांचेंहि मत असेंच आहे. गुह्य नांव आईबापांनाच माहीत असतें. शांखायन म्हणतो "तदस्य पिता च माता च विद्याताम्।" (गृ. १-२४). अर्जुन हें इंद्राचें गुह्य नांव होतें असें शतपथब्राह्मणांत वर्णन आहे (२-१-२-११). आईबापांना माहीत नाही असेंहि एक गुह्य नांव फार प्राचीन काळीं असावें, असें ऋग्वेदावरून दिसतें. हें नांव सूर्यप्रकाशित आकाशांत असतें, असेंहि आणखी तेथे सांगितलें आहे; उदा० "दधाति पुत्रः पित्रोरपीच्यं नाम तृतीयमधि रोचने दिवः।" (ऋ. ९-७५-२) ह्या मंत्राचा अर्थ नीटसा लक्षांत येत नाही. आक्षेप घेतां येणार नाही असा अर्थहि ह्या ऋचेचा करणें कठीण आहे. तथापि गुह्य नांवाची कल्पना ऋग्वेदकालापासून आहे असा तर्क करण्यास चिंता नाही. "ह्या गायींचीं गुप्त नांवें ह्याला ज्ञात आहेत" असा उल्लेख ऋग्वेदांत

(९.८७.३) आला आहे. ह्यावरून गायींनाहि गुप्तनांवें ठेवण्याचा प्रघात होता असें दिसतें. गुप्तनांव ठेवण्याची चाल फार प्राचीन असली पाहिजे; कारण, देवांना गुह्य नांवें होतीं.

उदा० "त्वमर्यमा भवसि । यत्कनीनां नाम स्वधावन् गुह्यं बिभर्षि ॥" (ऋ. ५-३-२).

अर्थ : "हे अग्ने, तूं अर्यमा आहेस. तूं कन्यांसंबंधीं गुह्यनांव धारण करितोस."

तसेंच "विद्मा ते नाम परमं गुहा ।" (ऋ. १०-४५-२).

अर्थ : "हे अग्ने, तुझें गुप्त नांव आम्हांला माहीत आहे."

५. **नामाक्षरसंख्या.** खरें नांव गुप्त ठेवावयाचें ठरलें की दुसरें खोटें नांव ठेवणें प्राप्त आहे. ह्यालाच पुढे व्यावाहारिक नांव असें म्हणूं लागले असल्याचा संभव आहे. खोट्या नांवाचा उच्चार करून कोणीं अभिचारमंत्रांनी उपद्रव देण्याचा प्रयत्न केला तरी तो सफल होणार नाही अशी समजूत असली पाहिजे. ह्या व्यावहारिक नांवांविषयी सूत्रकारांनी नियम केले आहेत. क्रिझीझानोव्हस्की, मिखाइलोव्ह, हैगनबारानोव्हस्की, ह्या रशियन नांवांप्रमाणे अवजड नांवें नसावीं, म्हणून नामाक्षरसंख्या मर्यादित करण्यांत सूत्रकारांनी शहाणपणाच दाखविला आहे असें म्हणावें लागतें. "द्व्यक्षरं चतुरक्षरं वा ॥"--दोन किंवा चार अक्षरांचें नांव असावें, असें आश्वलायन व आपस्तंब म्हणतात. परंतु दुसऱ्या कित्येक सूत्रकारांना हें बंधन आवडलें नाही. शांखायन म्हणतो की, सहा अक्षरांचें नांव असावें, तर बौधायनाच्या मतें सहा किंवा आठ अक्षरांचें नांव ठेवण्यास प्रत्यवाय नसावा. वैजवाप ह्याच्याहि पुढे जातो. सम संख्येविषयी त्याचा आग्रह नाहीच, परंतु वाटेल तितक्या अक्षरांचें नांव चालेल असें तो म्हणतो. द्व्यक्षरी नांव प्रतिष्ठा मिळवून देणारें असतें, तर चार अक्षरांचें नांव अध्ययनजन्य तेज प्राप्त होण्यास साधनीभूत होतें, अशी लालूच आश्वलायनाने दाखविली आहे.

६. **नांवाची रचना.** अक्षरसंख्येचा विचार केल्यानंतर आणखी कांही निर्बंध सूत्रकार सुचवितात. नांवाचें प्रथमाक्षर मृदु व्यंजन असावें, शेवटीं विसर्ग असावा, आणि मध्यें अर्धस्वर यावा असें आश्वलायनाने आपलें मत व्यक्त केलें आहे; उदा० "देवदत्तः, हरिः, महादेवः" इत्यादि (१-१३-१;

४-९). आपस्तंबाने ह्यांत आणखी भर घातली. तो म्हणतो कीं, नांवाच्या आरंभीं नाम, पुढें क्रियापद आणि मध्ये दीर्घस्वर किंवा उपसर्ग ह्याप्रमाणे व्यवस्था असावी; उदा० "गोप्रीः, हिरण्यदाः।" (६-१५; १-३ व ८-११) असें नांव प्रतिष्ठित होतें. आश्वलायनाचे नियम अचल ठेवून गोभिलाने आणखी निर्बंध घातले. त्याच्या म्हणण्याप्रमाणे कृत् प्रत्ययान्त व अतद्धित असें नांव असावें (२-८; ८ व १४ ते १६). अपरार्कानें उद्धृत केलेलें वैजवापाचें मत गोभिलाप्रमाणेच आहे. वैखानसाचें मत भिन्न दिसतें. दीर्घस्वरान्त अथवा भूतभूतकालवाचक प्रत्ययान्त नांवाचा शेवट व्हावा असें त्यास वाटतें; उदा० ब्रह्मदत्त, देवदत्त, यज्ञदत्त, इत्यादि (३-१९). पुरुषांचीं नांवें समाक्षरयुक्त व स्त्रियांचीं विषमाक्षरयुक्त असावीं असें सर्वसाधारण मत दिसतें. मुलींच्या संबंधाने अयुगाक्षरी नांवाचा नियम मान्य करूनहि मानव गृह्यसूत्रकार मुलीचें तीन अक्षरी नांवच पसंत करितो; उदा० "त्र्यक्षरं...कुमारीणाम्।" (१-१८-१,२). मुलीचें नांव दाकारान्त (गोभिल, मानवगृह्य), अकारान्त (वाराह, पारस्कर), इकारान्त (अपरार्क, वैजवाप) असावें, अशीं मतें प्रदर्शित केलीं गेलीं आहेत.

**७. लोकांनी दिलेलें नांव.** आईबापांनी ठेविलेलें नांव गुप्त असतें आणि तें केवळ आईबापांनाच ज्ञात असतें हें वर सांगितलेंच आहे. आता लोकांनाहि दुसऱ्याला नांव देण्याची अवश्यकता भासते. त्यांना आईबापांनी दिलेलें नांव माहीत नसतें. अशा स्थितींत हा अमक्याचा मुलगा, नातू, पणतू अशा अर्थाचें नांव त्यांच्याकडून बनविलें जाणें स्वाभाविक दिसतें; उदा० दैवाप, पौरुकुत्स्य, औद्दालकि, त्रैधात्व (त्रिधातूचा मुलगा) इत्यादि. *ऋग्वेदांत (५.३३.८) त्रसदस्यु पौरुकुत्स्य गैरिक्षित असें एकाचें नांव आहे. ह्यांत त्रसदस्यु हें स्वतःचें नांव, पुरुकुत्साचा मुलगा म्हणून पौरुकुत्स्य, व गिरिक्षिताचा वंशज गैरिक्षित. गैरिक्षित हें गोत्रनाम होतें असें मानण्यास आधार नाहीं. कदाचित् त्रसदस्यु हा गिरिक्षिताचा पणतू असेल. मुलगा बापाचा असतो तसा आईचाहि असतो. एवढेंच नव्हे तर बापा-

* ऋग्वेदांत रौहिण हें नांव आलेलें आहे; उदा० "यो रौहिणमस्फुरद्वज्रबाहुः।" (२-१२-१२) यावरून ऋग्वेदकालीं नक्षत्रनावें प्रचारांत होतीं असें दिसतें.

पेक्षा आई निश्चित असते. म्हणून अमक्या आईचा किंवा स्त्रीचा मुलगा अशा अर्थाचीं नांवें लोकांत पडणें शक्य असतें; उदा० ममतेचा मुलगा म्हणून त्या मुलाला मामतेय असें लोक म्हणूं लागले. तसेंच इतरेचा मुलगा ऐतरेय, अर्जुनीचा आर्जुनेय. हीं नांवें लोकांनी बनविलेलीं असलीं पाहिजेत असें आम्हांस वाटतें. अशा प्रकारानें एका माणसाला अनेक नांवें मिळत; उदा० नचिकेत्याच्या बापाचीं नांवें वाजश्रवस्, औद्दालकि, आरुणि, गौतम इतकीं होतीं. ह्यांपैकीं गौतम हें गोत्रनाम होतें असें पुढच्या संस्कृतीच्या छाये-खालील विद्वान् म्हणतात. प्रत्यक्ष नचिकेत्यानें आपल्या पित्याला गौतम ह्या नांवानें संबोधिलें आहे. उपर्युक्त नांवांपैकी एकहि नांव आईबापांनी ठेविलें असण्याचा संभव नाहीं. आईबापांनी ठेविलेलें नांव आईबापांनाच माहीत असावयाचें, इतरांस नाहीं; त्यामुळे सर्व व्यवहार ह्या लोकांनी रचिलेल्या नांवां-नीच चालत असला पाहिजे; आणि म्हणून ऋग्वेदांत लोकनामेंच आढळतात; पितृदत्त नांव आढळत नाहीं. गुह्य नांवाहून लौकिक नांव वेगळें. लौकिक व्यवहार ह्या दुसऱ्या नांवानेच चालत असला पाहिजे. पुढे जेव्हां आईबाप व्याव-हारिक नांव मुलाला देऊं लागले तेव्हा तेंच नांव इतर लोकहि वापरूं लागले : “लोके तावन्मातापितरौ पुत्रस्य जातस्य संवृते अवकाशे नाम कुर्वाते देव-दत्तो यज्ञदत्त इति। तयोरुपचारादन्येपि जानन्ति इयमस्य संज्ञेति।” (महा-भाष्य पु. १, पृष्ठ ३८) ह्यांत गुप्त जागीं नामकरण करावें असें आहे. गुप्त-नामाच्या ठिकाणीं गुप्तस्थान आलें. आई, बाप, आजा, पणजा ह्यांच्या नांवांवरून मनुष्य ओळखिला जाई, त्याप्रमाणे गांवावरूनहि नांव पडून त्याला ओळखतां येत असे. गांवावरून नांव पाडण्याची आवश्यकता दुसऱ्या गांवच्या लोकांना वाटत असली पाहिजे हें उघड आहे. भीमवैदर्भ, दुर्मुखपांचाल, जनकवैदेह हीं नांवें ह्या वर्गांत मोडतात.

**८. नाक्षत्रनांव.** नांव कसें असावें ह्याविषयीचे नियम झाले, परंतु नांव काय ठेवावें हा महत्त्वाचा प्रश्न राहिला. नांव हें संज्ञार्थ असतें. मानव-समाजाच्या आद्यावस्थेंत नांवें कशीं ठेवीत हें समजण्यास साधन नाहीं. परंतु जुन्यांत जुनी पद्धति नाक्षत्रनांवाची असावी असें वाटतें. फार प्राचीन काळीं लोकांना प्रथम नक्षत्रांचा परिचय झाला. ज्या नक्षत्रावर मूल जन्मलें असेल त्या नक्षत्रावरून मुलाचें नांव बनवीत; उदा० रोहिणी = रौहिणः;

प्रोष्ठपदा = प्रोष्ठपाद; तिष्य = तिस्स; श्रविष्ठा = श्रविष्ठ इत्यादि. मानवगृह्यसूत्रकार नाक्षत्रनांव यश देणारें असतें (यशस्यं नामधेयं नक्षत्राश्रयम्।) असें बजावतो. ह्यावरून ह्या नांवाचें प्राचीनत्व अनुमानतां येतें. नाक्षत्रनाम पहिलें असून तेंच गुह्य असावें असा आमचा तर्क आहे. आपस्तंब व वैखानस ह्यांनी तर तसें स्पष्ट म्हटलेंच आहे.

९. **नाक्षत्रदेवतानाम.** नाक्षत्रनामावरून मनुष्यनाम सिद्ध करीत हें आपण पाहिलें. ही पहिली पायरी असावी. ह्यानंतर नाक्षत्रदेवतांच्या नामांचा आधार मनुष्यनामांस मिळाला. नक्षत्रांच्या देवता कल्पिणें ही गोष्ट पाठीमागची असली पाहिजे. प्रत्येक नक्षत्राची देवता ठरलेली आहे; उदा० कृत्तिका = अग्नि; रोहिणी = प्रजापति; मृगशीर्ष = सोम; आर्द्रा = रुद्र; इ० कृत्तिका नक्षत्रावर जन्मलेल्या मुलाचें नांव आग्नेय ठेवण्यांत येई. नाक्षत्रदेवता मागाहूनच्या म्हटल्या तरी तैत्तिरीयसंहितेंत त्यांचा उल्लेख आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे (४.४.१०.१–३). नक्षत्राचा व त्याच्या देवतेचा संबंध कोणत्या कारणाने जोडण्यांत आला हें समजण्यास साधन नाही.

नक्षत्रें व त्यांच्या देवता येणेंप्रमाणे :—

| नक्षत्र | देवता | नक्षत्र | देवता |
|---|---|---|---|
| अ. | दस्र | ह. | सविता |
| भ. | यम | चि. | त्वष्टा |
| कृ. | अग्नि | स्वा. | वायु |
| रो. | प्रजापति | वि. | इंद्राग्नि |
| मृ. | सोम | अनु. | मित्र |
| आ. | रुद्र | ज्ये. | इन्द्र |
| पुन. | अदिति | मू. | निर्ऋति |
| पुष्य | बृहस्पति | पू. आ. | आप् |
| आ. | सर्प | उ. आ. | विश्वेदेव |
| म. | पितर | श्र. | विष्णु |
| पू. | भग | ध. | वसु |
| उ. | अर्यमा | श. | वरुण |

| | | | |
|---|---|---|---|
| पू. भा. | अजैकपात् | रे. | उपा |
| उ. भा. | अहिर्बुध्न्य | अभि. | ब्रह्मन् |

तथापि असें वाटतें की, ह्या नाक्षत्रदेवतांवरून ठेविलेलीं नांवें फारशीं आढळत नाहींत. आग्नेय, मैत्र, याम्य अशीं कांहीं थोडीशीं नांवें प्राचीन लेखांत सांपडतात. पुढें तर "देवतायाश्च प्रत्यक्षं प्रतिषिद्धम्।" असा निषेध घालण्यांत आला (मानवगृह्य १.१८.१,२). म्हणजे रुद्रदत्त हें नांव चालेल पण रुद्र हें नांव चालणार नाहीं. ज्या वारीं मूल जन्मतें त्या वाराचें नांव मुलास देण्याची चाल कित्येक जातींत आहे; उदा० बुध्या, मंगळ्या इत्यादि. हीं ग्रहांवरून पडलेलीं नांवें होत. अशा प्रकारचीं नांवें धर्मशास्त्रकारांस अवगत नव्हतीं असें दिसतें.

१०. **मासनाम.** ह्यानंतरची पद्धति मासावरून नांव ठेवण्याची. ज्या मासांत मूल जन्मलें असेल त्या मासाचें नांव त्यास ठेवावयाचें. महिन्यांचीं नांवें पूर्वी निराळीं असत; अथवा महिन्यांच्या अधिष्ठात्या देवतांचीं नांवें असेंहि त्यांस म्हणतां येईल. मार्गशीर्षापासून महिन्यांची मोजणी असे. हीं नांवें येणेंप्रमाणेः—

| **मास** | **देवता** | **मास** | **देवता** |
|---|---|---|---|
| मार्गशीर्ष | कृष्ण | ज्येष्ठ | उपेंद्र |
| पौष | अनंत | आषाढ | यज्ञपुरुष |
| माघ | अच्युत | श्रावण | वासुदेव |
| फाल्गुन | चक्री | भाद्रपद | हरि |
| चैत्र | वैकुंठ | आश्विन | योगीश |
| वैशाख | जनार्दन | कार्तिक | पुंडरीकाक्ष |

ह्यांपैकीं कित्येक नांवांचा प्रचार आजहि असल्याचें दिसतें. मात्र जन्ममासाचा व नांवाचा संबंध असतोच असें नाहीं.

११. **अभिवादनीय नाम.** आईबापांनीं ठेविलेलें जन्मनाम त्यांनाच केवळ माहीत असावें, त्याचा स्फोट करूं नये, हा नियम वर सांगितलाच आहे. मूल लहान असेपर्यंत त्याच्या नांवाची विशेष अवश्यकता वाटणार नाहीं. लहान मूल घरांतच वावरणार; बाहेरच्या माणसाशीं त्याचा संबंध येण्याचेंहि

कारण नाहीं. गुरुगृहीं जाण्यासाठी मुलगा प्रथम घराच्या बाहेर पडतो. सांप्रत शाळेंत घालतांना मुलाच्या नांवाची चौकशी केली जातें, तद्वत् पूर्वींहि मुलगा गुरूकडे गेल्यावर त्याला गुरु नांव विचारी. आईबापांनी ठेविलेलें गुह्य नांव प्रकट करण्याचा हाच पहिला प्रसंग. ह्या वेळीं गुरूला अभिवादन करतांना मुलगा जें नांव उच्चारतो त्याला 'अभिवादनीय नाम' अशी संज्ञा आहे. आश्वलायन म्हणतो की, अभिवादनीय नांव योजून ठेवावें आणि तें उपनयनापर्यंत मातापित्यांनाच विदित असावें: "अभिवादनीयं च समीक्षेत । तन्मातापितरौ विद्याताम् आ उपनयनात्" । (१. १३. १ व ४ ते ९). अभिवादनीय नांव नक्षत्राश्रय किंवा देवताश्रय असावें असें खादिर म्हणतो (२.४.१२). "देवताश्रयं वा नक्षत्राश्रयं वा अभिवादनीयं नाम कल्पयित्वा" असें म्हणून गोभिलानेहि ह्याचाच पुरस्कार केलेला आहे (२-१०-२१ ते २५). सांप्रत संध्येंतील नांव हें गुह्य, नाक्षत्र व अभिवादनीय असें त्रिविध असतें. ह्यावरून असें अनुमान करतां येण्यासारखें आहे की, जन्मनाम नाक्षत्र असावयाचें, तें गुह्य असावयाचें, आणि त्याचें प्रकाशन अभिवादनाच्या प्रसंगीं व्हावयाचें अशी रूढि एकेकाळीं होती.

**१२. यज्ञियनाम.** लोकांनी दिलेलें नांव धारण करण्यापेक्षा स्वतः नांव मिळविणें अधिक श्रेयस्कर ही कल्पना ऋग्वेदकाळींहि होती. शतक्रतु हें नांव इन्द्राने स्वतः बनविलें कीं त्याच्या कृतीवरून लोकांनी त्यास तें दिलें, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं; परंतु सामान्य माणसाच्या संबंधानें बोलावयाचें झालें तर यज्ञ करून नांव मिळविणें हा एकच मार्ग त्यास त्यावेळीं मोकळा होता. ह्याला याज्ञिय नांव म्हणतात. अग्निजित्, सोमयाजी, हीं अशा रीतीनें मिळविलेलीं नांवें होत.

**१३. व्यावहारिक नाम.** व्यवहाराकरिता ज्या नांवाचा उपयोग करीत त्यास व्यावहारिक नांव असें म्हणत.

**१४. गोत्रनाम.** गोत्रनामाचा उल्लेख गोभिलावांचून कोणी करीत नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. उपनयनाच्या वेळीं आचार्याला अभिवादन करतांना आचार्यानें बटूला गोत्रनाम द्यावें असें कांहीं लोकांचें मत म्हणून गोभिलानें दिलें आहे: "तस्य आचार्यः अभिवादनीयं नाम कल्पयित्वा...गोत्राश्रयमप्येके ।" (२.१०.२१.२५). ह्यानंतर पुण्याह-

वाचनाच्या प्रसंगीं आईबापांच्या नांवांबरोबर गोत्रनामाचा उच्चार करावा असें वैखानस सांगतो (३.१९). सारांश, नाक्षत्र, गुह्य, अभिवादनीय, व्यावहारिक व यज्ञिय असे नांवाचे प्रकार होते.

**१५. प्राचीन जन्मनाम.** फार प्राचीन काळीं जन्मतःच आईबापांनी ठेवावयाच्या नांवाचा प्रकार ह्याहूनहि निराळा असे. "तूं वेद किंवा जात-वेद आहेस" असें आईबाप मुलाला जन्मल्यावर सांगत "अथास्य नाम करोति वेदोऽसीति।" (बृ. उ. ६.४.२६). "मम नाम प्रथमं जातवेदः माता पिता च दधतुर्यदग्रे।" (तै. सं. १.५१०.१). नाक्षत्रनांव प्रचारांत येण्याच्या पूर्वीची ही स्थिति असावी; आणि हेंच गुह्यनांव असें बृ. उपनिषदाच्या वरील वाक्यांतच सांगितलें आहे. आमच्या मतें ही नांवाची तऱ्हा बंद पडली आणि नाक्षत्रनांव त्या ठिकाणीं आलें तेव्हा तेंच नांव गुह्य झालें असावें.

**१६. एकाच माणसाचीं अनेक नांवें.** अशा रीतीनें एकाच माण-साला एकाहून अधिक नांवें असत. प्राचीन वाङ्मयांत नांवांचा घोटाळा होण्याला हें एक कारण असावें. ऋग्वेदकालीं एका माणसाला चार नांवें असत अशाविषयीं स्पष्ट उल्लेख आढळतात. "तुरीयं नाम यज्ञियं यदा-कारस्तदुश्मसि आदित्पतिर्न ओहसे।" (ऋ. ८.८०.९) ह्या ऋचेंत यज्ञिय नांव चौथें असल्याचें कथन केलें आहे. तिसऱ्या नांवाचा निर्देश ऋ. ९.७५.२ मध्ये आढळतो. जेवढीं नांवें असतील त्या सर्वांचा उच्चार यजमानानें यज्ञांत केला पाहिजे असा नियम असे (द्राह्यायण श्रौत १.३.९). ह्यावरूनहि एका माणसाला एकाहून अनेक नांवें असल्याचें उघड दिसतें. ब्राह्मणाला निदान दोन नांवें असलींच पाहिजेत, त्याशिवाय त्याचा उत्कर्ष होणार नाही, असें शतपथब्राह्मणांत सांगितलें आहे (३.६.२.२४). दोहोंपेक्षा अधिक नांवें मुलाचीं असावीं असें ह्याच ब्राह्मणांत इतरत्र सांगितलें आहे. "तस्मात् पुत्रस्य जातस्य नाम कुर्यात्...द्वितीयमपि तृतीयम्।" (६.१.३.९). ऋग्वेदांत चार नांवांचा आणखी एक उल्लेख आहे तो असा: "चत्वारि ते असुर्याणि नामादाभ्यानि महिष्यस्य सन्ति।"(१०.५४.४). परंतु ह्या ठिकाणीं नामशब्दाचा अर्थ शरीर असा सायणाचार्यांनी

केला आहे. असो. एकंदरीत ऋग्वेकालापासून आजपर्यंत एकाहून अधिक नांवें असण्याची रूढि विशेषतः ब्राह्मणांत चालू आहे ह्यांत शंका नाही.

१७. नामकरणाचा काल. जन्मल्याबरोबर नांव देण्याची पद्धति जुनी दिसते. बृहदारण्यकोपनिषदांत तिचा उल्लेख आहे. जन्मनाम गुह्य असल्याकारणाने व्यावहारिक नांव पुढे केव्हा तरी ठेवणें भागच होतें. जन्मल्यापासून दहा दिवसांच्या आंत नामकरण करण्यास कोणी सांगत नाही. दहाव्या दिवशीं सांगणारे शास्त्रकार आपस्तंब, शांखायन, पारस्कर, वाराह, शंख, लिखित, मानवगृह्यकार हे होत. दहाव्या, बाराव्या किंवा शुभदिनीं नामकरणाची अनुज्ञा आश्वलायन देतो. दहाव्या, शंभराव्या दिवशीं अथवा वर्षाने नामकरणविधि करण्यास प्रत्यवाय नाही असें गोभिल व खादिर ह्यांचें मत आहे. वैखानसाने चाळिसावा दिवस सांगितला आहे. हिरण्यकेशीसूत्रांत बारावा दिवस विहित मानिला आहे. बौधायनाला दहावा किंवा बारावा कोणताहि मान्य आहे. लघु आश्वलायन स्मृतिकार अकरावा, बारावा अथवा सोळावा दिवस इष्ट मानितात : "अहन्येकादशे कुर्यान्नामकर्म विधानतः । कृत्वाभ्युदयिकं श्राद्धं द्वादशे षोडशेऽपि वा ॥" जन्मतःच नांव देण्याचा प्रघात पुढे बंद पडला असें दिसतें.

१८. नांवांचा क्रम. नांवांचा क्रम पाहतां पहिलें जातवेद, दुसरें नाक्षत्र, तिसरें गुह्य व चौथें यज्ञिय असा क्रम हिरण्यकेशी सूत्रकार देतो (२.४. १०–१५). सायणाचा क्रम असा : (१) नाक्षत्र, (२) गुह्य, (३) व्यावहारिक, व (४) यज्ञिय. पहिलें नांव गुह्य म्हणणारे गोभिल, खादिर व बृ. उपनिषत्कार आहेत. बौधायनगृह्यशेषसूत्रांत (१.११.४–८) नाक्षत्र, गुह्य व यज्ञिय "सोमयाजी तृतीयं नाम कुर्वीत इति विज्ञायते।" असा क्रम दिला आहे.

१९. वर्णसूचक नांव. नांवामध्ये पुरुषाचा वर्ण सुचविणारा शब्द असावा ह्या कल्पनेचाहि प्रभाव कांही काल अथवा कांही स्थलीं असलेला दिसून येतो. पारस्कर व बौधायन ह्यांनी ह्या दृष्टीने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांच्या नांवांपुढे अनुक्रमें शर्म, वर्म, गुप्त व दास हे शब्द लावावे असा नियम सांगितला आहे (पा. १.१७; बौ. १.११.९-१८). मनूचा नियम मोघम आहे. मंगलसूचक, पराक्रमद्योतक, संपत्तिदर्शक व आश्रितत्वनिवेदक अशीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांचीं नांवें असावींत

एवढेंच मनु सांगतो (२.३१-३२). शर्म, वर्म, गुप्त व दास ह्या शब्दांची योजना वेदकालानंतरची आहे असें दिसतें. तथापि ह्या नियमाविरुद्ध असलेलीं नांवें शिलालेखांमध्ये सांपडतात; : उदा० महाराज विष्णुदास व विष्णुपालितभट्ट; ह्यांत राजाच्या नांवापुढे दास आहे व ब्राह्मणाला पालित (गुप्त) हें उपपद लाविलेलें आहे. शक राजाच्या नांवापुढे 'वधन' (वर्धन) हें उपपद लावीत. 'भूति' व 'दास' हीं अनुक्रमें वैश्याचीं व शूद्राचीं उपपदें ब्राह्मणाच्या नांवापुढे लाविलेलीं आढळतात. सभापर्वांत शर्मक व वर्मक ह्या क्षत्रिय जाति असल्याचें सांगितलें आहे (३०.१३). त्याचप्रमाणे कदंबवंशाचा मूळपुरुष मयूरशर्मा नांवाचा ब्राह्मण असूनहि त्याचा मुलगा व पणतु ह्यांच्या नांवांपुढे 'वर्म' शब्द जोडलेला आढळतो; उदा० कंगवर्मा, काकुत्स्थवर्मा. हा प्रकार पाहतां रूढीवरून नियम केला गेला असावा असें वाटतें. अस्ताव्यस्त रूढीला नियम करून व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यांत आला असावा.

**२०. नांवानें ऋषिवंश, देवतासंबंध किंवा पूर्वज सूचित व्हावा.** बौधायनानें आणखी एक नियम बसविला. ह्या नियमाप्रमाणें नांव ऋषिवंशसूचक असावें अथवा देवतासंबद्ध असावें किंवा पूर्वजांपैकी एखाद्याचें असावें : "ऋष्यनूकं देवतानूकं वा । यथैवैषां पूर्वपुरुषाणां नामानि स्युः ।" (२.१.२४-३१). अलीकडील काळची नामपद्धति पाहून बौधायनानें हा नियम बांधिला असावा.

**२१. कुलदेवतासूचक नांव.** कल्पनेला फाटे कसे फुटतात हें शंखाचें एक वाक्य मिताक्षरेंत (१.१२) उद्धृत केलें आहे त्यावरून समजून येईल. कुलदेवतेचें अथवा कुलदेवताविषयक नांव असावें असें शंखाचें म्हणणें आहे. कुलदेवता अस्तित्वांत आल्यावर ही कल्पना निघाली हें उघड आहे.

**२२. नामकरणावर अद्वैतमताचा पगडा.** विष्णु, राम, शंकर, हरि इत्यादि देवांचीं नांवें प्रत्यक्ष मनुष्याला केव्हापासून देऊं लागले हें समजण्यास मार्ग नाही. तथापि अद्वैततत्त्वज्ञानाचा पगडा बसल्यानंतर ही चाल निघाली असण्याचा संभव आहे. "देवताश्च प्रत्यक्षं प्रतिषिद्धम् ।" ह्या मानवोक्तीला विसंगत अशी ही नामपद्धति आहे. विसंगति हें चचल कल्पनेचें

कार्य असतें. मनुष्याच्या भावना, मनुष्याची दृष्टि सारखी बदलत असते. ह्या बदलत्या मनोवृत्तीला धरून आचारनियमांत बदल होत असतो.

**२३. निषेध.** नांवाविषयी निषेध आहे त्याचाहि उल्लेख करणें अवश्य आहे. बापाचें नांव मुलाला ठेवूं नये असें मानवगृह्यसूत्रांत म्हटलें आहे; तर वाराह म्हणतो, मुलीला नदी, नक्षत्र, चन्द्र, सूर्य, पूषा ह्यांचीं नांवें ठेवूं नयेत; त्याचप्रमाणे अमुक देवाने दिलेली अथवा रक्षिलेली असें सुचविणारे शब्द लावूनहि नांव बनवूं नये; उदा० इन्द्रदत्ता किंवा इन्द्ररक्षिता असें मुलीचें नांव नसावें. गोभिलाप्रमाणे मुलाचें किंवा मुलीचें नांव तद्धितप्रत्ययान्त नसावें असाहि वाराहसूत्राचा दण्डक सर्वत्र होता असें दिसत नाही. आपल्याकडे कावेरी, नर्मदा, गोदावरी, कृष्णा हीं मुलींचीं नांवें प्रसिद्ध आहेत. तसेंच गोभिलाच्या विरुद्ध पारस्कर मुलीचें नांव तद्धितप्रत्ययान्त म्हणजे नामसाधित असावें असें सांगतो.

**२४. अग्निनामग्रहण.** आपलें नांव दुसऱ्याला देऊन त्याचें आपण घेणें हें श्रेयस्कर असतें अशी एका कालीं समजूत असली पाहिजे. प्रवासाला निघतांना आपलें नांव अग्नीला देऊन त्याचें नांव आपण धारण करण्याच्या रूढीचा निर्देश तैत्तिरीयसंहितेंत आहे: "मम नाम प्रथमं जातवेदः पिता माता च दधतुर्यदग्ने । तत्त्वं बिभृहि पुनरामदैतोस्तवाहं नाम बिभराण्यग्ने ॥" (१.५.१०.१). ह्यांत अनेक गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. जातवेद हें नांव मनुष्याचें कीं अग्नीचें होतें ? अग्नीचें कोणतें नांव मनुष्य स्वीकारी ? प्रवासाला निघतांना नांव बदलण्याचा हेतु काय ? असो. ह्या एकाकी उल्लेखांवांचून ह्याच आशयाचे अन्य उल्लेख आढळत नाहीत ही खेदाची गोष्ट होय. मात्र वर उद्धृत केलेलें वचन थोड्या भेदाने अन्य संहितांत व सूत्रांत पुनरुक्तीने आलेलें आहे.

**२५. फलश्रुति.** नांव ठेविल्याने पाप नाहीसें होतें. ..."जातस्य नाम कुर्यात् पाप्मानमेवास्य तदपहन्ति ।" (श. ब्रा. ६. १. ३. ९). अपरार्क म्हणतो, नांव ठेविलें म्हणजे कुल शुद्ध होतें. "शुचितकुलं भवति ।" खादिरगृह्याचा टीकाकार म्हणतो की, नांवाच्या अभावीं अभिचारमन्त्राचा उपयोग करून घेतां येणार नाही: "नामापरिज्ञाने अभिचाराद्यसिद्धिः फलम् ।"

वर सांगितलेल्या ग्रंथोक्त वचनांना अनुसरून राक्षसांचीं नांवें होतीं कीं काय हें पाहतां यावें म्हणून खाली कांही राक्षसांचीं नांवें देतों. (यांतील बहुतेक नांवें गणेशपुराणांतून घेतलीं आहेत.)

मधु, कैटभ, सिंधु, भीमकाय, वज्रदंष्ट्र, ज्वालामाली, खड्ग, क्षेम, कुशल, बाणासुर, कमलासुर, तारकासुर, उद्धत, धुंधु, विघंट, दंतुर, दारुण, बालासुर, पतंग, विधुल, काम, क्रोध, धूम्राक्ष, रुद्रकेतु, कूट, कुंड, ज्वालामुख, व्याघ्रमुख, क्रूर, कूपक, जघन, मनु, कंदरासुर, अंधक, अंभासुर, तुंग, पिंगाक्ष, दुरासद (भस्मासुराचा मुलगा), निघंट, कर्दम, तालजंघ, विदारण, मेघ, शुंभ, निशुंभा, वृत्र, प्रचंड, शंबर, यक्ष्म, घंटासुर, मल्ल, रक्तकेश, दुर्जय, व्योमासुर, कदंब, कोलासुर, हेम, कमठासुर, तल्पासुर, दुंदुभि, आजगर, शलभासुर, नूपुर, तनठ, शैल, चंचल, वृक, कृतान्त, काल, भगासुर, कलविकल, धर्म, अधर्म, सिंदूर हीं पुरुषराक्षसांचीं नांवें. जृंभा, हेडंबा व विरजा हीं स्त्रियांचीं नांवें.

# गणेशपुराणांतील सामाजिक माहिती

## धर्मकल्पनांची अवनति

गाढव व बैल या दोघांच्या लाथाळ्यांत त्यांच्या तोंडांत असलेले दर्भांकुर गणपतीवर पडले आणि तेवढ्याने तो संतुष्ट झाला. अज्ञानाने घडलेल्या संकष्ट चतुर्थीच्या व्रतापासून लागलेल्या पुण्याने विनायकाच्या धामाप्रत एक राजा गेल्याचें उदाहरण सांगितलें आहे. 'गजानन' हीं चार अक्षरें कानीं पडतांच एका वैश्याचा देह दिव्य झाल्याचें अन्यत्र वर्णन आहे. एक चांडाळी भिक्षेकरिता सहज एका गणेशाचें व्रत करणाऱ्याच्या घरीं गेली. तेथे तिच्या तोंडांतून सहज 'गणेश' असें नांव निघून तिने भिक्षा भक्षण केली त्याबरोबर तिला विनायकाचें विमान आलें एक राक्षस भीमास भक्षण करण्याकरिता आला असतां भीम शमी वृक्षावर चढला, त्यामुळें शमीपत्रें गणेशाच्या मस्तकावर पडलीं. एवढ्याने गजाननाने दोघांवर संतुष्ट होऊन त्यांस दिव्य देह देऊन आपल्या लोकीं पाठविलें.

## समजुती

दृष्टीच्या योगाने पिशाच दुष्टाचरण करणाऱ्या पुरुषांत प्रवेश करतो असा समज असे. तोंडाने उच्चारलेला शब्द खरा होतो असें समजत. म्हणून उलटसुलट शाप देण्याची प्रवृत्ति दिसून येते; उदा० सुलभ नांवाच्या क्षत्रियाने मधुसूदन नामक ब्राह्मणाची चेष्टा केल्यावरून त्या ब्राह्मणाने त्यास तूं बैल हो म्हणून शाप दिला, तेव्हा सुलभाच्या बायकोला राग येऊन "हे ब्राह्मणा, तूं गाढव हो" असा उलट शाप दिला. यावरून शाप देण्यास अधिकार अथवा तपश्चर्याच पाहिजे असें दिसत नाही. गृत्समदाने आपल्या आईला तूं कंटकी हो असा शाप दिला. हा शाप खरा झाला; यांत विशेष नाही, परंतु पातिव्रत्यभ्रष्ट झालेल्या त्या आईने आपल्या मुलास म्हणजे गृत्समदास 'तुला पुत्र होईल तो दैत्य होईल' असा दिलेला शापहि खरा झाला. चन्द्रांगद नामक राजपुत्राला नागकन्यांनी तूं आमचा पति हो अशी

विनंति केली असतां त्याने एकपत्नीव्रताच्या सबबीवर ती नाकारली तेव्हा तुझ्या स्त्रीशीं तुझी बहुत प्रकारें ताटातूट होवो असा शाप त्या कंन्यांनी त्या राजपुत्राला दिला. अभिचाराने प्रयत्न निष्फळ होतात असा समज असे. "अभिचारोऽथवा केन प्रयुक्तोऽयम् न वेद्मि तम्।"

तीर्थस्नान करण्यास मनुष्य जातीने हजर नसेल तर दर्भाची प्रतिकृति करून तिला स्नान घालीत. रुक्मांगदाने आपल्या माता-पित्यांच्या प्रतिकृति करून त्यांना चिंतामणि क्षेत्रांतील गणेश नामक तीर्थांत स्नान करविलें. त्यावेळेस मन्त्र म्हटला गेला तो असा—

**कुशोऽसि कुशपुत्रोऽसि ब्रह्मणा निर्मितः पुरा।**
**त्वयि स्नाते तु सः स्नातो यस्येदं ग्रन्थिबन्धनम्।**

तूं कुश आहेस, कुशपुत्र आहेस, तुला पूर्वीं ब्रह्मदेवाने निर्माण केलें आहे. तूं स्नान केल्यास ज्याच्या नांवाची ही गांठ बांधली आहेस त्याने स्नान केल्यासारखें होणार आहे.

## गण

अनेक गणांचा निर्देश या पुराणांत आला आहे; उदा० प्रथमादिगण, शंकराचे गण, गणेशाचे गण, वगैरे. जमातीला श्रेणी नांव असे व तिचा कोणीतरी एक प्रमुख असे. त्यास पुराधिप असें म्हटलें आहे. गांवांत कोणी वाईट इसम असल्यास त्यास पुराधिप गांवाबाहेर हाकून लावी. शंकराचे सात कोटी गण होते. नगराधिपाला नायक अशीहि संज्ञा असे. (**श्रुतं स्यात् अमरावत्याः नायकोऽसुरवर्जितः।**)

## संस्कार

मुलाचा जन्म होतांच पिता थंड पाण्याने स्नान करी. नंतर ब्राह्मण व गणपति यांची पूजा करून मातृपूजनपूर्वक पुण्याहवाचन करीत. तसेंच वृद्धि-श्राद्ध करून जातकर्म करण्यांत येत असे. मुलाला मध व तूप पाजल्यावर मंत्र म्हणून पिता पुत्राला स्पर्श करी आणि मंत्रपाठ चालू असतां आई बालकाला स्तनपान देई. एवढें झाल्यावर नालच्छेद करून न्हाऊं घालीत. पांचव्या दिवशीं वाणें वांटींत व सातव्या दिवशीं साखर वांटीत. पांचवी व सठी यांच्या पूजनाची चाल दिसत नाही. नामकरण अकराव्या दिवशीं होत

असे. जातकर्माच्या वेळीं दिशांच्या ठिकाणीं पांच ब्राह्मणांची स्थापना करीत. नांव ठेवणें तें ज्योतिष्यास विचारून ठेवीत.

चौल व व्रतबंध एकदमच करीत. पांचव्या वर्षीं हा संस्कार होई. चौल स्वतन्त्र केल्यास तिसऱ्या वर्षीं करीत. अन्नप्राशन योग्यकालीं होईच. गणपतिपूजन, पुण्याहवाचन, मंडपस्थापना, मातृकापूजन, वृद्धिश्राद्ध, होम हीं आजचीं कर्मं उपनयनाच्या वेळीं करण्यांत येत, एवढेंच नव्हे तर वेदी, अंतःपाट, भिक्षावळ, मेखला, यज्ञोपवीत, अजिन, दंड या सर्व गोष्टी आजच्याप्रमाणे यथासांग केल्या जात. मात्र उपनयनाला पिता आचार्याजवळ पुत्राला घेऊन जाई. हा संस्कार सूत्राप्रमाणे होई. नर्तकींचा नाच करीत. याशिवाय उपवेशनसंस्कार असे. यासाठी गुरुवार, त्रयोदशी व सूर्यनक्षत्र प्रशस्त मानलें जाई. मुलाला न्हाऊं घालून, त्याचें पूजन करून व सुवासिनींना वायनें देऊन वाढदिवस साजरा करीत.

प्रेतें जाळीत. कोणतेंहि प्रेत दहन केलें नाही अशी भूमि अन्त्यसंस्काराला पसंत करीत. क्रिया तेरा दिवस चाले. कर्ता क्षौर करी. उत्थान व विश्रांतिश्राद्ध करण्याची वहिवाट असे. अशौची पुरुपाचें अन्न खाऊं नये, असा नियम असे. रामाने मातृक्रिया केली तेव्हा अकराव्या दिवशीं वृषोत्सर्ग केला, बाराव्या दिवशीं सपिंडी केली आणि तेराव्या दिवशीं पर्येयश्राद्ध व पुण्याहवाचन केलें, असें वर्णिलें आहे. शोकाश्रु प्रेतास जाळतात, म्हणून मृताबद्दल शोक करूं नये असा समज असे.

## चालीरीति

आपण सध्या देवाला प्रदक्षिणा घालतों त्याप्रमाणे राजाला, आईला, मुनीला प्रदक्षिणा घालण्याची वहिवाट होती पिता पुत्राच्या मस्तकाचें अवघ्राण करी आणि कधीकधी तें मंत्रपूर्वक होत असे. मणि, मंत्र, औषधि, तपश्चर्या, जप, देवपूजा, यात्राविधान इत्यादि उपायांनी विद्रूप मूल सुरूप होऊं शकतें अशी समजूत होती. लोक पागोटीं वापरीत. स्त्रिया डोक्यावर पदर घेत. पादप्रक्षालन करून व कुंकू लावून स्त्रियांचा पूजासत्कार करीत. दक्षिणेकडे पाय करून निजलेल्या मुलांना पाहून सूर्यपुत्र यम क्रोधाविष्ट झाला

होता. द्विज काषायवस्त्रें नेसत. स्त्रिया विवस्त्र होऊन नदींत स्नान करीत. आत्महत्येचा दोष मानीत. "**प्राणत्यागे महद्दोषं वदन्ति शास्त्रचिन्तकाः**"। विष खाऊन, फास लावून घेऊन अगर शस्त्र खुपसून घेऊन आत्महत्या करीत. क्षत्रियाच्या घरीं ब्राह्मणाने राहणें, हा मोठा दोष मानीत. "**कथं नियमांस्त्यक्त्वा स्थितः क्षत्रियवेश्मनि.**" मृताचा शोक करतांना स्त्रिया छाती बडवून घेत. दृष्ट लागूं नये म्हणून, मुलावरून दहीभात अगर मृत्तिका ओवाळून टाकीत. कपाळाला कुंकू, गळ्यांत मंगळसूत्र, हातांत कंकणें हीं सौभाग्याचीं चिन्हें मानलीं जात. इंदुमतीला नारदांनी तिचा पति जिवंत असल्याचें सांगितल्यावर तिला आपलें मस्तक काळ्या वस्त्राने झाकण्यास उपदेश केला. असो. जांभई आली असतां आचमन न केल्यास शासन होण्याची भीति असे. औदुंबराच्या पात्रांत अन्न शिजवीत. उंडे किंवा कडबू, वडे, मोदक, आनरसे, लाडू, कानवले, मांडे वगैरे पक्कानें लोकांस माहीत होतीं. अठरा धान्यांच्या पिठाची चपाती करीत. समुद्राचें मीठ वापरीत. भात, भाज्या, वरण, चटण्या हे पदार्थ भोजनांत असत. भोजन होतांच पुढे ठेवलेल्या भांड्यांत हात धुवीत. पानांच्या द्रोणांतसुद्धा पीठ शिजवीत.

लाकडाचे दिवे वापरण्यात होते. प्रेत तेलांत ठेवीत. कुंचल्याच्या मुठी दगडाच्या असत. चेंडूचा खेळ लोकांस माहीत होता. पलंगावर निजत. वेश्यागमन अज्ञात नव्हतें. दासीदानाची पद्धति होती. दानांत गजदान व बकरीदान याचाहि उल्लेख आहे. मुखावर हात ठेवून शंखध्वनि करणें (**मुखहस्तरवः**) हा एक ओरडण्याचा प्रकार होता. शेषाला भेटण्यास त्याची आई आली तेव्हा तिला त्याने पित्र्यासनावर बसविलें व तिची पूजा केली बलीने इंद्रपदाकरता ब्राह्मणांना बोलावून यज्ञ केला. त्यांत वेद व कल्पसूत्र यांच्या वाक्यानुसार पशूचें आलभन झालें. स्त्रिया सती जात. अनेक स्त्रिया करण्याचा प्रघात होता (**नानाभोगाननेकाः स्त्रीर्बुभुजे धर्मतस्तु सः**।). स्नानाच्या वेळीं अंगाला आवळकटी लावीत. त्रिशिरस ब्राह्मण व त्याची बायको नग्न स्थितींत असत असें त्यांच्या निःस्पृहतेचें वर्णन केलें आहे. सभेमध्ये आलेला साधु असो अगर असाधु असो, दुर्बल असो अगर बलिष्ठ असो त्याची विचारपूस करून त्याचा सन्मान करणें ही सनातन नीति समजत. लग्नाचीं बोलावणीं लग्नपत्रिका पाठवून करीत.

## आचार

प्रातःकालीं उठून नैर्ऋत्य दिशेस जाऊन लाकडें व गवत यांनी भूमि आच्छादित करून तेथे मलमूत्रविसर्जन करण्याचा विधि सांगितला आहे. उभ्याने किंवा चालतां चालतां हीं कृत्यें करणें निषिद्ध समजत. मलमूत्र-विसर्जनाच्या वेळीं दिवसास तोंड उत्तरेकडे व रात्रीं दक्षिणेकडे करावें. पुरुषाने प्रथमतः गुदद्वार गवत, लाकूड इत्यादिकांच्या योगाने स्वच्छ करून तदनंतर पांच वेळ मृत्तिका व उदक यांच्या योगाने तें धुवावें. पुढे दहा वेळ डावा हात व सात वेळ दोन्ही हात धुवावे; तसें मूत्रोत्सर्गसमयीं एक वेळ लिंग, तीनदा डावा हात व दोन्ही हात दोन वेळ धुवावे. पाय मात्र एकवारच धुवावे. हा गृहस्थाचा शौचविधि होय. ब्रह्मचारी, वानप्रस्थ व यति यांच्या शौचाचें प्रमाण गृहस्थाच्या अनुक्रमें दुप्पट, तिप्पट व चौपट असें आहे. रात्रीं या प्रमाणाच्या अर्धें शौच करावें. शौच करतांना मौन धारण करावयाचें असतें. स्त्रिया व शूद्र यांना दिवसास अर्धें व रात्रीं पाव शौच सांगितलें आहे. शौचानंतर रसाळ व कांटे असलेल्या वृक्षाच्या काडीने दात व जिव्हा स्वच्छ करावीं. झाडाची काडी काढतांना त्याची प्रार्थना करतात ती अशी— 'हे वनस्पते, मला तूं बल, ओज, यश, तेज, पशु, बुद्धि, धन, धारणाशक्ति व ब्रह्मबुद्धि दे.'

यानंतर स्नानसंध्या, देवपूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, पुराणश्रवण वगैरे कर्में नित्य करण्यांत येत. दर्शश्राद्ध करीत. व्यतिपात, सोमवती यांचा उल्लेख झाला आहे. पति मेल्यावर स्त्रिया अंगावरचीं भूषणें काढून टाकीत व हातांतलीं कंकणें फोडीत. विघ्नहरणार्थ बालकाला रक्षा बांधीत, अंगावरून माती ओवाळून टाकीत व शान्त करीत. गांवांचें दान करतांना दहा गांवांचें करीत. वडिलांचें श्राद्ध करीत. गजाननाच्या मूर्तीची स्थापना वैदिक व पौराणिक मंत्रांनी केल्याचें वर्णन आहे. संकष्टी चतुर्थी करीत. चक्रपाणि राजाच्या बायकोने सिन्धुतीरीं जाऊन पोटांतील गर्भ टाकून दिला. यावरून गर्भपाताची कृति स्त्रियांस माहीत होती व गर्भपात अगर त्याग हा दूषणीय मानीत नसत असें दिसतें. प्रत्येक क्षत्रिय राजाचा नियमित ब्राह्मण पुरोहित असे.

होता. द्विज कापायवस्त्रें नेसत. स्त्रिया विवस्त्र होऊन नदींत स्नान करीत. आत्महत्येचा दोष मानीत. "**प्राणत्यागे महद्दोषं वदन्ति शास्त्रचिन्तकाः**"। विष खाऊन, फास लावून घेऊन अगर शस्त्र खुपसून घेऊन आत्महत्या करीत. क्षत्रियाच्या घरीं ब्राह्मणानें राहणें, हा मोठा दोष मानीत. "**कथं नियमांस्त्यक्त्वा स्थितः क्षत्रियवेश्मनि.**" मृताचा शोक करतांना स्त्रिया छाती बडवून घेत. दृष्ट लागूं नये म्हणून, मुलावरून दहीभात अगर मृत्तिका ओंवाळून टाकीत. कपाळाला कुंकू, गळयांत मंगळसूत्र, हातांत कंकणें हीं सौभाग्याचीं चिन्हें मानलीं जात. इंदुमतीला नारदांनीं तिचा पति जिवंत असल्याचें सांगितल्यावर तिला आपलें मस्तक काळ्या वस्त्रानें झाकण्यास उपदेश केला. असो. जांभई आली असतां आचमन न केल्यास शासन होण्याची भीति असे. औदुंबराच्या पात्रांत अन्न शिजवीत. उंडे किंवा कडबू, वडे, मोदक, आनरसे, लाडू, कानवले, मांडे वगैरे पक्वानें लोकांस माहीत होतीं. अठरा धान्यांच्या पिठाची चपाती करीत. समुद्राचें मीठ वापरीत. भात, भाज्या, वरण, चटण्या हे पदार्थ भोजनांत असत. भोजन होतांच पुढे ठेव-लेल्या भांड्यांत हात धुवीत. पानांच्या द्रोणांतसुद्धा पीठ शिजवीत.

लाकडाचे दिवे वापरण्यांत होते. प्रेत तेलांत ठेवीत. कुंचल्याच्या मुठी दगडाच्या असत. चेंडूचा खेळ लोकांस माहीत होता. पलंगावर निजत. वेश्यागमन अज्ञात नव्हतें. दासीदानाची पद्धति होती. दानांत गजदान व बकरीदान याचाहि उल्लेख आहे. मुखावर हात ठेवून शंखध्वनि करणें (**मुखहस्तरवः**) हा एक ओरडण्याचा प्रकार होता. शेषाला भेटण्यास त्याची आई आली तेव्हा तिला त्यानें पित्र्यासनावर बसविलें व तिची पूजा केली बलीनें इंद्रपदाकरता ब्राह्मणांना बोलावून यज्ञ केला. त्यांत वेद व कल्पसूत्र यांच्या वाक्यानुसार पशूचें आलभन झालें. स्त्रिया सती जात. अनेक स्त्रिया करण्याचा प्रघात होता (**नानाभोगाननेकाः स्त्रीर्बुभुजे धर्मतस्तु सः**।). स्नानाच्या वेळीं अंगाला आवळकटी लावीत. त्रिशिरस ब्राह्मण व त्याची बायको नग्न स्थितींत असत असें त्यांच्या निःस्पृहतेचें वर्णन केलें आहे. सभेमध्ये आलेला साधु असो अगर असाधु असो, दुर्बल असो अगर बलिष्ठ असो त्याची विचारपूस करून त्याचा सन्मान करणें ही सनातन नीति समजत. लग्नाचीं बोलावणीं लग्नपत्रिका पाठवून करीत.

## आचार

प्रातःकालीं उठून नैर्ऋत्य दिशेस जाऊन लाकडें व गवत यांनी भूमि आच्छादित करून तेथे मलमूत्रविसर्जन करण्याचा विधि सांगितला आहे. उभ्याने किंवा चालतां चालतां हीं कृत्यें करणें निषिद्ध समजत. मलमूत्र-विसर्जनाच्या वेळीं दिवसास तोंड उत्तरेकडे व रात्रीं दक्षिणेकडे करावें. पुरुषाने प्रथमतः गुरुद्वार गवत, लाकूड इत्यादिकांच्या योगाने स्वच्छ करून तदनंतर पांच वेळ मृत्तिका व उदक यांच्या योगाने तें धुवावें. पुढे दहा वेळ डावा हात व सात वेळ दोन्ही हात धुवावे; तसें मूत्रोत्सर्गसमयीं एक वेळ लिंग, तीनदा डावा हात व दोन्ही हात दोन वेळ धुवावे. पाय मात्र एकवारच धुवावे. हा गृहस्थाचा शौचविधि होय. ब्रह्मचारी, वानप्रस्थ व यति यांच्या शौचाचें प्रमाण गृहस्थाच्या अनुक्रमें दुप्पट, तिप्पट व चौपट असें आहे. रात्रीं या प्रमाणाच्या अर्धें शौच करावें. शौच करतांना मौन धारण करावयाचें असतें. स्त्रिया व शूद्र यांना दिवसास अर्धे व रात्रीं पाव शौच सांगितलें आहे. शौचानंतर रसाळ व कांटे असलेल्या वृक्षाच्या काडीने दात व जिव्हा स्वच्छ करावीं. झाडाची काडी काढतांना त्याची प्रार्थना करतात ती अशी– 'हे वनस्पते, मला तूं बल, ओज, यश, तेज, पशु, बुद्धि, धन, धारणाशक्ति व ब्रह्मबुद्धि दे.'

यानंतर स्नानसंध्या, देवपूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, पुराणश्रवण वगैरे कर्में नित्य करण्यांत येत. दर्शश्राद्ध करीत. व्यतिपात, सोमवती यांचा उल्लेख झाला आहे. पति मेल्यावर स्त्रिया अंगावरचीं भूषणें काढून टाकीत व हातांतलीं कंकणें फोडीत. विघ्नहरणार्थ बालकाला रक्षा बांधीत, अंगावरून माती ओवाळून टाकीत व शान्त करीत. गांवांचें दान करतांना दहा गांवांचें करीत. वडिलांचें श्राद्ध करीत. गजाननाच्या मूर्तीची स्थापना वैदिक व पौराणिक मंत्रांनी केल्याचें वर्णन आहे. संकष्टी चतुर्थी करीत. चक्रपाणि राजाच्या बायकोने सिन्धुतीरीं जाऊन पोटांतील गर्भ टाकून दिला. यावरून गर्भपाताची कृति स्त्रियांस माहीत होती व गर्भपात अगर त्याग हा दूषणीय मानीत नसत असें दिसतें. प्रत्येक क्षत्रिय राजाचा नियमित ब्राह्मण पुरोहित असे.

## देवपूजा

देवांचीं मंदिरें जागोजाग असत. गणपतीची उपासना सुरू होण्यापूर्वी विष्णु, शिव, शक्ति व सूर्य या देवतांच्या उपासना प्रचलित होत्या. या देवतांचे भक्त गाणपत्य बनले असें वर्णन आहे. कार्तिकी पौर्णिमेस प्रातः-कालीं शंकराची पूजा केली असतां रात्रीं केलेलें पाप नाहीसें होतें असें म्हटलें आहे. देवांतक व नरकांतक यांनी उपःकालीं शंकराची पूजा करण्याचा परिपाठ ठेवला होता. देवींमध्यें मार्जार, शुभ-आश्रया, विरजा व मुक्ता यांचीं नांवें आलीं आहेत. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून चतुर्थीपर्यंत क्रमाने एकेका देवीची पूजा सांगितली आहे. चार निरनिराळ्या दिशांस या देवता स्थानापन्न झालेल्या असाव्या. पार्वतीहि प्रातःकालीं पार्थिव लिंगाची पूजा करीत असे. पंचायतनाची पूजा प्रचलित होती. पार्वती, शंकर, विष्णु, विनायक व रवि हे ते पांच देव. याला विष्णुपंचायतन म्हणत. सिंधुराजाने सूर्याची उपासना केली होती. तथापि अभेदबुद्धीनेच सर्व देवतांची उपासना करण्यास सांगितलें आहे. ज्याचें जें इष्ट दैवत असेल तेंच श्रेष्ठ हा नियमहि होताच. शिवाचे सात कोटि गण होते. पंचायतनाचीं देवळें असून त्यांत पांच देवांच्या मूर्ति असत. भवानीमंदिर व शिवालय यांचा स्पष्ट उल्लेख आहे. इंद्रयागांत इन्द्राची मूर्ति पूजीत असावे.

शंकराची उपासना करणारे व्याघ्रचर्म, गजचर्म व अक्षमाला धारण करीत. देवांतक व नरकांतक यांनी अशा तऱ्हेने तपश्चर्या करून शिवाला प्रसन्न करून घेतलें.

## स्त्रीविषयक नीति

वाचक्नवि मुनींची बायको रुक्मांगद राजावर मोहित होऊन त्याच्या-पाशीं संभोगयाचना करूं लागली. राजाने तिचें म्हणणें नाकारल्या-वर ती त्याला म्हणते, 'जो पुरुष बलात्काराने परस्त्रीस भ्रष्ट करूं पाहतो, तोच नरकांत जातो. पण स्वतः एखादी स्त्री आली असतां तिचा जो अङ्गीकार करतो त्यास कोणताहि दोष लागत नाही. कृत व त्रेता या दोन युगांत ब्रह्मदेवाने स्त्रियांस स्वातन्त्र्य दिलें आहे.''

व्योमासुराची बहीण सोळा शृंगार करून आपल्या कटाक्षांनी पाहणारास मोहित करीत गिरिजालयीं गेली असें वर्णन आहे. मुलाला स्तनपान देणें हें प्रेमाचें चिन्ह असे. मलत्याच वेळीं स्त्रीसमागम झाला असतां देवांचा द्रोह करणारे दैत्य जन्मास येतात असा समज होता. होम करण्याच्या तयारींत असतां कश्यपाजवळ दितीने ऋतुदान मागितलें. 'ही वेळ वाईट आहे, होमानंतर मी तुला ऋतुदान देईन' असें पतीनें सांगितलें तरी ती ऐकेना. तेव्हा त्याला ऋतु द्यावा लागला. त्याचें फळ म्हणजे हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु या दोन पुत्रांचें जनन होय. ऋतुदानानंतर स्नान करून कश्यपु ऋषींनी होम दिला. उत्तम मुलगा ओळखण्यास बत्तीस लक्षणें असत.

पतीपासून पुत्रोत्पत्ति न झाल्यास अन्य पुरुषाकडून करून घेत. पुत्रोत्पत्तीचे सर्व उपाय हरल्यावर दुर्धष नांवाच्या पुरुषाच्या प्रमदा नामक पत्नीने ज्याच्यावर तिचें चित्त आसक्त झालें होतें अशा एका कोळ्यापासून शुभमुहूर्त पाहून पुत्रोत्पत्ति करून घेतली. हा सांत्र पुढे राजा झाला. ही क्षेत्रज संतति अथवा हा कैवर्तपुत्र विषयी निघाला. पतियुक्त असो वा नसो राष्ट्रामधली एकहि सुंदर स्त्री त्याने सोडली नाही. जात, परजात हा भेदाभेदहि तो विसरला (**न वा गणयते ज्ञातिभेदं विषयलम्पटः**). यावरून जातीचीं बंधनें ठाम झालीं होतीं असें दिसतें. स्त्री ऋतुदान मागेल तेव्हाच तिला ऋतु देण्याची वहिवाट मुनींमध्ये असावी. गर्भपात व गर्भविमोचन एक नसल्यास गर्भविमोचनाच्या कथा काल्पनिक म्हणाव्या लागतील. गर्भविमोचनाने गर्भाचा नाश होत नाही. चक्रपाणि राजा पुत्राकरिता तपश्चर्या करीत असतांना सूर्याने राजाचें रूप धारण करून त्याच्या राणीला स्वप्नांत ऋतुदान केलें (**स्वप्न एव भर्तृरूपी सविता तामृतुं ददौ ।**)

## कुलदैवत

गजानन हें भीमराजाचें कुलदैवत होतें. याचें स्मरण विश्वामित्र ऋषींनी त्यास करून दिलें. ("येन ते कुलदैवत्वं संप्राप्तोऽसौ गजाननः ।"

## वाहनें

सिंह, मयूर, उंदीर व घोडा हीं गजाननाचीं वाहनें. सिंह हें वाहन

गजाननाला पार्वतीकडून मिळालें (पुपूज पार्वती भक्त्या ददौ सिंहं स्ववाहनम् ।). यांपैकीं कोणत्यातरी एका वाहनावर आरूढ झालेली गजाननाची मूर्ति काढली पाहिजे. शंकर व यम यांचीं अनुक्रमें वृषभ व रेडा हीं एकच वाहनें सर्वत्र येतात.

# बडोदें खानेसुमारींतील कांहीं माहिती

## लोकसंख्या व संतति

गायकवाडी क्षेत्र ८१६४ चौरस मैल असून लोकसंख्या २४४३००७ आहे. ह्यांत १२५७८१७ पुरूष असून ११८५१९० स्त्रिया आहेत. म्हणजे पुरुषांहून बायका ७२६२७ नी कमी आहेत. १००० पुरूष असले तर बायका ९४२ असतात. म्हणजे दर हजारीं ५८ बायका कमी असतात. लोकसंख्येचे हे आंकडे भ्रामक असतात. लोकसंख्या म्हणजे शिरगणतीच्या रात्रीं विशिष्ट स्थलीं असलेल्या स्त्रीपुरुषांची संख्या. अशा मोजणींत कामाकरिता तात्पुरते बाहेरून आलेले लोकहि हिशेबांत धरले जातात आणि ह्या बाहेरून आलेल्या लोकांत पुरुषांचा भरणा विशेष असतो. शहरांमध्ये हा प्रकार विशेषतः अनुभवास येतो. खेड्यांत बाहेरचे लोक फारसे येत नाहीत. तेथील पुरुषच परगांवीं जातात. म्हणून खेड्यांत स्त्रीपुरुषांमधील तफावत शहरांतल्याइतकी नसते. एखाद्या गांवांत ज्यांचें कायमचें वास्तव्य असेल अशांची जी संख्या तिला आपण **नागर-संख्या** म्हणूं. इंग्रजींत Normal population म्हणतात. स्त्रीपुरुषांच्या संख्येंतील फरकाचा विचार करतांना ह्या नागरसंख्येचाहि उपयोग होत नाही.

जन्म झालेल्यांत स्त्रीपुरुषांचें प्रमाण पाहावयास जन्मसंख्येचाच विचार केला पाहिजे. ह्या संख्येस **जातसंख्या** (Natural population) हें नांव देतां येईल. सारांश, लोकसंख्या, नागरसंख्या आणि जातसंख्या असे हे तीन प्रकार विचारांत घेणें अवश्य आहे.

**जातसंख्येच्या आंकड्यांवरून पुरुषजन्माहून स्त्रीजन्माचे आंकडे दर शिरगणतीला कमी होत चालल्याचें दिसतें.**

हजार पुरुषांशीं स्त्रियांचें प्रमाण—

१९०१ : ९७०, १९११ : ९२७, १९२१ : ९२२, १९३१ : ९२०.

ह्याच्या उलट शिरगणतीच्या लोकसंख्येंत १००० पुरुषांशीं स्त्रियांचें प्रमाण वाढत गेल्याचें आढळतें; उदा०

१९०१ : ९३६, १९११ : ९२५, १९२१ : ९३२, १९३१ : ९४२.

स्त्रीपुरुषांच्या प्रमाणांत फरक पडण्यास अनेक कारणें असतात. **मुलांपेक्षा मुली कमी अथवा आधिक होणें हा कित्येक जातींचा आनुवंशिक गुण असल्याचें आढळतें. वैवाहिक बंधनामुळे हा गुण अथवा स्वभाव जातींत टिकून राहतो.** रजपूत आणि कांही गुजर जाती ह्यांच्यांत पुरुषसंतति अधिक होते, तर राणीपराज जातींत कन्यासंततीचें मान अधिक आढळतें.

हवापाणी अगर भौगोलिक परिस्थिति ह्याचाहि परिणाम जननावर होतो. **समुद्रकांठच्या प्रांतांत मुली जन्मास अधिक येतात.** धंद्यावरून सुद्धा स्त्रीपुरुषजननाच्या प्रमाणांत फरक पडतो असा तर्क आहे; उदा० कारागीरवर्गांत मुलींचें प्रमाण मुलांहून अधिक असतें. परंतु याविषयीं अद्यापि खात्रीलायक आधार मिळत नाही. कारण धंदा, जाति व हवापाणी ह्यांच्या विरोधी क्रिया चालू असतात; एक अशी निर्भेळ क्रिया अनुभवास येत नाही.

**बडोदें संस्थानांतील पुरुष व स्त्रिया यांचे जन्ममृत्यूचे आंकडे**

स. १९०१–१०; १९११–२०; व १९२१–३० ह्या सालांतील आंकडे येणेंप्रमाणे—

| साल | जन्म | मृत्यु |
|---|---|---|
| १९०१–१० | पु० २१४९३१ | पु० ३१४८१५ |
| | स्त्रि० १८९४४६ | स्त्रि० २७९५५९ |
| | एकूण ४०४३७७ | एकूण ५९४३७४ |
| १९११–२० | पु० ३०७१६४ | पु० ३२१४६१ |
| | स्त्रि० २७३२२६ | स्त्रि० २९०५९४ |
| | एकूण ५८०३९० | एकूण ६१२०५५ |
| १९२१–३० | पु० ३०२७५७ | पु० २३९४३२ |
| | स्त्रि० २७०९०३ | स्त्रि० २०९४२९ |
| | एकूण ५७३६६० | एकूण ४४८८६१ |

वरील आंकड्यांवरून स्पष्ट दिसून येईल की, पुरुषजन्मापेक्षा स्त्रीजन्म कमी, त्याप्रमाणे पुरुषमृत्यूंपेक्षा स्त्रीमृत्यूहि कमी. १००० पुरुषजन्मांशीं स्त्रीजन्मांचें प्रमाण वरील दशकांत अनुक्रमें ८८१, ८९०, ८९५ असें पडतें; मृत्यूचें प्रमाण ८८८, ९०४ व ८७५ असें येतें.

जन्ममृत्यूंची नोंद आपल्या इकडे अद्यापि कसोशीने होत नाही. त्यामुळे आजवर काढलेलीं अनुमानें कितपत निर्दोष आहेत, ह्याबद्दल खात्री देतां येत नाही. शहरांतली नोंद बरीचशी बिनचूक असते. त्यामुळे खेड्यांतल्यापेक्षा मुली शहरांत अधिक निपजतात असें अनुमान काढलें जातें. मुलगी जन्मली तर त्याबद्दल कोणास आनन्द होत नाही आणि म्हणून त्या जन्माचा बोभाटा होत नाही व त्यामुळे नोंदींत फरक पडतो अशा तऱ्हेचें खेड्यांतील स्थितीचें वर्णन केलें जातें. हेंहि कितपत बरोबर आहे, ह्याची शंका आहे. नोंदी बरोबर असतील तर मुलांमुलींच्या जन्मांचें प्रमाण जुळतेंच आलें पाहिजे.

आपल्या लोकांत वयहि अन्दाजाने सांगितलें जातें. ह्यामुळे कोणत्या वयांत मुलांमुलींच्या मरणाचें प्रमाण अधिक असतें ह्याविषयी निश्चित अनुमानें काढतां येत नाहीत. तथापि **पहिल्या वर्षांत मुलींपेक्षा मुलगे अधिक मरतात ह्यांत मात्र शंका नाही. स्त्रियांची मृत्युसंख्या**

**१५ ते ३० वयापर्यंत पुरुषांपेक्षा जास्त असते** असा अनुभव बराच येतो. त्याचप्रमाणे प्लेग-इन्फ्लुएंजासारखे कित्येक रोग स्त्रियांचे बळी अधिक घेतात.

ह्या सर्व आगंतुक कारणांचा अनुद्भव होईल असा प्रयत्न करून स्त्री-पुरुषांचें प्रमाण समसमान होईल ह्या गोष्टीकडे प्रत्येक सरकारचें लक्ष पाहिजे. प्रस्तुत अहवालांत पन्नासाहून अधिक जातींतील स्त्रीपुरुषांचें हजारीं प्रमाण दिलें आहे. त्यावरून असें दिसतें की, एका दुब्रळ्या जातींतच स्त्रीपुरुष समसंख्या आहेत. नागरब्राह्मण, श्रीमाळी, वाणी, मेमन, बोहरी, चांभार, लोहार, धेड, वालंद, तळबूदा आणि पारशी ह्या दहा जातींत पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या हजारीं जास्त आहे. बाकीच्या सर्व जातींत स्त्रिया पुरुषांहून कमी भरतात. **सर्वांत कमी देशस्थ ब्राह्मणांत; हजारीं ८६८ हें त्यांचें प्रमाण होय.** स्त्रिया कमी असलेल्या जातींत पुनर्विवाहाची चाल उपयुक्त ठरेल. सामाजिक व कौटुंबिक आपत्तींचा उगम स्त्री-पुरुषांच्या संख्यात्मक विषमतेंत असतो. म्हणून ही विषमता बाधक होणार नाही असे उपाय योजणें हें ज्याचें काम आहे असा तज्ज्ञ अधिकारी नेमून ह्या कामाचें स्वतंत्र खातें निर्माण केलें पाहिजे.

प्रथम संतति पुरुषजातीची असते हें वर सांगितलें आहेच. त्याचें प्रत्यंतर अहवालांत पाहावयास मिळतें. संस्थानांत १९३१ सालीं ३९७६८ कुटुंबांची त्या दृष्टीने पाहणी केली. ह्या कुटुंबापैकी ९७४ कुटुंबांत मुळींच संतति न झाल्याचें आढळून आलें. एक पुरुष व त्याची पहिलीच बायको आणि तीहि ४५ वर्षांवरील अशासारखींच कुटुंबें ह्या चौकशीकरितां घ्यावीं लागतात. वरील संतानहीन ९७४ कुटुंबें वगळल्यास बाकीच्या ३८७९४ कुटुंबांपैकी २२८३८ कुटुंबांत पहिलें मूल मुलगा असून १५९५६ कुटुंबात प्रथम जात मुलगी असल्याचें दिसून आलें; म्हणजे १००० पुरुष प्रथमजातांशीं स्त्री प्रथमजातांचें प्रमाण ६९८ पडतें. हा फरक कां पडतो ह्याचें कारण अद्यापि शोधण्यांत आलें नाही. ३९७६८ कुटुंबांत किती संतति किती कुटुंबांत झाली हें दाखविणारे आकडे येणेंप्रमाणे—

| संततिसंख्या | कुटुंबसंख्या | संततिसंख्या | कुटुंबसंख्या |
|---|---|---|---|
| ० | ९७४ | ११ | ८२७ |
| १ | १७४९ | १२ | ४४८ |
| २ | २५५० | १३ | १७४ |
| ३ | ३५९१ | १४ | ६० |
| ४ | ४५४१ | १५ | ३३ |
| ५ | ५४९८ | १६ | १५ |
| ६ | ५५१८ | १७ | २ |
| ७ | ५०९७ | १८ | ३ |
| ८ | ४०६६ | १९ | ० |
| ९ | २७७३ | २० | २ |
| १० | १८४७ | | |

एकूण कुटुंबसंख्या ३९७६८

३९७६८ बायकांना २२६४५६ मुलें झालीं. अर्थात् एका कुटुंबास किंवा बायकोस सरासरी ५·६९ मुलें होतात असें ठरतें. चौकशीच्या वेळेपर्यंत २२६४५६ मुलांपैकी फक्त १३६७९५ मुलेंच जिवंत होतीं, ८९६६१ मेलीं होतीं. ह्यावरून हजार जन्मलेल्या मुलांत ६०४ मुलेंच टिकून राहतात असें दिसतें.

बायकांना कितव्या वर्षी पहिलें मूल झालें हें खालील आंकड्यांवरून समजेल—

| वय— | १२ | १४ | १५ | १६ते२० | २१ आणि वर |
|---|---|---|---|---|---|
| संख्या— | १६३७ | २८३३ | ६७९२ | ३५७१६ | २३७८७ |

बाराच्या खाली कोणत्याहि वयांत मूल झालेलें नाही. **१६व्या वर्षी मुलें होणाऱ्या बायका अधिक असतात** असें दिसतें. सोळा वर्षांवरील वयांत पहिलें मूल होणाऱ्या वर्गांत अशिक्षितांचा क्रम पहिला लागतो ही विचार करण्यासारखी बाब आहे. हजार बायकांत ८५३ हें त्या वर्गाचें प्रमाण आहे. त्याच्या उलट शिक्षितांचें प्रमाण हजारीं ८२४ पडतें. वयावरून काढलेली माहिती अहवालांत पुष्कळच आहे. परंतु वयें नेहमी चुकीचीं देण्यांत येत असल्यामुळे मीं ही माहिती या लेखांत बुद्ध्या गाळली आहे.

## धर्म

संस्थानांत निरनिराळ्या धर्मांची लोकसंख्या खाली दिल्याप्रमाणे आहे--

| | | |
|---|---|---|
| हिंदु | | २१५२०७१ |
| (१) ब्राम्हणी | २१४९२०० | |
| (२) आर्य | २८०१ | |
| (३) ब्रम्हो | ७० | |
| मुसलमान | | १८२६३० |
| जैन | | ४८५०८ |
| वन्य जाती | | ४४८०९ |
| ख्रिस्ती | | ७२६२ |
| पारशी | | ७१२७ |

१९२१ च्या खानेसुमारीशीं तुलना करतां असें दिसतें की, वन्य जाती, ख्रिस्ती व पारशी यांची संख्या घटत आहे. ह्याचें कारण वन्य जाती हिंदूंत मिसळत आहेत. ख्रिस्ती संख्या कमी होण्याचें कारण असें असावें की, आता हिंदु ख्रिस्त धर्मांत जात नाहींत आणि नोकरीच्या निमित्ताने ख्रिस्तीधर्मानुयायी संस्थानांत फारसे येत नाहींत; तथापि हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, हे सात हजार ख्रिस्ती म्हणजे ख्रिस्त-धर्म-प्रसार-संस्थाचालक व त्यांनी बाटवलेले असे आहेत. संस्थानांत अमेरिकन मेथॉडिस्ट, एपिस्कोपल, प्रेस्बिटेरिअन व अमेरिकन चर्च ऑफ ब्रेथरन ह्या संस्था काम करतात. ह्याशिवाय मुक्तिफौजेचे लोक आहेतच.

ह्या लोकांस संस्थानांतून प्रोत्साहन कां मिळावें समजत नाही. ब्रेथरन चर्चने १९२१ च्या पूर्वी ४९८ इसम बाटवले तर पुढील दहा वर्षांत ४९८ चे ८९७ केले. दरसाल ४० इसम हिंदूंतून कमी केले. **मिशनऱ्यांच्या शाळा व दवाखाने यांच्या तोडीला आमच्या लोकांचे दवाखाने व शाळा स्थापन झाल्या पाहिजेत.** शहरांत हें झाल्यामुळे मिशनरी तेथून मागे हटले. खेड्यांत त्यांचें प्रचारकार्य निर्विघ्न चालतें; आणि तें स्वदेशांतून येणाऱ्या पैशांवर. अशा स्थितींत **मिशनऱ्यांना**

**खेड्यांत राहण्याची परवानगी तरी मिळूं नये अगर संस्थानांनी आपल्या खर्चाने खेड्यांत शाळा व दवाखाने काढावे. त्याशिवाय मिशनऱ्यांच्या बाटवीला आळा बसणार नाही.**

वर खिस्ती लोकसंख्या ७२६२ म्हणून सांगितली; त्यांत ७०६४ बाटलेले असून अस्सल खिस्ती व अँग्लो-इंडियन १९८ आहेत. हे ७०६४ लोक धर्माने खिस्ती झालेच पण अंतःकरणाने हिंदी राहिले तर मग भिण्याचें कांही कारण नाही. परंतु खिस्ती संस्कृतीकडे, खिस्ती राष्ट्राकडे, त्यांचा ओढा गेल्यास राष्ट्रीय दृष्ट्या धर्मांतर ही हानिकारक गोष्ट होते ह्या बाटलेल्या लोकांत भंगी, चांभार, कुणबी, मराठा, पठाण, वन्य इत्यादि निरनिराळ्या जातींचे लोक आहेत. सर्वांत जास्त भरणा वन्य जातींचा होय.

हिंदूंमध्ये ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिंदु धर्म आणि इस्लामी धर्म ह्यांच्या सरहद्दीवर असलेल्या लोकांची संख्या १५५८६ आहे. हे **लोक मुसलमानांत समाविष्ट होणार नाहीत ह्याविषयीं संस्थानने उपाययोजना न केल्यास ह्या अहवालाचा कांहीच उपयोग होत नाही** असें म्हणावें लागेल.

**सन १९२१ पासून दहा वर्षांच्या काळांत मुसलमानी धर्माकडे ओढल्या जाणाऱ्या हिंदूंची संख्या शेकडा ८५ ने वाढली आहे !** उलट हिंदुधर्माकडे आकृष्ट होणाऱ्या मुसलमानांच्या संख्येची वाढ शेकडा १८ ह्या प्रमाणांत आहे. हिंदु साधूंना भजणारे मुसलमान २३६५ आहेत. आर्यसमाजाच्या चळवळीमुळे पुष्कळ हिंदु मुसलमानी आचारापासून परावृत्त होत आहेत. ह्या पंथाला सत्पंथी ही संज्ञा आहे. नवसरी प्रांतांत मंगरोळ गांवीं एक पिराची गादी आहे. त्या गादीचा वारस सध्या पीरमोतमिय्या या नांवाचा साधु आहे. ह्याचे शिष्य एकंदर लाख आहेत असें म्हणतात. ह्यांत हिंदूंचा भरणा मोठा आहे. गाईला पूज्य मानण्यास तो आपल्या शिष्यांना उपदेश करीत असतो. त्याचप्रमाणे हिंदु शिष्यांस हिंदु आचार पाळण्यास पूर्ण मुभा आहे असा मोतमिय्या उपदेश करतो; बाटाविण्याचें काम करीत नाही. ह्यामुळेच बरेचसे हिंदु परावृत्त करतां आले.

गुरु करून त्याला देव मानणाऱ्यांचा पंथहि फार मोठा आहे. अशा लोकांची संख्या ८३४२७ आहे. ह्या लोकांची श्रद्धा हिंदु पुराणांवर व शास्त्रांवर असते; परन्तु त्यांच्या गुरूच्या ठिकाणीं त्यांची इतकी भक्ति असते की, त्याच्या शब्दापुढे शास्त्राचा शब्दहि कमी योग्यतेचा ठरतो. महाराष्ट्रांतहि मराठा गुरूचें उच्छिष्ट ब्राह्मण भक्षण करतात असें म्हणतात.

वल्लभाचार्य, स्वामी नारायण, रामानंदी व रामानुजी हे वैष्णवांतले भेद होत. पहिल्या दोन पंथांत वरिष्ठ जातीचे लोक विशेष आहेत. रामानंदी पंथांत खालच्या लोकांचा भरणा अधिक. अस्पृश्यांपैकी बरेच या पंथांत आढळतात. शंकराचार्यांच्या विरुद्ध रामानुजांनी आपल्या द्वैती पंथाची स्थापना इ. स. ११५० सालीं दक्षिण हिंदुस्थानांत केली. गुजराथेंत ब्राह्मण व वाणी जातीच्या लोकांतच ह्या मताचा प्रसार दिसतो. द्वैती असल्यामुळे खिस्ती पंथाशीं या पंथाचें साम्य फार आहे. वल्लभाचार्य व स्वामी नारायण या पंथांचा उगम कृष्णोपासनेंत आहे. रामानंदी पंथ विष्णूच्या सर्व अवतारांत रामावतार श्रेष्ठ मानतो. इ. स. तेराशे ते चौदाशे पर्यंतच्या शतकांत केव्हा तरी रामानुजांच्या एका अनुयायाने हा पंथ काढला व वल्लभाचार्य पंथाने कृष्णाच्या बाललीलांना महत्त्व दिलें. रामानंदी पंथांत रामाची तपश्चर्या, त्याचे सद्गुण, त्याची दयाशीलता आणि त्याचा थोरपणा ह्यांवर भर आहे. सन १९०१ पासून वल्लभाचार्य पंथाच्या अनुयायांची संख्या घटत आहे. हा अर्थात् शिक्षणाचा परिणाम आहे. वल्लभाचार्यपंथी स्वामीनारायण पंथांत शिरत आहेत. हा पंथ अगदीं अर्वाचीन म्हणजे गेल्या शतकांतला असून पुष्कळ धनिक व लौकिकवान् लोक ह्या पंथांत सामील होत आहेत. वल्लभाचार्य पंथाच्या महाराजांचें प्रस्थ तरुण पिढीस नकोसें झालें आहे. उपभोग हें ह्या धर्माचें महावाक्य. जीवात्मा आणि परमात्मा जर एकच आहेत तर आपल्या देहाचे हाल करणें म्हणजे परमेश्वराचाच छळ करणें होय, म्हणून वासनांचें नियंत्रण करण्याऐवजी त्या तृप्त करण्यानेच परमेश्वराला आनंद होईल, अशी ह्या पंथाच्या आचार्यांची विचारसरणी आहे! मठाधिपति हा कृष्णाचाच अवतार असें मानून त्याची इच्छा पूर्ण करणें, त्याला सर्वस्व अर्पण करणें, हा वल्लभाचार्यपंथी आपला धर्म समजतात.

| संततिसंख्या | कुटुंबसंख्या | संततिसंख्या | कुटुंबसंख्या |
|---|---|---|---|
| ० | ९७४ | ११ | ८२७ |
| १ | १७४९ | १२ | ४४८ |
| २ | २५५० | १३ | १७४ |
| ३ | ३५९१ | १४ | ६० |
| ४ | ४५४१ | १५ | ३३ |
| ५ | ५४९८ | १६ | १५ |
| ६ | ५५१८ | १७ | २ |
| ७ | ५०९७ | १८ | ३ |
| ८ | ४०६६ | १९ | ० |
| ९ | २७७३ | २० | २ |
| १० | १८४७ | | |

एकूण कुटुंबसंख्या ३९७६८

३९७६८ बायकांना २२६४५६ मुलें झालीं. अर्थात् एका कुटुंबास किंवा बायकोस सरासरी ५·६९ मुलें होतात असें ठरतें. चौकशीच्या वेळेपर्यंत २२६४५६ मुलांपैकी फक्त १३६७९५ मुलेंच जिवंत होतीं, ८९६६१ मेलीं होतीं. ह्यावरून हजार जन्मलेल्या मुलांत ६०४ मुलेंच टिकून राहतात असें दिसतें.

बायकांना कितव्या वर्षी पहिलें मूल झालें हें खालील आंकड्यांवरून समजेल—

| वय— | १२ | १४ | १५ | १६ते२० | २१ आणि वर |
|---|---|---|---|---|---|
| संख्या— | १६३७ | २८३३ | ६७९२ | ३५७१६ | २३७८७ |

बाराच्या खाली कोणत्याहि वयांत मूल झालेलें नाही. **१६व्या वर्षी मुलें होणाऱ्या बायका अधिक असतात** असें दिसतें. सोळा वर्षांवरील वयांत पहिलें मूल होणाऱ्या वर्गांत अशिक्षितांचा क्रम पहिला लागतो ही विचार करण्यासारखी बाब आहे. हजार बायकांत ८५३ हें त्या वर्गाचें प्रमाण आहे. त्याच्या उलट शिक्षितांचें प्रमाण हजारीं ८२४ पडतें. वयावरून काढलेली माहिती अहवालांत पुष्कळच आहे. परंतु वयें नेहमी चुकीचीं देण्यांत येत असल्यामुळे मीं ही माहिती या लेखांत बुद्ध्या गाळली आहे.

## धर्म

संस्थानांत निरनिराळया धर्मांची लोकसंख्या खाली दिल्याप्रमाणे आहे—

| | | |
|---|---|---|
| हिंदु | | २१५२०७१ |
| (१) ब्राम्हणी | २१४९२०० | |
| (२) आर्य | २८०१ | |
| (३) ब्रम्हो | ७० | |
| मुसलमान | | १८२६३० |
| जैन | | ४८५०८ |
| वन्य जाती | | ४४८०९ |
| ख्रिस्ती | | ७२६२ |
| पारशी | | ७१२७ |

१९२१ च्या खानेसुमारीशीं तुलना करतां असें दिसतें की, वन्य जाती, ख्रिस्ती व पारशी यांची संख्या घटत आहे. ह्याचें कारण वन्य जाती हिंदूंत मिसळत आहेत. ख्रिस्ती संख्या कमी होण्याचें कारण असें असावें की, आता हिंदु ख्रिस्त धर्मांत जात नाहीत आणि नोकरीच्या निमित्ताने ख्रिस्तीधर्मानुयायी संस्थानांत फारसे येत नाहीत; तथापि हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, हे सात हजार ख्रिस्ती म्हणजे ख्रिस्त-धर्म-प्रसार-संस्थाचालक व त्यांनी बाटवलेले असे आहेत. संस्थानांत अमेरिकन मेथॉडिस्ट, एपिस्कोपल, प्रेस्बिटेरिअन व अमेरिकन चर्च ऑफ ब्रेथरन ह्या संस्था काम करतात. ह्याशिवाय मुक्तिफौजेचे लोक आहेतच.

ह्या लोकांस संस्थानांतून प्रोत्साहन कां मिळावें समजत नाही. ब्रेथरन चर्चने १९२१ च्या पूर्वी ४९८ इसम बाटवले तर पुढील दहा वर्षांत ४९८ चे ८९७ केले. दरसाल ४० इसम हिंदूंतून कमी केले. **मिशनऱ्यांच्या शाळा व दवाखाने यांच्या तोडीला आमच्या लोकांचे दवाखाने व शाळा स्थापन झाल्या पाहिजेत.** शहरांत हें झाल्यामुळे मिशनरी तेथून मागे हटले. खेड्यांत त्यांचें प्रचारकार्य निर्विघ्न चालतें; आणि तें स्वदेशांतून येणाऱ्या पैशांवर. अशा स्थितींत **मिशनऱ्यांना**

**खेड्यांत राहण्याची परवानगी तरी मिळूं नये अगर संस्थानांनी आपल्या खर्चाने खेड्यांत शाळा व दवाखाने काढावे. त्याशिवाय मिशनऱ्यांच्या बाटवीला आळा बसणार नाही.**

वर ख्रिस्ती लोकसंख्या ७२६२ म्हणून सांगितली; त्यांत ७०६४ बाटलेले असून अस्सल ख्रिस्ती व अँग्लो-इंडियन १९८ आहेत. हे ७०६४ लोक धर्माने ख्रिस्ती झालेच पण अंतःकरणाने हिंदी राहिले तर मग भिण्याचें कांहीं कारण नाही. परंतु ख्रिस्ती संस्कृतीकडे, ख्रिस्ती राष्ट्राकडे, त्यांचा ओढा गेल्यास राष्ट्रीय दृष्ट्या धर्मांतर ही हानिकारक गोष्ट होते ह्या बाटलेल्या लोकांत भंगी, चांभार, कुणबी, मराठा, पठाण, वन्य इत्यादि निरनिराळ्या जातींचे लोक आहेत. सर्वांत जास्त भरणा वन्य जातींचा होय.

हिंदूंमध्ये ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिंदु धर्म आणि इस्लामी धर्म ह्यांच्या सरहद्दीवर असलेल्या लोकांची संख्या १५५८६ आहे. हे **लोक मुसलमानांत समाविष्ट होणार नाहीत ह्याविषयी संस्थानने उपाययोजना न केल्यास ह्या अहवालाचा कांहीच उपयोग होत** नाही असें म्हणावें लागेल

**सन १९२१ पासून दहा वर्षांच्या काळांत मुसलमानी धर्माकडे ओढल्या जाणाऱ्या हिंदूंची संख्या शेकडा ८५ ने वाढली आहे!** उलट हिंदुधर्माकडे आकृष्ट होणाऱ्या मुसलमानांच्या संख्येची वाढ शेकडा १८ ह्या प्रमाणांत आहे. हिंदु साधूंना भजणारे मुसलमान २३६५ आहेत. आर्यसमाजाच्या चळवळीमुळे पुष्कळ हिंदु मुसलमानी आचारापासून परावृत्त होत आहेत. ह्या पंथाला सत्पंथी ही संज्ञा आहे. नवसरी प्रांतांत मंगरोळ गांवीं एक पिराची गादी आहे. त्या गादीचा वारस सध्या पीरमोतमिय्या या नांवाचा साधु आहे. ह्याचे शिष्य एकंदर लाख आहेत असें म्हणतात. ह्यांत हिंदूंचा भरणा मोठा आहे. गाईला पूज्य मानण्यास तो आपल्या शिष्यांना उपदेश करीत असतो. त्याचप्रमाणे हिंदु शिष्यांस हिंदु आचार पाळण्यास पूर्ण मुभा आहे असा मोतमिय्या उपदेश करतो; बाटाविण्याचें काम करीत नाही. ह्यामुळेच बरेचसे हिंदु परावृत्त करतां आले.

गुरु करून त्याला देव मानणाऱ्यांचा पंथहि फार मोठा आहे. अशा लोकांची संख्या ८३४२७ आहे. ह्या लोकांची श्रद्धा हिंदु पुराणांवर व शास्त्रांवर असते; परन्तु त्यांच्या गुरूच्या ठिकाणीं त्यांची इतकी भक्ति असते की, त्याच्या शब्दापुढे शास्त्राचा शब्दहि कमी योग्यतेचा ठरतो. महाराष्ट्रांतहि मराठा गुरूचें उच्छिष्ट ब्राह्मण भक्षण करतात असें म्हणतात.

वल्लभाचार्य, स्वामी नारायण, रामानंदी व रामानुजी हे वैष्णवांतले भेद होत. पहिल्या दोन पंथांत वरिष्ठ जातीचे लोक विशेष आहेत. रामानंदी पंथांत खालच्या लोकांचा भरणा अधिक. अस्पृश्यांपैकी बरेच या पंथांत आढळतात. शंकराचार्योच्या विरुद्ध रामानुजांनी आपल्या द्वैती पंथाची स्थापना इ. स. ११५० सालीं दक्षिण हिंदुस्थानांत केली. गुजराथेंत ब्राह्मण व वाणी जातींच्या लोकांतच ह्या मताचा प्रसार दिसतो. द्वैती असल्यामुळे खिस्ती पंथाशीं या पंथाचें साम्य फार आहे. वल्लभाचार्य व स्वामी नारायण या पंथांचा उगम कृष्णोपासनेंत आहे. रामानंदी पंथ विष्णूच्या सर्व अवतारांत रामावतार श्रेष्ठ मानतो. इ. स. तेराशे ते चौदाशे पर्यंतच्या शतकांत केव्हा तरी रामानुजांच्या एका अनुयायानें हा पंथ काढला व वल्लभाचार्य पंथानें कृष्णाच्या बाललीलांना महत्त्व दिलें. रामानंदी पंथांत रामाची तपश्चर्या, त्याचे सद्गुण, त्याची दयाशीलता आणि त्याचा थोरपणा ह्यांवर भर आहे. सन १९०१ पासून वल्लभाचार्य पंथाच्या अनुयायांची संख्या घटत आहे. हा अर्थात् शिक्षणाचा परिणाम आहे. वल्लभाचार्यपंथी स्वामीनारायण पंथांत शिरत आहेत. हा पंथ अगदी अर्वाचीन म्हणजे गेल्या शतकांतला असून पुष्कळ धनिक व लौकिकवान् लोक ह्या पंथांत सामील होत आहेत. वल्लभाचार्य पंथाच्या महाराजांचें प्रस्थ तरुण पिढीस नकोसें झालें आहे. उपभोग हें ह्या धर्माचें महावाक्य. जीवात्मा आणि परमात्मा जर एकच आहेत तर आपल्या देहाचे हाल करणें म्हणजे परमेश्वराचाच छळ करणें होय, म्हणून वासनांचें नियंत्रण करण्याऐवजी त्या तृप्त करण्यानेच परमेश्वराला आनंद होईल, अशी ह्या पंथाच्या आचार्यांची विचारसरणी आहे! मठाधिपति हा कृष्णाचाच अवतार असें मानून त्याची इच्छा पूर्ण करणें, त्याला सर्वस्व अर्पण करणें, हा वल्लभाचार्यपंथी आपला धर्म समजतात.

श्वेतांबरी, दिगंबरी, स्थानकवासी हे जैनांतील पोटपंथ होत. स्थानकवासी मूर्तिपूजक नाहीत. त्याग अथवा संन्यास याला जैन धर्म महत्त्व देतो. कुटुंबांतील लहान मुलें नेऊन त्यांस यति बनविणें हें मोठें पुण्यकर्म समजलें जातें. जैनांत श्वेतांबरी पंथ वजनदार आहे.

**निरनिराळ्या पंथांतील अनुयायांची संख्या येणेंप्रमाणे—**

| | |
|---|---|
| हिंदू- | २१५२०७१ |

**सुधारकांचा पंथ**

| | |
|---|---|
| आर्यसमाज- | २८०१ |
| ब्राह्मो व प्रार्थनासमाज- | ७० |

**सनातनी सुधारक-सुधारकांच्या विरुद्ध अगदी नवीन मोहीम**

| | |
|---|---|
| राधास्वामी- | ६९८ |
| श्रेयससाधक अधिकारी वर्ग- | ८०५ |

**सनातनी सुधारक**

| | |
|---|---|
| बीजबंद- | ६१३६३ |
| दादुपंथ- | २१८८ |
| कबीर पंथ- | ३२७३७ |
| मोठा पंथ- | १६७ |
| मीरत् पंथ- | १२९२ |
| परनामी पंथ- | ८७६२ |
| उड पंथ- | २१४५ |

**गुरुदेव पंथ**

| | |
|---|---|
| भामाराम पंथ- | १३८७ |
| गोपीनाथ पंथ- | ७१७२ |
| कुबेर व सत्यकेवल पंथ- | १२३४९ |
| नानक पंथ- | १०५ |
| रामडेपीर- | ५८५४८ |
| रवीसाहेब- | १६८५ |
| संतराम- | २१८१ |

## वैदिक व पौराणिक हिंदुधर्म

| | |
|---|---|
| शैव अथवा स्मार्त– | ३९६९९४ |
| शाक्त– | ५३१३३ |
| वैष्णव– | ९२२३४० |
| गणेश पंथ– | ३३३ |

## न हिंदुर्न यवनः

| | |
|---|---|
| गंजपीर– | ५१ |
| नयकाक– | ४६६ |
| पिराण पंथ– | १४५२८ |
| सजी स्वामी– | १८६ |
| सत्पंथी व नकलंकी– | ३५५ |

## वन्य-धर्मी

| | |
|---|---|
| अजेपल– | १५२६ |
| देवीभक्त | ५१००३८ |
| हरिबाबा, तुळशीउपासक– | ३८९८४ |
| खिजाडिया पंथ– | ८१३ |
| अनिर्वचनीय हिंदु– | १५८६९ |

## वैष्णवांतील उपपंथानुयायांची संख्या

| | |
|---|---|
| माधवाचार्य– | १०५७ |
| राधावल्लभी– | ८४९२ |
| रामानंदी– | ५८४६४३ |
| रामानुजी– | ४५८१३ |
| स्वामी नारायण– | ७१२४६ |
| वल्लभाचारी– | १५३८१८ |
| अविशिष्ट वैष्णव– | ५७२७१ |

वरील कोष्टकावरून धर्मामध्ये नवीन नवीन पंथ अजून निघत आहेत हें दिसून येईल. गंजपीराचे एकावनच अनुयायी आहेत. हिंदुधर्मांत ह्या गोष्टी सारख्या घडत असतात. महाराष्ट्रांतील अस्पृश्य धर्मांतराची बात बोलतात

पण आपल्याला पाहिजे तसा नवीन पंथ निर्माण करण्याचें त्यांच्या मनांत कां येऊं नये समजत नाही.

## कांही जाती

गुजराथेंत अनेक लहान लहान जाती आहेत ही गोष्ट आता सर्वांच्या परिचयाची झाली आहे. उदाहरणार्थ, गुजराथी ब्राह्मणांत ८४ पोटजाती असून गुजराथी वाणी चाळीस पोटजातींत विभागले आहेत. १९३१ च्या शिरगणतीच्या पुस्तकांत अनेक जातींची संक्षिप्त माहिती दिली आहे. ती मराठी अभ्यासकांस उपयुक्त वाटल्यावाचून राहणार नाही.

**अहीर** (लोकसंख्या ६५३७). या जातीचे लोक बहुधा गुरें बाळगून निर्वाह करतात. काठेवाडांत या लोकांचा भरणा विशेष आहे. हे आपणांस वैश्य म्हणवितात; परंतु ब्राह्मण त्यांची गणना शूद्रांत करतात. **अनेक वेळां अहीर लोकांचें राज्यहि होतें.** संयुक्त प्रांतांतील अहिरांप्रमाणे गुजराथेंतील अहीरहि आपलें मूळ ठिकाण मथुरा समजतात. तुळशीश्याम हा त्यांचा देव. या देवास ते भजतात. तुळशीश्याम म्हणजे लक्ष्मी आणि कृष्ण. यांच्यामध्ये रबडी लोकांप्रमाणे प्रत्येक वर्षी एका ठरीव दिवशीं लग्नें करतात.

मेलेल्या वडील भावाच्या बायकोशीं लहान भावाने लग्न करण्याची वहिवाट या जातींत आहे.

अहीर हा शब्द संस्कृत अभीर शब्दाचा अपभ्रंश आहे. अहीर हे पूर्वीचे सीरियन् होत हा एक वेळचा समज हल्ली खोटा ठरला आहे. आता ते पूर्वीचे आर्यच असावे, असें म्हणतात.

**भरवाड** (६४३७८. यांच्यामध्ये रबडींचा समावेश केला आहे.) हे लोकसुद्धा गुरांचे कळप बाळगून असतात. गोकुळवृंदावन हें यांचें मूळ ठिकाण होय. गोकुळांतून मेवाड, मेवाडांतून काठेवाड व कच्छ याप्रमाणे त्यांचें आक्रमण झालें आहे. भरवाड आणि रबडी हे शास्त्रीय दृष्ट्या जवळजवळ एकच लोक होत. तथापि त्यांचा रोटीव्यवहार होत असला तरी बेटीव्यवहार होत नाही. हे लोक मेंढ्या पाळतात व घोंगड्या करून विकतात. थोडेसे रामानंदी पंथाचे लोक वगळले तर बहुतेक भरवाड मातादेवीचे उपासक आहेत.

भरवाड लोकांचीं लग्नें १२-१५ किंवा २५ वर्षांनी एक दिवस वैशाख महिन्यांत लागतात. एक मोठी ओसाड जागा घेऊन त्याच ठिकाणीं सर्व लग्नें लागत असतात. **एकदा लग्न लावलेली जागा पुन्हा त्याच कामाकरिता वापरावयाची नाही** असा दंडक असल्यामुळे पुढे ती जागा गुरचरण म्हणून मोकळी ठेवली जाते. या जागेवर एक खांब उभारतात. लग्नाच्या जागेची ही खूण होय. **ब्राह्मण किंवा दर्जी उपाध्यायाचें काम करतो**; परंतु यांपैकी कोणी नसल्यास मुलीकडील कोणीतरी इसम लग्न लावूं शकतो. **यांच्यामध्ये पाट लागतो व सोडचिठ्ठीचाहि रिवाज आहे.** लहान भावाचा वडील भावाच्या विधवेशीं लग्न लावण्याचा हक्क आहे. या जातींतील कित्येक लोक १५ दिवस सोयर बाळगतात. **परंतु दुसरे कित्येक लोक बिलकूल बाळगीत नाहीत.** यांच्यांत प्रेतें जाळतात. उत्तरक्रिया कयाटिया ब्राह्मणाकडून करून घेतात.

**रबडी.** हे आपणांस रजपूत समजतात. आम्हीं रजपूत बायका न करतां अप्सरांशीं लग्न लावलें आणि म्हणून आम्हांला रहा बहारी म्हणजे रीत सोडणारे असें म्हणूं लागले असें ते सांगतात. गुजराथमध्ये हे मारवाडांतून आले. परंतु ते त्याच्या पूर्वी संयुक्त प्रांतांत होते. यांचीं कांही आडनांवें रजपूतांसारखीं आहेत. जादव हें एक आडनांव आहे. गुजराथेंतील रबडी लोकांत पोटजात नाही. काठेवाडांत मात्र या लोकांत सहा पोटजाती आहेत. या सर्व जातींचा पंक्तिव्यवहार होतो; पण विवाहसंबंध होत नाही. **काठेवाडांत मुसलमानांकडील अन्न हे खातात.** यांच्यापैकी कांही बीजमार्गी, कांही रामानंदी, कांही पिराण आहेत. औदिच आणि सोमपूर ब्राह्मण त्यांच्याकडे उपाध्येपणाचें काम करतात. सर्व लग्नें एकाच दिवशीं झालीं पाहिजेत असा यांचा नियम आहे. आजूबाजूच्या खेड्यांतील सर्व लोक एका देवळांत जमतात. तेथे ब्राह्मणास बोलावून आणून त्याच्या संमतीने लग्नाचा दिवस ठरविला जातो. जवळच्या नातेवाइकांत विवाहसंबंध होत नाहीत. भरवाडांप्रमाणे यांच्यामध्येहि मेलेल्या भावाची विधवा आपल्या धाकट्या दिराबरोबर पाट लावते. त्याच्याबरोबरच तिने पाट लावला पाहिजे असा निर्बंध आहे. यांच्यांत प्रेतें पुरतात.

**भवसार** (हिंदु ४८६०; जैन १००६; आर्य १०). लुगड्यांवर खडी काढणें, चीट छापणें हा या जातीचा धंदा आहे. हे आपणांला क्षत्रिय म्हणवितात. परशुरामाच्या छळाला भिऊन मातादेवीवर श्रद्धा ठेवून तिच्या देवळांत आम्ही लपून बसलों, या आमच्या भावामुळे आम्हांला भवसार म्हणूं लागले, असें हे लोक सांगतात. रजपुतांचींच आडनांवें यांच्यांत आहेत. व्रज, मथुरा हें यांचें मूळ स्थान. हिंगळज आणि अंबाजी हे त्यांचे पूजेंतील देव होत. भवसारांत तीन जाती आहेत. रेवाकांठी, गामदेशी आणि तळवदा. परंतु या तिन्ही जातींत रोटीबेटीव्यवहार होत नाही. तथापि तळवद्यांनी शिजवलेलें अन्न रामदेशी व रेवाकाठी या लोकांस चालतें. तळवदा या जातीचे लोक शुद्ध शाकाहारी आहेत. वाणी किंवा श्रावक यांच्याप्रमाणेच त्यांचे लग्नविधि होतात. एकाच आडनांवाच्या लोकांत विवाहसंबंध घडत नाहीत पाट व सोडचिठ्ठीच्या चाली भवसारांत आहेत. वडील भावजय धाकट्या दिराशीं पाट लावण्याची वहिवाट पाळते. यांच्यांत प्रेतें जाळतात.

**ब्राह्मण** (१२३५२२)+(१९२ आर्य). निरनिराळ्या काळीं आर्यांच्या निरनिराळ्या टोळ्या उत्तरेकडून येऊन त्यांनी गुजराथेंत वस्ती केली. **स्थानिक दंतकथांवरून गुजराथी ब्राह्मणांपैकी कांही ब्राह्मण मूळच्या अनार्य लोकांमधून ब्राह्मण करून घेतलेले असे आहेत. परशुरामाने कोळ्यांचे ब्राह्मण केले** अशी चित्पावनांसंबंधाने जी दंतकथा आहे त्याच प्रकारच्या या दंतकथा होत. आर्य वसाहतवाल्यांनी अनार्य स्त्रियांशीं लग्नें लावून प्रजा निर्माण केली असें जें मेगास्थनीज्ने म्हटलें आहे तें बहुधा सत्य असून त्यावरूनच अशा दंतकथा निर्माण झाल्या असाव्या. गुजराथी ब्राह्मणांच्या ऱ्याण्णव जातींची नांवनिशी या ग्रंथांत दिली आहे. यांपैकी कित्येकांच्या आणखी पोटजाती आहेतच; उदाहरणार्थ, औदिच ब्राह्मणांत २९, मेवाड व गिरनार प्रत्येकीं ५, भार्गव ४, श्रीगौडदा श्रीमाळी ५, नागर १८ याप्रमाणे पोटजाती आहेत. **व्यास नांवाची एक पोटजात अनेक पोटजातींच्या मिश्रणाने बनली आहे.** मुसलमानी दरबारांतील एका ब्राह्मणाला निरनिराळ्या जातींतील एकशेआठ जणांनी प्रायश्चित्त दिलें. त्या ब्राह्मणांना वाळींत टाकल्यामुळे त्यांनी एक स्वतंत्र जात बनवली. **या व्यास ब्राह्मणांत विधवाविवाहाची रूढि आहे.** गुजराथी

ब्राह्मणांत नागर व भार्गव ब्राह्मण गौरवर्णाचे आहेत; बाकीचे कृष्णवर्णी म्हणण्यास हरकत नाही.

महाराष्ट्रांतील ब्राह्मणांपेक्षा सीमांतोन्नयन संस्कार यांच्यांत अधिक केला जातो. **उत्तरक्रियेला स्वर्गारोहणक्रिया ही संज्ञा आहे.** सगोत्र-सप्रवर-विवाह होत नाही. **मामेबहिणीबरोबर लग्न होत नाही.**

**अबोटी** ब्राह्मणांची २६४ संख्या आहे. वाल्मिकीच्या धाकट्या मुलापासून आपली उत्पत्ति असल्याचें ते सांगतात. इतर ब्राह्मण यांच्या हातचें अन्न खात नाहीत.

**आनवळ** ब्राह्मण (११८१८). यांसंबन्धाने अशी दंतकथा आहे की, रावणाचा वध करून राम परत येत असतां परतवाड्याजवळ त्याला श्राद्ध करण्याचा प्रसंग आला; परंतु जरूर तितके ब्राह्मण त्याला तेथे मिळण्यासारखे नसल्यामुळे **वन्य जातींतील १८००० लोक त्याने ब्राह्मण करून घेतले.** अशा प्रकारच्या आख्यायिका अनेक ठिकाणीं असल्यामुळे त्यांत शंभर हिस्से सत्य असतें असें नाही. एवढें खरें की, आनवळ ब्राह्मण गुजराथेंतील जुन्यांतले जुने होत. जंगलें नाहीशीं करून पिकाऊ जमीन त्यांनी तयार केली आणि त्या कारणाने पुष्कळ वर्षें जमिनीचे मालक हे लोक होते. आनवळ ब्राह्मण फार करून भातजमीन लावतात. ह्यांना मस्तन आणि भ्रस्थल म्हणजे मस्तखोर व भ्रष्टस्थल अशीं दूषणात्मक नांवें दुसऱ्यांनी ठेवलीं आहेत. ह्या जातीच्या कांही कुटुंबांत अशी वहिवाट आहे की, **मुलीचा सर्व खर्च लग्नानंतर मुलीच्या बापास करावा लागतो.** उदाहरणार्थ, हुंडा तर देतोच पण शिवाय नवऱ्याकडे ने-आण करण्याचा, गर्भारपणचा व बाळंतपणाचाहि खर्च त्यास करावा लागतो. एवढेंच नव्हे तर जावयाच्या वेळेचा त्याच्या आईच्या बाळंतपणाचा खर्च लग्नाच्या वेळेस नवरीच्या बापाला द्यावा लागतो. आनवळ सामान्यतः शैव आहेत.

**औदिच** (४५२२२). उत्तरेकडून गुजराथेवर आल्यामुळे यांस औदिच ब्राह्मण म्हणूं लागले. इ. स. ९६१ ते ९९६ पर्यंत राज्य करणाऱ्या मूळराज नांवाच्या राजाने यज्ञाकरिता औदिच ब्राह्मणांना गुजराथेंत आणलें अशी दंतकथा प्रचलित आहे. यज्ञ संपल्यावर या ब्राह्मणांनी येथे राहावें म्हणून राजांनी त्यांना जमीन व पैसे देऊं केले. सुमारें हजार लोकांनी

राजाचें म्हणणें मान्य केलें. म्हणून त्यांस औदिचसहस्र म्हणण्यांत येऊं लागलें. बाकीच्या टोळीने प्रथम राजाचें म्हणणें नाकारलें. परंतु राजाकडून आणखी प्राप्ति झाल्यानंतर त्यांनीहि गुजराथेंत राहावयाचें कबूल केलें. आणि म्हणून त्यांना औदिच टोळकिया असें नांव पडलें. हे लोक फक्त ३९२५ आहेत. टोळकी या जातीपेक्षा सहस्र जात श्रेष्ठ समजली जाते. सहस्र ब्राह्मणांत आणखी पुन्हा सिहोर आणि सिधपुरी असे दोन भेद आहेत. सिहोर भावनगर संस्थानांत असून सिधपूर बडोदें संस्थानांत आहे. हे दोन्ही गांव औदिच ब्राह्मणांच्या पूर्वजांनी संपादन केले आहेत. भिक्षुकी व शेत करून तसेंच दुसऱ्याकडे सैंपाककृत्य करून हे आपली उपजीविका करतात. आनवळ ब्राह्मणाची बुद्धिमत्ता व धडाडी यांच्यांत नाही. दर्जी, हजाम, कोळी, मोची, गंधर्व या लोकांकडे उपाधेपण करणारांना कमी लेखण्यांत येतें. बागड येथे वस्ती करून राहिलेले औदिच ब्राह्मण हुक्का ओढतात. विधवाविवाह होऊं देतात. शिजलेलें अन्न शेतावर घेऊन जातात. या चालीमुळे इतर ब्राह्मणांच्या दृष्टीने हे ब्राह्मण अगदी हीन दर्जाचे समजले जातात. सिधपुरी औदिच हा इतर औदिच्यांहून श्रेष्ठ समजला जातो. सिधपुरी औदिच्याकडे आपली मुलगी पडावी म्हणून औदिच मुलींचे बाप खटपट करीत असतात.

**गुगळी** (१५१३). गुगुळ, गोकूळ यावरून हें नांव पडलें आहे असें सांगण्यांत येतें. द्वारकेंत यांची वस्ती पुष्कळ असून तेथील देवाचे ते पुजारी आहेत.

**ओढ** नांवाची यांच्यांत एक पोटजात आहे. परंतु दुसऱ्या गुगळीबरोबर ह्या जातीचा रोटीबेटीव्यवहार होत नाहीं. ही निराळी जात पडण्याचें कारण असें सांगतात की, या जातींतील एका माणसाने सर्वांना यज्ञाकरिता आमंत्रण दिलें आणि अशी अट घातली होती की, कोणी वेळेवर येणार नाही त्याच्यावर बहिष्कार घातला जाईल. योगायोग असा की यजमानाचे पुतणेच उशिरा आले. तेव्हा साहजिकच तो फार कोपला आणि त्याने त्यांना ओढ म्हणजे मूर्ख म्हटलें व बहिष्कृत केलें.

**खेडवाळ** (३९९२). खेडा जिल्ह्यांतील खेडा शहरावरून यांना हें नांव प्राप्त झालें. श्रीरंगपट्टणाहून शंकर जोशी आणि दवे यांचे नेतृत्वाखाली

खेडा शहरांत हे येऊन राहिले असें म्हणतात. त्या वेळीं खेडा येथे चंद्रवंशी मोरध्वज नांवाचा रजपूत राजा राज्य करीत होता. श्रीरंगपट्टणशीं यांचा अजून संबंध आहे. यावरून ही आख्यायिका खरी असावी असें वाटतें. दक्षिणी स्त्रियांप्रमाणे यांच्या बायका कानांत काप घालतात. विधवा पांढरें वस्त्र नेसतात. हे लोक मोतीं विकण्याचा व सावकारीचा धंदा करतात. असें सांगतात की, पुत्र व्हावा म्हणून उत्सव करीत असलेल्या खेडाच्या राजाने या ब्राह्मणांना सोन्याच्या गाई दान केल्या. पुष्कळ लोकांनी ही देणगी घेण्याचें नाकारलें आणि ते गुप्तपणाने शहराच्या भिंती चढून बाहेर पडले; म्हणून त्यांना बाह्य म्हणूं लागले. बाह्यांचा अपभ्रंश बाध्य होय. ज्यांनी दान घेतलें ते वेशीच्या आंत राहिले. अशा रीतीने त्यांना भिन्न असें नांव मिळालें. खेडावळ ब्राह्मणांत बाह्य आणि भिन्न अशा पोटजाती अशा रीतीने पडल्या.

**मोध** (९०३९). इतर बऱ्याच ब्राह्मणांप्रमाणे याहि ब्राह्मणांचें नांव गांवावरून पडलें आहे. यांच्या पांच पोटजाती आहेत. परंतु परस्परांशीं रोटीबेटीव्यवहार होत नाही. यांतील त्रिवेदी पोटजातीची संख्या सत्तर असून जेठीमल ब्राह्मणांची लोकसंख्या तर फक्त अठ्ठेचाळीस आहे. अशा जातींत लग्नाची किती अडचण पडत असेल याची कल्पना येईल. मोर ब्राह्मणांत मुलीकरिता पुष्कळ पैसे द्यावे लागतात. या ब्राह्मणांतील एक पोटजात मिनोल म्हणून आहे. त्या जातीचा धंदा गेल्या शतकापर्यंत चोऱ्या, दरवडे, खून करणें हाच होता. धंदेवाईक दरवडेखोर ब्राह्मण इतरत्र कोठे आढळत नाहीत.

**मेवाड** (५०७५). हे ब्राह्मण मेवाडांतून आले हें उघड आहे. भट, चोराशी व त्रिवेदी या नांवांच्या तीन पोटजाती यांच्यांत आहेत. या सर्व जातींत रोटीव्यवहार रूढ आहे, पण बेटीव्यवहार नाही.

त्रिवेदी मेवाड ब्राह्मणांत एक विलक्षण चाल आहे. लग्नाच्या पूर्वी नवरा मुलगा एका बाजेवर निजतो व नवरी मुलगी त्याच्या बेंबीला गूळ लावते. हा विधि झाल्यानंतर नवरा मुलगा लग्नमंडपांत जातो.

**दर्जी** (१५७२३). यांना 'मेराई' अथवा 'सुई' असें सुद्धा म्हणतात. यांच्यांत १२ पोटजाती आहेत. पैकी 'मेरु रामदेशी' म्हणून जी जात

आहे तींत फक्त अकराच माणसें आहेत. काठेवाडी दर्जांची संख्या ४५ च आहे. या बारा पोटजातींत रोटी-बेटीव्यवहार बंद आहेत. दक्षिण गुजराथेंत ब्राह्मणाचे अभावीं 'मारवाड' जातींत **दर्जी लग्नें लावतो.** यांच्यांत पाट लागतात. कित्येक ठिकाणीं नवऱ्याला आणि बायकोला वाटेल तेव्हा विवाहसंबंध तोडतां येतो. कडीसारख्या कित्येक ठिकाणीं नवऱ्याला बायको सोडतां येते; पण बायकोला नवरा सोडतां येत नाही.

**नागर** (८०९६). सर्व गुजराथी ब्राह्मणांत नागर ब्राह्मण आपणांस श्रेष्ठ समजतात इतर ब्राह्मण सामान्यतः परस्परबेटीव्यवहार करीत नसले तरी पंक्तिव्यवहार करतात. परंतु नागर इतर ब्राह्मणांबरोबर जेवीत नाहीत. ते इकडील चित्पावन ब्राह्मणांप्रमाणे धूर्त, हुशार व बुद्धिवान् असावे. नागरांत मुख्य सात पोटजाती आहेत. ह्यांतहि पंक्तिव्यवहार होत नाहीं. मात्र वडनगर आणि डिंगरपुरे नागरांच्या हातचें इतर ब्राह्मण खातात.

नागवंशांतील हे लोक असावे असा तिकडील लोकांचा समज आहे. प्रथम त्यांची वस्ती वडनगर येथे झाली. आमच्या बायका म्हणजे नागकन्या आहेत अशी भाषा नागर लोकांच्या तोंडून अजून ऐकू येते. नागरांच्या उत्पत्तीविषयीं अनेक दंतकथा आहेत. शिवाच्या लग्नाकरिता यांची मुद्दाम उत्पत्ति केली अशी एक दंतकथा आहे, तर दुसऱ्या दंतकथेप्रमाणे शिवाच्या यज्ञांत पुरोहिताचें काम करण्याकरिता ब्रह्मदेवाने नागर ब्राह्मण उत्पन्न केले. तिसरी दंतकथा अशी की, मांत्रिकांनी पाठलाग केलेल्या एका नागाने ब्राह्मणाचें रूप धारण केलें आणि तो वडनगराला पळून आला. तेथे त्याने एका ब्राह्मण मुलीबरोबर लग्न केलें. तिच्यापासून त्याला जीं मुलें झालीं त्यांना 'नागर' म्हणूं लागले. वडनगर बांधलें तेव्हा तेथे शंकराचें देऊळ बांधलें नाही म्हणून शंकराला राग आला. तेव्हापासून नागरांनी वडनगर शहर सोडण्याचा उपक्रम केला. आज वडनगर येथे वडनगर ब्राह्मणाचें एकच कुटुंब आहे. दुसरी एक दंतकथा अशी आहे की, पाटणचा चव्हाण राजा विशाळदेव याने विसनगर शहर वसविलें, तेव्हा एक यज्ञ केला आणि वडनगरी ब्राह्मणांना यज्ञाकरिता बोलावलें. पुढे दक्षणा देत असतां त्याने ती नाकारली. मग त्याने गावांचीं इनामपत्रें तयार करून आणि तीं विड्यांत घालून ते विडे ब्राह्मणांना दिले. या

दानाचा स्वीकार केल्यामुळे वडनगरच्या ब्राह्मणांनी त्या ब्राह्मणावर बहिष्कार घातला. त्यामुळे हे ब्राह्मण आपापल्या इनामगांवीं जाऊन राहिले. या ब्राह्मणांना विशाळनगर ब्राह्मण हें नांव पडलें. ज्या नागर ब्राह्मणांना आपल्या जातींतील बायका न मिळाल्यामुळे परजातींतील बायका कराव्या लागल्या त्यांची एक जात बनली. या जातीला 'बरड' जात म्हणतात. वडनगर ब्राह्मणांत गृहस्थ आणि भिक्षुक असे दोन भेद पडले असून त्यांच्यांत विवाहसंबंध होत नाहीत. वडनगर ब्राह्मणांत **एकापेक्षा अधिक बायका करण्याची वहिवाट नाही.**

**तपोधन** (६०७०). हे ब्राह्मण बहुधा देवळांतील पुजारी असतात. शंकराला समर्पण केलेला नैवेद्य तपोधन ब्राह्मण भक्षण करीत असल्यामुळे इतर ब्राह्मण त्यांना कमी समजतात. तपोधन ब्राह्मणांत विधवाविवाह होत असतात हेंहि त्यांच्या हलक्या दर्जाचें कारण आहे.

शिकलेले तपोधन विधवाविवाहाची रूढि मोडण्याची खटपट करीत असतात.

**गंध्रप** उर्फ गंधर्व. आम्ही पूर्वी चित्रोड नागर ब्राह्मण होतों असें हे म्हणतात. वाद्यें वाजविण्याचा हे धंदा करतात. जानवें घालतात. औदिच ब्राह्मण यांचे उपाध्ये असतात. हे लोक शाकाहारी आहेत. विधवाविवाहाची बंदी आहे. त्यांची संख्या फार थोडी असल्यामुळे **चुलतभावांत व चुलतबहिणींत लग्नें होतात.**

मुसलमान गंध्रप नांवाची एक स्वतंत्र जात आहे. या जातीची लोकसंख्या ६१७ आहे. हे बाटलेले मुसलमान असून त्यांनी सुनी पंथाचा स्वीकार केला आहे. यांच्या मुली धंदेवाईक नर्तिका व वेश्या होत असल्यामुळे या लोकांना आपल्या जातींतून बायका मिळत नाहीत; म्हणून गरीब मुसलमानांच्या किंवा **कोळ्यांच्या बायका कराव्या लागतात.** मुलींच्या कमाईवर आईबाप आपला निर्वाह करतात.

अशाच स्वरूपाची 'जागरी' म्हणून एक जात आहे. ही धर्मानें हिंदु जात असून या जातींत फक्त पंधरा पुरुष व सतरा बायका आहेत. या जातींतील स्त्रिया उघड उघड वेश्याव्यवसाय करीत असतात. गंध्रप जातींत नृत्यकला तरी आहे पण जागरी जातींत कलेचें नांव सुद्धा नाही.

मुलगी जन्मल्याबरोबर ती देखणी असली तर वेश्याव्यवसायाकरिता तिची योजना केलेली असते. मुलीच्या चौदाव्या वर्षी तरवारीबरोबर तिचें लग्न लावतात. हा लग्नसमारंभ आठ आठ दिवस चालू असतो. ब्राह्मण लग्न लावतो. ह्या लग्नानंतर त्या मुलीला आपला धंदा करण्यास मोकळीक होते. या असिविवाहाच्या पूर्वी केव्हा केव्हा लग्नाचा खर्च एखादा स्पृश्य हिंदु भेटल्यास त्याला ती मुलगी पसंत करते. या माणसाशीं लग्नाचा विधि होत नाही. परंतु या पुरुषाला त्या मुलीच्या घरीं राहावें लागतें, तिच्याकरिता कामधंदा करावा लागतो व तिचें पोषण करण्याची जबाबदारी तो पत्करतो. नवरेपणाचा कायदेशीर हक्क मात्र त्या मुलीवर त्या पुरुषाचा असत नाही. या पुरुषाबरोबर राहत असतांना सुद्धा आपला वेश्याव्यवसाय करण्यास प्रतिबंध नसतो. या वेश्याव्यवसायाच्या कमाईतून घरखर्च केला जातो. बडोदें संस्थानांत व बाहेर मिळून या जातीचीं फक्त १५० कुटुंबें आहेत. बडोद्याबाहेर पालपूर संस्थानांत व सिंध प्रांतांतील थरपारकर जिल्ह्यांत ही जात आढळते.

**रावडीया** (२०६१४). यांना जोमी असेंही म्हणतात. हे मूळचे रजपूत असावे. घरात मृत्यु झाला असतां रावळाला अन्न देणें हें पुण्यदायक समजण्यांत येतें. पाटाची व सोडचिठीची चाल यांच्यांत आहे. दिराला मेलेल्या भावाच्या बायकोशीं लग्न लावतां येतें.

**सोनी** (१२१४५). हे सोनाराचा धंदा करतात. ब्राह्मण आई व वैश्य बाप यांच्यापासून आपली उत्पत्ति झाल्याचें सोन्यांतील ‘त्रगड’ नांवाची पोटजात सांगते. यांच्या गळ्यांत जानवें असतें. ब्राह्मणाशिवाय दुसऱ्या कोणाच्या हातचें अन्न यांना चालत नाही. सोनी जातींत उपाध्ये ब्राह्मणाचें काम औदिच, सारस्वत आणि श्रीमाळी करतात. मरू, पराजिया आणि चोस्तराजिया, श्रीमाळी सोनी यांच्यांत पाटाची चाल आहे. चरोत्रीया श्रीमाळी सोन्यांत बायकोला काडीमोड करण्याचा हक्क आहे.

**वोहरी** (शेतकरी) (१६६४६). हे पूर्वीचे कुणबी शेतकरी असून चौदाव्या पंधराव्या शतकांत त्यांनी मुसलमानी धर्म स्वीकारला. यांची जन्मभाषा गुजराथी आहे. शहराची छाया ज्यांच्यावर पडली नाही अशा शेतकरी स्त्रीपुरुषांचा पेहराव हिंदूंप्रमाणेच असतो. बहुधा यांच्या जाती-

बाहेरच्या मुसलमानांबरोबर यांचा विवाहसंबंध होत नाही. बाटल्यानंतरहि हिंदूंच्या जातींचें यांनी थोडेंबहुत संरक्षण केलें आहे; कारण हिंदूंच्या वरिष्ठ जातींतील बाटलेला बोहरी कनिष्ठ जातींतील बाटलेल्या बोहऱ्याकडे आपली मुलगी देण्यास नाखूष असतो. वेळीं तो मुलगी करील पण देणार नाही. नवीन चळवळीपासून गुजराथी सोडून उर्दू भाषा स्वीकारण्याकडे यांची प्रवृत्ति होत आहे. हे सर्व सुनी आहेत. कोणी मेलें असतां यांच्या बायका हिंदूंप्रमाणे ऊर बडवून घेतात. जातजेवणावळींत हिंदु पदार्थच केले जातात. **जातजेवणाचीं बोलावणीं न्हावी करतो.**

**बोहरी** (व्यापारी) (११७०९). अकराव्या शतकांत हे लोक बाटल्याचें इतिहास सांगतो. दवे, त्रवडी, मेथा इत्यादि आडनांवें पूर्वी ते ब्राह्मण अगर वाणी असल्याचें सुचवितात. बोहरी श्रीमंत झाले म्हणजे आम्ही इजिप्त अगर अरबस्तानांतून आलों आहोंत असें म्हणूं लागतात.

बडोदें संस्थानांत दाऊदी बोहऱ्यांचा भरणा विशेष आहे. हे श्रीमंत व्यापारी असून हे एडन, झांझिबार, रंगून, सयाम, चीन इत्यादि ठिकाणीं व्यापाराकरिता जाऊन राहिले आहेत. मुलाच्या नावाच्या अंतीं जी किंवा अल्ली हे शब्द असतात. यांची जन्मभाषा गुजराथीच आहे दाऊदी बोहरी यांचीं घरें प्रशस्त असून हवाशीर असतात. **हे लोक दारू पीत नाहींत व विड्याहि ओढीत नाहींत.** यांचा धार्मिक गुरु म्हणजे मुल्ला. हा सुरत येथे असतो. मुल्ला हा सर्व तंट्यांचा निकाल करतो. त्याच्यावर मिय्यासाहेबाकडे अपिल जातें व मिय्यासाहेबांच्या ठरावाबर भाईसाहेबाकडे अपिल जातें. या सर्वांवर बाबासाहेब म्हणून एक न्यायाधीश आहे. मिय्या आणि भाई यांची गादी अहमदाबादेस असून बाबासाहेबांची गादी सुरतेला आहे. सर्व धार्मिक व व्यावहारिक कलहाच्या प्रश्नांसंबंधाने बाबासाहेबाकडून झालेला निकाल प्रमाण समजतात.

याशिवाय **सुलेमानी बोहरी** म्हणून जात आहे. सोळाव्या शतकांत एका सुरती बोहऱ्याने अरबस्थानांत प्रचारक पाठविला. तेथे त्याने पुष्कळ लोक आपल्या धर्मांत घेतले. यांना सुलेमानी बोहरी म्हणतात. कांहीं काळ गुजराथेंतील मुल्लासच ते आपला गुरु मानीत; परंतु सोळाव्या शतकाच्या अखेरीस दाऊद बीन अजब शाहा मयत झाल्यावर गुजराथेंतील बोहऱ्यांनी

दाऊद बीन कुताब शाहा यास आपला धर्मगुरु केला. दरम्यान सुलेमान नांवाचा एक मुल्ला यावनच्या लोकांनी आपला गुरु मानला. हा गुजराथेंत आला; पण त्याचा अधिकार तेथे कोणी मानीना म्हणून तो परत अरबस्तानांत गेला. ज्या गुजराथी बोहऱ्यांनी त्याचा अधिकार मान्य केला त्यांना सुलेमानी बोहरी असें नांव पडलें. या सुलेमानी बोहऱ्यांचीं लग्नें दुसऱ्या मुसलमानांबरोबर होतात.

**देशवळ** अगर दिसवळ, दिशावळ (७२१५). ही एक वाणी जात आहे. यांच्यांत तीन मुख्य पोटजाती आहेत. **लग्नांत सप्तपदीच्या ऐवजी अष्टपदीची चाल आहे.** यांचा उपाध्या देशवळ ब्राह्मण असतो. हे लोक वल्लभपंथी आहेत. सिद्ध माता हें यांचें उपास्यदैवत आहे.

**वाणी** (हिंदु ४१४८६; जैन ४४९३९). हे सर्व आपणांस वैश्य समजतात. पण यांच्यांत मुंज करण्याची रीत नाहीं. पुष्कळ जातींतून ही एक जात बनली असावी असा कित्येकांचा तर्क आहे. सर्वांचा धंदा एकच असल्यामुळे व व्यापाऱ्यांचे संघ असल्यामुळे सर्व वाण्यांचा एकोपा टिकूं शकला. गुजराथी वाण्यांत ४० पोटजाती आहेत. जैन आणि हिंदु धर्मांचें मिश्रण सर्वत्रच आढळतें. चारी दिशा भटकल्यानंतर जे गुजराथेंत येऊन राहिले त्यांना दशा म्हणूं लागले. जे चार उपदिशांत राहिले त्यांना 'विदिश' किंवा 'विश' म्हणूं लागले. दशांपेक्षा दुपटीने मोठे म्हणून विशे बनले अशी एक दंतकथा आहे. अशा समजुतीवर बनलेल्या पोटजाती पुढे इतक्या दृढमूल झाल्या, की जैन आणि हिंदु विश श्रीमाळी यांच्यांत एखादे वेळ लग्न होऊं शकेल पण विश हिंदु व दश हिंदु यांच्यामध्ये लग्न होणार नाहीं. आपल्या गांवांतील मुली त्याच गांवांतील मुलांस द्यावयाच्या, बाहेर द्यावयाच्या नाहींत; असा गुजराथेंत नियमच होऊन गेला आहे; कारण बाहेर मुली गेल्याने खेडेगांवांतील मुलांना मुली मिळेनाशा झाल्या.

**वाघरी** (३५८०५). संस्कृत वागुर = जाळें या शब्दावरून वाघरी हें नांव या जातीला मिळालें. पक्षी पकडण्याचा धंदा हे लोक करतात. धेडांहून श्रेष्ठ व कोळ्यांहून कमी प्रतीचे वाघरी समजतात. हे स्वतः आपणांस चव्हाण रजपूत समजतात. चव्हाण, चारण व कोणी या संकरजाती असाव्या असा तर्क आहे. यांच्या चार पोटजाती

आहेत. हे डुकराचें मांस खातात. यांचीं लग्नें ब्राह्मणाशिवाय होतात. काळका, बहू चारजी, खोडिआर, मेलदी, हडकाई आणि विहद या नांवांच्या देवींना ते भजतात. प्रेतें पुरण्याची व जाळण्याची दोन्ही तऱ्हा यांच्यांत आढळतात. आपल्या बायकांच्या पातिव्रत्याचा त्यांस फार अभिमान आहे. परमुलखांतून फेरी करून परत घरीं आल्यावर बायकांना विहद देवी-समोर नेतात. बरोबर रेडा अगर बकरें असतें. या देवीसमोर जीं पापें आपल्या हातून घडलीं असतील त्यांचा उच्चार प्रत्येक बायको करते. क्षुल्लक गोष्टहि सोडली जात नाही. 'एके दिवशीं मिय्याने माझ्याकडे पाहिलें; हे माते, मीं त्याला उत्तेजन दिलें असलें तर तूं मला क्षमा कर.' देवीला हें पटलें तर बरोबर आणलेला रेडा अगर बकरी कांपूं लागते आणि मग ताबडतोब त्या प्राण्याचा शिरच्छेद केला जातो. बायकोच्या सांगण्याने जर देवीचें समाधान झालें नाहीं तर तिचा राग कुटुंबांतील कोणातरी इसमास सहन करावा लागतो. तो इसम लवकरच आजारी पडतो व मरतो. विहद देवी ज्या वाघऱ्याच्या अंगांत येते त्यास बुवा म्हणतात व तेच बाकीच्या वाघऱ्यांचे उपाध्ये होतात.

**तरगळ** (५२४२). यांना भवैय म्हणतात. भव म्हणजे शंकर. त्याची बायको ती भवाई. यापासून भवाईय हा शब्द निघाला आहे. असीद नांवाचा औदिच ब्राह्मण होता; तो एका कुणब्याच्या मुलीबरोबर जेवल्या-मुळें त्यास वाळींत टाकलें. तो चांगला गाणारा होता. नृत्यगायनावर तो आपली उपजीविका करी. त्याच्या वंशजांनी तोच धंदा चालविला आणि आपली स्वतंत्र जात बनवली. व्यास आणि भवईय अशा यांच्या दोन पोटजाती आहेत; पण त्यांच्यांत रोटी व बेटीव्यवहारहि होत नाहीं. आम्हांला जानवें घालण्याचा अधिकार आहे असें ते म्हणतात; पण त्याच्या-करिता बेफिकीर असतात. गांवोगांव हिंडून उघड्या जागेवर तमाशा कर-ण्याचा यांचा धंदा आहे. आईच्या बाजूकडून तीन ते सात पिढ्या बघून त्याच्यापलीकडील पिढीशीं लग्न करण्यास यांच्यांत हरकत नाही. उमा माता आणि महादेव यांच्या मूर्ति यांच्या घरच्या देवांत असतात. बहूचार देवीच्या समोर तमाशा केल्याशिवाय हे लोक बाहेर पडत नाहीत.

**शेख** (२३१). हे पूर्वीचे हिंदु असून आता मुसलमान झाले आहेत.

बाळा महमद शहा या पिराला ते भजतात. यांच्यांत प्रेतें पुरतात व इतर बाबतींत त्यांचे आचार हिंदूंचे आहेत. **ते सुंता करीत नाहींत आणि मुसलमानांच्याबरोबर जेवीत नाहीत.** यांच्यापैकी बऱ्याच जणांनी अलीकडे स्वामी नारायण पंथाचा स्वीकार केला आणि १९३१ च्या खानेसुमारींत यांची हिंदूंमध्ये गणना झाली आहे. हिंदु ब्राह्मण व मुसलमानी फकीर दोघेहि लग्नास हजर असतात. **मुसलमान फकीर निका लावतो आणि हिंदूंचा चौरी विधि ब्राह्मणांकडून केला जातो.** यांची स्वतंत्र जात असून जातींतच लग्नें होतात.

**तळविया** (५२५६५). दुबळ्यांची ही एक पोटजात होती; पण आता ती स्वतंत्र झाली. हे गुजराथी भाषा बोलतात. विराई देवी(विहत)ची हे पूजा करतात. दररोज सूर्याची आराधना करतात व दर पौर्णिमेला बायका उपास करतात. यांच्यांत प्रेत पुरतात व त्याचें डोकें उत्तरेकडे केलेलें असतें.

**मावची** (९१९). ही जंगली जात आहे. खानदेशांत वडांग आणि सोनगड महालांत हे लोक विशेषतः आढळतात. भावी सासऱ्याकडे ठरीव मुदतीपर्यंत चाकरी करून त्याची मुलगी बायको करावयाची अशी रीत या लोकांत आहे. या चाकरीच्या मुदतींत लग्नविधि झाला नसला तरी नवरा-बायकोप्रमाणें राहून मुलेंहि त्यांना होतात. या लोकांचा भुतांवर विश्वास फार. अस्त्रंबा, गौळीमाता, वागदेव यांना हे लोक भजतात. प्रेतें पुरतात तेव्हा मयताचे स्वतः वापरण्याचे पदार्थसुद्धा त्याच्याबरोबर पुरतात. **हे गोमांसभक्षक आहेत.**

**कोतवालीया** (२२०७). हे लोक काळ्या रंगाचे असतात. रस्त्यावर अगर शेतांत भेट झाली असतां वधूवर लग्नें ठरवितात. मग मुलाचे आईबाप मुलीकडे जातात. साडेचारपासून दहा रुपयांपर्यंत देज ठरवतात व लग्नाचा दिवस ठरवतात. त्या दिवशीं पुढे मुलगी व तिचे आईबाप मुलाकडे जातात व तेथेच त्यांचें लग्न होतें. लग्नाच्या वेळीं मुलगा व मुलगी दोन माणसांच्या खांद्यावर बसतात. हीं माणसें नवरा-नवरीला खांद्यावर घेऊन नाचतात आणि नवरानवरीचे हात एकमेकांच्या हातांत घालतात. याचेंच नांव लग्न. नाचणें व दारू पिणें हा कार्यक्रम लग्नाच्या आधी व मागून असतो. **आतेबहिणीबरोबर व मामेबहिणीबरोबर लग्नें लावितात**

परंतु मावसबहिणीबरोबर लावीत नाहीत. नवरा-बायकोचें न पटल्यास नवरा बायकोस घराबाहेर काढतो. बायकोच नवऱ्यास सोडण्यास तयार झाली तर ती लग्नांतील देज परत देते व निघून जाते.

**गामिट** (५९२१३). यांना गांमडा असेंहि म्हणतात. हे गोमांस अगर मेलेल्या जनावरांचें मांस खात नाहीत. वागदेव, संम्लदेव, देवली माता यांची ते पूजा करतात. यांचेच लोक उपाध्येपण करतात; यांना ब्राह्मण लागत नाही. ताडाच्या झाडावर मुलगा चढूं लागला म्हणजे तो लग्नास योग्य झाला असें समजतात. यांच्यांत विधवांचा पाट लागतो; परंतु नवराहि विधुरच असला पाहिजे अशी शर्त असते.

**वसवा** (१७५२७). ही एक जंगली जात आहे. यांना वसवडा असेंहि म्हणतात. बायकोकरिता नवीन वस्त्र खरेदी केलें म्हणजे नवरा तें वस्त्र फाडून एक तुकडा दिवसा आपल्या कंबरेच्या करगोट्यांत घालून लोंबत ठेवतो आणि रात्रीं त्याच तुकड्याने कमरेखालचा भाग झाकून घेतो ही विशेष चाल आढळते. लग्न झाल्यावरच बायका चोळी घालतात. मुलगा सज्ञान झाला म्हणजे त्याचे आईबाप वधूशोधाकरिता मुलास बरोबर घेऊन घराबाहेर पडतात. आईबापांनी दाखवलेली मुलगी मुलास पसंत पडल्यास ताबडतोब ताडी विकत आणतात आणि मुलीच्या आईबापांसह सर्व जण पितात. बात्तीस ते तीस रुपयेपर्यंत मुलीच्या बापास देज देण्यास मुलाचा बाप तयार असतो. नंतर लग्नाचा एक दिवस निश्चित करतात आणि मुलगा व त्याचे आईबाप घरीं परततात.

लग्नाच्या आधी एक दिवस वरपक्षाची मंडळी रात्रभर गांवाच्या बाहेर राहून नाचत असतात. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुलीकडे सर्व जण जातात. तेथे गेल्यावरहि वरपक्ष व वधूपक्ष, मध्यें एक लांब बांबू ठेवून नाचूं लागतात, कांहीं वेळ नाच झाल्यावर मुलाचा बाप मुलीच्या बापाला एक दारूची बाटली व दोन पैसे देतो. ते मिळाल्याबरोबर मध्यें असलेला बांबू काढून टाकतात आणि दोन्ही बाजूंची मंडळी एकत्र नाचूं लागतात. नंतर मुलगा मुलीला साडी देतो. त्या साडीच्या पदराच्या टोकाला एक रुपया व चार पैसे बांधलेले असतात. नंतर मुलामुलीला तेलहळद लावून दोन माणसें त्यांना आपल्या खांद्यावर बसवितात. त्या वेळीं मुलाच्या हातांत तरवार असून

मुलीच्या हातांत तरवारीचें झाकण असतें. नवरा-नवरीला खांद्यावर घेऊन कांहीं वेळ नाचल्यावर सर्व जण जेवावयास बसतात. जेवण झाल्यावर वधूला घेऊन नवरा आपल्या वऱ्हाड्यांसह घरीं परततो. नवव्या दिवशीं मुलीच्या गांवांतील शिष्ट मंडळी नवऱ्याच्या गांवीं जातात. तेथे **नवऱ्या मुलाच्या घरासमोर न बोलतां नाचूं लागतात.** मुलाच्या बापाने एक रुपया व दारूची एक बाटली देतांच नाचणें थांबतें. मग परस्परांचें संभाषण सुरू होतें. जेवण झाल्यावर मुलीला घेऊन सर्व जण आपल्या गांवीं परत फिरतात.

यांच्यांत प्रेतें जाळतात. तिरडीवर ठेवलेलें प्रेत चितेभोवती सात वेळां फिरवितात. मृताच्या तोंडांत अन्न घालून त्याचीं नित्याचीं हत्यारें वगैरे त्याच्या जवळ ठेवतात. अग्नि पेटवून सर्व जण स्नान करतात व माघारे फिरतात. संध्याकाळीं पुन्हा सर्व एके ठिकाणीं जमून दारू पितात व जेवण करतात. इतकें झाल्यावर मृताचा नातेवाईक शेजारीं असलेल्या झाडाला बाण मारतो, आणि अशा रीतीने मृताची क्रिया संपली असें जाहीर करतो.

**कोकणे** (७९५२). हे लोक मराठी व गुजराथी अशी मिश्रभाषा बोलतात. त्यांच्या नांवावरून ते कोकणांतून तिकडे गेले असावे असा तर्क आहे. मोलमजुरी व शेतकीवर ते आपला निर्वाह करतात. बैल नसल्यामुळे स्वतः नांगर ओढतात; म्हणून त्यांस हातोडिया म्हणतात. ब्रह्म आणि वागदेव यांना ते भजतात. सामडी नांवाच्या झाडाजवळ एक दगड असतो; शेजारीं मातीचा घोडा, दिवा व निशाण असतें; या दगडाला ब्रह्मदेव म्हणतात. वागदेवाचा एक लाकडी खांब असून त्यावर एक वाघाचें चित्र असतें; शेंदूर लावलेला असतोच. कोकण्यांना ब्राह्मणाची जरूरी लागत नाही.

**भिल्ल** (५४५४२). हे लोक गाढव, घोडा, उंट व माकड यांचें मांस खात नाहीत; तसेंच उंदीर व सापहि त्यांना चालत नाहीत. दरवडे घालणें हा यांचा धंदा. माता देवीचे ते उपासक आहेत; तथापि चंद्रालाहि ते भजतात. भुतांखेतांवर त्यांचा विश्वास आहे. भुतांना ते मातीचे घोडे, मातीचीं भांडीं वगैरे देतात. बायको वाटेल तेव्हा एक नवरा सोडून दुसरा

करते. नवीन नवऱ्याला पहिल्या नवऱ्याचा लग्नाचा खर्च द्यावा लागतो. भिल्लासारख्या जंगली जाती एकंदर अठरा आहेत.

**पोमला (२५).** ही एक चमत्कारिक जात बडोदें शहरांत आढळली. कांहीशी तेलगूसारखी हे भाषा बोलतात. खेळाचीं चित्रें, केरसुण्या, पाट्या व टोपल्या करून व विकून हे आपला निर्वाह करतात. दोनशे वर्षांपूर्वी मद्रास इलाख्यांतून हे गुजराथेंत आले असावे असें वाटतें. **यांच्यांत अशी एक चाल आहे कीं, बायको बाळंतीण व्हावयाची असली म्हणजे बाळंतिणीचे सर्व उपचार नवरा करून घेतो.** त्यावरून अशी एक म्हण पडली आहे की, '**पोमली जनें अने पोमलो खाई.**' बायको बाळंतीण होतांच कडू लिंबाच्या पाल्याचा रस व तेल तिला पिण्यास देतात. नंतर त्या बाईला घराच्या बाहेर काढतात. पांच दिवसपर्यंत ती घरांत शिरत नाही. **या पांच दिवसांत नवराच बाजेवर पडून बाळंतिणीचीं नेहमींचीं औषधें घेतो व सर्व उपचार करून घेतो.** आम्ही नुसती रूढि म्हणून पाळीत नाहीं, आमचें त्या वेळीं खरोखर पोट दुखूं लागतें, असें ते म्हणतात ! ही एक माता देवीची कृपा आहे असें ते समजतात. यांच्यापैकी कित्येक लोक विस्तवावर चालतात. **पोमलांना पाट लावणें फारसें पसंत नाही. पाट लावणारावरून लक्ष्मी मातेची कृपा उडते** अशी त्यांची समजूत आहे. वर सांगितलेली बाळंतपणाची चाल आता नाहीशी होत आहे.

**ओड (हिंदु २०१८).** जमीन खणणें हा या जातीचा धंदा. पाटण येथील सहस्रलिंगाचा तलाव खणण्याकरिता सिंगराज जयसिंगाने यांना आणलें अशी दंतकथा सांगतात. या जातींतील बरेच लोक कर्नाटकी आहेत. ओद्र किंवा ओरिसा प्रांतांतून आले असें त्यांच्या नांवावरून म्हणतां येईल. ते स्वतः आपण क्षत्रिय असल्याचें सांगतात. सगरपुत्र भगीरथ यांचे आपण वंशज आहोंत असें ते म्हणतात. रासमालेंतील हकिकतीवरून असें दिसतें की, सिद्धराज याने ओडांना माळव्यांतून आणलें. पुढे त्यांच्यांतील एका सुंदर स्त्रीवर त्याचें मन गेलें. या बाईने त्याला नाकारल्यावर सिद्ध राजाने तिचा छळ चालवला. तेव्हा तिने आत्महत्या केली. मरतांना तिने राजाला शाप दिला आणि सांगितलें की, 'तळ्यांत पाणी राहणार नाहीं; इतःपर

कोणतीहि ओडाणी स्वरूपवान असणार नाही.' ही दंतकथा खरी खोटी कशीहि असो; पण एवढें सत्य आहे की, ओड जातीच्या स्त्रिया कुरूप असतात. **अनेक जातींतील लोक या जातींत सामील होतात.** परजातीचा मनुष्य ओड जातींत घ्यावयाचा म्हणजे त्याचा क्षौर करतात. लिंबाच्या जळत्या काठीने त्याच्या जिभेचें टोक डागतात व मग त्याला तीर्थ घ्यावयास देतात. बायकोचें जात्यंतर व्हावयाचें असल्यास तिचा क्षौर करीत नाहीत परंतु तिच्या चोळीबांगड्या काढून घेतात. गुजराथी ओड हे दक्षिणेंतून आल्याचें सांगतात. यांपैकी कांही जण रामदासी पंथाचे आहेत. **भावाची विधवा दिराची बायको** होते. यांच्यांत सोडचिठ्ठी द्यावयाची झाली म्हणजे नवरा बायकोला सर्व लोकांसमक्ष आई किंवा बहीण अशी हाक मारतो. असें म्हणतांच तीं परस्पर विवाहबंधनांतून मुक्त होतात.

**ममन** (१३८२९). हा शब्द मोमिनपासून बनला आहे. हे शियापंथी आहेत. पूर्वीं हिंदु होते. हे कुराण न वाचतां इमामशहाचें धर्मपुस्तक वाचतात आणि **हिंदु देवांची पूजा करतात. हे हिंदूंसारखा पोशाख करतात. हे शाकाहारी आहेत. सुंता करतात व प्रेतें पुरतात. हिंदूंचींच नांवें ठेवतात. मुसलमान रिवाजाप्रमाणें लग्न लावून पुनः कित्येक मोमिन ब्राह्मणाला बोलावून हिंदु पद्धतीने लग्न लावतात.** पालनपोर व बडोदें येथील मोमिनांमध्ये बेटीव्यवहार होत नाही. हल्ली हिंदु होण्याकडे प्रवृत्ति होत आहे. नवरा अगदी तंतोतंत मुसलमान असेल तर लग्न झालेल्या मुलींना नवऱ्याकडे पाठवीत नाहीत येथपर्यंत कित्येकांची मजल गेली आहे.

**मोलेसलाम** (१०८६२). ही एक अर्धवट हिंदु व अर्धवट मुसलमान अशी जात आहे. महमद टेगडाच्या कारकिर्दींत (सन १४५९ ते १५१३) हे लोक बाटले गेले. मौला इस्लाम याचें अपभ्रष्ट रूप मोलेसलाम आहे. परजातीचा मनुष्य मुसलमान झाल्यावर त्याला मोला म्हणण्याची वहिवाट होती. मोलेसलाम इतर मुसलमानांबरोबर जेवतात; पण घरीं ते शाकाहारीच असतात. काजी आणि मौलवी यांच्याबरोबर ब्राह्मण भिक्षुकालाहि ते आश्रय देतात.

**मातिया** (३५५८). पूर्वीचे लेवा कुळंबी असून पुढे मुसलमान बनले.

सुमारें तीनशे वर्षांपूर्वी कांहीं लेवा कुळंबी काशीस जात असतां वाटेंत मुसलमानी साधू इमामशहा याची गांठ पडली. इमामशहाने तेथेच काशी दाखवण्याचा चमत्कार केला. त्यामुळे पुढे न जातां, ते लोक इमामशाहाचे अनुयायी बनले. यांनी बऱ्याच मुसलमानी चाली घेतल्या आहेत, तरी मद्य-मांस यांस वर्ज आहेत. **लसूण-कांदेसुद्धा यांस चालत नाहींत, मग मासे चालणार नाहींतच.** हे **अथर्ववेदी** असून आपणांस सत्पंथी म्हणवतात. मुसलमान पिरास भजतात. यांच्यांतही विधवा भावजय दीराबरोबर लग्न करते. **प्रथमवराला पाटाची बायको करावयाची असल्यास प्रथम शमी झाडाशीं लग्न लावावें लागतें.** १८८० सालापासून या लोकांपैकी बरेच हिंदु झाले आहेत. तथापि लेवा कुळंबी त्यांच्याबरोबर जेवणास अजूनहि कबूल होत नाहीत.

**मुसासूहाक** म्हणून एक फकिराची जात आहे. इ. स. पंधराव्या शतकाच्या शेवटीं मुसा नांवाचा फकीर होऊन गेला, त्याच्यावरून त्याच्या अनुयायांना वरील नांव पडलें. हा मुसा बायकांचा पेहराव करीत असे. कारण देव व मनुष्याचें नातें पतिपत्नीप्रमाणे आहे असें तो मानी. यामुळे या पन्थाचे सर्व लोक लग्न झालेल्या बायकोसारखें नेसतात. दाढी करीत नाहीत; बायकाचे दागिने अंगावर घालतात. हे सुनी पन्थाचे असून लग्न कधीहि करीत नाहीत.

**बरोत** ही एक भाटांची जात आहे. पुराणांतील गोष्टींवरून काव्य करणें हा त्यांचा धंदा. गुजराथी भाट अलाहाबाद आणि मारवाड येथील मूळचे ब्राह्मण असावे, असें कित्येकाचें म्हणणें आहे. त्यांच्या गळ्यांत जानवें असतें व ब्राह्मणांप्रमाणे त्यांच्यांत शाखाभेदहि आहे. निरनिराळ्या शाखांच्या लोकांत रोटीबेटीव्यवहार होत नाही, तरी पण वाणी आणि कुळंबी यांच्या हातचें अन्न चालतें. यांच्या लग्नांतील चालीरीती कुळंब्यांप्रमाणेच आहेत. ब्रह्मभाटांशिवाय इतरांत पाट लागतात. आपणांला ते कुलीन समजतात. ते विधवाविवाह निषिद्ध मानतात. नवऱ्याला बायको सोडतां येते; पण बायकोला नवरा सोडतां येत नाही. पुष्कळ जातींच्या वंशावळी भाटांनी जतन करून ठेवल्या आहेत. पूर्वी दोन राजांमध्ये तह

झाला, तर त्या तहाप्रमाणे वागण्याची खात्री पटावी म्हणून भाटांना जामीन देण्याची वहिवाट असे. त्याचप्रमाणे सामान्य माणसांच्या व्यवहारांतहि ते जामीन राहत. भाटांवर सर्वांचा पूर्ण विश्वास असे. कराराप्रमाणे वागावयाला लावण्याचें शस्त्र त्यांच्या हातांत असे. तें त्रागा करणें व धरणें धरणें हें होय. करारापासून परावृत्त होणाराकडे जाऊन ते आपला किंवा कुटुंबांतील एखाद्या माणसाचा प्राण देत. असें केलें असतां देवाचा कोप गुन्हेगारावर ओढवतो व त्याचा नाश होतो, अशी समजूत असे. धरणें धरावयाचें म्हणजे ज्याने गुन्हा केला असेल, त्याचे घरासभोवार भाटांचा गराडा घालून आपण स्वतः उपाशी राहावयाचें व घरांतील माणसांसहि उपास पाडावयाचा. भाटांचा पूर्वीचा धंदा आता बसल्यामुळे ते नवीन धंदे करूं लागले आहेत.

**बेहलिंब** हे पूर्वीचे रजपूत असून आता मुसलमान झाले आहेत. महमद बेहलिंब तुर्काने मारवाडी हिंदु राजांचा पराभव करून मुसलमानी राज्य स्थापलें त्या वेळेस रजपूत कुटुंबें मुसलमान झालीं, त्यांचेच बेहलिंब हे वंशज होत. यांच्यांत लग्नविधि अद्यापि ब्राह्मणी व मुसलमानी पद्धतीप्रमाणे करितात. मुलीच्या घरीं तरवार पाठवून तिला समारंभाने नवऱ्याच्या गांवीं आणण्याची रजपुतांची चाल या लोकांत अद्यापि चालवली जाते.

**काठी** (३५२५). काठेवाडांत या लोकांची वस्ती फार आहे. मध्य एशियांतून मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळे चौदाव्या शतकांत ते इकडे आले असावे, असें म्हणतात. **हे सूर्योपासक आहेत. हल्ली ते हिंदूंचे देव पुजतात व ब्राह्मणांनाहि मानतात. उत्तरक्रियेच्या वेळीं कावळ्याला पिंड न देतां बगळ्यांच्या** (plover) **जातीच्या पक्ष्यांस** देतात. या जातीच्या पक्ष्यांबद्दल काठी लोकांत आदरभाव आहे. कोणत्याहि हिंदूच्या हातचें यांना अन्न चालतें पुनर्विवाह शास्त्रनिषिद्ध नाही, परंतु क्वचित् करण्यांत येतो. मात्र धाकटा दीर असल्यास त्याच्याबरोबर लग्न केलें पाहिजे असा नियम आहे. इतर हिंदूंप्रमाणे **हे सुतक पाळीत नाहीत; त्याचप्रमाणे बायका विटाळशा बसत नाहीत.**

# वडोदें खानेसुमारींतील माहिती.

## परिशिष्ट

### भाषा.

संस्थानची लोकसंख्या २४४३००७ आहे. त्यांपैकीं २११९५५१ माण-सांची गुजराथी व ३५५३२ लोकांची मराठी जन्मभाषा आहे. गुजराथी जन्मभाषा असणाऱ्या लोकांपैकीं फक्त ११६९ इसमांना मराठी बोलतां येतें. ह्या लोकांत ८८ भिल्ल, २१७ हिंदी भाषेचे लोक व ३ कच्छी मराठी बोलूं शकतात. ज्यांची जन्मभाषा मराठी आहे अशापैकीं १६१३९ इस-मांना गुजराथी, तिघांना कच्छी व ९२० जणांना हिंदी बोलतां येतें. संस्थानांत मराठी भाषेची वाढ इतर भाषांच्या मानाने कमी आहे. ह्याचें कारण दक्षिणी लोक संस्थानांतून कमी होत आहेत, असें खानेसुमारीकारांचें म्हणणें आहे. सबंध संस्थानांत एकंदर ३७ मुख्य भाषा व १९ पोटभरू अगर प्रांतिक भाषा (बोल्या) बोलल्या जातात. ओडकी व पेंढारी ह्या जिप्सी लोकांच्या भाषा होत मराठी जन्मभाषा असणारांची एकंदर संख्या ३५५३२ असल्याचें वर आलेंच आहे. ह्यांपैकीं १९०८६ पुरुष असून १६४४६ स्त्रिया आहेत. पुरुषांमध्ये ९८६७ व बायकांमध्ये ६२७२ इतक्या जणांना गुजराथी चांगलें बोलतां येतें. ह्यावरून जवळ जवळ सहा हजार दक्षिणी कुटुंबें गुजराथेंत स्थायिक वस्ती करून राहिल्यासारखीं आहेत. बायका परकी भाषा चांगल्या रीतीने बोलूं लागल्या म्हणजे पुढे मुलांची तीच जन्मभाषा बनण्याचा संभव असतो. ह्या दृष्टीने प्रस्तुत घटनेकडे बघणें अवश्य आहे. गुजराथ महाराष्ट्राला जवळ असल्याकारणाने मराठी कुटुंबें गुजराथी बनलीं नाहीत. नाहीतर तंजावराकडे गेलेल्या दक्षिणी कुटुंबांप्रमाणे गुजराथकाठेवाडकडील दक्षि-ण्यांची स्थिति झाली असती. तथापि भाषेच्या दृष्टीने गुजराथ काठेवाडा-कडील दक्षिणी कुटुंबांची स्थिति भीतिप्रद नाही असें म्हणतां येणार नाही. बायकांना गुजराथी वाचतां येऊं लागलें की गुजराथी पुस्तकेंच घरांत येणार आणि त्या प्रमाणांत मराठीची पिछेहाट होणार हें उघड आहे. ज्यांची जन्मभाषा गुजराथी आहे, अशा स्त्रिया मराठी बोलूं लागल्या तर ती गोष्ट महत्त्वाची गणली जाईल. परंतु अशा स्त्रियांचें प्रमाण फार थोडें आहे.

हजार पुरुषांबरोबर ३९१ बायका असें हें प्रमाण आहे. गुजराथी स्त्रियांना मराठी बोलावयास लावण्याचा प्रयत्न आमच्या दक्षिणी स्त्रियांनी केला पाहिजे. मराठी जन्मभाषेचे लोक बडोदें शहर व दक्षिण गुजराथ ह्यांमध्येच विशेषतः असल्याचें आढळतें. हिंदुस्थानाबाहेरील भाषा बोलणारांची संख्या सर्व संस्थानांत ३९७ हून अधिक नाही.

जन्मभाषेहून दुसरी भाषा व्यवहारांत नेहमी बोलण्यांत येत असेल तरच तिचा विचार खानेसुमारींत केला आहे. ह्याचमुळे इंग्रजी भाषेचा विचार झालेला नाही. इंग्रजी भाषा पुष्कळांना समजत असली तरी नित्याच्या व्यवहारांत तिचा कोणीच उपयोग करीत नाही. गुजराथेंत गुजराथी ही तेथील लोकांची मुख्य व जन्मभाषा होय. अर्थात् त्या लोकांना दुसऱ्या भाषा बोलण्यास शिकण्याचें प्रयोजन नाही; परंतु बाहेरून आलेल्या लोकांना स्थानिक लोकांची भाषा शिकणें भाग पडतें. १००० गुजराथी जन्मभाषा असलेले लोक घेतले तर त्यांत ९९३९ लोकांस दुसरी भाषा मुळींच बोलतां येत नाही; बाकी ५१ लोक हिंदुस्थानी, ६ मराठी व ४ कच्छी बोलूं शकतात. ह्याच्या उलट मराठी भाषेच्या लोकांत शेंकडा ४६ उत्कृष्ट गुजराथी बोलतात.

हिंदुस्थानांत आर्यांच्या पूर्वी जे डोंगरी किंवा जंगली मूळचे लोक होते त्यांची भाषा कोणती होती, हें समजण्यास आज मार्ग नाही. त्यांनी आर्यांची भाषा अपभ्रष्ट स्वरूपांत आज आत्मसात् केलेली दिसते. ते आज जी भाषा वापरतात तींत कित्येक वैदिक शब्द आढळतात. ह्यावरून वैदिक आर्यांच्या सहवासांत हे लोक असावे असें दिसतें. तथापि या अनार्य लोकांची बोली लुप्त होत चालली आहे, असा सामान्यतः समज आहे. गुजराथेंतील वन्य जाती गुजराथी बोलतात; महाराष्ट्रांतील वन्य जाती मराठी बोलतात. हे वन्य लोक आपला मूळचा धर्म सोडून हिंदू बनत आहेत. ही क्रांति सावकाश होत असल्यामुळे लोकांच्या नजरेंत भरत नाही. खालील कोष्टकावरून वन्य जाति व त्यांची भाषा ह्यांसंबंधी बरीच माहिती समजेल.

| वन्य जातीचें नांव | त्यांच्या भाषेचें नांव | त्यांची लोकसंख्या | हिंदु म्हणून सांगणारे | जातभाषा बोलणारे | इतर भाषा बोलणारे |
|---|---|---|---|---|---|
| १ बावचा | बावची | ११८६ | ११८६ | ५५८ | ६२८ |
| २ भिल्ल | भिल्ली | ५४५४२ | ५३२३५ | ३२८२७ | २१७१५ |
| ३ चोध्रा | चोध्री | ३८७८६ | २९७३६ | ३७७४६ | १०४० |
| ४ धोडिया | धोडिया | २६१३२ | २५४१४ | २२२१० | ३९२२ |
| ५ गामीत | गमताडी | ५९२१३ | ३३२१० | ५९२०९ | ४ |
| ६ काथोडिया | काथोडी | ५५१ | ३३३ | ४२८ | १२३ |
| ७ कोकणे | कोकणी | ७९५२ | ६४४९ | ७९३० | २२ |
| ८ कोल्घे | कोल्घी | ९९१ | ७९८ | ८२० | १७१ |
| ९ कोतवालिया | कोतवाली | २२०७ | ११५६ | २०६५ | १४२ |
| १० मावची | मावची | ९१९ | ९०५ | ९२४(?) | ० |
| ११ नायकडा | नायकडी | ११८०२ | ११६६२ | ४१३० | ७६७२ |
| १२ वालवी | वालवी | १३२ | १०१ | २९ | १०३ |
| १३ वार्ली | वार्ली | ३६८ | १८७ | ४८३(?) | ० |
| १४ वासवा | वासवी | १७५२७ | १३२९० | ११०२५ | ६५०२ |

वरील कोष्टकावरून वन्य जाती हिंदुधर्मांत कशा संक्रमण होत आहेत हें दिसून येईल. हें हिंदूकरण अन्य कारणांहून अगदी वेगळ्या स्वरूपाचें आहे हें सहज ध्यानांत येईल. धर्मतत्त्वें अगर उपासनाप्रकार हिंदुत्वांत येण्यास प्रतिबंधक होत नाहीत. एकाच गोष्टीचा हेका सोडणें म्हणजे हिंदु होणें होय. तसेंच अशिक्षित लोकांच्या बोलीचा हळूहळू कसा लोप होत जातो हेंहि समजण्यास वरील कोष्टक उपयुक्त होईल. वार्ली आणि मावची ह्यांच्या लोकसंख्येपेक्षा त्यांची भाषा बोलणारांची संख्या अधिक आहे. ही कदाचित् गणकांची चूक असेल अथवा दुसऱ्या जातींचे लोक कांही कारणांमुळे ह्या जातींची भाषा बोलूं लागले असावे. एकंदर वन्य जातींच्या लोकांपैकी शेकडा तीस लोकांना स्वतःची भाषा नाही; उदा० दुब्ळे, धनका, तडवी, तळाविया ह्या जातींची स्वतःची अशी भाषा नाही. वरील जातींच्या लोकांची एकंदर संख्या ८९७३३ आहे. ह्यांपैकी ८९४९२ लोक आपल्यास हिंदु म्हणवितात. हिंदु म्हणून सांगूनसुद्धा गुजराथीच्या ऐवजी स्वभाषेला चिकटून राहणाऱ्या चोधासारख्या जाती आहेत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. बडोदें संस्थानांत १८२६३० मुसलमान आहेत; त्यांपैकी ११०८५० गुजराथी ही मातृभाषा असणारे आहेत. ह्यावरून ऊर्दूचें बंड संस्थानांत नाही असें दिसतें. पुढील खानेसुमारींत ही संख्या कमी होते कीं काय ह्या गोष्टीकडे लक्ष जाणें स्वाभाविक आहे.

संस्थानांत मराठी बोलणारे अनेक जातींचे लोक आहेत. त्या जाती येणेंप्रमाणे— १ भंडारी, २ ब्राह्मण (देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, देवरुखे, यजुर्वेदी, शेणवी), ३ धीवर, ४ धनगर, ५ घडसी, ६ गुरव, ७ होलर, ८ कासार, ९ कोकणी कुणबी, १० कोमटी, ११ महार, १२ मराठे, १३ प्रभु, १४ शिंपी, १५ सोनार, १६ विदूर.

गुजराथी भाषा नागरी अपभ्रंशापासून निघाली असें म्हणतात. ह्या नागरी अपभ्रंशाचें शौरसेनेशीं फार साम्य आहे. नागर ब्राह्मणांवरून भाषेला नागरी अपभ्रंश ही संज्ञा प्राप्त झाली. गुजराथी भाषेला जें ग्रांथिक स्वरूप आलें त्याला नागर ब्राह्मणांचें ग्रंथकर्तृत्व प्राधान्येंकरून कारणीभूत झालें आहे. गुजराथी भाषेंत पहिलें संस्कृत व्याकरण इ. स. १९३४ सालीं देवसुंदराच्या एका शिष्यानें लिहिलें. इंग्रजीप्रमाणे गुजराथींत अॅ व ऑ हे

उच्चार आहेत. संस्कृत **अ** चा उच्चार गुजराथींत **ओ** करतात. ही लकब बंगाली, उडीया, ल्हांडा व मराठी भाषांतहि आढळते. पश्चिम हिंदींत भाई असा उच्चार करतात तर गुजराथींत भै (-ह्रस्व ऐ) असा उच्चार होतो. गुजराथीने ही लकब ल्हांडा भाषेपासून उचलली असावी. तसेंच श, ष, स ह्यांचा गुजराथींत सिंधी व बंगालीप्रमाणे श उच्चार करतात. हा मागधीचा परिणाम असावा. सुरतेकडील गुजराथी मात्र **श**चा उच्चार **स** करतात. गुजराथी ग्रांथिक भाषेंत महाप्राण जतन करून ठेवलेले आढळले, तरी बोलींत त्यांचा संक्षेप केला जातो. काश्मिरी उच्चारांचा हाच विशेष आहे. पूर्वबंगाली सुद्धा ह्या बाबतींत ह्याच वर्गांत पडते; उदा० घर–गर; घोडा–गोरा. **हाथे**च्या ऐवजीं गुजराथी मनुष्य **हाते** बोलतो. **अमे** उच्चार बरोबर की **अम्हे** बरोबर ह्याविषयी गुजराथी विद्वानांत मोठाच वाद चालू आहे. उत्तर गुजराथींत व भिल्ल भाषेंत **स** चा **ह** उच्चार करतात; उदा० माणस–माणह; सूरज–हूरज. पैशाची भाषेची ही लकब पूर्वबंगाली व आसामी भाषांनीहि उचलली आहे; उदा० श्वशुर–होउर, सकल–होगल. वर्णव्यत्यासाचीं उदाहरणें गुजराथींत सांपडत नाहींत असें नाहीं; उदा० कुकरी–कुकीर; घरे–घेर. अशी एक कल्पना आहे की, मध्यदेश त्याच्या भोंवतीं तीन बाजूंस असलेले प्रांत– पंजाब, सिंध, गुजराथ, राजपुताना, औध, बिहार वगैरे– ह्यांच्या आर्योद्भव पण भिन्न भाषा होत्या. दोन्ही ठिकाणीं आर्यांच्याच टोळ्यांची वसाहत होती; परंतु पाठीमागून मध्यदेशांत आलेल्या आर्य लोकांनी कडेवरच्या लोकांस जिंकून त्यांच्यामध्ये आपली भाषा घुसडली. म्हणून मध्यदेशाच्या लोकांच्या भाषेचा परिणाम गुजराथी भाषेवर झाला आहे. ग्रियर्सन साहेबांचें हें मत श्री. सत्य मुकर्जी यांस मान्य नाही.

मध्यदेशांतील लोकांनी कडेवरच्या लोकांस जिंकिलें ह्याला ऐतिहासिक पुरावा नाहीं; असलाच तर तो उलट आहे. रामप्रसाद चांदा म्हणतात की, 'पूर्वपंजाब अथवा प्राचीन उशीनर हा सीमेवरील प्रांत नसून आर्यावर्तांत मोडत होता. ऐतरेय ब्राह्मणांत कुरु, पांचाल, उशीनर वगैरे लोक मध्यदेशांत स्थायिक झाले होते असें म्हटलें आहे. आर्य लोकांनी येथील मूळच्या लोकांना जिंकिलें ही कल्पना चुकीची व निराधार आहे.

गुर्जर लोक पश्चिम पंजाबकडून अरवली ओलांडून माळवा पायाखाली घालून गुजराथेंत आले असें मानण्यास आधार आहे. त्या वेळीं गुजराथेवर यादवांचें राज्य होतें असें म्हणतात. तात्पर्य, गुर्जरांच्या भाषेवर दुसऱ्या जेत्या लोकांच्या भाषेचा परिणाम झाला हें म्हणणें बरोबर नाही. ह्यामुळे मारवाडी ही गुजराथीचीच पोटभाषा मानणें युक्त आहे. कच्छी भाषाहि गुजराथीची पोटभाषा आहे असें गुजराथी भाषापंडितांचें म्हणणें आहे. कच्छीचे दोन भेद आहेत– १ भाट्या कच्छी, २ कायस्थी कच्छी. ह्या दोनहि भाषा काठेवाडी गुजराथीला जवळ आहेत. परंतु प्राकृतांत वर्ण द्वित्त झालेला आढळतो, त्या ठिकाणीं अर्वाचीन भाषांत एक वर्ण लोप पावून पाठीमागला स्वर दीर्घ होतो; तथापि सिंधींत व कच्छींत वर्णलोप होतो खरा पण मागील स्वराला दीर्घत्व येत नाही; उदा० हत्थ (हात) = हात (मराठी) = हथ (कच्छी); कन्न = कान (मराठी) = कन (कच्छी). ह्यास्तव कच्छी भाषा वायव्येकडील भाषांशीं संलग्न आहे. गुजराथीची ती पोटभाषा नाही असें श्री. मुकर्जी यांनी प्रतिपादन केलें आहे.

# भावनगर संस्थानची खानेसुमारी

## लोकसंख्या व संतति

भावनगर संस्थानची १९३१ सालची खानेसुमारी संस्थानच्या अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदारीवर केली होती. तिचा वृत्तांत त्यांनी स्वतंत्र रीत्या प्रसिद्ध केला आहे तो फारच अभ्यसनीय झाला आहे. ह्यातील कांही महत्त्वाच्या बाबींचा येथे विचार करावयाचें योजिलें आहे. प्रथमतः स्त्री-पुरुषजातिविषयक गोष्टी विचाराकरिता घेऊं.

स्त्रीपुरुषजातीसंबंधाने पहिला सिद्धान्त असा आहे की, ह्या दोन जाति सर्वत्र समसमान नसतात; कित्येक देशांत स्त्रिया अधिक तर कित्येकांत पुरुषजात स्त्रीजातीहून अधिक असते.

निरनिराळ्या देशांतील व प्रांतांतील पुरुषांच्या मानाने बायकांची संख्या खाली दिली आहे:—

| देश | खानेसुमारी वर्ष | १००० पुरुषांशीं स्त्रियांची संख्या |
|---|---|---|
| जर्मनी | १९२१ | १०९९ |
| इंग्लंड | ,, | १०९६ |
| स्कॉटलंड | ,, | १०८० |
| डेन्मार्क | ,, | १०५३ |
| ऑस्ट्रेलिया | ,, | ९६७ |
| अमेरिका | ,, | ९६१ |
| कानडा | ,, | ९४० |
| कोचीन | १९३१ | १०४३ |
| मद्रास | ,, | १०२५ |
| बिहार ओरिसा | ,, | १००५ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ,, | ९९८ |
| त्रावणकोर | ,, | ९८७ |
| हैदराबाद | ,, | ९५९ |
| ब्रह्मदेश | ,, | ९५८ |
| म्हैसूर | ,, | ९५५ |
| भावनगर | ,, | ९४५ |
| बडोदें | ,, | ९४२ |
| हिंदुस्थान | ,, | ९४० |
| बंगाल | ,, | ९२४ |
| संयुक्तप्रांत | ,, | ९०२ |
| मुंबई | ,, | ९०१ |

| | | |
|---|---|---|
| आसाम | १९३१ | ९०० |
| अजमीर | ,, | ८९२ |
| ग्वाल्हेर | ,, | ८८७ |
| काश्मीर | ,, | ८८१ |
| कुर्ग | ,, | ८०३ |
| दिल्ली | ,, | ७२२ |
| बलुचिस्थान | ,, | ७१७ |
| अंदमान निकोबर | ,, | ४९५ |

वरील कोष्टकावरून असें दिसतें की, पश्चिम युरोप व हिंदुस्थानांतील कोचिन, मद्रास व बिहार हे प्रांत खेरीज करून बाकी बहुतेक ठिकाणीं स्त्रिया पुरुषांहून कमी आहेत. स्त्रियांची संख्या कमी असण्याचीं अनेक कारणें आहेत. तथापि स्त्रिया कमी असतात हा सामान्य नियम खरा. बदलापुरांत स्त्री-पुरुष जात जवळ जवळ समसमान आहे. परंतु पुरुषांहून बायकांची संख्या एकानें कमी आहेच.

स्त्रिया कमी असण्याचें पहिलें कारण म्हणजे स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी जन्मतात; उदाहरणार्थ—

| देश | शंभर स्त्रीजन्मांशीं पुरुषजन्मांचें प्रमाण | देश | शंभर स्त्रीजन्मांशीं पुरुषजन्मांचें प्रमाण. |
|---|---|---|---|
| इंग्लंड | १०४ | डेन्मार्क | १०५ |
| फ्रान्स | १०५ | रशिया | ,, |
| जर्मनी | ,, | इटली | १०६ |
| बेलजियम् | ,, | आयर्लंड | ,, |
| हॉलंड | ,, | नॉर्वे | ,, |
| स्वीडन | ,, | स्पेन | ,, |
| | | ग्रीस | ११२ |

ग्रीस सोडल्यास पुष्कळ देशांत स्त्री-पुरुषजन्माचें प्रमाण सारखेंच आहे हें दिसून येईल.

आता आपल्या देशांतील कांही प्रांतांचे आंकडे पाहूं—

| | | | |
|---|---|---|---|
| बिहार व ओरिसा | १०४ | आसाम | १०७ |
| कुर्ग | ,, | संयुक्त प्रांत | १०८ |
| मद्रास | ,, | पंजाब | १०९ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ,, | वायव्य सरहद्द | १२३ |

शेवटला आंकडा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. वायव्य सरहद्द प्रांतांत बायका फार कमी. येथील लोक तुर्की इराणी वंशाचे आहेत.

मुलगा किंवा मुलगी जन्मण्याच्या कारणाची चर्चा अद्यापि चालूच आहे. तथापि कांही वंशांत अगर जातींत निश्चयानें मुलगे अधिक जन्मतात, कांहींत मुली अधिक जन्मास येतात ह्यांत शंका नाही. **औरस संततींत मुलांचें प्रमाण अधिक असून अनौरस संततींत मुलींचें प्रमाण अधिक असतें असें म्हणतात. तसेंच शहरांत मुली अधिक उपजतात; खेड्यांत मुलगे अधिक जन्मास येतात.** प्रथम जन्मास येणारें मूल मुलगा असतो असाहि एक समज आहे. हे सर्व तर्क कितपत शास्त्रशुद्ध आहेत ह्याचा संशय आहे. आपल्या इकडे गांवोगांवच्या जन्ममृत्यूंचा स्वतंत्र अभ्यास होईल तेव्हाच कांही निश्चित अनुमानें काढतां येतील.

पुरुष जन्मास अधिक येतात तसे मरतातहि अधिक. १९२१ ते ३० पर्यंतच्या दशकांत भावनगर संस्थानांत ४०८१६ पुरुष मेले, तर स्त्रीमृत्यु ३४१३९ होते. हजार पुरुष मेले तर बायका ८३६ मरतात. हेंच प्रमाण कमी जास्त सर्वत्र असतें. **जन्मण्यांत आणि मरण्यांत पुरुषच अधिक कामगिरी करतात.** मुलींपेक्षा मुलांची जोपासना चांगली होते असें म्हणतात, पण अनुभव असा येतो की, मुलांकडे अधिक लक्ष मिळूनहि पांच वर्षेपर्यंत मुलींपेक्षा मुलगे अधिक मरतात. **मुलांविषयी अधिक दक्षता कां घेण्यांत येते ह्याचें हें खरें कारण आहे. हिंदूंना मुली नको असतात हा मूर्खपणाचा आरोप आहे.** लहान वयांत पांचाच्या पुढे मात्र हें प्रमाण राहत नाही. पुढे स्त्रिया अधिक मरतात. ६० वर्षांच्या वयापर्यंत हें असें चालतें. साठीनंतर पुनः पुरुष अधिक मरतात. म्हणजे

आरंभीं आणि अंतीं पुरुषजात कमकुवत असते. स्त्रीची मरणशीलता ५ ते ६० ह्या वयांत असते. वैद्यशास्त्राला संशोधन करण्यास येथे चांगलें क्षेत्र आहे. स्त्रियांना कोणत्या वयांत जपणें अवश्य आहे हेंहि पुरुषांना ह्या आंकड्यांवरून समजेल.

भावनगरच्या जन्ममृत्यूंच्या आंकड्यांवरून खेड्यांत जन्मास आलेल्या मुलांत पुरुषजात अधिक असते ह्या सिद्धान्ताला पुरावा मिळण्यासारखा आहे. ह्याहि बाबतींत इकडील खेड्यांतील जन्मांचे आंकडे अभ्यासण्यासारखे आहेत. पण अशा गोष्टीकडे अद्यापि कोणाचें लक्षच जात नाहीं. खानेसुमारीच्या अहवालांत ३७ हिंदुजातींतील स्त्रीपुरुषांचें प्रमाण सर्व वयांची सरासरी काढून त्या सरासरीच्या वयाला काय पडतें तें आंकडेवारी दाखविलें आहे; त्यावरून असें दिसतें की, हजार पुरुषांमागे हजाराहून अधिक स्त्रिया ज्या जातींत आहेत अशा फक्त अकरा जाती निघाल्या. बाकीच्या सव्वीस जातींत पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी निघाली. भवसार, औदिच्य ब्राह्मण, श्रीमाळी, दर्जी, धेड, हजाम, काठी, खवस, मोची, कपोल वाणी व दशावाणी ह्या त्या अकरा जाती होत. सर्वांत अधिक स्त्रिया खवस जातींत सांपडतात. मुसलमानांच्या नऊ जातींपैकी फक्त पिंजारी जातींतच स्त्रियांची संख्या पुरुषांहून अधिक असते. बाकीच्या सर्व जातींत स्त्रिया कमी.

भावनगर संस्थानांतील ७२२ प्रथमजातांची चौकशी करण्यांत आली. त्यावरून असें आढळलें की, ह्यांमध्ये २७४ स्त्रीजात असून ४४८ पुरुषजात होतीं. म्हणजे हजार प्रथमजात पुरुषांस ६१२ प्रथमजात स्त्रिया असें प्रमाण बसतें. पुरुषजातच जन्मास अधिक येते तर प्रथमजातांतहि पुरुषाधिक्य असणें स्वाभाविक आहे.

स्त्रियांची प्रसवक्षमता हाहि एक अभ्यसनीय विषय आहे. प्रत्येक स्त्रीला सरासरीने ६-७ मुलें होतात, हा नियम धरून चालण्यास हरकत नाहीं. ही खानेसुमारी करणारांनी ७४२ कुटुंबें ह्या दृष्टीने तपासलीं. ह्या कुटुंबांत ४९१० मुलें जन्मास आलीं असें आढळलें; अर्थात् कुटुंबामागे (नवराबायकोचें कुटुंब) ६.६ मुलें हें प्रमाण पडलें. जन्मलेल्या ४९१० पैकी ३२३४ शिल्लक राहिलीं होतीं; बाकीचीं मेलीं. एक हजार जन्मलेल्यांत

६५९ जगतात असें होतें. हिंदूंत वाघरी व मुसलमानांत बोहरो ह्या जातींत संततीचें प्रमाण आठावर गेलें आहे. काठी, कुंभार, सुतार व पारशी ह्या जातींत सर्वांत कमी म्हणजे ६च्या आंत आहे. साराश, मुलांची सरासरी ५ व ९ ह्यांच्या दरम्यान असते. **संतति मुळींच न होणारे स्त्रीपुरुष फारच थोडे आहेत.** लग्न होऊन १५ वर्षांचा काळ लोटला असतांहि ज्यांना मूल झालें नाही अशीं ३११३ कुटुंबात ४७ कुटुंबें निघालीं. ह्यांत लग्नाच्या वेळीं बायकोचें वय १५ ते २४ ज्या कुटुंबांत असल्याचें आढळलें अशा २९ कुटुंबांतील स्त्रीपुरुषांचे समागम वंध्य असल्याचें नमूद आहे.

जन्ममृत्यूचे आंकडे हा संशोधकांना मोठा अभ्यासाचा विषय आहे. सर्व अधिकाऱ्यांनी जन्ममृत्यूचीं पत्रकें बिनचूक ठेवण्याची अवश्यकता किती आहे हें ह्यावरून समजेल; परंतु ह्याचें महत्त्व ओळखण्याइतके चतुर अधिकारी आमच्यांत अद्यापि निपजावयाचे आहेत.

## वैवाहिक जीवन

स्त्रीजात व पुरुषजात ह्यांचें जन्मविषयक प्रमाण ठरविल्यानंतर त्यांच्या विवाहसंबंधाचा विचार करणें ओघानेच प्राप्त होतें. स्त्रीपुरुषांनी एकत्र राहून संतति निर्माण करावी हा परमेश्वराचा हेतु दोन जाति निर्माण करण्यांत व्यक्त होतो. **प्रजाजनन व प्रजापालन ह्याला स्त्री-पुरुष ह्या दोघांचा सहवास जितका अधिक काल असेल तितका चांगला व अवश्य.** ह्याकरिताच विवाहसंस्था अस्तित्वांत आली. ख्रिस्ती, मुसलमान इत्यादि हिंदूतर लोकांत विवाह हा कराराच्या स्वरूपाचा असतो; परंतु हिंदूंत तो एक धार्मिक विधि (संस्कार) समजला जातो. करारांत दोन शरिरांचा संबंध जुळविला जातो. **संस्कारांत दोन जीवांचें संमीलन करण्यांत येतें. ह्याच कारणामुळे हिंदूंतील वरच्या जातींत पुनर्विवाह लोकविद्विष्ट झाला.** दुसरा भेद असा दाखवितां येईल की, **करारस्वरूपी विवाहांत आर्थिक दृष्टि उत्पन्न होते; संस्कारांत तिचा लोप होतो.** दोन जीवांचा एक जीव करण्याची कल्पना सर्वांना

पचण्यासारखी नसते ही गोष्ट खरी परंतु ती केवळ शरीरसंयोगाहून श्रेष्ठ दर्जाची आहे ह्यांत शंका नाही; आणि म्हणूनच विवाह हा आमच्याकडे संस्कार मानण्यांत आला. **संस्कारांत नैसर्गिक पाशवी स्थिति ओलांडून मनुष्य पुढल्या बुद्धिनिर्मित श्रेष्ठ स्थितींत गेलेला असतो.** आर्थिक विचारांच्या अभावीं प्रत्येक स्त्रीने अथवा पुरुषाने विवाह करणें हा नियम बनला. तसेंच जीवसंमीलनाच्या कल्पनेंत पतिपत्नींच्या फारकतीचा विचार त्याज्य ठरला. **करार हा तात्पुरत्या सोयीसाठी असतो; संस्कार हा सर्व जीवनाला व्यापून उरतो.** असो, ह्या सर्व घडामोडी खानेसुमारीच्या आंकड्यांत प्रतिबिंबित झालेल्या असतात.

भावनगर संस्थानच्या गेल्या खानेसुमारीचे आंकडे पाहतां स्त्रीपुरुषांची लग्न करण्याची प्रवृत्ति सर्व सामान्य असल्याचें दिसतें. एकंदर लोकसंख्येंत शेंकडा ४४·६ लग्न झालेले पुरुष आढळतात, तर शेंकडा ४८ विवाहित स्त्रिया असतात. ह्याच्या उलट इंग्लंड व वेल्स ह्या देशांत शेंकडा ४१ पुरुष व ३८ स्त्रिया विवाहित स्थितींत असलेल्या आढळतात. त्या देशांत अविवाहित स्त्रीपुरुषांचें प्रमाण अनुक्रमें ५३:५५ असें पडतें. भावनगर संस्थानांतील अविवाहितांत शेंकडा ८७ पंधरा वर्षांच्या आंतील वयाचीं असल्याचें दिसतें. ह्यावरून बालविवाहाचें प्रमाण हटत चाललें आहे हें उघड होतें. तरी सुद्धा १५ वर्षांच्या आंत लग्न झालेल्या स्त्रीपुरुषांचें प्रमाण १५:८ असें आहेच. १५ वर्षांच्या पूर्वी लग्न झालेला मुलगा अगर मुलगी इंग्लंडमध्ये एकहि आढळणार नाही. संस्थानांतील पारशी व खिस्ती ह्यांच्यामध्येहि तीच स्थिति आहे. तीस वर्षांवरील वयाच्या माणसांत ३४६६ पुरुष आणि २४९ स्त्रिया अविवाहित आहेत. ह्यावरून मुलगा लग्नाचा राहिला तरी एक वेळ चालेल पण मुलीचें लग्न झालेंच पाहिजे ह्या नियमाची पकड अद्यापि सुटली नाही असें दिसतें. २४९ स्त्रिया बिनलग्नाच्या कां राहिल्या तें समजण्यास मार्ग नाही. कदाचित्

व्यंग असल्यामुळे त्यांच्यावर अविवाहित राहण्याची पाळी आली असेल.

स्त्रीपुरुषांनी विवाहबद्ध होणें हें नैसर्गिक आहे. समाजाच्या प्रगतीला व विकासाला विवाहसंस्था पोषक असल्याकारणाने विवाहाला प्रतिबंधक कृत्रिम प्रकार समाजाने बंद केले पाहिजेत. हुंडा, लग्नाचा फाजील खर्च, दारिद्र्य व खर्चिक राहणी आणि उद्योग न करण्याची प्रवृत्ति ह्या गोष्टी लग्नाला विघातक होतात; म्हणून ह्या आगंतुक अडचणी दूर सारण्याची जबाबदारी समाजनेत्यांवर असते; परंतु ह्याचें महत्त्व अद्यापि पूर्णपणें ओळखलेलें दिसत नाही.

बालविवाह हा पातिव्रत्यविचारप्रवणतेच्या अतिरेकापासून उद्भवलेला विकार मानला तर बालवैधव्य हें जीवैक्याच्या बेसुमार कल्पनेचें कार्य समजलें पाहिजे. सर्व जगांत विधवा असतातच. बालविधवा फक्त हिंदुस्थानांत आढळतील. भावनगर संस्थानांतील सर्व जातींच्या स्त्रियांत विधवांचें प्रमाण शेकडा १५ आहे. इंग्लंडमध्ये हेंच प्रमाण ८ असतें. दुःखाची गोष्ट ही की, इतर देशांत १५ वर्षांच्या आंतल्या वयाची एकहि विधवा सापडणार नाही, तर आपल्या समाजांत अशा विधवा हजारांनी निघतील. भावनगर संस्थानांत पांच वर्षांच्या आंतील वयाच्या १३, ५ ते १० वर्षेंपर्यंतच्या ६० आणि १० ते १५ वर्षेंपर्यंतच्या ११८ विधवा खानेसुमारीच्या सालांत नोंदलेल्या आढळतात. ह्या अक्षतयोनि मुलींसंबंधाने कोणत्याहि समाजाला अगर सरकारला स्वस्थ बसून चालणार नाही. हिंदूंत थोड्या वरच्या जातींत पुनर्विवाह निषिद्ध मानतात; परंतु जैनांत पुनर्विवाहाची कोणत्याच स्त्रीला मोकळीक ठेवलेली नाही. मुसलमानांतील सय्यद व शिपाई ह्यासारख्या कांही जातींनी ब्राह्मणांचें अनुकरण करून विधवाविवाहनिषेध मान्य केला आहे; त्यामुळे चमत्कार असा दिसतो की, जैन व मुसलमान ह्यांच्यांत हिंदूंपेक्षाहि विधवांची संख्या अधिक. **प्रत्येक धर्माच्या १००० स्त्रिया घेतल्या तर हिंदूंत १४६, मुसलमानांत १५८ व जैनांत १९६ विधवा असल्याचें १९३१ च्या खानेसुमारीवरून दिसतें.** पारशी व ख्रिस्ती ह्यांच्यांत ही संख्या ७८ व ५१ अशी आहे. ३० वर्षांवरील वयांची स्त्री बहुधा पुनर्विवाह करण्यास प्रवृत्त होत नाही असें अनुमान करण्यास जागा आहे. लग्न करण्याची इच्छा जशी स्वाभाविक

तशीच **कांही काळ संसार केल्यावर अन्य-पुरुष-प्रणय-पराङ्मुखताहि स्त्रियांत स्वाभाविक दिसते. म्हणून पुनर्विवाहाचें स्वातंत्र्य असूनहि वैधव्यदशा पतकरणाऱ्या स्त्रिया सर्व लोकांत आढळतात.**

वर जें निरनिराळया जातींतील विधवांचें प्रमाण दिलें आहे त्याच्या उलट विधुरांचें प्रमाण आढळतें; उदा० १००० लोकांत हिंदु विधुर ६७, मुसलमान ५४, जैन ६३, पारशी ८३ व खिस्ती ३७ असें प्रमाण आहे (सन १९३१).

१९३० च्या कायद्याने लग्नाचें कमींत कमी वय मुलीचें १४ आणि मुलाचें १८ ठरविल्यामुळे ह्यापुढे कोणतीहि मुलगी वैधव्याग्नीने होरपळत राहणार नाही. ह्या कायद्याचें उल्लंघन करणारास ५०० रुपये दंडाची शिक्षा कायद्यांत सांगितली आहे. ह्या कायद्यामुळे बालविवाह बंद होतीलच. परंतु कायदा नव्हता तेव्हाहि लग्नाच्या वयाची मर्यादा लोकमताला अनुसरून वाढत होती. १९२१ सालीं १० ते १५ दरम्यानच्या वयाच्या १००० मुलींत ५४० अविवाहितांची संख्या होती, तर हीच १९३१ सालीं ६६८ वर आली. ज्या समाजांत शिक्षणाचा प्रसार अधिक त्या समाजांत प्रौढविवाहाची प्रवृत्ति अधिक दिसून येते. कोळी, वाणी, भंगी ह्यांसारख्या हिंदूंमध्ये पूर्णपणें न मिसळलेल्या जातींत मात्र शिक्षणाचा प्रवेश न होतांहि प्रौढविवाहाची रूढि दिसून येते.

ह्या लोकांत विवाहकालच ठरलेला नसावा. **विवाहकाल निश्चित करणें हें संस्कृतीचें द्योतक आहे.**

**सारांश वैवाहिक उत्तम स्थिति म्हणजे —**

**प्रत्येक निरोगी अथवा अव्यंग स्त्री-पुरुषांचें लग्न व्हावें.**

**गर्भाधानाच्या वेळीं पुरुषाचें वय निदान २५ व स्त्रीचें निदान १८ असावें; एवढेंच नव्हे तर त्याहून अधिक असूं नये.**

**संततिकाल पंचवार्षिक असावा.**

**१८ व २५ वर्षांच्या अगोदर स्त्रीपुरुषांचें लग्न होऊं नये.**

पुनर्विवाहाची मोकळीक सर्वांस असावी.

पतिपत्नींमधील अंतर १० वर्षांहून अधिक असूं नये.

पुरुष स्त्रीपेक्षा वयानें मोठा असावा.

आणि ही वैवाहिक स्थिति खानेसुमारीच्या आकड्यांवरून प्रतीत व्हावी.

# त्रावणकोर संस्थानांतील वन्य जाती

**पंटारम्.** या जातीचे लोक स्थायिक घरें नसल्यामुळे भटकत असतात. त्यांच्या कुटुंबांत २–३ पेक्षा अधिक माणसें बहुधा असावयाचीं नाहीत. ते जंगलांतील झाडें तोडून त्यांच्या झोपड्या बांधतात. वर पानांची शाकारणी असते. त्यांच्या घरांत उबेसाठी नेहमी विस्तव तयार केलेला असतो. वस्त्र नसल्यामुळे अशा रीतीने विस्तव त्यांना सदोदित बाळगावा लागतो. हिवताप, देवी इत्यादि रोगांनी मृत्युसंख्येचें प्रमाण त्यांच्यांत बरेंच असतें. एकंदरींत ह्या जातीचा ऱ्हास होत आहे, असें दिसतें.

जन्म पाहिल्यावर अथवा अगोदरहि त्यांच्यांत मुलींचीं लग्नें होतात. सामान्यतः आते-मामे भावंडांत विवाहसंबंध घडून येतात. आपली बहीण दुसऱ्यास द्यावयाची व त्याची बहीण आपण करावयाची हा प्रकार बराच चालतो. लग्न मुलीच्या घरीं होतें. लग्नाच्या दिवशीं वराला धोतरजोडा देतात. हा पोशाख दिल्यानंतर मुलीचा बाप आपल्या मुलीचा उजवा हात मुलाच्या डाव्या हातांत घालतो आणि नंतर ‘मी आपली मुलगी तुला देत आहें, हिला तूं जप’ असें म्हणतो. नंतर नवरा-नवरीला एका चटईवर बसवून एका पानावर भाताचे चार घास आणतात. त्यांपैकी दोन घास

नवरी नवऱ्यास खावयास देते; ते खाल्ल्यावर दुसरे दोन घास नवरा बायकोला देतो, ती ते खाते. इतकें झालें की लग्नविधि संपला.

न्हाण आल्यावर मुलीला घरांत ठेवीत नाहीत. राहावयाच्या झोपड्यापासून सुमारें २०० हात अंतरावर एका लहानशा खोपटांत त्या न्हाणोलीला ठेवितात. हा विटाळ सोळा दिवस मानतात. एरव्ही नेहमींचें विटाळसेपण सात दिवस पाळावयाचें असतें. या मुदतींत नवऱ्याने झाडावर चढतां कामा नये किंवा टेकडी चढून जातां कामा नये. त्याला घरांत बसून राहावें लागतें. हत्यारें-पात्यारेंहि त्याने हातांत धरतां कामा नयेत. रानटी लोकांना विटाळशा बायकांचें मोठें भय वाटतें. आपल्यावर दैवी आपत्ति कोसळेल या भीतीनें बायकांच्या विटाळसेपणांत ते आपणांस घरांत कोंडून घेतात. बायकांची प्रसूतीहि घरांत होऊं देत नाहीत. राहत्या घरापासून ४०० हात अंतरावर निराळ्या झोपडींत बाळंतपणाची व्यवस्था केलेली असते. त्यांच्यांत सोळा दिवस सोयेर धरतात. या मुदतींतहि शिकार करण्याकरिता, अन्न मिळविण्याकरिता किंवा दुसऱ्या कोणत्याहि कामाच्या निमित्ताने नवरा घराबाहेर पडत नाही. बाळंतीण घरांत आली तरी मुलगा झाल्यास तीन ते पांच महिने व मुलगी असल्यास चार ते सहा महिने तिला थोडेंसें आशौच पाळावें लागतें; म्हणजे ती स्वयंपाक करण्याइतकी शुद्ध मानली जात नाही. गर्भारपणांत पांचव्या महिन्यापासून पुढे आणि बाळंत झाल्यानंतर सहा महिने पुढे नवराबायकोचा संबंध घडत नाही.

यांच्यांत प्रेतें पुरतात. कोणीही मेलें असतां सगळी जातच्या जात तें ठिकाण सोडून दुसऱ्या ठिकाणीं राहावयास जाते. सुतक आठच दिवस धरतात. नवव्या दिवशीं सर्व जातीला जेऊं घालतात.

**मदुवण.** पंटारम् लोकांप्रमाणे हे लोकहि डोंगरावर राहणारे आहेत. त्यांची वस्ती एके ठिकाणीं कधीच नसते याचें कारण जी जमीन एकदा नांगरली व जिच्यांत पीक केलें, ती टाकून पुढील सालाकरिता त्यांना दुसरी जमीन पाहावी लागते. त्यांच्या झोपड्या लहान असून चौरस असतात व त्यांना एकच दरवाजा असतो.

लग्नाच्या पूर्वी वैषयिक निर्बंध फार पाळले जातात. अविवाहित तरुणांचें वर्तन चोख असावें लागतें. दहा वर्षांवरील सर्व अविवाहित मुलगे एकत्र

निजतात आणि अविवाहित मुली व विवाहित बायका अगदीं निराळ्या झोपडींत निजतात. एवढेंच नव्हे तर त्यांच्यावर देखरेख करण्यास एक म्हातारी बाई असते.

या लोकांमध्ये सख्ख्या भावाबहिणींच्या मुलांत विवाहसंबंध होतो. लग्न संध्याकाळचें लागतें आणि तें मुलीच्या घरींच लागतें. नवऱ्या मुलाला मुलीकडे घेऊन जाण्यास मुलीकडील एक कुवारीण असते. लग्नाच्या वेळेस आईबाप घरांत राहत नाहीत. लग्न पाहूं नये, अशी त्यांच्यांत समजूत आहे. मुलाकडून मुलीला काचेच्या बांगड्या, सुंकलें, साड्या आणि फणी इतके जिन्नस मिळतात. फणी बांबूची असून नवऱ्यामुलानेच ती करावयाची असते. ती फणी बायकोने आपल्या वेणींत ठेवावयाची असते.

हा लग्नविधि संपल्यावर जातीला जेवण देण्यांत येतें. जबरदस्तीने मुलीला पळवून नेऊन तिच्याबरोबर लग्न करण्याचा प्रकारहि असामान्य नाही. एका पुरुषाला अनेक बायका करतां येतात. दुसऱ्या बायकोने पहिल्या बायकोच्या आज्ञेंत वागलेंच पाहिजे असा या जातींत कडक नियम आहे. बायकांचे पाट लागतात; परंतु दिराशीं लावलाच पाहिजे असा नियम नाही.

न्हाण आलेल्या मुलीला निराळ्या खोपटींत ठेवतात. उद्देश हा की, तिच्याकडे कोणत्याहि पुरुषाची नजर जाऊं नये. विटाळ तीन दिवस धरतात. बाळंतिणीकरिताहि बाळंतघर अगदी निराळेंच असतें. गांवांतील सर्व विवाहित बायका बाळंतिणीच्या मदतीस येतात. तीस दिवस सोयेर असतो. मुलास मामाचें अथवा आईच्या बापाचें नांव ठेवतात.

पुरुष मेल्यानंतर त्याची मिळकत त्याच्या बहिणीच्या मुलाकडे जाते. कोट्टमलस्वामी आणि वडगनाथस्वामी या जंगली देवांची ते पूजा करतात. तथापि हिंदुधर्माचीहि छाप त्यांच्यावर पडत चालल्यामुळे सुब्रह्मण्य आणि मीनाक्षीअम्मा या देवतांचीहि ते प्रार्थना करूं लागले आहेत. याशिवाय सूर्याची व त्याचप्रमाणे करप्पू मारीअम्मा आणि काली ह्या उपद्रवी देवतांचीहि ते उपासना करतात.

या लोकांना म्हशी बाळगण्याचा नाद आहे. हीच ह्यांची संपत्ति. त्यामुळे त्याना दूध पिण्याची चटक फार. गव्याला ते मारीत नाहीत; परंतु माकड, सांबर व बकरे यांचें मांस खातात. ह्यांच्या कमरेभोवती एक फडकें

गुंडाळलेलें असतें. खांद्यावर घोंगडी व डोक्यावर पागोटें हा यांचा पोशाख. पुरुषांच्या कानांत भिगबाळी व उजव्या हाताच्या करंगळीजवळच्या बोटांत अंगठी व दंडांत कडें असे दागिने हे लोक घालतात.

**मद्यान.** हे लोक उंचवट्यावर ज्या ठिकाणीं पाण्याचा पुरवठा कायमचा असून लागवडीला पुष्कळ जमीन मिळेल अशा ठिकाणीं राहतात. बांबूच्या खाटेवर बसण्याचा व निजण्याचा अधिकार जातीच्या नायकाला फक्त असतो. बाकी सर्व लोकांनी जमिनीवरच बसलें-निजलें पाहिजे. न्हाण येण्यापूर्वी मुलीचें लग्न होत नाहीं. लग्नाच्या वेळेस मुलगा १६ ते २० वर्षांचा असतो आणि मुलीचें वय १४ वर्षांवर असतें. आते-मामे भावंडांत लग्नें होतात. विवाहविधि होण्यापूर्वी वर्ष सहा महिने नवरामुलगा मुलीच्या बापाकडे येऊन राहतो. लग्न अर्थात् मुलीकडे होतें. नवरामुलगा व त्याचप्रमाणें नवरी मुलगी आपापल्या आईबापांना व घरांतील दुसऱ्या वडील माणसांना नमस्कार करून एका चटईवर येऊन बसतात. तेव्हा नवऱ्या मुलाची बहीण नवरीच्या गळ्यांत टाली बांधते आणि नंतर जेवणाचा समारंभ होतो.

मुलीला पळवून नेऊन तिच्याबरोबर लग्न करण्याचा प्रकारहि यांच्यांत आहे. एखाद्या पुरुषाबरोबर लग्न करण्यास एखादी स्त्री कबूल झाली नाहीं तर तिला तो जबरदस्तीनें पळवून नेतो व तिच्यासह रानांत दहा बारा दिवस राहतो. इकडे गांवांत त्यांचा शोध करूं लागतात आणि सांपडल्यानंतर गांवांत परत आणून गांवकरी दोघांचें लग्न लावून देतात. मुलामुलींच्या लग्नाला आईबापांची हरकत असली तरी सुद्धा दोघेंजण पळून जाऊन लग्नें लावतात. पहिल्या बायकोला मूल होत नसेल तर दुसरें लग्न करतात. बहुभर्तृकतत्वाची चाल आहे; पण फारच विरळा. विधवांचे पाट लागतात. दिराला भावजयीबरोबर पाट लावतां येतो.

इतर जातींप्रमाणें या जातींतहि न्हाण आलेल्या व बाळंत होणाऱ्या स्त्रीला अगदी एकीकडे एकटीला ठेवण्यांत येतें. न्हाण आलेली मुलगी अशा झोंपडींत चार दिवस राहते. पांचव्या दिवशीं स्नान करून ती घरांत येते व नवीन कपडे घालते. पुढील मासिक विटाळांत पांचव्या दिवशीं तिनें स्नान केलें तरी आणखी चार दिवस तिला निराळें राहावें लागतें.

बाळंतिणीला वीस दिवस सोयेर असतो व या दिवसांत बाळंतीण घराच्या-बाहेर पडत नाही. एकविसाव्या दिवशीं ती घरीं येते; परंतु निराळ्या खोलींत राहते. हे लोक हळूहळू हिंदु होत चालले आहेत. कारण ते सेष्ट देवाची पूजा करतात. जंगल तोडलें असतां वनदेवता रुष्ट होतील अशी त्यांची समजूत असल्यामुळे राखीव जंगलाचा कांही भाग या देवतांकरिता मुद्दाम राखून ठेवण्यांत येतो. काळ्या माकडाचें मांस व उंदीर हे लोक खातात. पण गव्याचें मांस निषिद्ध मानतात.

**उरळी.** या जातींतही मुलीला न्हाण आलें म्हणजे तिला एका झाडाच्या ढोलींत ठेवतात. अशा बायकांकरिताच त्या ढोलीचा विनियोग नेहमी केला जातो. सात दिवस विटाळ धरतात. आठवे दिवशीं स्नान करून ती बाई शेजारील झाडाच्या दुसऱ्या ढोलींत दोन दिवस राहते. तिसरे दिवशीं ती स्नान करून घरीं येते. तिच्या डोक्यावर चुलता किंवा भाऊ फणसाच्या पानांतून सात वेळां तेल व गाईचें शेण ओतून तिला शुद्ध करून घेतो. नंतर ती झोपडींत शिरते. नेहमीच्या विटाळसेपणांतहि जवळ जवळ हाच प्रकार होतो. मात्र सात दिवसांचा सक्त नियम नाही व फणसाच्या पानाचा उपयोगही करतातच असें नाही.

न्हाणाच्या अगोदर किंवा नंतरहि मुलींचीं लग्नें होतात. आपली बहीण देऊन दुसऱ्याची करावयाची हा लग्नाचा प्रकार असल्यामुळे ज्यांना बहिणी नाहीत त्यांचें लग्न होणें कठीण जातें. पूर्वी उरळी आपल्याला जितक्या बहिणी असतील तितक्या बायका करीत असे; पण अलीकडे दोहोंपेक्षा अधिक बायका करीत नाही. बहुपतित्वाची चाल या जातींत विरळा आहे. लग्नविधि अगदी साधा असतो. नवरा मुलगा व त्याचा बाप नवऱ्या मुलीच्या झोपडींत जातात आणि तिला घेऊन परत आपल्या घरीं येतात. तेथे मुलीकडील वऱ्हाड्यांना जेवण देतात. आकडीचे कोयते, कपडे व भांडीं हें मुलीचें देज.

प्रसूतीकरिता बायको एका दूरच्या वृक्षगृहांत जाते. बाळंत होतांना तिला कोणीहि मदत करीत नाहीत. बायका तिच्यापासून अंतरावर उभ्या राहतात व तेथून तिला काय करावयाचें तें सांगतात. प्रसूतीनंतरहि कोणीहि बायको तिच्याजवळ जात नाही व तिला मदत करीत नाही. प्रसूतीचें अशौच एक-

वीस दिवस पाळावें लागतें. या मुदतींत नवरा कोणतेंहि काम करीत नाही. बाविसाव्या दिवशीं स्नान करून बाळंतीण घरांत येते.

हे लोक शेतीच करितात; पण त्यांची शेती फिरती असते. भात हें त्यांचें खाण्याचें मुख्य अन्न आहे. जंगल साफ केल्यावर तीन दिवसपर्यंत स्त्री-संभोग करीत नाहीत: संभोग केला असतां त्यांच्यावर व पिकांवर आपत्ति कोसळेल अशी त्यांना भीति वाटते. जेथे पिशाच्चें येतात अशी त्यांची समजूत आहे, त्या जागेची ते पूजा करितात. उरळी लोक मन्नान आणि पलियान लोकांबरोबर जेवीत नाहीत. शेतीच्या सणांत मृतांच्या भूतांची पूजा करतात.

**कलियन्.** या जातींत मुलीला प्रथम न्हाण आलें म्हणजे पधरा दिवसपर्यंत तिला एकटीला एका स्वतंत्र झोपडींत राहावें लागतें. सोळावे दिवशीं स्नान करून व डोक्यावर पाण्याचें मडकें घेऊन घरीं येते. घरीं आल्यावर स्वयंपाक करून दुसऱ्या बायकांना तिने वाढलें म्हणजे ती शुद्ध झाली असें समजतात. पुढच्या विटाळसेपणांत तिला पांच दिवस विटाळशीघरांत राहावें लागतें.

न्हाण येण्यापूर्वी मुलीचें लग्न होत नाही. चुलतभावंडांत लग्न होऊं शकतें. लग्नाच्या पूर्वी आपला भावी सासरा जो चुलता त्याच्या घरीं नवऱ्या मुलाला सहा महिने चाकरी करावी लागते. ती चाकरी म्हणजेच मुलीच्या बापास द्यावयाचें देज होय. लग्न नवऱ्याच्या घरीं रात्रीं लागतें. एका दिवसांत लग्न-समारंभ खलास होतो. तिसऱ्या दिवशीं नवरा-नवरीचे कपडे केशराचे पाण्यांत भिजवतात. नंतर नदीवर किंवा ओढ्यावर जाऊन स्नान करून घरीं परत येतात. धाकट्या व मोठ्या मेलेल्या भावाच्या विधवेशीं पुरुषाचें लग्न होऊं शकतें. पहिल्या बायकोला मूल होत नसल्यास दुसरी बायको करण्याची रीत आहे. परंतु ही दुसरी बायको नेहमी पहिल्या बायकोची बहीण असते. वडील भावाच्या बायकोशीं धाकट्या भावांचा संभोग होतो असें म्हणतात.

बाळंतपणाकरिता स्वतंत्र बांधून ठेवलेल्या झोपडींत बायका बाळंत होतात. बाळंत झाल्यावर सहा दिवस त्यांना त्या झोपडींत राहावें लागतें. सातवे दिवशीं ती स्नान करून घरीं परत येते. त्या वेळेला मुलाकरिता तिला चुलत्याकडून नवीन कापडाचा पाळणा मिळतो. बापाची मिळकत मुलाकडे येते. कलियन लोक फिरती शेती करतात. पेरणी व कापणी चाल

असतां स्त्रीसंभोग ते निषिद्ध मानतात. आपण पवित्र नसलों तर पीक चांगलें येणार नाही अशी त्यांची समजूत असते.

**मलपुलय.** मलपुलय नांवाची एक जात आहे, तिचे कुरुंब, करवशी आणि पांपु असे तीन पोटभेद आहेत. करवशी जातीचे लोक बहुधा वेल्लाळ जातीच्या लोकांकडे नोकरीस असतात. त्यांच्याकडून त्यांना पगारादाखल भात मिळतें. मलपुलय जातींतील मुलीला न्हाण आलें म्हणजे विटाळशीगृहांत तीस दिवस राहावें लागतें. या मुदतींत तिने कोणत्याहि पुरुषाचें तोंड बघतां कामा नये. एकतिसाव्या दिवशीं ती स्नान करून घरीं येते तेव्हा मोठी जेवणावळ होते.

न्हाण आल्यानंतरच लग्न होतें. चुलतभावंडांचीं लग्नें होतात. लग्न-समारंभ तीन दिवस चालतो. लग्न मुलीच्या घरीं लागतें. करवशी पुलयांत चाळीस वल्लन भात व त्याशिवाय चिटाचें लुगडें मुलीच्या आईला व मुलीला याप्रमाणे देज द्यावा लागतो. लग्न रात्रीं लागतें. नवरा-नवरीला लग्न लागतांना पूर्वेकडे तोंड करून एका हांतरीवर बसवतात. मुलीच्या गळ्यांत नवरा मुलगा मण्यांची माळ घालतो. एकाच ताटांत बसून जेवतात. जेवतांना एकमेकांस घास देतात. नंतर सर्व वऱ्हाडी मंडळी जेवते. नंतर नवरा-नवरीची वरात नवऱ्याच्या घरीं नेतात.

कुरुंब जातींत देज देण्याची वहिवाट नाही. नवरीला एक साडी देतात आणि केशराच्या पाण्यांत बुडविलेली दोरी नवरीच्या गळ्यांत बांधतात. नंतर सर्वजण जेवतात म्हणजे लग्न संपलें.

मेलेल्या धाकट्या भावाच्या विधवेशीं वडील भावाला लग्न करतां येतें. अनेक बायका करण्याची रीत आहेच. बहिणीबहिणी सवती होतात. बायकोला अनेक नवरे करण्याची मुभा आहे. संकर अथवा व्यभिचार या जातींत बऱ्याच प्रमाणांत आढळतो.

काली, मारीअम्मा, चपळम्मा, कटलपारम्मा या देवींना मलपुलय जातीचे लोक भजतात. कोणताहि धार्मिक विधि करावयाचा असला तर त्याच्यापूर्वी दहा दिवस स्त्रीसंभोग करीत नाहीत.

**विषवन.** त्रावणकोरच्या उत्तर भागांत हे लोक आढळतात. या लोकांत न्हाण आलेली मुलगी विटाळशीघरांत सात दिवस राहते. या मुदतींत पुरुषाचें

तोंडहि तिला दिसतां कामा नये. पुरुष दृष्टीस पडला असतां गांवावर कांही-तरी संकट येईल असें त्यांस वाटतें. आठवे दिवशीं न्हाणवली स्नान करून घरीं येते. लग्नाच्या पूर्वी मुलीला मांस खाण्यास देत नाहीत. विवाहाच्या पूर्वी विषयोपभोगाचा अनुभव नाही अशी स्त्री विरळा. कोणत्याहि पुरुषाचा कोण-त्याहि स्त्रीबरोबर चोरून संबंध होतो. लग्नापूर्वी मुलगी गरोदर राहिल्यास गर्भपात करण्याचा प्रयत्न न करतां ज्याच्यापासून ती गरोदर राहिली असेल, त्याच्याशीं तिचें लग्न लावून देतात.

न्हाण येण्याच्यापूर्वी मुलीचें लग्न होऊं शकतें. आपल्या कुळीच्या बाहेर-चीच मुलगी पुरुषानें पाहिली पाहिजे. चुलतभावंडांचें लग्न निषिद्ध मानलें जातें. मुलीच्या घरीं लग्न लागतें व समारंभ एका दिवसांत आटोपतो. आपली बहीण दुसऱ्यास देऊन त्याची बहिण आपण करावयाची हा प्रघात या जातींत आहे. वाटेल तेव्हा काडीमोड केली तरी चालते.

राहत्या घरापासून तुटक असलेल्या झोपडींत बायको बाळंत होते. तेथे पुरुषास जाण्याची मनाई आहे.

पंधरा दिवसपर्यंत बाळ-बाळंतीण या ठिकाणीं राहतात. सोळावे दिवशीं स्नान करून बाळंतीण घरीं येते.

मिळकतीचा वारसा भाच्याकडे जातो. बायकांकडे वारसा जात नाही.

हे लोक दर वर्षाला निरनिराळी जमीन लावतात. एकदा लावलेली जमीन सोडून देण्यापूर्वी पितरांना अन्न देतात. साष्ट देवतेची हे लोक पूजा करतात.

**मलवेदन**. या लोकांना कानकवेदन, वेदर, वेट्टुवन असेंही म्हण-तात. मलवेदन जातींत चार पोटजाती आहेत. त्यांचीं नांवें—(१) वलिय-वेदन, (२) चेरुवेदन, (३) चिंगणीवेदन, (४) एलिचक्षीवेदन अशीं आहेत. चेरुवेदन यांचा वलियवेदनांबरोबर रोटीबेटीव्यवहार होत नाही. परंतु चिंगणीवेदनांच्या हातचें अन्न त्यांना चालतें; एवढेंच नव्हे, तर त्यांच्या बायकाही त्यांना चालतात. परंतु त्या बायका चेरुवेदन बाय-कांच्या पंक्तीला बसत नाहीत. नवरा मेल्यावर बायको आपल्या मुलाला घेऊन आपल्या बापाच्या घरीं जाते. चेरुवेदनांचा आणि एलिचक्षीवेदनांचा रोटीबेटीव्यवहार होत नाही. चेरुवेदनापासून अठरा फूट अंतरावर चिंगणी-

वेदन उभे राहतात आणि स्वतः चेरुवेदन हे आपल्या वरिष्ठ जातीच्या माणसापासून आठ फूट अंतरावर राहतात.

चुलतभावाबहिणींत विवाहसंबंध होतो. आपली बहीण देऊन दुसऱ्याची बहीण करणें हा प्रकार यांच्यांत रूढ आहे. न्हाण येण्याच्या पूर्वी किंवा नंतरहि लग्न होऊं शकतें. लग्न मुलीच्या घरीं लागतें आणि एका दिवसांत खलास होतें.

नवऱ्या मुलानें नवरीला साडी देऊन तिच्या गळ्यांत टाली बांधणें हाच लग्नाचा विधि. चिंगणीवेदन जातींत नवरानवरी एका हांतरीवर बसतात आणि एका केळीच्या पानांत शिजविलेला भात वाढल्यावर दोघेंजण जेवतात. अनेक बायका करण्याचा प्रघात आहे. परंतु विधवा भावजयीशीं पाट लावण्याची रीत नाही. त्याचप्रमाणे मेलेल्या बायकोच्या बहिणीबरोबरहि लग्न करीत नाहीत. काडीमोड यांच्यांत होते.

न्हाण आलेल्या मुलीला विटाळशीगृहांत नऊ दिवस राहावें लागतें. दहावे दिवशीं स्नान करून ती परत येते. घरीं आल्यावर घरांतील सर्व माणसांच्या कपाळावर गाईच्या शेणानें उभी रेघ काढते आणि प्रत्येकाला पेलाभर भाताची पेज देते. एवढें झालें म्हणजे ती शुद्ध झाली असें समजतात.

राहत्या घराच्या एका खोलींतच स्त्री बाळंत होते. प्रसूतीनंतर नवरा बायकोला कोळशाची भुकटी घातलेला असा वनस्पतीचा काढा देतो.

चिंगणीवेदन जातींत बापाची दोन भाग मिळकत मुलगे वांटून घेतात व राहिलेली एक भाग भाच्याकडे जाते. परंतु चेरुवेदन जातींत मुलगे व भाचे यांच्यांत ती सारखीच वांटली जाते.

**मलकुरवन**. मुलीला न्हाण आल्यानंतरच तिचें लग्न होतें. पूर्वी पांच आणि आठ वर्षांच्या दरम्यान केट्टुकल्यनम् नांवाचा विधि करण्याची वहिवाट असे. मुलीला ताली बांधणें याचें नांव केट्टुकल्यनम्. परंतु ही चाल हल्ली बंद पडलेली आहे. यांच्यांत मामेबहिणीबरोबरच मुलाचें लग्न होतें; आतेबहिणीबरोबर लग्न होत नाहीं. लग्न मुलीच्या घरीं लागतें व एका दिवसाचा समारंभ असतो. मुलाचा बाप मुलीच्या बापाला अडीच रुपये देतो. हे रुपये दिल्याखेरीज नवऱ्याच्या घरीं मुलीला पाठवीत नाहीत. मुलीला दोन साड्या देणें हाच लग्नविधि.

लागवडीकरिता जंगल साफ करण्यापूर्वी डोंगरावरील पिशाचादि देवतांचें हे लोक पूजन करतात. खलपारमल, उडनपारमल आणि ठेवलपारमल हीं पिशाच्चांचीं नांवें आहेत. शेताची पेरणी झाल्यावरहि पुन्हा या देवतांना बलि देतात.

**मलअखन.** या शब्दाचा अर्थ पर्वताचे राजे असा आहे. इतर सर्व जातींपेक्षा आपण श्रेष्ठ आहों असें ते मानतात. उह्लाडन लोक यांना वाल्याणमार असें म्हणत असत. या शब्दाचा अर्थ राज्यकर्ते असा आहे. यावरून एका काळीं ते फार पराक्रमी होते असें दिसतें.

न्हाण आल्यावर मुलीला एक दिवस निराळ्या घरांत ठेवतात. दुसऱ्या दिवशीं अंग धुतल्यावर ती आपल्या घरांत येते. आठवे दिवशीं ओढ्यांत तीन वेळां बुडी मारून ती स्नान करते. तिसऱ्यांदा बुचकळी मारल्यावर ती ताली बांधणाऱ्याकडे बघते. नंतर तिला व ताली बांधणाऱ्याला समारंभाने घरीं आणतात. तेथे एका हांतरीवर त्यांना बसवून भोजन घालतात. न्हाण येण्यापूर्वी ताली बांधण्याचा समारंभ होतो. हा समारंभ बहुधा पुष्कळ मुलींचा एकत्र केला जातो. या वेळीं मुलींचीं वयें तीनपासून नऊपर्यंत असतात. परंतु लग्न मात्र न्हाण आल्यानंतर लागतें.

लग्न संध्याकाळीं किंवा रात्रीचें लागतें. मुलाचा बाप वधूवरांना अहेर करतो; नंतर त्या दोघांना पूर्वेकडे तोंड करून हांतरीवर बसवितात. मग मुलीचा भाऊ तिला विडा देतो. नवरी मुलगी या विड्याचे चाऊन दोन भाग करते. पैकी अर्धा भाग ती आपल्या नवऱ्याला खावयास देते व दुसरा अर्धा ती स्वतः खाते. विडा खाल्ल्यावर दोघें एकाच भांड्यांत थुंकतात. नंतर सर्व वऱ्हाडी विडे खातात. बायकोला मूल होत नसलें तर दुसरें लग्न करतात. क्वचित् अनेक भावांची एक बायको असते. यांच्यांत पाट लागतो. बापाची मिळकत मुलांकडे जाते. त्याच्या अभावीं मुली वारस ठरतात. निपुत्रिक मनुष्य मेल्यास त्याची मिळकत प्रथम त्याच्या भावाकडे जाते. भाऊ नसल्यास बहिणीकडे जाते.

पितृपूजा हा यांचा मुख्य धर्म होय. जिवंत माणसांचें बरें वाईट मेलेलीं माणसें करूं शकतात अशा समजुतीनेच ते लोक पितृदेव बनलेले असावे. हे लोक पांच टेकड्यांची पूजा करतात. या टेकड्यांत दिव्य शक्ति आहे असें ते समजतात. जड आणि चेतन हा फरक ते करीत नाहीत.

अत्यंत प्राचीन वन्य देवता जी सास्त तिचेहि हे लोक उपासक आहेत. या लोकांपैकी पुष्कळ लोक ख्रिस्ती झालेले आहेत.

**उल्लादन.** उल्लादन आणि कोछुवेळन यांच्यामध्ये फारसा फरक नाही. उल्लादन यांना कट्टालन असेंहि म्हणतात.

बहुधा उल्लादन पुरुष आपल्या चुलत्याच्या मुलीबरोबर लग्न करतो. न्हाण येण्यापूर्वी लग्न होतें. मुलगी सात वर्षांची झाली म्हणजे पालिकेट्टु-कल्याण नांवाचा विधि करतात. या समारंभाच्या चवथ्या दिवशीं ताली बांधणारा मुलगा आणि नवरी मुलगी अशीं नदीवर स्नानास जातात. तेथून त्यांना वाजतगाजत घरीं आणतात. या ताली बांधणाऱ्याची इच्छा असल्यास मुलीला न्हाण आल्यावर तिच्याशीं त्याला लग्न करतां येतें. लग्न मुलीकडे लागतें. नवऱ्या मुलाकडून नवरीला पोशाख मिळतो. तो ती परिधान करते. जमलेल्या मंडळींना विडे देतात आणि मग नवरानवरी नवऱ्याच्या घरीं जावयास निघतात. नवऱ्याकडे रात्रीं जेवणावळ घालतात. दुसऱ्या दिवशीं पुन्हा दुसरी जेवणावळ झाल्यावर मुलीकडील वऱ्हाड आपापल्या घरीं परततें. अनेक बायका करण्याची चाल या लोकांत आहे. विधवा भावजयीशीं पाट लावतां येतो. क्वचित् अनेक भावांना एक बायको असल्याचा प्रकारहि आढळतो.

मनुष्य मेल्यानंतर त्याची निम्मी मिळकत मुलांना व निम्मी भाच्यांना मिळते. भाचा नसल्यास सर्व मिळकत मुलांनाच मिळते.

डिसेंबर ते एप्रिलपर्यंत जंगल साफ करून जमीन लागवड करीत असतां या जातींत स्त्रीसंभोग करीत नाहीत. जंगलच्या देवतांचा कोप टाळण्या-करिता हे लोक ब्रह्मचर्य पाळतात. स्त्रीसंभोग हा आचार अपवित्र आहे अशी त्यांची समजूत असते. थलपारमल, उदंपारमल आणि चकीपारमल या देवतांना दरवर्षी शुक्रवारीं बळी देतात.

**काणीकार.** यांच्यांत न्हाणापूर्वी अथवा नंतर लग्न होतें. लग्न नव-ऱ्याच्या घरीं दिवसा लागतें. नवरीच्या गळयांत नवरा मण्यांची माळ बांधतो. नंतर वऱ्हाडसुद्धा सर्व मंडळी जेवावयास बसतात. वधू व वर हांतरीवर बसून एकाच पानांत जेवतात. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व जण आपआपल्या घरोघर जातात. नवरी मात्र नवऱ्याकडे राहते. कोट्टूर प्रांतांत मुलगी

अगदीच लहान असली तर तिच्या गळ्यांत नवरामुलगा ताली बांधतो. उपवर असल्यास त्याची बहीण बांधते. केळीच्या पानांत दोघेंजण जेवा-वयास बसतात. भात आणि आमटी हेंच यांचें पक्वान्न. या वेळेस दोन बायका वधूचें डोकें धरून तें वराच्या खांद्यावर सात वेळां टेकवतात. नंतर नवरा मुलगा नवरीला सात घास देतो. कित्येक ठिकाणीं लग्न मुलीच्या घरीं लागतें. फार करून एकाहून अधिक बायका हे लोक करीत नाहीत. पण दुसरी बायको करण्याचा प्रसंग आल्यास पहिल्या बायकोची बहीण करतात. मेलेल्या बायकोच्या बहिणीबरोबर लग्न करतां येतें. व्यभिचार न होऊं देण्याबद्दल यांचा फार कटाक्ष आहे. व्यभिचार करणाऱ्या पुरुषाला झाडास उलटा टांगून खाली जमिनीवर मिरच्यांची धुरी करतात आणि त्या टांगलेल्या पुरुषास झोके देऊन पंचवीस फटके मारतात आणि बायकोला पंधरा फटके मारतात.

कांही ठिकाणीं न्हाणवलीला झोपडींतच ठेवतात. परंतु दुसऱ्या कित्येक ठिकाणीं राहत्या घरापासून सुमारें शंभर फुटांवर निराळ्या झोपडींत तिला राहावें लागतें. विटाळ सहा दिवस धरतात. सातव्या दिवशीं स्नान करून ती घरीं परत येते. तेथे भगत तिला अंगारा देतो. तो ती आपल्या कपाळाला लावते. गर्भारपणीं सातव्या महिन्यांत वयरू पोंगल नांवाचा समारंभ करतात. या वेळीं सूर्याला नैवेद्य दाखवितात. घरांतच बाळंतपण होतें. सोयेर सोळा दिवस धरतात. जंगलांत हिंवतापाच्या साथीमुळे बायका फार दुवेततात.

मिळकतीचा वारसा मुलगे आणि भाचे यांच्याकडे सारखाच जातो. भाचे नसल्यास सर्व वारसा मुलाकडेच जातो. या लोकांत बापाकडून पिढ्या न सांगतां आईकडून सांगतात आणि मुलें आईच्या माहेरचीं म्हणून समजलीं जातात.

या लोकांचे देव असंख्य आहेत. सर्व आपत्ति या देवांमुळेच ओढवतात, या समजुतीने त्यांची आराधना करणें हाच त्यांचा धर्म. ते पितरांना आणि अगस्त्याला भजतात.

कित्येक ठिकाणीं या लोकांत अविवाहित तरुणांकरितां निराळें घर बांधलेलें असतें. तेथे बायकांस जाण्याची मनाई असते. तेथे रात्रीं व दिवसा

हे तरुण राहतात व फक्त जेवणापुरते आपापल्या घरीं जातात. अविवाहित पुरुषांप्रमाणे सर्व अविवाहित मुलीहि एका स्वतंत्र घरांत राहतात.

**ठंटपुलय.** या जातींत न्हाण आल्यानंतर मुलीचें लग्न होतें; परंतु सातव्या किंवा आठव्या वर्षीं वाङ्निश्चय झालेला असतो. मुलीला दोन साड्या देऊन तिच्या गळ्यांत मण्यांची माळ नवऱ्याने बांधली म्हणजे दोघेंजण विवाहबद्ध झालीं असें मानतात. नवऱ्याकडील पांच इसमांना जेवावयास घालून त्यांना पानसुपारी देण्याची वहिवाट आहे. इतकें झालें म्हणजे लग्नसमारंभ खलास झाला. एकाहून अधिक बायका करणें सांपत्तिक दृष्ट्या सोयीचें असल्यामुळे या जातींतील पुरुष एकाहून जास्त बायका करतात; कारण पुरुषांच्या बरोबर बायका काम करतात. कधी कधी त्या नवऱ्यांना पोसतातहि. बायका पाट लावतात. हे लोक मातृवंशी आहेत. मामाची मिळकत भाच्यांकडे येते. भाच्याच्या अभावीं मात्र मुलांकडे मिळकतीचा वारसा जातो. हे लोक सूर्योपासक असल्यामुळे सकाळ. संध्याकाळ सूर्याची पूजा करतात. नागांचीहि पूजा करण्याची वहिवाट आहे.

## प्रेतसंस्कार

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत लिहिलेल्या तामिळी ग्रंथांतून ब्राह्मणांशीं संबंध येण्यापूर्वी मूळच्या लोकांत प्रेतांची विल्हेवाट करण्याचे अनेक प्रकार सांगितले आहेत, ते येणेंप्रमाणेः—

(१) कोल्ह्यांनी खाण्याकरिता उघड्या जागेवर प्रेत टाकून देणें. (२) जाळणें. (३) प्रेत खळग्यांत टाकून देणें. (४) मातीच्या मोठ्या रांजणाखाली झाकून ठेवणें. (५) पुरणें.

त्रावणकोरच्या पुष्कळ वन्य जातींत प्रेत पुरण्याची वहिवाट आहे. पंटारम् लोक जेथे मनुष्य मरतें तेथेच त्याला पुरतात. पुरल्यानंतर त्या ठिकाणची सर्व वस्ती हालते; पुन्हा कोणीहि तेथे जात नाही.

मदुवण लोक गांवापासून एका मैलावर प्रेतें पुरतात. पुरुषाच्या प्रेतासाठी कंबरभर जागा खणतात. परंतु स्त्रीच्या प्रेताकरिता छातीभर खळगा खणतात. प्रेतावर भाच्याने अगर मुलाने विकत आणलेलें कोरें कापड घालतात. खळग्यांत प्रेत ठेवल्यावर पुरुषाची चकमक आणि पागोटें प्रेताच्या

शेजारीं ठेवतात. नंतर मातीने खळगा बुजवतात. डोक्याच्या व पायाच्या बाजूला एक लहान दगड पुरून ठेवतात. वर एक लहानसें छप्पर उभारतात.

उराळी जातींतहि प्रेतें पुरण्याची चाल आहे. आपल्या झोपडीपासून सुमारें ३००-३५० हात अंतरावर प्रेत पुरतात. खळगा खणतात तो पुरुषाच्या प्रेताला त्याच्या उंचीइतका खणतात आणि बायकांकरिता तिच्या छातीएवढा खोल खणतात. अंत्यविधि भाचा करतो. प्रेताला स्नान घालून कोऱ्या कपड्याने तें आच्छादतात; नंतर गवताच्या हांतरीवर तें ठेवून बांधतात; नंतर स्मशानांत नेतात. खळग्यांत लाकडें घालून त्याच्यावर बांबूची हांतरी ठेवतात. खळग्याच्या सभोंवती बांबूचे तट्टे लावतात. नंतर प्रेत खळग्यांत ठेवतात आणि त्याच्यावर पुन्हा वर हांतरी घालतात. प्रेताच्या उजव्या खाकेंत पानसुपारीचें साहित्य व पावडें ठेवतात. नंतर खळगा मातीने भरतात आणि मग एक फूट रुंद व दोन फूट लांब असा दगड डोक्याशीं व पायाशीं पुरतात.

उल्लाडनांतहि प्रेतें पुरतात. मयताचा मेव्हणा खळगा खणतो. घराबाहेर प्रेत काढण्यापूर्वी भुई झाडून जमलेला केर तिरडीवर ठेवतात. या योगाने प्रेताचें भूत पळून जातें अशी समजूत आहे. प्रेताच्या डोक्याशीं दगड उभारतात.

मलपुलयांमध्ये प्रेतें पुरतात; परंतु डोक्याशीं, छातीशीं व पायाशीं दगड पुरून ठेवतात.

त्रावणकोरच्या मध्य प्रदेशांतील मलआरयन लोक आपल्या घराच्या दक्षिणेस ४० ते ५० हात अंतरावर प्रेत पुरतात. मयताचा वडील मुलगा व भाचा प्रेत पुरण्याच्या जागेभोंवती तीन प्रदक्षिणा घालतात. प्रदक्षिणा घालतांना ते भाताच्या लाह्या टाकीत असतात. नंतर तेथून दोघेहि मातीच्या तीन पुंज्या उचलून बाहेर टाकतात. असें करतांना यांचीं तोंडें खळग्याकडे नसतात. एवढें झाल्यावर चार फूट खोलीचा खळगा खणतात. खळगे खणणारांनी प्रेत हलवावयाचें नसतें. कोऱ्या कापडांत वेष्टिलेलें प्रेत खळग्यांत ठेवतात. नंतर बरोबर गेलेल्या मंडळीपैकी प्रत्येक जण तीन वेळां माती खळग्यांत टाकतो. तेव्हाहि सर्व जण प्रेताकडे पाठ करून उभे असतात.

नंतर मातीने खळगा भरतात. खळग्याभोवती लहान लहान दगड लावून ठेवतात आणि मोठा दगड उशाशीं व पायांशीं उभा पुरतात.

मन्नान जातींतहि प्रेत पुरण्याचा रिवाज आहे. भाच्याने विकत घेतलेल्या कोऱ्या ताक्याने वेष्टिलेलें प्रेत तिरडीवर घालून श्मशानांत नेतात. पुरुषाचा खळगा कमरेइतका खोल असतो, बायकांचा कमी असतो. दक्षिणेकडे डोकें करून प्रेत खळग्यांत ठेवतात; नंतर खळगा मातीने भरून काढतात आणि पावसाने बिघाड होऊं नये म्हणून त्याच्यावर छप्पर उभारतात.

पलियन जातींत वस्तीपासून एक मैलावर प्रेतें पुरतात. बायकांकरिता छातीइतका खोल व पुरुषाकरिता कमरेइतका खोल खळगा असतो. गवताच्या हांतरीवर खळग्यांत प्रेत ठेवतात आणि प्रेतावरहि गवताची हांतरी घालतात.

विषवन लोकांची प्रेत पुरण्याची तऱ्हा अगदी साधी आहे. गांवापासून एक मैल दूर श्मशान असतें. एका नवीन हांतरींत प्रेत गुंडाळून तें वाशास लोंबतें बांधून श्मशानांत नेतात. पश्चिमेकडे डोकें व पूर्वेस पाय अशा रीतीने प्रेत खळग्यांत ठेवतात. डोक्याच्या खाली आधार देऊन प्रेताची दृष्टि पूर्वेकडे राहील अशा तऱ्हेने प्रेत खळग्यांत ठेवतात. नंतर प्रेतावर बांबूच्या पट्ट्या पसरून खळगा मातीने बुजवतात.

काणीकार लोकांत प्रेताकरिता खड्डा खणणारे लोक भूतपिशाचाची बाधा होऊं नये म्हणून मांत्रिकांनी दिलेला अंगारा खणण्याच्यापूर्वी कपाळाला लावतात. प्रेत खळग्यांत ठेवल्यावर मयताचे वापरण्याचे सर्व पदार्थ प्रेताच्या शेजारीं ठेवतात. नंतर मुलगा आणि भाचा दोघे मिळून खड्डा बुजवतात. कोट्टूर येथील काणीकार जातींत मयताची बायकोहि प्रेताबरोबर श्मशानांत जाते आणि खड्डा भरल्यावर तिने आपल्याबरोबर आणलेली भाताची एक चमचा पेज व चाळण प्रेताच्या पायगतीं ठेवते. या जातींत कांही ठिकाणीं सोळा दिवस सुतक धरतात, कांही ठिकाणीं नऊ दिवस व कांही ठिकाणीं सात दिवस सुतक धरतात. प्रेताला खांदा घालणाराला बारा दिवस सुतक धरावें लागतें. त्रावणकोरच्या कांही भागांतले काणीकार लोक प्रेतें जाळतातहि.

सहा फूट लांब, बारा फूट रुंद व दोन फूट खोल असा खड्डा खणून त्यामध्ये लाकडें ठेवतात व त्यावर दक्षिणेकडे डोकें करून प्रेत ठेवतात. त्याच्यावर लाकडें घालून डोक्याच्या व पायाच्या बाजूला चिता पेटवितात. प्रेताचें दहन झाल्यावर हाडांचे तुकडे गोळा करून नदींत टाकून देतात. मयताच्या बहिणीचा मुलगा हा अंत्यसंस्कार करतो. नदींत हाडें टाकल्यावर तो स्नान करतो आणि एका हातांत पेटतीं लाकडें व दुसऱ्या हातांत पावडें घेऊन दहनभूमीवर परत येतो. त्याच्याबरोबर मयताचा मुलगा खांद्यावर पाण्याचें मडकें घेऊन जातो. तो प्रेताच्या खड्ड्यामोवतीं तीन वेळां प्रदक्षिणा घालतो. नंतर मुलाच्या खांद्यावरील मडक्याला भाचा तीन वेळां पावड्याने हळूहळू टोले मारून भोक पाडतो आणि मग तो मुलगा तें मडकें खांद्यावरून मागच्यामागे टाकून देतो.

मलवेदन जातीचे लोक आपल्या घरापासून एक मैल अंतरावर प्रेतें पुरतात. प्रेत घरांतून बाहेर काढण्यापूर्वी घरांतील जमीन झाडतात आणि तो कचरा व केरसुणी प्रेताच्या तिरडीवर ठेवतात. येणेंकरून मेलेल्या माणसाचें भूत घरांतून बाहेर जातें अशी समजूत आहे. मुलगा आणि भाचा हे मुख्य क्रियाधिकारी होत. स्नान केल्यानंतर अशौच धरणारीं सर्व गोताचीं माणसें कपाळावर शेणाचा टिळा लावतात.

या लोकांच्या सूर्य-चंद्र व इतर नैसर्गिक घडामोडींबद्दल कल्पना पुढीलप्रमाणे आहेत—

## सूर्य व चंद्र

काणीकर लोक सूर्याला भगवान् अथवा ईश्वर या नांवाने संबोधितात. दर शुक्रवारीं ते सूर्याची पूजा करतात. सूर्योदयाबरोबर आपल्या घरापुढे एक दिवा लावून ठेवतात व त्या दिव्याजवळ फळें आणि लाह्या ठेवतात व 'भगवान्, हें तुला ठेविलें आहे त्याचा तूं स्वीकार कर' अशी प्रार्थना करतात. नंतर सर्व कुटुंबांतील माणसें तो नैवेद्य खातात. सूर्य हा सृष्टीचा कर्ता आहे. सूर्य ही स्त्री व चंद्र हा पुरुष मानतात. पौर्णिमेच्या दिवशीं ते चंद्राला नैवेद्य दाखवितात. त्या दिवशीं रात्रीं ते घरापुढे दिवा व पाव माप भात ठेवतात. चंद्रोदय होतांच भात शिजवतात आणि नैवेद्य दाखवितात.

'हे चंद्रा, ह्या नैवेद्याचा तूं स्वीकार कर' अशी ते त्याची प्रार्थना करतात. चंद्राची उपासना केली असतां डांग्या खोकला बरा होतो अशी त्यांची समजूत आहे. चंद्रावरील डाग ही ससाची खूण असें ते लोक मानतात. चंद्राबद्दल अशी कथा आहे की, एक काणीकर माणूस आपल्या बायकोसह जंगलांत फिरत असतांना गवतांत लपलेला चंद्र त्याच्या दृष्टीस पडला. याची बायकोच्या गळ्यांत घालण्यास उत्तम ताली होईल अशा समजुतीने चंद्र पकडण्याचा त्याने प्रयत्न केला. तेव्हा त्याच्या हातांतील कोळशाची राख चंद्रावर पडून चंद्रावर कायमचा डाग झाला, तेव्हा चंद्र आकाशांत उडून गेला.

मदुवन जातीचे लोक सकाळ संध्याकाळ दोन्ही वेळां सूर्याची उपासना करतात. आम्ही जंगलांत आहों, आम्ही अज्ञानी, संकटांपासून आमचें संरक्षण कर, अशा कांही अर्थाची सूर्याची प्रार्थना सकाळीं उठल्यावर करतात. अशीच प्रार्थना रात्रीं निजण्याया पूर्वी केली जाते.

सूर्य हा सृष्टिकर्ता आणि सर्व जीवांचा बाप, व चंद्र ही आई अशी उराली लोकांची समजूत आहे. चंद्रावरील डागाबद्दल या लोकांत दंतकथा प्रचलित आहे ती अशी– सूर्याला चंद्र वाढीत असतां दोघांत भांडण जुंपलें आणि संतापाच्या भरांत सूर्याने चंद्राच्या तोंडावर भाताचे घास फेकले; त्यामुळे चंद्राचा चेहेरा डागळलेला दिसतो. प्रतिपदेचा चंद्र उगवतो त्या दिवशीं चंद्र अस्पर्श (विटाळाशी) आहे असें समजतात, आणि म्हणून ढगांत तो लपलेला असतो.

सूर्य आणि चंद्र हे एकाच देवाचीं मुलें आहेत अशी मलअरयन लोकांची समजूत आहे. त्यांत सूर्य हा औरस पुत्र असून चंद्र हा दत्तक मुलगा आहे अशी कल्पना आहे. त्यांच्यांत अशी कथा प्रचलित आहे की, त्यांच्या आईने एकदा त्यांना तुम्हांला जें कांही भोजनास वाढलें जाईल त्याचा अवशेष आणा असें बजावून जेवणावळीस पाठविलें. चंद्राने प्रत्येक पदार्थाचा अवशेष आणला. सूर्य मात्र आईच्या आज्ञेप्रमाणे वागला नाही; त्यामुळे आईला राग येऊन तिने सूर्याला शाप दिला की, जळून तुझी राख होवो. या कारणास्तव सूर्यामध्ये जबरदस्त उष्णता उत्पन्न

झालेली आहे. तूं नेहमी थंडगार राहशील असा तिने चंद्राला वर दिल्या-वरून चंद्र शीतल झाला आहे.

## भूकंप

काणीकर लोकांच्या समजुतीप्रमाणे बैलाच्या एका शिंगावर पृथ्वी असल्यामुळे पृथ्वीचा भार थोडा असह्य होतांच बैल पृथ्वी एका शिंगा-वरून दुसऱ्या शिंगावर ठेवतो, तेव्हा भूकंप होतो.

मदुवनांची समजूत अशी आहे की, पृथ्वीला धारण करणारी देवी ती एका खांद्यावरून दुसऱ्या खांद्यावर ठेवते तेव्हा भूकंप होतो.

उराली लोकांची कल्पना अशी आहे की, दोन भीम आळीपाळीने पृथ्वी आपल्या खांद्यावर धरून ठेवतात. जेव्हा एक भीम दुसऱ्या भीमाच्या स्वाधीन ती करतो तेव्हा भूकंप होतो.

मलअरयन यांच्या कल्पनेप्रमाणे पृथ्वी पांच मस्तकांच्या सापावर बसली असल्यामुळे सापाने कोणतेंहि डोकें हालविलें म्हणजे भूकंप होतो.

## ग्रहण

चंद्राचा बाप नाग आहे असें काणीकार म्हणतात. चंद्राने एकदा सापाला भांडें देण्याचें नाकारलें म्हणून साप आपली फणा कधी कधी चंद्रावर उभारून त्याला झाकतो.

सूर्यग्रहणाच्या संबंधाने अशीच समजूत आहे.

उराली लोक असें म्हणतात की, आपलें येणें असलेलें कर्ज न दिल्या-मुळे नाग सूर्यचंद्रावर वारंवार हल्ला करतो. त्यांच्या भोवती तो वेटाळें घालून बसतो व त्यांना गिळून टाकावयास बघतो. थोडेसे पैसे मिळाले म्हणजे तो सोडतो.

मलअरयन लोकांत अशी दन्तकथा आहे की, सशाच्या पाठीमागे साप लागला असतां ससा चंद्राच्या पाठीमागे त्याच्या आश्रयाला असतो. तेव्हा सर्प चंद्रावर उडी मारून जातो. हें चंद्रग्रहणाचें कारण होय.

## मेघगर्जना व वीज

कालार काणीकर लोक मेघगर्जनेला काट्टालमेडी म्हणतात. या शब्दाचा

अर्थ राक्षसांचे ठोसे किंवा आघात असा आहे. राक्षसाच्या कमरेला दगड बांधलेला असतो. 'मारुती' झाड दृष्टीस पडलें म्हणजे राक्षस तो दगड त्या झाडावर आपटतो या आपटण्याचा आवाज हीच मेघगर्जना होय. झाडाला दगड मारतांना जाळ निघतो ती वीज होय.

मदुवन लोकांच्या समजुतीप्रमाणे देव दगड लोटतात त्यामुळे मेघगर्जना होते. वायु आणि पर्जन्य या देवता दगड लोटूं लागल्या म्हणजे वीज उत्पन्न होते.

उराली लोकांचा विश्वास असा आहे की, स्वर्गांत भीमांत द्वंद्वयुद्ध होतें तेव्हां मेघगर्जना, वीज व पाऊस यांचा उद्भव होतो. जमिनीवर ठेवलेल्या एका फळीवर हें युद्ध होतें. फळीच्या प्रत्येक टोकावर एकेक भीम उभा असतो. तेथून प्रत्येक जण मोजकीं पावलें टाकीत फळीच्या मध्यावर येऊन आपल्या तरवारीने परस्परांवर घाव करूं लागतात. तरवारींच्या घर्षणामुळे वीज उत्पन्न होते. चालण्याचा आवाज तीच मेघगर्जना आणि योद्धयांचा घाम हाच पाऊस.

मलअरयन यांची अशी कल्पना आहे की, पृथ्वीचा देव जो परमेश्वर त्याच्याजवळ एक नामांकित धनुष्य आहे. त्याने तें वाकविलें म्हणजे निरनिराळ्या रंगांचें तें दिसूं लागतें. या धनुष्याचें प्रतिबिंब पडतें तीच वीज. देव एकमेकांबरोबर युद्ध करूं लागले म्हणजे मेघगर्जना होते.

## इन्द्रधनुष्य

इंद्रधनुष्य हें राक्षसाचें हाड असें काणीकार मानतात.

इंद्रधनुष्य म्हणजे अर्जुनाचें धनुष्य असें मदुवन समजतात. त्यांतील तांबडी ओळ हा दोर व जांभळी ओळ ही दांडी.

उरालींच्या मताप्रमाणे इंद्रधनुष्य हें रामाचें धनुष्य आहे. या धनुष्याचें एक टोक पृथ्वीला स्पर्श करतें.

पाऊस नसतांना इंद्रधनुष्य पडलें तर भरपूर पाऊस पडेल, पाऊस पडत असतांना इंद्रधनुष्य दिसल्यास पाऊस अजीबात थांबेल, असें भविष्य पंटारम् करतात.

# कित्येक डोंगरी लोकांच्या चालीरीति

## भंटु

हे जिप्सी लोक होत. अर्थात् यांच्या भटकणाऱ्या टोळया चोऱ्या करून व दरोडे घालून आपला निर्वाह करतात. हे मुख्यत्वेंकरून उत्तर व मध्य-हिंदुस्थानांत आढळतात. हिंदुस्थानांत ही गुन्हेगार जात ठरल्यामुळे आपलें खरें स्वरूप लपविण्याकरिता भंटु लोक अनेक नांवें धारण करतात.

चितरगडच्या चव्हाण ठाकुरांपासून आपली उत्पत्ति हे लोक सांगतात. हे द्राविड वंशाचे लोक असावेत असें वंशशास्त्रावरून म्हणतां येतें. भग्न-पासून भंटु शब्द कित्येक लोक व्युत्पादितात; परंतु एका भंटूने असें सांगितलें की, आमच्या जमिनीवर दुसरा कोणी आल्यास त्याला आम्ही 'भग्तु' म्हणजे 'चालता हो' असें म्हणतों, त्यावरून आम्हांला लोक भंटु म्हणूं लागले.

भंटु लोकांच्या छत्तीस पोटजाति आहेत. पोटजातीला गोट असें म्हणतात. प्रत्येक गोटाच्या चालीरीति निरानिराळ्या आहेत.

या लोकांत वैवाहिक नीतिमत्ता बरीच पाळली जाते. लग्नापूर्वी किंवा नंतर अंतस्थ संबंध निंद्य मानला जातो. अगदी जवळच्या नातेवाईकाबरोबर लग्न करीत नाहीत. तसेंच भंसवळे गोटाखेरीज इतर गोटांत आपसांत बेटीव्यवहार होत नाही. एका गोटांतील माणसाने दुसऱ्या गोटांतील किंवा परगोटांतील माणसाशीं लग्नसंबंध केला पाहिजे असा नियम आहे. पूर्वी वीसपासून तेवीस वर्षांचें वय झाल्याविना मुलांमुलींचीं लग्नें होत नसत. मुलाकडील माणसें मुलीची मागणी करण्याकरिता तिच्या आईबापाकडे जातात. होकार आल्यास मुलाचा बाप शिष्ट मंडळी बरोबर घेऊन मुलीच्या बापाकडे जातो. तेथें दोन डुकरें मारतात. जमिनीवर दारू सांडली म्हणजे लग्न ठरलें असें समजतात. दोन तीन दिवसांनी पुढे मुलीला द्यावयाच्या देजाची रक्कम ठरविली जाते. तीनशेपासून पंधराशेपर्यंतसुद्धा देजाची रक्कम असते. मुलीला व्यंग असल्यास थोडक्या देजांत भागतें. मुलीला देवी न येतां दोन मुलें होण्यापूर्वी ती मेली तर मुलीची घेतलेली रक्कम बापाला

परत करावी लागते. परंतु दोन मुलें झाल्यावर देवींनी तीं भेल्यास बापाला कांही द्यावें लागत नाही.

ह्यानंतर थोड्या दिवसांनी आणखी एक समारंभ होतो. त्याला मोरवण असें म्हणतात. तेव्हाहि एक डुक्कर मारलें जातें आणि तें मारण्यापूर्वी 'आई महाराज, श्री ठाकूरजी, कारण किसिका नाम पहिले तेरा नाम। हमारे पिर पुर्के के नाम जैसे बाप दादोंकी जातमें होत आया है हम वैसेही करते। तुमारी लडकी की हम शादी करते हैं। अच्छी तऱ्हेसे रखना। दोनों तरफ अच्छी तऱ्हा रखना' असें म्हणतात. नवरामुलगा चांगला पोशाख करतो. बायका त्या मुलाचे दोन्ही डोळे काळे पांढरे रंगवितात आणि त्याला मुलीच्या घरीं घेऊन जातात. वाटेंत जातांना गाणीं म्हणत असतात आणि नवऱ्यामुलाचे आप्त वाटेंत भेटल्यास त्यांस शिव्या देतात. जातांना मुलावर रंगीत कागद दोन बायका धरतात.

मुलीच्या घराशीं आल्यावर मुलगा घरांत शिरत असतां त्याला दोन बायका अडवितात व त्याच्या तोंडासमोर पडदा उभा करून 'पैसे दिल्याशिवाय तुला मुलगी दृष्टीस पडूं देणार नाहीं' असें सांगतात. पैसे मिळाले म्हणजे गुळपाणी भरलेलें भांडें पडद्याखालून त्याला सारूं देतात. ती मुलगी तें भांडें घेऊन आपल्या तोंडाला लावते. इतक्यांत मुलीची आई हळदीने माखलेला हात नवऱ्या मुलाच्या पाठीवर मारते. यामुळे त्याच्या कपड्यावर तिच्या हाताचा ठसा उमटतो. नंतर ती मुलाच्या कपाळाला अक्षता लावते. यानंतर अहेर होतात पडदा काढून घेतात आणि मग मुलीला आपल्या घरीं घेऊन जाण्यास मुलाला मोकळीक होते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुलीचे जवळचे पुरुष नातेवाईक मुलीच्या घरीं जमतात व दारू पितात. हे सर्व लोक वर्तुळ करून बसतात. मधोमध चादर पसरलेली असते. त्या चादरीच्या खाली एक टोपला ठेवतात. दारू पितां पितां पैसा किंवा दुसरी कांही मूल्यवान् वस्तु त्या टोपलींत टाकतात. हे सर्व पदार्थ वधूवरांना देतात.

या वेळीं पंचायतीचा हक्क पंचायतीला मिळतो. देजाची सर्व रक्कम एकदम देत नाहीत. मुलीला सासरीं वाईट रीतीने वागविल्यास या शिल्लक राहिलेल्या रकमेची मागणी करतात. ही रक्कम मिळेपर्यंत मुलीच्या संबंधाने मध्यें पडण्याचा हक्क आईबापांना असतो. पैसे मिळाल्यानंतर मुलीचा बाप

त्या नवराबायकोच्या भांडणामध्ये पडला तर नवरा त्याला सांगतो, 'पैसे देऊन माल मीं घेतला आहे, आता तुझा काय संबंध?' खर्च कमी करण्याकरिता मुलीच्या देवघेवीने लग्न करण्याचा प्रचार यांच्यांत बराच आहे. सामान्यपणें मोठ्या मुलाचें लग्न प्रथम होतें; परंतु तो तुरुंगांत असल्यास किंवा परागंदा असल्यास एखादी चांगली मुलगी मिळाल्यास मोठ्या भावाकरिता धाकट्या भावाबरोबर तिचें लग्न लावतात. मोठ्या भावाच्या परवानगीनें धाकटा भाऊ त्या बायकोला आपल्या घरीं आणतो. मोठा भाऊ घरीं परत आल्यावर त्याने पाहिजे तर तिला आपली बायको म्हणून घ्यावी अथवा दुसऱ्या एखाद्या स्त्रीबरोबर लग्न करावें. जर मोठा भाऊ तिला बायको म्हणून पत्करण्यास कबूल झाला तर धाकट्या भावापासून तिला झालेलीं मुलें धाकट्या भावापाशींच राहतात.

काडीमोडीची चाल या लोकांत असली तरी ती चांगली म्हणून उत्तेजन देण्यास ते तयार नसतात. काडीमोडीचा विशेष विधि नसतो. फक्त पंचायत जमून मुलीच्या माहेरच्या माणसाने किती पैसे परत द्यावयाचे हें ठरविलें जातें. काडी मोडल्यावर तिला पुन्हा लग्न करतां येतें.

बायको बाळंतीण झाल्यावर सहा दिवसपर्यंत ती घरांतील स्वयंपाकाच्या भांड्यांना शिवत नाही. या सहा दिवसांत बाळंतीण मेल्यास ती भूत होऊन घरांतील माणसांना बाधा करते असें म्हणतात. भगताने जोड्याने मारलें म्हणजे ही भूतबाधा नाहीशी होते अशी समजूत आहे. लग्न होण्याच्या पूर्वी लहानपणीं मुलगा किंवा मुलगी मेल्यास तीं पिशाचयोनींत जातात आणि आपल्या नातेवाईकांना त्रास देतात; म्हणून त्या पिशाचांना सैतान म्हणतात. मुलांना आकडे येतात ते या सैतानामुळेच अशी समजूत आहे. व्यभिचार करणारा मनुष्य मेल्यावर भूत होतो. मुलीच्या भुताला बलाई हें नांव असून मोठ्या बाईच्या भुताला चरेल हें नांव आहे. एखादें मूल भुताने पछाडलें आहे असा संशय आल्यास आळींतल्या सर्व मुलांना जुने कपडे घालावयास देतात आणि त्याच्या केसांना तेल लावण्याचें बंद करतात.

हे लोक देवीउपासक आहेत. तथापि पूर्वजांची पूजाहि यांच्यांत आहे. यांचीं सर्व कर्में ब्राह्मणाशिवाय होतात. मेलेल्या भंटूचा जीवात्मा त्याच्या-

पूर्वी मृत झालेल्या भंटूंना भेटतो; परंतु त्यांच्यांत मिसळण्यापूर्वी पृथ्वीवरील जिवंत नातेवाईकांनी जमातीला ठराविक जेवणें दिलीं पाहिजेत. ही जेवणांची संख्या पुरी होईपर्यंत मृताचा आत्मा अस्पृश्याप्रमाणे वेगळा राहतो. तो आपल्या मृत भंटूंत सामील होऊं शकत नाही. हीं जेवणें न दिल्यास मेलेला मनुष्य भूत होऊन नातेवाईकांना त्रास देतो. तुरुंगांत किंवा अन्य ठिकाणीं मेल्यामुळे परकी माणसांनी प्रेत जाळल्यास मृताचे वारस त्याचा पुतळा करून पुन्हा जाळतात.

मेलेलीं माणसें आपले सर्व व्यवहार लक्ष लावून बघत असतात असें हे समजतात. तीन चार पिढ्यांच्या मृतांना पुर्खे किंवा पिरपुर्खे अशी संज्ञा आहे. ह्याच्या पलीकडील मृतांना देवता समजतात.

कांही भंटु जातींत प्रेतें जाळतात व कांहीं जातींत पुरतात. ढापो गोतांत प्रेत जाळण्याचीच चाल आहे. मनुष्य आता मरणार, अशा वेळीं कांडें जळत ठेवतात. हें कांडें चितेला अग्नि लावीपर्यंत जळत असतें. जमिनीवर पसरलेल्या घोंगडीवर प्रेत ठेवतात तेव्हा त्याच्या डोक्याशीं व पायांशीं चाकू जमिनींत खुपसून ठेवण्याची चाल आहे. नंतर सदरा, पागोटें व धोतर हे कपडे प्रेताला घालण्याकरिता कापड आणतात. या कपड्यांबरोबर थोडेंसें सूतहि असतें. कपडे घालून झाल्यावर प्रेताच्या तोंडांत एक पैसा व सुई ठेवतात आणि हातांत गव्हाच्या कणकीचा पिंड ठेवतात. मयताची बाज, विशेषतः तिचें उजवें अंग, काठ्या मारून मोडतात. नंतर ती बाज उलटी करतात व मोडलेली बाजू दोरीने ताबडतोब दुरुस्त करतात. नंतर तें प्रेत उलट्या बाजेवर ठेवून ती चार माणसें श्मशानांत घेऊन जातात. श्मशानाजवळ प्रेत येतांच प्रेताच्या उजव्या हातातील पिंड काढून घेऊन तो झुडपांत ठेवतात आणि तो पिंड प्रेतावरचें कापड फाडून आच्छादितात. श्मशानांत प्रेत लाकडांनी रचलेल्या चितेवर ठेवतात. गवताची जळती गुंडी हातांत घेऊन क्रिया करणाराने चितेभोवती तीन प्रदक्षिणा घातल्यावर ती पेटवितात. नंतर गोटांतील कांहीं माणसें प्रेताच्या डोक्याची कवटी फोडतात. प्रेत जळल्यावर सर्व मंडळी चितेभोवती सात प्रदक्षिणा घालतात आणि मग शेजारच्या ओढ्यावर स्नानास जातात. मुख्य स्त्री पाण्यांत उभी राहून मोठ्याने म्हणते, ‘आई महाराज, जो कुछ उसके उपर बंध

था और गुबलथार अगर वह झिंद रहता तो हम पूजा देते. अब वह मर गया इसीये उसके संग चले जाव' इतकें म्हणून ती सात वेळां आपल्यापुढे पाणी टाकते. सर्व मंडळी घरीं परत आल्यावर घराकडे आतेष्ट जमलेले असतात. त्यांना पानांत गुंडाळून बिनभाजलेली चपाती प्रत्येकाला देतात. ती तोंडाने चाऊन जमिनीवर टाकून दिली जाते. नंतर सर्वांवर पाणी शिंपडतात व सर्व मंडळी घरोघर निघून जातात.

ढोलिया गोतांत प्रेतें पुरण्याची चाल आहे. ढापो गोतांत प्रेतदहनाच्या पूर्वी प्रेतासंबंधी ज्या गोष्टी करतात त्याच थोड्याबहुत फरकाने ढोलिया जातींतहि करण्याची वहिवाट आहे. प्रेत जमिनीवर ठेवल्यावर त्याला धोतर नेसवतात, अंगांत अंगरखा घालतात व डोक्यावर पगडी ठेवतात. तोंडामध्ये जो फडका ठेवतात त्यालाच सुई टोचलेली असते हातामध्ये पिंड ठेवीत नाहीत. ढापोंप्रमाणे यांच्यांतहि बाज मोडून उलटी करण्याची वहिवाट आहे. मात्र एका घावासरशी ती मोडली पाहिजे, नाही तर प्रायश्चित्तादाखल बळी द्यावा लागतो. मोडलेली बाज लगेच दुरुस्त करतात व त्यावर प्रेत ठेवतात. प्रेत घराबाहेर काढण्याच्या वेळीं पाण्याने भरलेलें मडकें जमिनीवर फोडतात. श्मशानांत जातांना वाटेंत जमिनीवर तीन ठिकाणीं प्रेत ठेवतात आणि तेथे जमिनींत खळगी करून पैसा आणि कवडी टाकून ती बुजवतात. अनुकूलता असल्यास जातां जातां प्रेतापुढे पैसे उधळतात.

प्रेताचा खड्डा सुमारें तीन चार हात खोल खणतात. खळग्यांत प्रेत ठेवल्यावर जमलेले लोक त्यावर माती टाकतात. माती टाकताना 'आज तुझें नांव खुदाकडे गेलें' असें तोंडाने म्हणतात. श्मशानांत बायका जात नाहीत. खळगा भरल्यावर तेथे काठी ठेवून सर्वजण स्नानास जातात. स्नान करतांना व घरीं गेल्यावर करावयाचे विधि ढापो लोकांप्रमाणेच आहेत. तिसरे दिवशीं एक डुक्कर विकत घेऊन मरणाचे खोलींत त्या डुकराची एक तंगडी धरून तीन वेळां गरगर फिरवतात. डुकराचा प्राण गेल्यावर त्याची उजवी बाजू कापून ते तुकडे जमिनीवर टाकतात. त्या वेळीं 'ठाकूर महाराज, हे तुम्ही घ्या आणि आमच्या बापजाद्यांबरोबर खा' असें म्हणतात, आणि राहिलेला भाग जमलेल्या मंडळींना खावयास देतात.

बदक, खोकड, मासे, गोमांस हीं या लोकांना वर्ज्य आहेत.

यांच्या भाषेला पपी म्हणतात. ह्या भाषेंतील कांही शब्द येथे देतों.

| मराठी शब्द | पपी भाषेंतील शब्द | मराठी शब्द | पपी भाषेंतील शब्द |
|---|---|---|---|
| बायको | छिंतणी | आई | मावती |
| मुलगा | बोह्रा(डा) | बहीण | छईण |
| मुलगी | बोह्री(डी) | हात | खोत |
| रुपया | कुपया | डोकें | न्हीर |
| तेल | नेल | डोळे | कोंके |
| कुत्रा | रुत्ता, भोकर | कान | रान |
| पाणी | चेनी | बोलणें | कोगणें |
| बाप | दपाप | | |

## भिल्ल

मेवाड संस्थानांतील भिल्ल शिरगणतीच्या वेळेला आपलीं घरें मोजूं देईनात; कारण जें मोजलें जातें तें कमी होतें अशी त्यांची समजुत आहे. ह्यांच्या घराच्या भिंतीवर त्यांचा देव काढलेला असतो. भेरोणमाता आणि गणेश या देवांची ते पूजा करतात.

देवी येऊन जे मरतात त्यांना पुरतात व बाकीच्यांचीं प्रेतें जाळतात.

## ओरयान

चंडू देवतेची तीन वर्षांनी फाल्गुन महिन्यांत हे पूजा करतात. सालवृक्ष हें यांचें दैवत. हे वृक्ष आता तोडले गेल्यामुळे पिंपळाची पूजा करूं लागले आहेत. चंडू देवाचा दगड साल वृक्षाखालीं ठेवलेला असतो.

दगडाच्या वाटोळया चितेवर प्रेत ठेवून जाळतात आणि जवळच्या ओढ्यांत राख टाकून देतात. अस्वाभाविक रीत्या मेलेल्या माणसांना न जाळतां पुरण्यांत येतें. पेरणी व कापणी यांच्या दरम्यान कोणी मेल्यास त्याचें प्रेत तेव्हा न जाळतां पुरतात आणि पिकें काढल्यावर तें पुनः उकरून जाळण्यांत येतें.

## गोंड

यांची ग्रामदेवता म्हणजे एक लाकडी लिंग असतें. प्रेतें पुरतांना त्याचें डोकें पूर्वेला व पाय पश्चिमेला असें उताणें पुरतात. पुरलेल्या जागेवर दगड ठेवतात.

## राजगोंड

ह्यांच्यामध्ये प्रेत उभ्या स्थितींत पुरतात. पुरलेल्या जागेवर दगडाचें लिंग करतात.

## वडारी

मातीवडारी, जातीवडारी व गाडीवडारी असे निरनिराळे धंदे करणारे ह्या जातींत लोक आहेत. जातीं करणारे ते जातीवडारी. ह्या पोटजाती नाहीत. कारण ह्या सर्वांत रोटीबेटीव्यवहार सरसहा होतो. लग्नाचें देज दोनशे तें तीनशे रुपये पर्यंत असतें. पाट व लग्न ह्यांत देजासंबंधानें भेद नाही. लग्नाचा खर्च नवरा करतो. त्याला जातीला तीन जेवणें द्यावीं लागतात. नवरीकडील जेवण जातीला मिळत नाही. बाशिंगावांचून व वाजंत्र्यांशिवाय लग्न लागतें. वधूच्या घरीं हळद दोघांना लागते. नवरा-नवरी घोंगडीवर बसतात. समोर पण घोंगडीवरच तांदुळाच्या रांगोळीचीं चित्रें काढतात. त्यांत चंद्राचें चित्र असतें. दोघांनाहि हळद लावलेली असते. नंतर नवऱ्याला एकजण कडेवर घेतो; दुसरा नवरीला घेतो. मग नवरा तीन वेळां नवरीला धक्का देतो, कोपरखळ्या मारतो. नवरानवरी विडा खाऊन थुंकून टाकतात. जाई मंगळी राई मंगळी शिरम् शितरडु बालो राजन्ना हें मंगलाष्टक तेलगूंत म्हणतात.

नवरा बायकोला नांवानें हाक मारतो, परंतु बायको नवऱ्याचें नांव घेत नाही. मंगळवारीं स्त्रीसंभोग करणें विहित समजतात. बायलो, सीता, मुल्ला, मारका, जीजा, सौडू, चेटका इ० बायकांचीं नांवें असतात. लग्न पंच लावतात. तें वधूच्या घरीं लागतें.

विटाळसेपण सात दिवस पाळतात. आठव्या दिवशीं स्नान होतें. हे सात दिवस घरांत राहत नाहीत. बाहेर गोणपाटाची सावली करून–पाल करून–

तेथे विटाळशी राहते. पहिल्या न्हाणाच्या वेळीं सात अगर नऊ दिवस बसतात. न्हाणवलीला गुळ खोबरें देतात. ती विडा खाते. पुढे तारुण्यांत विडा खात नाहीत.

स्त्रिया विड्या ओढीत नाहीत. कुंकू लावलें तर साडेतीनशे रुपये दंड करतात. डाव्या हातांत फक्त काचेची बांगडी घालतात. उजव्या हातांत पितळेचीं कडीं असतात. विवाहित स्त्री गळ्यांत काळी पोत घालते. वैधव्य आलें तर ती तोडतात. पाट लागला तर पुनः घालतात. कुंकवाप्रमाणे चोळीलाहि निषेध आहे व चोळी घालण्याचा एखाद्या स्त्रीने अनाचार केल्यास तितकाच दंड करण्यांत येतो. दंड दिला नाही तर त्या बिचारीस जातीबाहेर टाकण्यांत येतें. मुलाचे व मुलीचे जन्मकेस काढतात.

प्रेतें पुरतात. बायको जिवंत असल्यास खळग्यांत पहिली माती तिनेच टाकली पाहिजे, मुलगा तिच्यानंतर टाकतो. अकरा किंवा तेरा दिवस क्रिया चालेपर्यंत सुतक धरतात. मुलीचें लग्न होण्यापूर्वी आईबापांना तिचें तीन दिवस सुतक असतें; परंतु लग्न झाल्यावर तेरा दिवस धरतात.

बाळंतिणीच्या उशाशीं चाकू ठेवतात. वार पुरतात व त्या ठिकाणीं दगड ठेवतात. ह्या दगडावर बाळंतिणीने अंग व कपडे धुवावयाचे असतात. वारेला माया म्हणतात. वार घराच्या बाहेर पुरतात. पांचव्या दिवशीं मुलाला पाळण्यांत घालतात. नांव केव्हाहि ठेविलें तरी चालतें. सुंका, शिन्ना, मल्लाड, मंमई, अण्णा, बापू, देवा, शंकऱ्या, मशा, माऱ्या, छिन्नामारू, छिन्नशिय्या अशा प्रकारचीं पुरुषांचीं नांवें असतात. प्रसूतीनंतर बारा महिने पर्यंत स्त्रीसंभोग करीत नाहीत. संभोगाने दूध तुटेल ही भीति वाटते. सोयर बारा दिवस धरतात. सोडचिठ्ठीची वहिवाट आहे; पण देज परत करावा लागतो.

## जव्हारचे वारली

जव्हारच्या राजाचें कुलदैवत मल्हारी. त्याचा पुजारी वारली आहे. वारल्याच्या देवाला हिरवा म्हणतात. मोराचा पिसारा देव्हाऱ्यांत ठेवून दिवाळींत त्याची पूजा करतात हाच हिरवा देव. हा घरोघरीं नसतो; तो जाम-

सर गांवीं आहे. पावसाकरिता ह्या देवाची प्रार्थना करितात. हिरवा देव म्हणजे पितर समजतात.

वारली चातुर्मासांत चवळ्या खात नाहींत; तसेंच हिरवी भाजीहि खात नाहीत. तथापि चवळ्या दिवाळीला खातात.

पावसाळ्यांत वारली कुटुंबांत एक तरी जोडपें ब्रह्मचर्य पाळतें. असें केल्याने पीक चांगलें येतें अशी समजूत आहे.

ह्या जातींत स्त्रीपुरुषांचा पहिला संबंध जंगलांत होतो. नेहमीहि शक्यतों मैथुनकर्म घरांत करीत नाहीत; जंगलांत जाऊन करतात.

वारल्यांची समजूत अशी आहे की, पांडव तीन; नकुल व सहदेव त्यांस माहीत नाहीत.

# विशिष्ट जातींतील चालीरीति

## कोचीनचे ज्यू*

भावाने मेलेल्या भावाच्या बायकोबरोबर लग्न केलें पाहिजे. हे लोक लग्नावांचून राहणें पाप मानतात. त्यांच्या धर्माला अनेकभार्यात्व मान्य आहे. प्रेतें पुरतात. सुतक सात दिवस धरतात. प्राणोत्क्रमणानंतर तीन तासांच्या आंत पुढील क्रिया आटोपावी लागते.

जन्मल्यावर आठव्या दिवशीं मुलाची सुंता करतात. नामकरणविधि त्याच दिवशीं होतो.

मुलींचें नांव पांचव्या दिवशीं अथवा तीस दिवसांनंतर केव्हांहि ठेवतात.

* ता ५ जानेवारी १९४१च्या बॉम्बे क्रॉनिकलवरून.

## जागाची किंवा राणादेवीची मुंज*

खानदेशांतील यजुर्वेदी ब्राह्मणांत राणादेवीच्या मुंजीचा कुलाचार आढळतो. विशेषतः वडील मुलाच्या मुंजीच्या वेळीं हा कुलाचार करावा लागतो. त्याचा प्रकार असा :—

मुंजीला प्रारंभ रविवारींच करावयाचा असतो. घरांतील व शेजारील मंडळी समारंभाने गांवाबाहेर जाऊन आंब्याच्या झाडाच्या खालील पांच पाट्या मातीचें पूजन करून ती वाजतगाजत घरीं आणतात. आंब्याच्या झाडाखाली पूजेच्या वेळीं लावलेला तुपाचा दिवा मातीबरोबर घरीं येतो, तो सव्वा महिना न विझवतां तेवत ठेवावा लागतो. घरांत पांच चौरंग मांडून वर एक एक कोरी टोपली ठेवलेली असते. तिच्यांत वरील माती ओततात. नंतर ह्या मातींत धान्याचा रोह करतात. प्रत्येक चौरंगावर एक एक पाट ठेवलेला असतो. तो आंब्याच्या लाकडाचा पाहिजे असा नियम आहे. ह्या पाटावर सोन्याची देवीची प्रतिमा ठेवतात. ह्या देवीचें नांव राणादेवी. चौरंगाच्या दोन बाजूंस दोन समया तेवत असतात. पैकी एक तुपाची व एक तेलाची. ह्या समयासुद्धा आंब्याच्या लाकडाच्या कराव्या लागतात. हेहि दिवे सव्वा महिना तेवत असतात. रोज सोळा मेहुणे भोजनास बोलावतात. दुसऱ्या रविवारीं राणादेवीचें शंकराशीं लग्न लावतात. लग्नाचा सर्व सोहळा होतो. शंकराची मूर्ति (लिंग नव्हे) मातीची असते. ती कुंभार करून देतो. दोन रविवारांच्या मध्यें मुलाला लाभेल त्या दिवशीं त्याची मुंज लावण्यांत येते.

नवव्या दिवशीं सोमवारीं बोळवण करतात. आठहि दिवस पक्वान्नांचा नैवेद्य असतो. लग्नांत हा कुलाचार नसतो; मुंजींतच तो करावयाचा असतो. म्हणून ह्या देवीच्या लग्नाला मुंज म्हणण्याचा प्रघात पडला असावा. राणादेवीला रण्णा व सण्णा अशीं दुसरीं दोन नांवें आहेत.

---

* ही माहिती बदलापूर स्टेशनवर धुळ्याचे जोशी स्टेशनमास्तर होते त्यांच्याकडून मिळाली.

## कोल्हाटी*

ह्या जातींत बारा कुळी आहेत त्यांचीं नांवें येणेंप्रमाणे :—

१ पाटणकर घोरपडे, २ औंधकर जाधव, ३ कुडळकर, ४ जावलकर, ५ गाडे, ६ पडकर, ७ घुमरे, ८ ताथवडकर, ९ लाखे, १० म्होरकर, ११ बेमळे, १२ जातकर. ह्यांपैकी पडकर व जातकर कुळी नष्ट झाल्या आहेत.

ह्यांचा मद्रासकडील कोल्हाटयांच्या बरोबर रोटीबेटीव्यवहार नाही कुडळकरांशीं बाकीच्या कुळींचा रोटीव्यवहार होत नाही पण बेटी-व्यवहार आहे.

एकाच कुळीच्या लोकांत लग्न होत नाही. लग्न मुलीकडे लागतें. देज साठ रुपये ठरलेला आहे. लग्न लावण्यास ब्राम्हणाची अवश्यकता असते. ब्राम्हणाने दिलेल्या मुहूर्तावर सकाळीं किंवा सायंकाळीं लग्न लागतें नवरा-नवरी पाटावर उभीं राहतात व मध्यें अंतरपाट धरतात. ब्राम्हण सांगेल ती बाई मुलामुलीला हळद लावते. ही बाई व तिचा नवरा पदरास गाठ मारून आंब्याचा टहाळ आणून मांडवाला रोवतात. लग्न लागण्याच्या पूर्वी प्रत्येक लग्नाच्या स्त्रीस नारळाची एक वाटी व दोन आणे तसेंच कुमारिकेला अर्धी वाटी व एक आणा देण्याची वहिवाट आहे. लग्नाला निघतांना मुलगा मोह करतो. ह्यांच्यांत बाशिंगें बांधण्याची चाल आहे. वरातीच्या वेळीं मुलगा पायीं चालत जातो. लग्न लावण्याच्या अगोदर मुलांमुलींचें नातें विचारून घेतात; त्याचप्रमाणे मुलाच्या बापाच्या सद्वर्तना-विषयी प्रश्न विचारतात. पदर येण्यापूर्वी लग्न झाल्यास मुलगी बापाच्या घरीं असतांना मरण पावली तर त्या मुलाला मुलीच्या बापाने आपल्या खर्चाने दुसरी बायको करून दिली पाहिजे असा निर्बंध आहे. लग्नानिमित्त शिजवलेल्या अन्नाची जेवणावळ घालीत नाहीत. मुलाकडून चाळीस रुपये घेऊन त्याचें धान्य आणतात आणि तें जमलेल्या सर्व लोकांस—बायकां-पुरुषांस— सारखें वांटून देतात. राडवा असल्यास तिला दोन वांटे मिळतात.

* औंध येथाल कोल्हाटणीकडून ही माहिती घेतली आहे.

एक तिचा व दुसरा तिच्या मेलेल्या नवऱ्याचा. साखरपुडा होऊन मुलगी देत नाही असें बाप म्हणाल्यास त्याच्याकडून जातीला शंभर रुपये मिळतील तेव्हाच त्या मुलीचें दुसऱ्याशीं लग्न होऊं शकतें.

औंधकर कोल्हाट्यांत स्त्रियांचा पुनर्विवाह नाही. वेश्याव्यवहारानंतरहि इच्छेस येईल तर लग्न होण्यास अडचण पडत नाही. पालमांडु कोल्हाट्यांत लग्नसंस्था नाहीं. ह्या लोकांना भातू म्हणतात.

जमिनीवर बसून प्रसूति होते. मुलगा झाल्यास पांच रुपये व मुलगी झाल्यास दोन रुपये दैवाला द्यावे लागतात. मुलाला बाराव्या दिवशीं पाळण्यांत घालतात. त्याच्या अगोदर बायका नदीवर, विहिरीवर अगर इतरत्र पाण्याच्या ठिकाणीं जाऊन सटवाई पूजतात व तेथेच जेवतात. सटवाई म्हणजे दगडाचे चार पांच खडे असतात. प्रत्येक मुलाच्या गळ्यांत तिसऱ्या दिवशीं केलेली रुप्याची सटवाई बांधतात. तिसऱ्या दिवशीं दारूतुपाबरोबर कोंबडें खाण्याची चाल आहे. सहाव्या दिवशीं बाळंतीण घराबाहेर पडते. बाळंतिणीच्या उशाशीं चाकू असतो. ह्यांच्यांत पांचवीपूजन आहे, सहावीपूजन नाही. तें वर सांगितल्याप्रमाणे निराळ्या प्रकाराने होतें. तिसऱ्या दिवशीं न्हाणीपूजन म्हणजे मोरीची पूजा करतात*.

विटाळशा चार दिवस बसतात. सुतक बारा दिवस; तेराव्या दिवशीं स्नान. प्रेतें पुरतात, परंतु प्रेतापुढे विस्तव नेण्याची चाल आहे.

## कोल्हाटी लोकांच्या लग्नांत म्हटलीं जाणारीं गाणीं

(हळद लावतांना)

**नवरीचें**— हाळद हाळदई आई सुये ।
तारईबाई लालीला मळवट भरा ॥
आई सुये तारईबाई नवरीला हाळद लावावे ।
,, ,, ,, ,, मंडवळे बांधावे ॥
,, ,, ,, ,, शेरा ,, ॥
,, ,, ,, ,, बाशिंगे ,, ॥

---

* ही चाल ऋग्वेदी देशस्थांतहि आहे.

**नवऱ्याचें—** हाळद हाळदये आई सुये ताराईबाये लाल्याला मळवट भरा ॥
आई सुये ताराईबाये नवऱ्याला हाळद लावावे ॥
,, ,, ,, ,, ,, मंडवळे बांधावें ॥
,, ,, ,, ,, ,, शेरा ,, ॥
,, ,, ,, ,, ,, बाशिंगे ,, ॥

(नवरीकडे नवरा जातांना)

आले आले मारुती डफ डफ वाजती नवरदेव ॥
नवरा चालला नवरीसाठी, वऱ्हाडणी चालल्या पोटासाठी ॥
पालखी नव्हे सुपारी सांगुनी धाडा दुपारीं नवरदेवास ॥
आमचें वऱ्हाड देहूकस; माणिक मोती रस ॥
त्यांचें वऱ्हाड येवो कस; हातांत दाळ्या बोकड कस ॥

(वरातीच्या वेळचें)

वरात चालली मायबापाची गणागोताची ॥
बहिणी भावाची वरात चालली थोराचा नवरा ॥
चालला शब्रिला वरात चालली ॥

## काठेवाडी नागर ब्राह्मण *

काठेवाडी नागर ब्राह्मणांत सहा जाती : १ वडनगर, २ वीसनगर, ३ प्रश्नोरा, ४ डुंगरपरा, ५ साटोदरा, ६ गिरनारा. ह्या जातींत रोटीबेटी-व्यवहार नाही. वडनगर ब्राह्मणांत उपाध्यायवर्ग व गृहस्थ ह्यांच्यांत बेटी-व्यवहार नाही. बाकीच्या नागरांत तसें नाही. वडनगर गृहस्थ ब्राह्मण दक्षणा घेत नाही. नागर ब्राह्मणांत एक बायको जिवंत असतां दुसरी करीत नाहीत.

* ही माहिती जावंदंयां मंडळाचे चिटणीस रा. ज. न मानकर ह्यांनी सांगितली. हे स्वत: वडनगर ब्राह्मण, ऋग्वेदी, आश्वलायन सूत्र, सांख्यायन शाखा, गोत्र गॅगॅनस.

## भाटे *

भाट्या जातींत लग्नाच्या वेळीं मुलाच्या हातांत सोन्याच्या ऐवजी चांदीची आंगठी घालतात.

विधवेच्या श्राद्धाला विधवा सवाशीण सांगतात; मात्र ती ब्राह्मण जातीची विधवा असावी लागते.

श्राद्धाच्या दिवशीं मुलांनाहि अगोदर जेवावयाला घालीत नाहींत.

विधवा काळें लुगडें नेसतात.

मावशीच्या नवऱ्यास मासा म्हणतात.

लग्नांत मुलीला मामानें दागिने द्यावयाचे असतात.

सौभाग्यचिन्ह म्हणून मंगळसूत्राला फारसें महत्त्व नाहीं.

घरांत मृत्यु आल्यास सवाशणी स्त्रियाहि दहा दिवस कुंकू लावीत नाहींत.

वरातींत विधवा सर्वांच्या मागें असतात.

भाटे जातींत स्त्रियांचा पुनर्विवाह नाहीं. सुतक बारा दिवस धरतात. पतिनिधनानें वैधव्य आल्यास उत्तरक्रियेच्या वेळीं एकदाच केशवपन करतात. नंतर केस वाढविण्यास प्रतिबंध नाहीं.

नागर ब्राह्मणांप्रमाणें ह्या जातींतहि पहिली बायको जिवंत असतां दुसरी करतां येत नाहीं.

ह्यांच्यांत मुंज करतात. मांसाहार अथवा मत्स्याहार निषिद्ध आहे.

## रड्डी §

लग्न मुलाकडे होतें. नवरानवरी बैलांवर बसून जातात. मारुतीच्या देवळांत नवरानवरीचें स्नान व मंडळींचें भोजन होतें. देवळांत वधूवरांचें

---

* ही माहिती औंधला जात असताना डब्यांत बसलेल्या एका बुद्धिमान् भाट्या जातीच्या स्त्रीकडून मिळाली.

§ औंध संस्थानांतील गुणदाळ तालुक्यांतील रड्डी लोकांची माहिती तेथील कपूर वकील ह्यांनी दिली.

गोत्र गुरव सांगतो. साखरपुड्याच्या वेळीं काळ्या घोंगडीवर मुलीला घेऊन बसण्याची रीत आहे. लग्नांत, मुलगी दगडावर उभी असते. लग्नांत सुपाऱ्या, खारका, हळकुंडें, विड्याचीं पानें, खोबऱ्याचे तुकडे हे जिन्नस प्रत्येकीं अठ्ठेचाळीस अठ्ठेचाळीस घ्यावे लागतात. कुंभाराकडून घट आणून मुलामुलीचें स्नान घालतात. लग्न झाल्यावर न्हाव्याकडून मुलाचीं नखें काढतात; तोपर्यंत मुलाचीं नखें काढीत नाहीत. नवऱ्या मुलाला शेतांत पेरावें लागतें. लग्नानंतर गुगळाचा विधि उरकतांना पुरवंत होणाऱ्या इसमाच्या छातीवर वीरभद्राची मूर्ति कोऱ्या धोतराने बांधून त्याला गुगळासह वीरभद्राच्या देवळांत नेऊन त्याच्याकडून देवास नमस्कार करवितात. इतकें झाल्यावर पुरवंत होण्यास तो पात्र होतो.

ह्या लोकांत स्त्रियांचा पुनर्विवाह एकदाच होऊं शकतो.

## लिंगायत रड्डी

पुरुषाच्या प्रेताला उलटा अंगरखा व स्त्रीच्या प्रेताला उलटी चोळी घालतात. प्रेत खळग्यांत ठेवल्यावर प्रेताच्या डोक्यावर जंगम दोनदा पाय ठेवतो. नवरा मेल्यावर बायकोच्या लुगड्याचे पदर फाडतात व हातांतील कांकणें फोडतात. बायको प्रेताला ओवाळते. अशा बाईला पुनर्विवाह करण्याची परवानगी नाही. प्रेताच्यापुढे नाचणी फेकली तर प्रेत भूत होत नाही अशी समजूत आहे.

## पंचमसाळी

न्हाव्यांकडे महार, मांग जेवीत नाहीत. न्हावी मेला तर मागील भिंत पाडून शव घेऊन जातात.

---

## स्नेहसंबंध करणें

कोणत्याहि दोन पुरुषांना व स्त्रियांना स्नेही होतां येतें. ह्या दोन व्यक्ति एकाच गोताच्या असतां कामा नये. जोहार, भजली, महाप्रसाद, सखी वगैरे स्नेह्यांचे प्रकार आहेत. जोहारद्वार स्नेह करण्याचा विधि येणेंप्रमाणे :— घरांत किंवा अंगणात सारवलेल्या जागेवर मित्र होणाऱ्या

दोन व्यक्ति समोरासमोर बसतात. शेजारचीं माणसें बोलावलेलीं असतात त्यांपैकी वडील माणसें शेजारीं चौकोन करून बसतात. एक बाई पेटलेली गोवरी घेऊन येते तिच्यावर तूप ओततात. दोघे पुरुष उभे राहतात. त्यांच्या हातांत ताम्हण असतें. त्यात लोकांनी दिलेल्या तांदुळ, डाळ, तंबाखू, मीठ, वस्त्र, नारळ, रुपया वगैरे वस्तु असतात. ह्या ताम्हणांची तीन वेळां आदलाबदल करतात, नंतर ताम्हण खाली ठेवतात व परस्परांना मिठी मारतात. खालीं बसून एकमेकांच्या तोंडांत खोबरें घालतात. नंतर सर्वांस नारळ वांटून दारू पितात. जोहार संबंध असल्यामुळे ज्वारीचीं कणसें एकमेकांच्या कानांवर ठेवतात. ह्यापुढे पूर्वीच्या नांवाने न हाक मारतां जोहार ह्या नांवाने परस्परांस हाक मारतात.

नर्मदाजल किंवा गंगाजल विधि प्रायः स्त्रियांमध्ये होतो. नदीवर अथवा ओढ्यावर जाऊन परस्परांवर पाण्याचें मार्जन करतात हाच विधि.

— एलविन्च्या बाय्गा पुस्तकावरून

## दुराचाराच्या कल्पना*

आपल्या बांधवांना दुष्टपणाने कटु बोलणें.

भुकेलेल्या ब्राह्मण अतिथीला जेवूं न घालणें.

रविवारीं, अमावास्येला, संक्रांतीच्या दिवशीं, श्राद्धतिथीला क्षार लावून वस्त्र धुणें.

तलावांत मलमूत्रोत्सर्ग करणें.

एकानेच मिष्टान्नभक्षण करणें.

कामिनीनें पुरुषाला अगर पुरुषाने कामिनीला शुक्र पाजणें.

सकेश पार्थिव लिंगाची अर्चा करणें.

गर्भार पत्नीबरोबर संभोग करणें.

आपण अगर नोकराकडून बैलाला काठीने मारणें.

तलावांतून बाहेर आलेल्या सुसरींना मारणें.

ब्राम्हणाने गादीवर कासवाचें मांस खाणें.

---

* ब्रह्मवैवर्तपुराण.

# रजःकण

१. महादेवाचे पुजारी मराठे गुरव आहेत. ह्यांच्यामध्ये मुंज लागते; परंतु ब्राम्हण त्यांच्यापैकीच असतो. जंगम किंवा अन्य जातीचा ब्राम्हण तें बोलावीत नाहीत. प्रेतें जाळतात. मांस खात नाहीत; तथापि मांसाहारी लोकांकडे जेवतात.

२. सोनारांकडे सोनारच उपाध्या असतो. सोनारांना पंचकलशी म्हणतात.

३. झरेगांवीं न्हाव्यांची जोशीपणाची वृत्ति आहे. ह्यांना भट अथवा भाट म्हणतात. ते अंतरपाट धरतात. ही वृत्ति ब्राम्हणांकडेहि आहे. परंतु त्यांच्याकडे स्वतः न जातां माडोत्री ब्राम्हण पाठवितात.

—(औंध संस्थानांतील).

४. मांजरीची वार शुभदायक मानतात. म्हणून ती घरांत उंबरठ्या-खाली पुरतात. मांजरीची वार फारशी सांपडत नाही.

५. औंध संस्थानांतील आटपाडी महालांत महालक्ष्मीला जोडे वाह-ण्याची चाल आहे.

६. ठाणें जिल्ह्यांत आगऱ्यांच्या बायका होळी लावण्यास व होळीवर खेळण्यास जातात.

७. रत्नागिरी जिल्ह्यांत वाणी जातींत वर्षांतून एक दिवस स्त्रियांनी नग्नावस्थेंत स्वयंपाक करून पूजा करण्याची चाल आहे.

८. सोमवारीं मुलगा असलेली आई कांडीत नाही.

९. लग्नकार्यादि प्रसंगीं देवक बसविण्याकरिता एका सुपांत जे जिन्नस मांडतात त्यांत कुंभारणीचीं शष्पें ठेवण्याची चाल कित्येक कुटुंबांत आहे. ह्या शष्पांची गंधपुष्पाने उपाध्याला पूजा करावी लागते. तासगांव तालुक्यां-तील धामणी गांवच्या कुळकर्णी ब्राम्हण कुटुंबांत ही चाल आहे.

मिरजेचे डॉ. जोशी हे तेथे वृत्तिसंबंधाने जात असतां त्यानी स्वतः पाहिली आहे. —(डॉ. भातखंडे मिरज यांचें पत्र).

[stamp]

१०. रत्नागिरी जिल्ह्यांत ब्राम्हणाच्या प्रेताचें जानवें काढून मग तें प्रेत जाळतात. गणपतिविसर्जन करतांनाहि देवाच्या अंगावरचें जानवें काढण्याचा प्रघात आहे.

११. रत्नागिरी येथें मिऱ्यावरील सांवत कुटुंबांत निजतांना गादीखाली गवताची काडी ठेवून निजण्याची रूढि आहे.

१२. कृष्ण दैवत ज्यांचें आहे—मग ते कोणत्याहि जातीचे असोत—ते हिंदूंनी मारलेल्या बोकडाचें मांस खात नाहीत. मुसलमानाकडूनच बोकडाची हत्या झाली पाहिजे.

१३. माघ पूर्णिमेनंतर कोणत्याहि शुक्रवारीं औंधचे महार— प्रत्येक स्त्री पुरुष मुल— मूळपीठावरील देवीच्या पुढे नंदीजवळ शेगडींत आपल्या अंगाचें कातडें काढून टाकतात. हें कातडें चाकूने—खुरप्याने—काढतात. रात्रभर टेकडीवर असतात. त्यांचें जेवणखाण तेथेच होतें.

१४. कित्येक ब्राह्मण (महाराष्ट्रांतील) वर्षांतून आठ दिवस मुसलमान होतात. तेव्हा ते मशिदींत जाऊन राहतात. —(शंकरराव जोशी यांजकडून).

१५. मद्रास इलाख्यांत माध्यंदिन ब्राह्मणांत दररोज दुपारीं १२ ते १ पर्यंत घराबाहेर राहून अस्पृश्यत्व पाळण्याची चाल आहे.

१६. वाई तालुक्यांत नागपंचमी सांगण्यास गांवांत न्हावी नग्न होऊन जातो. —(शंकरराव जोशी).

१७. नागपंचमीच्या दिवशीं आज तुम्ही सकाळीं उठा, पुरणवरण करा, सण करा, असें कोणी तरी येऊन सांगितल्याशिवाय अंथरुणावरून उठावयाचें नाही अशी रूढि कित्येक घराण्यांत आहे. —(शंकरराव जोशी).

१८. मोताळा ब्राह्मणांत मुलगी मेल्यावर तिचें गोत्र तर्पण करतांना बापाचें लावतात. ह्यास कोकीळमत म्हणतात. —(शंकर रामचन्द्र शेंडे).

१९. औंध येथे प्रेताच्या खाली व वर निंबाचा पाला घालतात.

२०. बदलापुरांत प्रेताच्या अस्थि बुधवारीं गोळा करीत नाहीत.

२१. आडिवरें येथे महार लग्नाचा घाणा भरतात. तो शेलार व राणे

यांनी तेथे जाऊन निमेनिम घ्यावयाचा असतो. शेलार व राणे गुरव आहेत. —(आडिवऱ्याचे दीक्षित)

२२. इमारतीचें काम सुरू असतां सुतार खुटा करीत नाही. तसेंच त्या वेळीं कोणी पायाला तेढा घालून बसतां कामा नये.

२३. कांही ठिकाणीं नाथाची पूजा कुंभाराची आहे. नाथाची घोड्यावर मूर्ति असून समोर नंदी असतो. तसेंच नागाचा पुजारी न्हावी असतो.

# लोककथा

## लोककथा १

(पुढे दिलेली कथा बदलापूरच्या एका कातकऱ्याने सांगितली. ही कथा तो पांचवीच्या दिवशीं सांगतो.)

एक आंबरसर राजा होता. त्याला आंबरसया नांवाची मुलगी होती. तिचें आंबऋषीबरोबर लग्न झालें. लग्न होऊन बारा वर्षें झालीं; पण पोटीं संतान होईना. तेव्हा ती आपल्या पतीला बोलली की पुत्रसंतान नसल्यामुळे राज्याला कोणी वारस नाही. तेव्हा तूं दुसरें लग्न कर. पण आंबऋषीने आपल्या भार्येला सांगितलें की, तूं असतांना मी दुसरी बायको करणार नाहीं; मग आपल्या नशिबांत काय असेल तें खरें. त्यावर आंबरसयेने उत्तर दिलें की राज्याला कोणी धनी नसल्यामुळे मी आत्महत्या करून तुला दुसरें लग्न करावयाला लाविलें असतें; पण तसें केलें असतां नरकवास सोसावा लागेल अशी मला भीति वाटते; म्हणून ज्यांनी मला जन्म दिला त्यांच्याकडे जाऊन त्यांची मी सेवा करीन. सेवा करताना मरण आलें तर मला सद्गति मिळेल. ह्यावर तिच्या पतीने तिला पुन्हा बजावलें की तूं देवाकडे गेलीस तरीसुद्धा मी दुसरें लग्न करणार नाहीं. तेव्हा आंबरसया आंबऋषीच्या पायां पडून म्हणाली, तूं माझी आता आशा सोड. मी आलें तर तुझी; मेलें तर पृथ्वीची. आंबऋषीने तिला जाण्यास अनुज्ञा दिली. आंबरसय एकवीस स्वर्गास लागून कैलासास पोंचली आणि शंकराच्या चरणांपाशीं

आली. तेव्हा शंकराने तिला विचारलें, तुझ्यावर एवढें संकट तरी कोणतें आलें आहे म्हणून तूं माझे पाय धरलेस ? आंबरसया म्हणाली, जन्म देऊन वाया चालला, पोटीं नाहीं आणि पाठीं नाही अशी स्थिति आहे. शंकर म्हणाला कीं, बाई, ब्रह्मदेवाचा टाक आणि सतीचें अक्षर हें कांही चुकत नाही. तेव्हा आंबरसया त्याला म्हणाली, तर मग माझ्या पोटीं पुत्रफळ द्यावें. शंकरानें सांगितलें, तुझ्या दैवांत पुत्र नाही. तेव्हा आंबरसया त्याला म्हणाली की, मला येथेच मृत्यु आण. शंकरानें सांगितलें, तुझें आयुष्य पुष्कळ असल्यामुळे तुला मृत्यु येणार नाही. तूं ब्रह्मलोकीं गेलीस तरी तुला हेंच उत्तर मिळेल. म्हणून तूं परत मृत्युलोकीं आपल्या राज्यावर जा. तुला मरण नाही. तेव्हा आंबरसया पुन्हा एकवीस स्वर्गास लागली आणि मृत्युलोकीं येऊन राज्यावर बसली. इतक्यांत पार्वतीला तिची दया येऊन तिनें महादेवाला विनंती केली की, आपण नवखंड पृथ्वी आणि दहावी काशी हिंडणारे आहांत. कांही तरी करा आणि आंबरसयेला पुत्रफळ द्या. असें करतां येणार नाही असें महादेवाने म्हटल्यावर पार्वती त्याला पुन्हा म्हणाली, तूं वाटेल तें कर पण आंबरसयेच्या 'देहीं उजेड कर'. मग शंकराने विचार करून नारद देवाचा शोध केला. त्या वेळीं नारद तिन्ही ताळा सप्त पाताळा क्षीरसागरांत होता. तेथे त्याला बोलाविणें पोचतांच तो एकदम निघाला आणि कैलासास आला. महादेवाला नमस्कार करून मला कां बोलावणें केलें म्हणून त्यानें पृच्छा केली. महादेव म्हणाले, थोडें काम आहे. करशील का ? नारद म्हणाले, करण्यासारखें असेल तर करीन नाहीतर सोडून देईन; पण मला सांगा. महादेवाने नारदाला सांगितलें, अंगांत भगवें वस्त्र घाल, डोकीला टोपी घाल, तोंडाला भस्म लाव, खांद्यावर विणा धर आणि एका हातांत टाळ घे. अशा थाटाने आंबऋषीच्या नगराला जा. तेथे दोन अक्षरें सांग. तोळा भरून गांजा देईल त्याला एक पुत्र होईल. दोन तोळे देईल त्याला दोन होतील. ह्याशिवाय तिसरें अक्षर बोलूं नको. त्याप्रमाणे नारददेव आंबऋषीच्या नगराला जाऊन सर्वत्र हिंडले. नंतर राजवाड्यांत गेले. प्रधानाने पाहून राजाला कळविलें की, आपल्या नगरांत जोशी आला आहे. तो असें बोलतो की, एक तोळा गांजा देईल त्याला एक बाळ होईल. दोन तोळे देईल त्याला दोन होतील. मग राजाच्या सांगण्यावरून प्रधा-

नानें नारदाला राजाजवळ आणलें. मग आंब्रऋषीनें प्रधानाला सांगितलें, एक टोपली गांजा व एक टोपली अफू आणून साधूच्या पुढे ठेव. गांजा अफूची टोपली पुढे आल्यावर नारदानें धोपटींतून एक तराजू व दोन तोळ्यांचें वजन काढलें. नंतर दोन तोळे गांजा जोखून घेतला व बाकीचा परत दिला. मग एक तोळा गांजा मळून ओढला. नंतर नारददेव कैलासास जाऊन शंकराला भेटले आणि म्हणाले माझा वांटा मी ओढला, तुझा तोळाभर गांजा तूं घे. महादेवानें नारदाला गांजा मळून चिलीम भरण्यास सांगितलें आणि म्हटलें तोळाभर गांजा आपण दोघे ओढूं. त्याप्रमाणे दोघांनी गांजा ओढल्यावर नारददेव क्षीरसागराला गेले. नंतर कांही काळ गेल्यावर आंबरसया गर्भार राहिली. नऊ महिने नऊ दिवस भरले; प्रसूत होऊन दोन पुत्र झाले. स्वर्गांत घंटा वाजू लागल्या की, आंब्रसयेच्या दैवांत पुत्र नव्हता, मग हे पुत्र कोणीं दिले ? तेव्हां ब्रम्हाविष्णूंनी विचार केला की, ज्यांनी ह्या बाळांना जन्म दिला तोच त्यांचीं नांवें ठेवील. पुढे बाराव्या दिवशीं मुलांना पाळण्यांत घातलें तेव्हा नारदांनी भिक्षुकाचें रूप घेऊन ते आंब्रऋषीच्या नगराला गेले आणि दक्षिणा मागूं लागले. हा आरास कसला चालला आहे अशी नारदांनी चौकशी करतां मुलाचें बारसें असल्यानें गाणें चाललें आहे असें समजलें. मुलांचें तुम्हीं नांव ठेवा. पंचांग आणतों मग नांव ठेवतों असें नारदानें कळविलें. असें म्हणून नारद महादेवाला आणावयाला गेले. महादेवांनी पोटदुखीचें निमित्त सांगितलें, त्यांना वाटलें की, मी नांव ठेवीन तर माझें नांव 'दाखील' होईल; नारद म्हणाले, कसेंहि करा पण चला. महादेव म्हणाले, मला दवा आणून दे. मृत्युलोकीं जा आणि जिवंत असेल त्याला फाडून त्याचें काळीज आण. हा दवा मला लागू पडेल. मग नारद मृत्युलोकीं जायला निघाले. त्याना वाटेंत गाय भेटली, तिनें विचारलें अरे देवा, जातोस कुठे ? नारदानें सांगितलें, शंकरदेवाचें पोट दुखत आहे म्हणून त्यांना दवा आणायला जातों. गायीनें विचारलें, दवा कोणता ? नारद म्हणाला, ही सोन्याची सुरी घे, तूं आपलें पोट फाड आणि काळीज आणून दे. गाय म्हणाली, देवा, उद्याचें मरण आज कोण पत्करील ? हे चैत्र वैशाखाचे दिवस आम्ही मोठ्या जुलमानें काढतों. तेव्हा माझ्याजवळ दवा नाही, तुला दुसऱ्या कोठे मिळेल तर घेऊन ये. नंतर नारद-

देव सगळ्या पृथ्वीवर हिंडले, पण त्यांना कोणी दवा देईना. मग ते जपन देशाला गेले. त्या वेळीं जपनऋषी शंकराचा जप जपत होता. बारा वर्षे त्याचा जप चालला होता. तो पुरा व्हायला आणि नारददेव जायला एकच गांठ पडली. तूं कोठे चाललास असा प्रश्न जपनऋषींनी विचारल्यावर शंकराचें पोट दुखत आहे, त्याला दवा आणण्यासाठी जातों असें नारदांनी उत्तर दिलें. कोणता दवा पाहिजे हें नारदांनी सांगितल्यावर जपनऋषींनी सोन्याची सुरी घेऊन आपलें पोट फाडलें व काळीज 'आटीडील' दिलें. कारण त्यानें विचार केला की, मीं बारा वर्षें तप केलें तेव्हा शंकराचा भक्त झालों. त्याचें ज्याअर्थी पोट दुखत आहे त्या अर्थी त्याला दवा दिला पाहिजे. नारदांनी हा दवा नेऊन शंकराला दिला व त्याचें पोट राहिलें. आणलेला दवा शंकरानें खुंटीला लावून ठेवला. नंतर नारदांनी आंबरसयेच्या पुत्राचें नांव ठेवायला जाण्याविषयी शंकराला पुन्हा विनंती केली. तेव्हा शंकर म्हणाले की, तुझ्या माझ्यासारख्याला नांव ठेवतां येणार नाही; ज्यांनी पोट चिरून आंतडें दिलें तोच नांव ठेवील. म्हणून जपनऋषीला घेऊन जा. म्हणून नारद जपन देशाला जाऊन त्या जपनऋषीला घेऊन आंबऋषीच्या नगराला गेला व त्या मुलांचें नामकरण केलें. एकाचें नांव पालकदेव व दुसऱ्याचें गोपाळदेव अशीं नांवें ठेवून ते दोघे परतले. इकडे आठ दिवसांनी खुंटीवर टांगून ठेवलेल्या काळजाला वाचा फुटली. तें म्हणूं लागलें देवा, मला कांही तरी वर दिला पाहिजे. त्यामुळे शंकर तें जपनऋषीचें काळीज घेऊन ढवळ्या नंदीवर बसून चौथ्या समुद्राला जावयास निघाले. तेथे गेल्यावर समुद्राच्या मध्यभागीं त्यांनी तें काळीज टाकलें. तें अगदी तळाला गेलें. नंतर देठ होता तो वाळूंत खुपसला. तेव्हा त्या काळजाच्या वरती कमळ उत्पन्न झालें. मग शंकरांनी त्याला वर दिला की, वाटेल त्या देवाच्या मस्तकावर तुला नेऊन वाहतील.

## लोककथा २

(खालील कथा एका कातोड्याने सांगितली. ती त्याच्यांच भाषेंत दिली आहे.)

एक धर्मपूर नगर. या नगरांत व्हानखीत राजा राज्य करीत हता. तहां त्याने दाराशी अहंकाराना झाड हता. त्या नगरांत माणसाला मुर्तू नाही. त्या राजानी आस्तुरी शरमाकांता. तिनी पोटीं बाल जन्म लिधा. त्यांना नांव जबनकेत. तहां बारा दिवसांत त्या बालनी आईस मरनी. तहां राजा विचारांत पडना की ए बालानी सोय किशी करवा. तहां नगरांतल्या लोकांहीं विचार काय करा की राजाला ठार मारूं ने राज्य लेवूं. तहां सर्व लोक जमीहीन ते राजाने राजवाड्यांत ग्यात. तहां राजाला काय सांगह की तुला ठार मारीहीन राज्य लेवूं. मग राजा काय आखह की, माना लहान बाळ आहा मला मारसा नको. तर माझे नगरांतून मी निंगी ग्या. तर तो निंगीन कोसभर जाग्यामा ग्या. तहां देह अहंकाराना झाड नाहीशी हीना. तहां ते नगरांत मुर्तू पुन्हा हिनी. तहां राजा निंगीहीन भायसर-वनांत ग्या. जातां जातां दिवस अस्मानी ग्या. तहां लहान बाल रडूला लागना. तहां राजा काय बोले की याला खावला काय घालूं. वनांत रात्र हिनी. वस्ती कशी करवा. एक चंदनाना मोठा इरिक्षा (वृक्ष) हता. त्याने बुडाशीं राजाने वस्ती करी. तहां रात्रीने अमलांत भयंकर सैतन आना. मोठ्यान् तो किकाळी मारुला लागना. तहा राजा घाबरना. आता भूत खाहां कीं काय करह. भूत जंगलांतून हिंडत हिंडत राजाने कडेला ग्या. तहां राजाने त्याला हेरल्याबराबर राजाना सामर्थ्य खलास हीना. आता इथ बाळाला खा का मला खा. तहां भूत काय बोले की तूं कोण आहास. राजा काय आखह की मा राजा स्वतःच आहा. भूत बोले तूं राजा आहास मा तुला खां. राजा त्याला आखह की माला खाशील नको. भुता तुला मी वळखां. तूं मुक्ताबाई सैतन आहांस. जर माला आशीर्वाद दीनास तर तुला जागा लंकाभवानीनी देवळांत मी दिईन. तहां भुतानी सांगह की राजा तुला सूट. ती रात निगी ग्यी. ते वनांतून निंगीनी दुसरे ऐरवणांत ग्या. तहां राजाला फार सोक लागना. ऐरवणामा

तळा पाण्याना हता. ते तळावर राजा ग्या. तथ राखणदार हता. तो राजाला सांगह की ए तळाना पाणी पिईस नको. पाणी पीधां की बाईल हीन. तहां राजा बोले की बाईल हीनी तरी हरकत नाही. मग राखणदार काय सांगह तुला सोक लागना. माने घरा परत चल. मग राजा राखणदाराने घरा ग्या. तहां घरा जाईन पाणी प्यावाला हपा. त्या ठिकाणीं राजाला मोठा आनाद वाटना. तो तथ रही ग्या. तथ राजाला वर्ष सहा हीना. राजाना बाळ शहाणा हीना. तहां बाळ बापाला काय सांगह की बा मा वनामा जातां आहां. बाहास काय सांगह की वनानी तुला माहिती नाही. बाळ काय सांगह की माला माहीत नाही तरी अक्कल आहा. बापाना आग्रह मोडीनी वनामा ग्या. वनामा हिंडतां हिंडतां शक्तिपूर नगरामा ग्या. तहां नगरना शिपाई आना. शिपाई सांगह तूं कसना? तूं जहास कस. बाळ म्हणह की आईबापाना घर इसराना. शिपाई आखह आमने राजा परत चल. तो सांगे त्याप्रमाणे ऐक. तहां बाळ नगरामां ग्या. राजाला राम राम करी राजवाड्यामा ग्या. राजा बोले तूं कसना यवगी (योगी)? बाळ काय सांगह की माला घर नाही दार नाही. तहां राजा बोलह माने नगरांत लाव पिजनी (सवकली आहे). मारशील तर फार चांगलें हीत. मारशील तर पोटने कन्याशीं लग्न लावीन. सर्व्यांनी बारी पुरी हिनी. ते नगरामा चार भाऊ ब्राह्मण हता. त्यानी वडील भाचावर बारी आनी. तेव्हा चारी भाऊ रडूला लागना. तहां एक गाडीभर अन्न लिहीन गांवाबाहेर ठेवा. तहां राजा काय सांगह बाळा तुना नांव काय? माना नांव म्हणे जबनकेत. तर म्हणे आज बाराना टेमा लाव यीयीन. तहां बाळ गांवाना बाहेर ग्या. जाहीन हाक मारह की बिसना कोण? तेव्हा तो ब्राह्मण काय सांगह की बाला मा आहां. तो बाल काय सांगह अरे दादा तूं जग. ब्राह्मण काय सांगह की तूं माने पायीं मरस कासा? बाल काय सांगह की जर ब्राह्मणाला जीवदान दीना तर माला फार पुण्य हीन. तहां ब्राह्मण निगीहीन एक बाजूला ग्या. ब्राह्मणाने जागावर यो बाल बिसना. बारानी टेमाला लाव आनी. लाव काय बोलह आज खावनी मजा आहा. तहां बाल काय म्हणे अरे तूं कोणाला खाहास? तहां लाव म्हणे तुला खावला आना. दोन जणांनी मोठी झोंबी हिनी.

शेवटला लावेला मारा. इतक्यांत ब्राह्मण यीईन बालाने पायावर डोई ठेवी. काल काढास हा फार चांगला हीना. याना आम्हाला त्रास हता. लाव मारी तिशी राजाला बातमी कळनी. साफ उजाडना तहां बाल आणि ब्राह्मण नगरामा ग्या. राजाला राम राम करा. आता म्हणले राजा तूं माला वरतना (वचन) दीधास तो दे. राजा काय बोले की तूना लग्न करा. तहां राजानी ब्राह्मण बोलवी नावरशी काढीहीन पंचमीनी हळदी आणि दशमीना लग्न. लग्न हिईन सर्वा लज्जाहोम करी तयारी हिनी. तेव्हा राजा काय बोले की या राज्यावर तुम्ही सर्वा राज्य त्राळाने मार्फती मारा. राजा काय सांगह कीं जवाय (जांवई) हा राज्य तुम्ही आटपा. माला फार तीर्था करूला आहा. खाईपिई तुम्ही राज्य करा. सर्वा इसरा जा. पण देवाचा उपदेश इसरूं नको.

## लोककथा ३

(खालील कथा एका ठाकराकडून घेतली आहे.)

एक कोरडा देश होता. तेथे एक भट व भटीण होतीं. त्यांस दोन मुलें होतीं. नवराबायकोंनी विचार केला की, आपण काशीयात्रेस जावें. भटीण म्हणाली, आपण म्हातारीं झालों. आपणांस चालवणार नाही. मुलें घरीं ठेवूं. भट म्हणाला, एक तूं कडेवर घे, एक मी घेईन. त्याप्रमाणे मुलें कडेवर घेऊन दोघें यात्रेस चाललीं. तेव्हा तो भट एक वण सांडतो (मागे टाकतो), दुसरा मांडतो (पुढे येतें), तिसऱ्या वणाचे घेग घेतो (भयंकर रान लागतें). असल्या रानांत जाऊन भटीण भटाला विचारते, आपण तीन रानें टाकलीं त्यांचीं नांवें काय ?

भट म्हणतो पहिल्या रानाचें नांव ऐराण, दुसरें पैराण, तिसरें कौकष्टी-राण आणि चौथें भयंसूरराण. करंदीच्या जाळी किरकिरा वाजती, हाडळी वया (गाणीं) गाती, धुंधुस्वर नाचती; राकस (राक्षस) पिठा कांडती, ढवळे कावळे, फुलें पंगारे, कासवाएवढा ढेकूण, लिल्याएवढें मीरकूट, गाढवाएवढा ससा, मोराला हात हात दांत, असल्या रानांतून आपण चाललों आहों. पुढे जातां जातां अर्ध्या रानांत भटिणीला तहान लागली. तेथे कास्तुर नांवाच्या गोसाव्याचा मठ असे. तेथे तीं गेलीं. बुवा बुवा म्हणून हाका मारूं लागलीं. तो बुवा तपाला बसला होता म्हणून त्याने

हाक दिली नाही. तप पुरें होऊन तो त्यांच्याजवळ बोलूं लागला, तुम्हांला काय पाहिजे? भट म्हणतो, आम्हाला आधीं पाणी पाजा. पाणी पिऊन शान्त झाल्यावर गोसाव्याला भटभटीण बोलूं लागलीं कीं, आमचीं दोन मुलें तुझ्या घरीं राहूंदे. आम्ही परत आलों म्हणजे झालेला खर्च देऊन मुलें घेऊन जाऊं. गोसावी म्हणतो, अर्धेल देशील तर मुलगे ठेवतों. भटीण कबूल झाली. मग गोसाव्याने मुलाचीं नांवें विचारलीं. एकाचें नांव लाल-मणी, दुसऱ्याचें भौरमणी. मुलें ठेऊन दोघें काशीस गेलीं. गोसावी मुलांस विद्या शिकवूं लागला. मोठा मुलगा कमी शिकला. धाकटा जास्ती शिकला. गोसाव्याने मुलांस आवडदेशचें व गावडदेशचें पाणी आणण्यास सांगितलें. उपर दोघे मुलगे ऐराणांत गेले. तेथे एका मोठ्या डोंगरावर लाल सर्प तोंडाने लाळ टाकीत होता. ती मोठ्या भावाने मडक्यांत भरली. धाकट्याने अंगावरचा फडका काढून दहिवर पडलें होतें त्यावर घालून तो पिळला आणि मडकें भरलें. धाकटा भाऊ प्रथम मठांत आला. गोसाव्याने त्याला शाबासकी दिली. मोठा भाऊ अर्ध्या वाटेस आला. गोसाव्याचा एक बहिरा ससा पाळलेला होता त्याने त्याच्यावर झडप टाकून मडकें फोडलें. मुलगा घरीं रिकामा आला. गोसाव्याने विचारलें, पाणी कां नाहीं आणलें. मुलगा म्हणाला, पाखराने मडकें पाडून पाणी सांडलें. गोसावी मनांत ध्यानला. पुढे आईबाप मागाहून आलीं. गोसाव्याने मोठ्या मुलाच्या अंगावर पुष्कळ दागिने घातले. धाकट्याच्या अंगावर थोडे घातले. दोनहि मुलगे आईबापांच्या पुढे उभे केल्यावर भटीणीने मोठा मुलगा घेतला. धाकटा नाकारला. तिघें घराकडे चाललीं. धाकटा मठांतून पळून आईबापांच्या मागोमाग आला. मग चौघे एका तळ्यावर विसावा घेण्यास बसले. गोसावी ध्यानस्थ होऊन पाहतो तों धाकटा मुलगा गेल्याचें त्यास समजलें. गोसावी तेव्हा त्याच्या मागोमाग गेला. गोसाव्याला चौघांनीं पाहिलें. तेव्हा तळ्यांत एक म्हैस बसली होती तिच्या शिंगांत धुंग होऊन धाकटा मुलगा जाऊन बसला. गोसाव्याने ध्यानस्थ होऊन तें ओळखलें. मग म्हैस कोणाची म्हणून त्याने चौकशी केली. मागशील ती किंमत देईन पण म्हैस मला दे असें गोसावी म्हशीच्या धन्यास म्हणाला व ती किंमत देऊन त्याने म्हैस घेतली व शिंग फोडून पाहिलें तों तो धुंग तेथून उडाला.

सावकारानें पोपट देण्याचें कबूल केलें. तो घरीं गेला व आपल्या मुलीजवळ पोपट मागूं लागला. तिने सांगितलें, सर्व देईन पण हा पोपट मागूं नको. बाप म्हणाला, पोपट बाजारांत किती तरी येतील ते मी तुला घेऊन देईन. असें म्हणून तो पोपट बापाने घेतला आणि त्या गारुड्याकडे आणला. गारुड्याच्या हातांत सावकारानें पोपट देतांच तो पोपट डाळिंब झाला. तें डाळिंब तावडतोब फुटून त्याचे दाणे भुईवर पडले. तो गोसावी तावडतोब कोंबडा होऊन दाणे खाऊं लागला. कैक त्याने खाल्ले. कैक शिल्लक राहिले. राहिलेल्या दाण्यांचा कोल्हा झाला. कोल्हा होतांच कोल्ह्याने कोंबडा मारून खाल्ला. मग तो कोल्हा परत मुलगा होऊन सावकाराच्या घरीं आला. तेथे त्याचें सावकाराच्या मुलीशीं लग्न लागलें. नंतर तो बायकोला घेऊन आपल्या घरीं आला. तेथे तीं आनंदाने खाऊन पिऊन राज्य करूं लागलीं.

## लोककथा ४

(ही कथा एका कातकऱ्याकडून मिळाली.)

ऐधी नगराचा धर्मपूर नांवाचा राजा होता. त्याचें चौदा चौकडी राज्य होतें. त्याला असें वाटलें की, माझें राज्य मोठें आहे. तेव्हा मी आता धर्म करतों. बारा वर्षेंपर्यंत त्याने भटजींस धर्म केला. बारा वर्षें पुरीं झाल्यावर त्याने ब्राह्मणांस विचारलें की, तुम्ही मला आता धर्माचा रस्ता दावा. तेव्हा ते सर्वे ब्राह्मण बोलावून आपल्या कचेरींत नेले. तेव्हा राजा म्हणतोः— मला आठ दिवसांत धर्माचा रस्ता दाखविला पाहिजे. नाहीतर तुम्हांला समद्यांना कापून टाकीन. तेव्हा त्या भटजी लोकांनी पुष्कळ ग्रंथ पाहिले पण धर्माचा रस्ता सांपडला नाही व सात दिवस झाल्यावर गांवांतून पळून जाण्याचा विचार ब्राह्मणांनी केला. सर्वे ब्राह्मण रात्रीस गांवाबाहेर पडले. एक लंगडा ब्राह्मण होता. त्यास उशीर लागला. त्या ब्राह्मणाची एक मुलगी होती. ती काय म्हणते, 'बाबा, तुम्ही जरा थांबा. माझी एक मैत्रीण आहे तिला भेटून येतें.' तितक्यांत रात्रीच्या पाहारांत ती धोब्याच्या घरीं गेली. धोब्याच्या मुलीला 'गंगू गंगू' म्हणून हाक मारीत गेली. गंगू म्हणते, 'तूं कोण आहेस?' ती म्हणते, 'मी ब्राह्मणाची जायी आहें.' गंगू म्हणते, 'इतक्या रात्रीं आलीस कां?' ती म्हणाली, 'तुला भेटण्या-

नंतर गोसावी बहिरा ससाणा झाला आणि घुंग पकडण्याचा त्याने प्रयत्न केला. पण तो सांपडेना. तो घुंग मारुतीच्या देवळांत गेला व मारुतीच्या पाठीला जाऊन बिलगला. मागोमाग गोसावी गेला. घुंग तेथून निघाला. तो इंद्रसभेंत गेला. गोसावी पण तेथे त्याच्या मागोमाग गेला. इंद्राची कन्या तपाला बसली होती. तिने असा पण केला होता की, मृत्युलोकचा जो कोणी येईल. त्याला मी भ्रतार करीन. त्या मुलीच्या गळयांत नवरत्नांचा हार होता. त्यांत तो मुलगा शिरून बसला. त्याने इंद्राच्या मुलीला सांगितलें, तूं हार गोसाव्यास दिलास तर संबंध तरी देऊं नकोस. तोड आणि भुईवर हापट. पुढे हाराची किंमत ठरून तो तिने गोसाव्यास दिला; पण तोडून हापटून दिला. तेव्हा गोसावी कोंबडा होऊन हारांतील रत्नें वेचून तीं खाऊं लागला तेव्हा तो मुलगा पुन्हा घुंग होऊन मृत्युलोकीं आला व एका विहिरींत गेला तेथे तो बेडूक झाला. इतक्यांत तेथे गोसावी आला व सर्प झाला, आणि बेडकाच्या मागे लागला, तेव्हा तेथून तो मुलगा निघाला. एका सावकाराचा घोडा होता त्याच्या लगामांत जाऊन शिरला. घोड्याच्या धन्याला त्याने सांगितलें, की तूं घोडा विकलास तरी लगाम देऊं नको. इतक्यांत गोसावी तेथे आला. त्याने घोड्यांची किंमत केली व तो घेतला, पण सावकाराने लगाम काढून घेतला. गोसावी तक्रार करूं लागला. मीं लगामी सकट घोडा घेतला आहे. तूं लगाम ठेवूं नकोस. मुलानें धन्याला सांगून ठेवलें होतें की, लगाम कदाचित् दिलास तरी जीन देऊं नको. गोसाव्याला लगाम मिळाला. नंतर गोसावी जीन मागूं लागला. सावकार म्हणतो, जीनासकट तुला घोडा दिला नाही. मुलानें सांगून ठेवलें होतें की, जीन दिलास तरी पायाची काढणी देऊं नको. त्याच गांवांत गोसावी गारुड्याचें सोंग घेऊन आला व आपले खेळ करूं लागला. खेळ पाहण्यास सावकार आला होता. इतक्यांत सावकाराचा घोडा पोपट होऊन सावकाराच्या कन्येच्या खोलींत गेला. तिने त्या पोपटाला धरून उत्तम तऱ्हेचा पिंजरा करून त्यांत ठेविलें. इकडे गारुड्याने 'विद्या जपून' पाहिलें तों घोडा पोपट झाल्याचें कळालें. नंतर खेळ झाल्यावर उत्तम खेळ झालेला पाहून तुला काय देऊं असें गारुड्यास सावकाराने विचारलें. गारुडी म्हणाला, मला तुझा पैसा नको. तुझ्या मुलीजवळ एक पोपट आहे तो पाहिजे.

सावकारानें पोपट देण्याचें कबूल केलें. तो घरीं गेला व आपल्या मुलीजवळ पोपट मागूं लागला. तिने सांगितलें, सर्व देईन पण हा पोपट मागूं नको. बाप म्हणाला, पोपट बाजारांत किती तरी येतील ते मी तुला घेऊन देईन. असें म्हणून तो पोपट बापाने घेतला आणि त्या गारुड्याकडे आणला. गारुड्याच्या हातांत सावकारानें पोपट देतांच तो पोपट डाळिंब झाला. तें डाळिंब तावडतोब फुटून त्याचे दाणे भुईवर पडले. तो गोसावी तावडतोब कोंबडा होऊन दाणे खाऊं लागला. कैक त्याने खाल्ले. कैक शिल्लक राहिले. राहिलेल्या दाण्यांचा कोल्हा झाला. कोल्हा होतांच कोल्ह्याने कोंबडा मारून खाल्ला. मग तो कोल्हा परत मुलगा होऊन सावकाराच्या घरीं आला. तेथे त्याचें सावकाराच्या मुलीशीं लग्न लागलें. नंतर तो बायकोला घेऊन आपल्या घरीं आला. तेथे तीं आनंदाने खाऊन पिऊन राज्य करूं लागलीं.

## लोककथा ४

(ही कथा एका कातकऱ्याकडून मिळाली.)

ऐधी नगराचा धर्मपूर नांवाचा राजा होता. त्याचें चौदा चौकडी राज्य होतें. त्याला असें वाटलें की, माझें राज्य मोठें आहे. तेव्हा मी आता धर्म करतों. बारा वर्षेंपर्यंत त्याने भटजींस धर्म केला. बारा वर्षें पुरीं झाल्यावर त्याने ब्राह्मणांस विचारलें की, तुम्ही मला आता धर्माचा रस्ता दावा. तेव्हा ते सर्वे ब्राह्मण बोलावून आपल्या कचेरींत नेले. तेव्हा राजा म्हणतोः— मला आठ दिवसांत धर्माचा रस्ता दाखविला पाहिजे. नाहीतर तुम्हांला समद्यांना कापून टाकीन. तेव्हा त्या भटजी लोकांनी पुष्कळ ग्रंथ पाहिले पण धर्माचा रस्ता सांपडला नाही व सात दिवस झाल्यावर गांवांतून पळून जाण्याचा विचार ब्राह्मणांनी केला. सर्वे ब्राह्मण रात्रीस गांवाबाहेर पडले. एक लंगडा ब्राह्मण होता. त्यास उशीर लागला. त्या ब्राह्मणाची एक मुलगी होती. ती काय म्हणते, 'बाबा, तुम्ही जरा थांबा. माझी एक मैत्रीण आहे तिला भेटून येतें.' तितक्यांत रात्रीच्या पाहारांत ती धोब्याच्या घरीं गेली. धोब्याच्या मुलीला 'गंगू गंगू' म्हणून हाक मारीत गेली. गंगू म्हणते, 'तूं कोण आहेस?' ती म्हणते, 'मी ब्राह्मणाची जायी आहें.' गंगू म्हणते, 'इतक्या रात्रीं आलीस कां?' ती म्हणाली, 'तुला भेटण्या-

करितां आलें. तुझ्यामाझ्या अंतरीं लोभ तुटला.' गंगू म्हणते, 'इतकें जड तुला काय आलें आहे?' ती बोलते, 'आपला धर्मराजा यानें आम्हांला बारा वर्षेपर्यंत धर्म दिला आणि आतां आम्हांला धर्माचा रस्ता विचारतो. पण तो आम्हांला सांपडत नाही. म्हणून आम्ही दुसऱ्या मुलुखांत पळून चाललों आहों. बाई, माझें ऐकतेस काय?' गंगू म्हणते 'तुमच्या समद्या ब्राह्मणांना जाऊन सांगा की, 'मागे फिरा' आणि ज्याचे त्याचे दरवाजे गच्च लावून आंत बसा. उद्यां मी धर्माचा रस्ता दावतें.' तशीच ब्राह्मणाची मुलगी निघून आपल्या मंडळींत गेली. बापाला सांगते, 'बाबा, माझी थोडी गोष्ट ऐका. आपल्या सर्वे मंडळीला सांगून मागे फिरवा. राजा मारील, कापील त्याबद्दल मी गुन्हेगारी घेतें.' हें ऐकून सर्वे लोक मागे फिरले. ज्याच्या त्याच्या घरांत जाऊन दरवाजे लावून गच्च बसले. दिवस उगवल्याबरोबर राजाचे शिपाई लोक आले. येऊन पाहतात तो सर्वे ब्राह्मणांचीं घरें ओसाड. दरवाजे लावून बंद. सर्वे ब्राह्मणांचीं घरें तपासून ते परत राजाकडे गेले. राजाला सांगतात, 'ब्राह्मणलोक कोण घरांत नाहीत.' राजानें हुकूम केला, 'त्यांचे दरवाजे जाऊन फोडा' बरीच मंडळी जाऊन दरवाजे फोडायला लागली. एक दोन घरांचे दरवाजे फोडल्याबरोबर बाकीचे लोकांनी आपले दरवाजे उघडले. राजा आता मारील म्हणून सर्व ब्राह्मण घाबरून गेले. तेव्हा सर्वे ब्राह्मण राजांनी आपल्या राजवाड्यांत नेले. राजा काय म्हणतो की, 'मला धर्माचा रस्ता आताच्या आता दावा तर तुम्हांला सोडून देतों.' ब्राह्मण काय बोलते राजाला, 'राजश्री, तुम्हीं आम्हांला धर्म दिला, आम्हीं खाऊन घेतला, आता रस्ता काय दाखविणार? पुष्कळ प्रयत्न केला, पण धर्म सांपडत नाही.' असें म्हटल्याबरोबर राजा हातांत तलवार घेऊन उभा राहिला. 'धर्म तुम्ही मला दावीत नाही त्याबद्दल मी आता तुम्हांला मारतों.' इतक्यांत ब्राह्मणांची मुलगी धोब्याकडे गेली. 'बाई, लवकर चल राजाकडे. नाहीतर आता माझे सर्व लोक मरतील.' तशी धोब्याची मुलगी तिच्याबरोबर राजाकडे गेली. धोब्याच्या मुलीने राजाला रामराम दिला. 'राजश्री, तुम्हींच आमचे मायबाप. तुम्हींच मारणार तारणार. धर्माचा रस्ता स्वतः गेल्याशिवाय कळत नाही. तर तुम्हाआम्हांला सांगतां येईल काय?' ऐवढें सांगितलें तरी राजा ऐकेना. सर्वेच

राजाच्या चरणास गेले. तरी राजा म्हणतो की, 'कापल्याशिवाय सोड-णार नाही.' तेव्हा धर्माचा रस्ता धोब्याच्या मुलीला माहीत होता. कापाचा वेळ आला तेव्हा धोब्याची मुलगी म्हणाली, 'मी धर्माचा रस्ता दावतें. तूं ह्यांना मारूं नको.' राजा म्हणतो, 'मला आतां दाखव.' मग तिने धर्माचा रस्ता बोटाने दाखविला. 'ही धर्मशीला उघडावी आणि धर्म पाहण्यास तुम्हीं जावें.' तेव्हा राजा घोडयावर बसून धर्म पाहण्यास गेला. चालून चालून तो बारा कोशींवर गेला. वाटेंत त्याला सोन्यासुवर्णाच्या गाई भेटल्या. तेव्हा राजा म्हणतो, ये गोवाऱ्या ह्या गाई कोणाच्या? धर्मपूर राजानी धर्म केला. त्याचा हा धर्म उभा राहिला. हें ऐकून राजाला मोठा 'आनाद' (आनंद) झाला. तसेंच पुढे आईबाप भेटले. सोन्यासुवर्णाची त्यांना मेणापालखी होती; दोहोंबाजूंस पांचपांच इसम त्यांना वारा घालीत होते. तेव्हा धर्मराजाने विचारलें, हा देव कोण आहे? लोकांनी सांगितलें की, हा धर्मपूर राजाचा बाप आहे. अप्राट त्याने पुण्य केला; त्यामुळे आई-बापाचा मोठा आनाद आहे. तेथून निघून पुढे गेले. वाटेंत एक पिंपळाचें झाड लागलें त्याचें पान सोन्यासारखें दिसत असे. त्या झाडाला राखणदार असे दोनशे लोक होते. जितकें पान पडलें तितका पिंड होतो तेव्हा राजाने विचारलें, हा झाड कोणाचा? लोक म्हणाले, धर्मराजाचा. त्यांनी धर्म केला त्याच्यामुळे आमचा पण आनाद आहे.

हें सर्व पाहून राजा मागे आला. राजवाड्यांत आल्यावर सर्व मंडळी भेटाला आली. तीन तास राजाच्या पाया पडत होते. राजा म्हणतो जें आपणास पहावयाचें असेल तें स्वर्गांत जाऊन पहावें. जिनी मला धर्माचा रस्ता दावला ती मला बायको पाहिजे. तिच्यापासून सर्व मला माहिती होईल. तेव्हा धोब्याच्या मुलीला बोलावून राजाने राजवाड्यांत नेली. तो म्हणाला तुला स्त्री करून घेतों. राजा, मी धोब्याची मुलगी तुमच्या अंगाचा मळ काढणारी. माझ्यावर तुमचा हेतू कसा झाला. तुझ्या तोंडांत पापी वासना झाली. राजा, तुझा तूं धर्म पाहून यावें. मग मी तुझी बायको होईन. तसाच राजा परत गेला. गेल्याबरोबर सोन्यासुवर्णाच्या गायांना कसाब लोक कापावयास लागले. तसें धर्मराजा बोलूं लागला हें झालें

काय ? कसाबदार बोलतात की धर्मराजाची पापी वासना फार झाली. ह्याच्यापुढे जावें, तुम्हांला आणखी कळेल. आईबापाच्या ठिकाणास गेला. तेव्हा आईबाप नरक कुंडांत होते. आईबापाला पाहूनशिनी राजा रडूं लागला. देवा, होतें कसें, झालें कसें. हें पाहून आणिक पुढे गेले. पिंपळाचें झाड तोडीत आहेत असें त्याने पाहिलें. हें पाहून राजाला आणिक दुःख उत्पन्न झालें. हें सर्व पाहून आपल्या राजवाड्यास राजा आला. धोब्याच्या बाईला बोलावून आपल्या कचेरीस घेतली. बाई तूं सांगितलेंस तें खरें झालें. माझी तूं बहीण आहेस. जें तूं मागशील तें तुला मी देतों. माझ्या धर्माचा फार वाईट होऊन गेलेला आहे. तूं राजा तुझ्या तोंडांतून पापी वासना झाली म्हणून तुझा धर्म वाईट झालेला आहे. जैसें शोभेल तैसेंच करावें. जातींतल्या बायका दहा कराव्या. परकी स्त्री आपल्या बहिणीप्रमाणे मानावी. आता आणिक बारा वर्षें याच ब्राह्मणांना धर्म करावा म्हणजे तुझा धर्म पुनः सारखा होईल. नाहींतर तुम्ही सुद्धा नरक कुंडांत जाल. मला तुमचें द्रव्य नको. हत्ती नको. आजपासून मला बहिणीप्रमाणे वागवावें. मी धोबीण आहें पण मी माझ्या पुरुषाशिवाय दुसरा पुरुष बघितलेला नाहीं. त्याच्यामुळे माझ्या नवऱ्याला यश होतो. मी सांगेन तेप्रमाणे होईत होता. अशी मी साधारण महा पुण्यवान् होतें. आता राजा तुम्हीं मला बाई हाक मारावी. बारा वर्षें झाल्यानंतर पुनः तुम्ही धर्म पहाण्यास जावें. बामण लोक म्हणतात की बाई आम्हांस शेर तूं उत्पन्न केलास. हाच तुझा आशीर्वाद आम्हांला घेतला.

## लोककथा ५

(खालील गोष्ट एका कातकऱ्याने सांगितलेली भाषा बदलून दिली आहे.)

एक साखळीवत नांवाचा राजा होता. त्याने एक दिवस आपल्या प्रधानाकडून गांवच्या पाटलाला बोलावून आणलें. पाटील आल्यावर राजाने गोष्ट काढली की, आपल्या गांवांत शाळा नाही, तेव्हा ज्या नगराला शाळा असेल तेथे पाटील तुमचे तीन मुलगे, प्रधानजी तुमचे दोन मुलगे आणि माझा एक मुलगा अशा सहा मुलांना शाळेंत लिहिण्याकरिता ठेवावें. राजाच्या हुकुमाप्रमाणे प्रधानाने साही मुलांना परगांवीं नेऊन शाळेंत ठेवलें.

तेथे तीं मुलें तीन वर्षें शिकत होतीं. आता मुलांचें लिहिणें पुरें झालें असेल अशा समजुतीने राजाने तीं मुलें प्रधानाला पाठवून आपल्या गांवीं परत बोलावून आणलीं. घरीं आल्यावर राजा, प्रधान व पाटील आपलीं मुलं काय शिकलीं आहेत तें पाहूं लागले. पण राजाच्या मुलाने कांहीच विद्या संपादन केली नव्हती म्हणून तो एकदा राजाच्या तोंडाकडे पाही व एकदा आपल्यापुढे असलेल्या कागदाकडे पाही. मुलगा कांहीच शिकला नाही असें पाहून राजा त्याला मारूं लागला. तेव्हा तेथून तो मुलगा निसटून आपल्या आईजवळ गेला. आईने विचारिलें, "बाळा, तूं कां रडतोस?" "आई, मला लिवणं आलं नाही म्हणून बाबांनी मारलं." हें ऐकून आई पण त्याला मारूं लागली. तेव्हा तो मुलगा आईच्या हातांतून निसटून गांवाबाहेर पळून गेला. तें पाहून प्रधानाचे व पाटलाचे मुलगेहि त्याच्याकडे धावत गेले. त्यांनी विचारलें, "दादा, तूं पळून कां आलास?" राजपुत्र म्हणाला, "मला विद्या येत नसल्यामुळे आईबापांचा मार मला खावा लागला म्हणून मी आता वनवासाला जातों. तुम्ही आपल्या घरीं राहा." पण त्याचे सोबती म्हणूं लागले की, आपण सर्व भावांप्रमाणे आहों. करितां आम्ही घरीं न राहतां तुझ्याबरोबरच येतों. याप्रमाणे सर्वांचा निश्चय झाल्यावर कपडेलत्ते करून घोड्यावर स्वार होऊन साही जणांनी रस्ता धरला. वनांतून चालतां चालतां तीं मुलें भुकेने व तहानेने व्याकूळ झालीं. इतक्यांत त्यांना एक झाड दिसलें. परिपक्व व रसभरित फळांनी तें ओथंबलेलें होतें. पण तीं फळें खाण्यायोग्य आहेत किंवा नाहीत हें त्यांना माहीत नसल्यामुळे ते जरा चिंतातुर झाले. तेव्हा राजाचा मुलगा म्हणाला, मित्रांनो, तुम्ही हीं फळें प्रथम खाऊं नका, मी खातों; कारण मी वनवाशा बाळ आहें. मेलों तरी हरकत नाही. पण ही गोष्ट राजपुत्राच्या सोबत्यांना मान्य होईना. सर्वांनी एकदम फळें खाण्याचें ठरविलें. आपण मेलों तर सर्वच ह्या झाडाखाली मरूं. सर्वांनी फळें खाल्लीं. व बोलतां बोलतां झोपीं गेले. कांही वेळाने जागे झाल्यावर फळें फार चांगलीं निघालीं हें पाहून त्यांना फार आनंद झाला. नंतर सर्वजण आपआपल्या वारूवर बसून त्यांनी पुढला मार्ग सुधारला. थोडक्याच अवधींत ते इंद्रिवत् नांवाच्या एका राजाच्या नगराला येऊन पोचले. त्या वेळीं राजा कचेरींत होता. त्याने या

मुलांना पोहेंल. राजाने मुलांना आपणाकडे घेऊन येण्यास प्रधानाला आज्ञा केली. प्रधानाबरोबर शेन्द्रिवत् राजाकडे तीं मुलें गेलीं आणि त्यांनी त्याला विचारलें, "राजा, तूं आम्हांला कां बोलावलेंस?" राजा म्हणाला, "आता संध्याकाळ होऊन गेली, पुढे आसपास गांव नाही. तेव्हा तुम्ही वस्ती कोठे कराल? म्हणून आजची रात्र माझ्या घरीं राहा आणि उद्या उजाडल्यावर पुढे चालूं लागा." मुलांना ती गोष्ट पटली व त्यांनी तेथे मुक्काम केला. स्नान व जेवण झाल्यावर, तुम्हांला कोठे जावयाचें आहे म्हणून राजाने मुलांना विचारलें. चाकरी लागेल तेथे आम्ही राहणार, असें मुलांनी उत्तर दिल्यावर राजा म्हणाला, मींच तुम्हांला चाकरींत ठेवलें तर तें तुम्हांला पत्करेल काय? मुलांनी होय म्हणून उत्तर दिल्यावर तुम्हीं सालाचें काय घ्याल म्हणून राजाने त्यांना विचारलें. मुलांनी सांगितलें, आम्ही शंभर रुपये घेऊं. तेव्हा राजाने पुन्हा विचारलें, तुम्ही कामधंदा तरी काय कराल? "हे पलंगावर बसलों आहों असे बसूं, सोंगटीडाव खेळूं आणि तिन्ही वखत तुझ्या पंक्तीला जेवूं. जे काळीं तुझ्यावर वखत येईल त्या काळीं उभे राहूं." हें त्या मुलांचें उत्तर राजाला मानवलें. ते मुलगे खात पीत व मजा मारीत. दहा वर्षे त्या राजाजवळ राहिले. एके दिवशीं रात्र पडल्यावर राजाच्या एकुलत्याएका मुलीचें प्राणोत्क्रमण झालें. तेव्हा राजाने आपल्या शिपायांना सांगितलें, माझी मुलगी मेली. रात्रभर प्रेत घरांत ठेवतां येत नाही. तुम्ही तें मसनोटीवर घेऊन जा. रात्रभर तेथे प्रेताचें रक्षण करा. मी सकाळीं माणसें घेऊन येईन आणि प्रेताला अग्नि देईन. तेव्हा शिपाई राजाला म्हणाले, फुकट बसून खाणाऱ्या मुलांना हें काम सांग. त्याप्रमाणे राजा मुलांकडे जाऊन म्हणाला, माझी मुलगी मेली आहे. या प्रसंगाला तुम्हीं माझ्या उपयोगी पडलें पाहिजे. माझ्या मुलीचें प्रेत श्मशानांत नेऊन त्यावर तुम्हीं रात्रभर पहारा ठेविला पाहिजे. मुलगे म्हणाले, आम्ही सहाजण आहों. आम्हांकरिता सहा बाजा दे आणि तुझ्या मुलीकरता एक दे. बाजा मिळतांच त्या मुलांनी मुलीचें प्रेत श्मशानावर नेलें. मुलीची बाज मध्ये ठेवून आपल्या सहा बाजा त्यांनी सभोवती मांडल्या व एक एक जणाने पाळीपाळीने जागृत राहून पहारा करण्याचें ठरविलें. पांच जणांचे पहारे झाल्यावर शेवटची पाळी राजाच्या

मुलावर आली. हा मुलगा पहारा करीत असतां देवाचा रथ चरणीला गेला होता तो तिकडून फिरत फिरत श्मशानाशीं आला. रथाचा कडका लागतांच राजाच्या मुलाने धावत जाऊन देवाचा रथ धरला आणि देवाला म्हणाला, "राजाची मुलगी मयत झाली आहे." देवाने विचारलें, "मग तुझें म्हणणें काय आहे?" "मेली ती जित्यांत आली पाहिजे." देव म्हणाला, "जा. जित्यांत आली." त्याबरोबर रथ सोडून तो राजपुत्र प्रेताजवळ आला आणि पाहतो तों मुलीची हालचाल त्याला दिसली. पुन्हा धावत जाऊन त्याने देवाचा रथ धरला. तेव्हा देव म्हणाला, "बाळा, घडी घडी माझा रथ धरूं नको. तुला काय पाहिजे तें सर्व मला एकदा सांग." मुलगा म्हणाला, "मुलगी तर जिवंत झाली पण माझ्या तोंडीं कांही लिहिणं नाही त्याचं काय?" देव म्हणाला, "जा; मनुष्यांना साध्य नाही अशी देवलोकची विद्या तुला प्राप्त होईल." तेव्हा रथ सोडून मुलगा परत आपल्या जागीं आला. इकडे उजाडतांच मनुष्यें व फाटीं बरोबर घेऊन राजा रडत रडत श्मशानांत आला. जिवंत झालेली मुलगी प्रथम प्रधानाने पाहिली व तो राजाला म्हणाला, राजा रडूं नको. तुझी मुलगी जिवंत आहे. राजा म्हणतो, मेलेलें मनुष्य जिवंत कसें होईल? जवळ जाऊन पाहतो तों खरोखरीच आपली मुलगी जिवंत झालेली त्याला दिसली. ताबडतोब त्याने माणसें गांवांत पाठवून दोन पालख्या आणवल्या. एका पालखींत ती मुलगी आणि राजाचा मुलगा अशीं बसलीं. राजपुत्राचे सोबती दुसऱ्या पालखींत बसले. याप्रमाणे सर्वजण आनंदित होऊन घरीं परत आले. पुढे कांही दिवसांनी राजपुत्राच्या सोबत्यांना सोयरिकी पाहण्यास प्रधानाला गांवोगांवीं पाठविलें. हिंडत हिंडत तो प्रधान एका राजाच्या नगरांत गेला. राजा कचेरींत बसला होता तेथे जाऊन, तुझ्या मुली लग्नाच्या आहेत का म्हणून प्रधानाने विचारलें. माझ्या पांच मुली आहेत असें राजाने सांगतांच प्रधान म्हणाला आम्हांला पांची पाहिजेत. आमच्याजवळ पांच मुलगे आहत. ताबडतोब साखरपुडा करण्यांत आला. नंतर आपल्या गांवीं परत येऊन प्रधानाने राजाला सोयरिकी मिळाल्याचें सांगितलें. लागलीच राजाच्या मुलीला हळद लावली; त्याचप्रमाणे साही मुलांना हळदी लावल्या. राजाची मुलगी व राजपुत्र यांना घरींच ठेवलें आणि पांच इसम घोड्यावर बसून मुलींच्या बापाच्या

नगराला गेले. तेथे भट जमून त्यांनी त्यांचीं लग्नें लावलीं. लग्नें लागल्यावर रात्रीं जेवणखाण होऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपआपल्या नवऱ्या घेऊन पांचीजण परत फिरले. इकडे राजाच्या मुलीचें लग्न राजपुत्राबरोबर लागलें. हळदी उतरल्यानंतर शेंद्रिवत् राजाच्या घरीं ही सर्व मंडळी दोन तीन महिने राहिली. मग त्यांनी राजाला म्हटलें, आम्ही आता आपल्या घरीं जातों. राजाने त्यांना जाण्यास परवानगी दिली आणि म्हटलें, बोली-प्रमाणे तुम्ही आपले झालेले पैसे घेऊन जा. पण मुलांनी त्याला सांगितलें, आमच्या घरीं पैसा आहे तो खपत नाही मग आणखी पैसा आम्हांला कशाला पाहिजे ? आमचीं लग्नें केलींत इतकें पुरे झालें. नंतर बायकांसकट सर्वजण राजाच्या पायां पडून आपल्या घरीं यावयास निघाले. गांवीं पोचल्यावर जो तो आपआपल्या घरीं गेला. जेवण आटोपल्यावर पूर्वीप्रमाणे राजाचा मुलगा पलंगावर जाऊन बसला आणि आपल्या पित्याला म्हणाला, मागे मी लिहिणें शिकलों नाहीं म्हणून तुम्हीं मला मारलें. आता मी शिकून आलों आहें, तुम्ही ऐकायला बसा. मुलाची विद्या पाहून राजाला आश्चर्य वाटलें. हा एवढी विद्या कोठें शिकला असावा बरें ! राजाला आनंद झाला. त्याने मुलगा उचलून घेतला व त्याच्या स्वाधीन राज्य केलें. मुलगा राज्य करूं लागला आणि प्रधानाचा मुलगा त्याने आपला प्रधान केला.

# इतर सामाजिक माहिती

## लिंबन्हाण

मुलगा लग्नाला जाण्यास निघण्यापूर्वी त्याच्याच मांडवांत त्याच्या आजीला (बापाची आई) न्हाऊं घालण्याचा रिवाज आहे. तांदुळाच्या पिठाच्या लहान गोळ्या बऱ्याचशा करतात. आजी स्नानाला मांडवांत पाटावर बसली की तिच्या डोक्यावर पितळी उपडी धरतात. मग या

पितळीवर त्या गोळ्या सोडतात. अर्थात् त्या खाली पडतात. नंतर पितळी काढून घेऊन पांच गडव्यांतलें थंड पाणी तिच्या डोक्यावर ओततात. या वेळीं आजीच्या मांडीवर नवरा मुलगा बसलेला असतो. पांच विवाहित बायका वाजतगाजत तळ्यावरून अथवा विहिरींतून पांच गडवे पाणी भरून घेऊन येतात तेंच पाणी त्या बायका आजीवर ओततात. मागून आजी व मुलगा घरांतल्या ऊन पाण्याचें स्नान करतात. आजी विधवा असली तरी सुद्धा हें न्हाण तिला घालतात. आजी नसल्यास धर्माची आजी कोणीतरी बसवितात. गोळ्यांना लिंबोट्या म्हणतात. म्हणून या न्हाणाला लिंबन्हाण म्हणतात. मुलीच्या मांडवांत सुद्धा मुलीच्या आजीचें लिंबन्हाण होतें. पण तें लग्नानंतर मुलगी नवऱ्याकडे जाते त्या दिवशीं म्हणजे वरात निघण्यापूर्वी होतें. ही चाल हपसाण्यांत आहे. इतर जातींत उदा० कुंभारांत व आग्ऱ्यांत मुलाच्या स्नानाच्या वेळीं त्याच्याबरोबर त्याचा आई, आजी, मावशी व आत्या ह्या बसतात व त्यांचेंहीं न्हाण होतें. न्हाण झाल्यावर मुलाला बाशिंग बांधून तो मुलीकडे लग्नास जावयास निघतो.

## एक पिंड

नाशकाहून रा. चंद्रात्रे लिहितात:—

चंद्रात्र गोत्र ज्यांचें आहे अशांपैकी कांहीं कुलांत— उदा० चंद्रात्रे, दीक्षित आणि अंधृटकर— अशी रूढि आहे की, प्रात्याब्दिक श्राद्धात त्रयीचा उच्चार करून तीन पिंड न देतां एकच पिंड द्यावयाचा. वरील कुटुंबें शुक्लयजुर्वेद माध्यंदिन शाखेचीं आहेत. हा प्रकार शास्त्राच्या विरुद्ध उघड उघड दिसतो. पण ही रूढि पडण्याचें कारण काय असावें बरें !

## पावसाचा तोडगा

पाऊस पाडण्याचा एक तोडगा पूर्वी करीत असत. वस्त्र सोडून पाला नेसून रात्रीच्या वेळीं कोणीतरी बाई घरोघर हिंडत असे. तिच्या अंगावर लोक पाणी घालीत. अर्थात् ही बाई काळोखांतच हिंडायची. पण तोंडाने गाणें म्हणत फिरावयाची. तें गाणें असें:—

अरगुंड बुरगुंड बैल बुका । चंदनी चुका मृगराजा । पाणी दे रे बाबा पाणी दे ॥

# सामाजिक टांचणें

जात म्हणजे एक अभेद्य किल्लाच होय. भिन्न जातीची मुलगी विवाहाच्या द्वाराने आपल्या जातींत न घेण्याने जातीचें संरक्षण केलें जातें व जातीचा जातपणा सिद्ध होतो. अर्थात् जात मोडणें म्हणजे परजातीची मुलगी करणें होय. खाण्यापिण्याने जात मोडत नाही; जातीबाहेर विवाह केल्यानेच मोडते; कारण वरिष्ठ जातीच्या माणसाने कनिष्ठ जातीच्या माणसाकडे अन्नव्यवहार केला तरी सुद्धा प्रायश्चित्त घेतल्यावर जातींत राहतां येतें; अशुद्धतेच्या पलीकडे त्याला दोष नाही. रजस्वला ज्याप्रमाणे चार दिवस अस्पृश्य मानली जाते तद्वत् प्रायश्चित्त घेईपर्यंत खालच्या जातीशीं अन्नव्यवहार करणारा अशुद्ध अथवा अस्पृश्य राहतो इतकेंच. जाती फक्त हिंदूंत आहेत. मग हिंद्वितरांशीं संबंध घडला तर त्याचा परिणाम काय समजावयाचा हा अत्यंत बिकट प्रश्न आहे. कारण हिंदूंतील जातीजातींमधील व्यवहार रूढीने ठरून गेले आहेत. जातिप्रधान हिंदुसमाजाचा विचार शास्त्राने केलाच नाही. पण आज येथे या प्रश्नाचा विचार कर्तव्य नाही. जातींत ज्या रूढी आहेत त्यांवरून जातींचें स्वरूप समजून घ्यावयाचें आहे. स्त्रियांच्या व्यभिचारावरून हें स्वरूप निश्चित करण्यास आपणांस एक साधन मिळण्यासारखें आहे. प्रत्येक जातीला वरिष्ठकनिष्ठपणाची जाणीव आहे; पण ती नैतिक स्वरूपाची आहे. कोणत्याहि जातींतील स्त्रीने खालच्या जातींतील पुरुषाशीं शरीरसंबंध केल्यास तिला परत जातींत घेत नाहीत. एका ठाकराची लग्न झालेली व नवरा असलेली मुलगी पहिली बायको असलेल्या एका कातकऱ्याचा हात धरून गेली. कातकऱ्यांची जात आपणांहून कमी प्रतीची असें ठाकूर समजतात व कातकरीहि तें मान्य करतात. ही मुलगी आता जातीमध्ये परत घेणें अशक्य असल्यामुळे तिचा बाप आणि नवरा तिच्या नांवाने पिंड पाडणार आणि मडकें फोडणार. अर्थात् ती मेली असें ठाकूर जात मानणार. आता हीच मुलगी ठाकूर जी वरिष्ठ जात समजतात त्या जातींतील पुरुषाबरोबर दुर्वर्तन करती तरीसुद्धा तिला परत जातींत घेऊन तिच्याबरोबर कोणीहि लग्न लावणार नाही. तिच्या हातचें अन्नपाणी घेण्यास मात्र हरकत नाही. तिला या व्यभिचारापासून संतति झाली तर ती अकरमाशी

म्हणूनच मानली जाईल. कोणीहि अस्सल ठाकूर, मुलगा असल्यास त्याला आपली मुलगी देणार नाही अगर मुलगी असल्यास ती आपल्या मुलाला करणार नाही. हें व्यभिचाराचें पाप नाही; जात मोडल्याचें आहे. कारण त्या मुलीने आपला नवरा टाकून दुसऱ्या पुरुषाबरोबर–पण आपल्याच जातीच्या– बदकर्म केलें तर दंड घेऊन तिला शुद्ध करून जातीपैकी कोणीहि तिला लग्नाची बायको करून घेण्यास तयार होईल. यावरून असें दिसतें की, कोणतीहि जात दुसऱ्या जातीला श्रेष्ठ समजून परबीज पतकरण्यास तयार नाही. असें करूं देणें म्हणजे जातीच्या अस्तित्वावरच घाला घालणें होय. शिवाय आपली जात म्हणजे एकबीजात्मक आहे अशी समजूत असली पाहिजे. स्त्रियांच्या संबंधाने आपल्या जातीचें बीज आणि परजातीचें बीज हाच भेद केला जातो. पतिबीज आणि पतीतरबीज असा भेद करीत नाहीत. समान दर्जाच्या जातींत रोटीव्यवहार होतो, पण बेटीव्यवहार होत नाही. वरिष्ठ-कनिष्ठ जातींत कनिष्ठ जात वरिष्ठ जातीकडे अन्नव्यवहार करते, पण वरिष्ठ जात कनिष्ठ जातीकडे जेवणखाण करीत नाही; पण एका जातींतली मुलगी दुसऱ्या जातींत कोणत्याहि कारणानें खपणार नाही. जातीचा वरिष्ठपणा आहारनिवृत्तीवर असावा. कातकरी उंदीर खातात, ठाकूर खात नाहीत; त्यामुळे ठाकूर कातकऱ्यांहून श्रेष्ठ.

## हिंदूंपैकी कित्येक जातींतील कांही रूढी

१ बहिणीच्या केसाला भावाने जिवंतपणीं हात लावतां नये म्हणून बहीण सवाशीण मेली तर तिच्या प्रेताला न्हाऊं घातल्यावर तिच्या ओल्या केसांची वेणी भाऊ घालतो आणि मग प्रेत तिरडीवर ठेवतात.

२ किंक्रांतीच्या दिवशीं सकाळीं पारोशा केसांवर सवासणींची ओटी भरतात.

३ भोगीच्या दिवशीं केलेली भाकरी किंक्रांतीच्या दिवशीं घरांतील सासुरवासणीला खायला देतात.

४ मुलीच्या तिसऱ्या वर्षी तिला पहिली परकर चोळी आतेने नेसवली पाहिजे; तसेंच तिच्या पहिल्या बांगड्या आतेने भरल्या पाहिजेत.

५ मुलीला दांत येऊं लागले म्हणजे आतेने तिच्या दांतांवरून एकदा हात फिरवावा लागतो.

६ भाद्रपदांत मुली गौरी आणतात तेव्हा गौरीचे खडे तळयांतून किंवा नदींतून डोळे मिटून काढतात व वाटेंत न बोलतांना त्या घरीं आणतात. घरीं आल्यावर घरांतील वयातीत बाई हातांत दिवा घेऊन त्या गौरींना हें दुमत्याचें फडताळ, हें धान्याचें कोठार, ही तिजोरी असे शब्द तोंडाने उच्चारून सर्व घर दाखविते.

## लावण्या

(या लावण्या बदलापूरच्या एका ठाकराकडून घेतल्या आहेत.)

### भिंगाची लावणी

एक वेळा भिंग पाहिला राघो मौजेचा
हिरवा रंग राघोचा चारा आणतो मोत्यांचा
त्या राघोला तहान लागली समुद्रावर गेला
तीन मुखवट्या बुडवून शाहिरा एक घोट केला
एक घोट पिऊन राघोची तहान नाही गेली
तीन भिंगांचा चुरान पाहून मनीं दंग झालें (१
दुसऱ्या भिंगांतून पाहिला बेलचंदन
त्या चंदनाला आलीं पानें अवघीं दोनतीन
पहिल्या पानाखाली गेली सृष्टि झाकून
दुसऱ्या पानावरि ऋषि करतील भोजन
तिसऱ्या पानावरि जळते नित्य आगीन
त्या अग्नीच्या पोटीं जन्मली नागी पद्मीण
ढफढोलगीं बसा सांभाळून जाइल गिळून (२)

छपर गण सागर तेथे एक राघोचा घर
राघोच्या शिरिंमस्तकीं तळा एक भरलें पाण्याने
त्या तळ्यामधीं नित्य जळते आगीन
त्या अग्नीच्या भोवती ऋषि देव बैसले नऊजण
एक एकाच्या गळ्यामधीं नऊ नऊशे कामीण
करा शब्दाचा मान शास्त्रार्थ द्या मला निवडून
चौथ्या भिंगांतून पाहिला असा एक चंदन (३)
त्या चंदनाचा शेंडा गेला आकाश लागून
एक्या खांदीवर घारीने घरोटाच केला
त्या घारीने अंडीं घातलीं अवघीं दोन तीन
पहिल्या अंड्यांतून कुठे झाले राम लक्ष्मण
दुसऱ्या अंड्यामधीं कुठे मेरुचा आसन
तिसऱ्या अंड्यामधीं कुठे जळते आगीन (४)

## भिल्लाची लावणी

सातपुडी डोंगर साजण झाडी काठवण भिल्लाचें रान
कसे जाल वाटेने भिल्ल मारतील तीराने मागं आहे कोण
पलटणची बातमी जासुदा सांग वारंवार पुसते नार
सोरि संगती गेले शिपाये नाहि आले परतून लढे कामीन
देतें बैसाया घोडा घोडा तुम्ही फिरवा मौजेनं घरीं राहून (१)
आला सण शिमग्याचा सण शिमगा मी खेळूं कोणासंगें उडवा रंग
मी निजलें पलंगावरी जागी मी झालें डचक्याने लचकली मान
हातीं घेऊन पंचारती ओवाळितें माझा दिलभर पलंगावर
हातीं घेऊनिया समाचार अगोदर कापा माझी मान जाइल हा प्राण (२)

## वेगळेपणाची लावणी

चौघां भावांचा ऐका विचार। धाकटी नार निघाली अगोचर।
तिला मारिलें सासूसासऱ्याने। तिला अक्कल नाही केवळ पाषाण।
अहो पतिराया कां भरलें वेड। कष्टसंगें चूर झालीं हाडं।

शेणपाणी करतांना मोडली कंबर । ह्यो रुपयाचा बांड नेसूं कुठवर ।
निऱ्या पडती गुडघ्याच्यावर । अहो पतिराया कां भरलें वेड ।
कष्टसंगें चूर झालीं हाडं (१)

चार परमेश्वर आणा बोलावून । हा संसार चार ठायीं देवा वांटून ।
सोळा बैल घेतले निवडून । गाई म्हशी आल्या तीन तीन ।
भांडींकुंडीं घेतलीं वांटून । दाण्याचीं पेवीं घेतलीं मापून ।
शेतीमाती घेतली वांटून । नथ डागिना घेतला तोडून ।
अहो पतिराया कां भरलें वेड । कष्टसंगें चूर झालीं हाडं (२)

उपट खाल्ली पतिच्या दैवाने । सोळा बैल मेले रोगाने ।
गाई म्हशीचें नाही ठिकाण । दाण्याचीं पेवीं गेलीं सरून ।
नथ डागिना खाल्ला मोडून । भांडीं कुंडीं नेलीं सावकाराने ।
होती कोंबडी खाल्ली खरड्याने ।
अहो पतिराया कां भरलें वेड । कष्टसंगें चूर झालीं हाडं (३)

## मरतिकाची लावणी

थाट करून माट नेसली चंद्रकरकाळी, कोण हौशाची राजबाळी,
आसक्तीच्या नादानं बुडाल्या शहाण्णव कुळी तेव्हा लंकेची झाली होळी
भगलेपणाच्या गोष्टी सांगतो नव्ह की रे केली, मी एक आतमाया भोळी
कर शब्दाचा मान्या घेतो तुला जरकांठ चोळी, मिळूं दे गुळवण्याला
पोळी (१)

ऐक पंडिता तुला सांगतों व्यर्थ नरदेवी, मायेचा पसारा, जगामधीं आपला
कोणी नाही
लखपति सावकार ह्याची केवढी ग बढाई; संपत्तीचा धनी हरपला, मग
रडते माई
असेल घरामधीं धन दौलत ती करावी कायी, सन् संपदा असून बरोबर
कवडी गेली नाही
असतील काक्या, असतील चुलत्या म्हणायला बाई आली यमाची उडी
मग कुणी सोडवत नाही.

ओठावरती किरणकमाया शोभते ग बाई बापासारखा धनी शेवटीं कामा येत नाही.
चुलती म्हणते चोळी कांकण हरपलें बाई, बायको म्हणते शेज भामला पडलें दुराई (२)

सवा हात रे कापड आणाया पेठमधीं जाई
कोणी खणितो खाच उठली कामाची घाई
तिरड्यावरती हात बांधले आता करूं काई
खाटल्यावरती ह्याला घातलें रडायाची घाई
शेज बाजूला चार भावली चौघे झाले बोडके
होता पोटचा लेकरुं त्यांनी घेतलें शिदोरीचें मडकें
नगिनी यावें नगिनी जावें वरती लवलाही
आतमरगी* गेला वरती कोणाची ओळख नाही
एक देहीला नव दरवाजे करावी चतुराइ
कोणत्या देहीवाटे आत्मा गेला झालें लवलाही
चुलीवरती भात ठेवला खाली जाळ नाही
थोडथोडं पाणी घातलं कुठं शिजला नाही
ह्या देहींचा मोतुरपाया कोणि रचलाही
सांग भटाचें नांव पायामधिं काय घातलाही (३)

## धवशा

असा एक मीं धवशा पाहिला धवशाला चार तोंड
हमेसाशी लावून सडका उडतील कोरडे
लाही उह्राव लहान गिळली, गिळलीं नवखंडें
मुलखामंधीं धुंद मांडली वैऱ्याला दंड
आच्छार मच्छार माया मंडळ सुमार घर याचा
निर्गुणाच्या पलीकडे राहिवास त्याचा
धवशा शास्तर टोला भेरीका संभाळ शास्त्राचा
नुंगेसुरते पद घ्या ऐकून टोला हरीपाचा. (१)

---

* आत्मा.

जुग्म जुग्मी मीं एक पाहिली रणांत नागीण
तिची पडली फरफट त्यांत बुडालं तिरभुवन
अशी पंडिता नागीण धुंडून आणिली कुठून
जर का म्हणशील सात समुद्र जाईल पिऊन
खारट खाईना तुरट खाईना हरामरुताचा
धवशा शास्तर टोला भेरीका संभाळ शास्त्राचा
लुंगे सुरते पद घ्या ऐकून टोला हरिपाचा (२)
एक्या पुरुषाला हजार शिष्टण होती सर्व अंगीं
कोणत्या शिष्टणांनी अस्तुरी भोगावी लावावी मार्गीं
एक्या शिष्टणामधीं धडीचे पुत्र पांचजण
करा वेळीची बेरीच तुम्ही राव चढवा गावण
बारा बिरदना कशी चढविता करार कलगीचा
धवशा शास्तर टोला भेरीका संभाळ शास्त्राचा (३)

## जगाची उत्पत्ति

ऐक पंडिता तुला सांगतों शास्त्र कुळ धरून
जळांतुन आला बुडबुडा घ्या तुम्ही ऐकून
बुडबुड्याच्या मोरं पंडिता उभें होतें कोण
आधी दिव्य सांगून मग पुढे करा गाणं
नाभीं कमळ झळके नाभीला करणार कोण
नाभीं कमळ कुठे जनमलें दे मला सांगून
नाभीं कमळणीच्या फुलांत जाऊन बैसले भगवान
नाभीं कमळण कोणीं रे केलें पुरुष होता कोण ? (१)
अठरा पल्याच्या पल्यावर भगवान जळावर होते
आनंद रूपाची झोप तयाला भगवान निजले ते
झोप पुरी झाल्यावर महाराज उठून बसले ते
गोष्ट आली त्यांच्या मनांत.
भगवंतांनी विचार करुनि आपल्या मनांत
आसती ह्या वेळेला नार भोगीन मनोरथ

हात जोडून उभी राहिली मोरं शकत
द्या तिजला भोग आता पुरवा मनोरथ
भोग दिला कीं नाही दिला सांगा पंडित
आईस लागे की बहीण लागे सांग शिवशक्तीचें नात (२)
ब्रह्मदेवांनी घेऊन लेखणी आपल्या हातांत
खेळ मांडिले तिन्ही ताळांत
ब्रह्माविष्णुमहेश तीन देव पुढे झालेत
तिघांजणांना तीन तीन कामें काय दिलीं तीनही ताळांत
शुन्य शुन्य मायाचा घर ऐका पंडित
तुम्ही शिव पंडित ओळख धरा एक्या अक्षरांत (३)
कोटी कोटी यवदना नव्हती सूर्याला ज्योत
जांबुवंताचा बाप सांगा तुम्ही अशा यवगांत
सटुपिलाजी गुरु गेनाजी हुर घाला ज्योत
माणिक देशामधीं गांव करंगळी निशाण भडकत
ऐसें कैसें म्हणेल रे भाऊ धरावें ध्यानांत
गेनु बळवंता म्हणे वैरी आगिवाणी जळत्यात. (४)

## पांडवांची लावणी

पांचीं पांडवांचीं सभा बसली, धर्मराज थोर
सहदेव पोथी वाची समोर
अर्जुन खेतरी धनुष्यबाण घेऊन संचार
गदा भीमाच्या खांद्यावर ठायीं ठायीं पांडव
रक्षिले भक्तीच्या आधारीं, यांचे कैवारी सारंगधर
द्वारकेमधीं कृष्णदेव तो एक परमेश्वर,
द्रौपदीला पुरविलीं वस्त्रें; हात जोडूनि मी
आर्जव करतों कुंती द्रौपदीला
खिनभर— करूं नको गलबला (१)
देसाई देशमूख पांडे जमादार कचेरी
भरली देव दरबारीं

अवघे रयीत मिळून पाहयाला जातील लहान थोर
समाकुलभारी पांढरीवर; येतील आया जातील बाया,
त्याच्या समस्ताला; खिनभर करूं नको मलबला (२)
हात जोडून मी आर्जव करतों आणखी मुक्ताबाईला,
वेताळ राखण पांढरीला
तुज उजळा, पाहून पहिला, मान देतों तुला,
संभाळून तेल घाल दिवटीला.
गांवाचा कोतवाला, त्यांनी गांव मजकूर केला,
चौकया चार रस्त्याला.
गांवामधीं दिवाणवाडा, धेडवाडा बाहेर,
हमेशा उभा चावडीवर (३)
हात जोडून मी आर्जव करतों माझ्या गुरुस्वामीला,
यांनी मला आज्ञा मार्ग दाविला.
आम्हीं गाण्याशीं उभे राहतों; भितों आमच्या जिवा,
गाण्यामधीं गर्व नसावा,
मनामधीं इसमिस होती संचिताचा टेवा,
आला वांटा कुणाला द्यावा.
काय बेस्याचा गळा चांगला काय नाच्याचा जवा,
असा लवंडिचा गाणारा असावा (४)

## वेळू व चंदन

भांडतील दोघे जण वेळूचंदन; तुम्हीं ऐका चित्त देऊन;
वेळू म्हणे चंदनाला ऐक तूं मूढा माझा होतो धनुषमेढा;
पालखीला होत्यात दांड्या आणखी जीन कोंढे;
पायीं फौज चाले धुडधुडे;
माझ्या काठ्या लागल्या शिखराला; आणखी मोहरी पांवा;
वाजवी शिरिहरी का नारायण चल तुला पुसतो कोण. (१)
चंदन म्हणे वेळुला ऐक नीच जाती; मांगाच्या घरीं तुझी वस्ती

गाईढोरांच्या सागळें तुला आवडती; आणखी शिंतोडा घेती
दुरदुर होई अमंगळा;
माला तुझा येतो कंटाळा; चंदनाच्या होत्यात माळा,
घालत्यात गळां कीं नारायण; चल तुला पुसतो कोण. (२)
वेळू म्हणे चंदनाला ऐक तूं वेड्या माझ्या होत्यात कामोड्या,
होत्यात सुपल्या आणखी कुरकुल्या दुरड्या
वळचणीं लावल्या चाड्या;
बळीराज लावतो शेत, नाही माझ्यावांचून चालत,
भाला आहेत लष्करांत;
हत्तीवर तक्त निशाण नाही चाले सुपावांचून.
भांडतील दोघेजण वेळूचंदन ऐका चित्त देऊन. (३)
पेमतीर गोसावी गातो गरंथ संन्याशी केंगरांथ,
दोघांशीं धरली जोड्याशीं
विठू रामू सरग्यांनीं वेळूची होते पाटी
शेण भर चल तुला पुसतो कोण. (४)

# अस्पृश्यतेचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार

अस्पृश्यतेच्या प्रश्नाला महात्मा गांधी यांनी अस्पृश्यांसाठी स्वतःच्या प्राणांची आहुति देण्याचा निश्चय केल्याने एकदम विलक्षण चालना मिळाली. गांधींच्या उपोषणाने सर्व सुज्ञासुज्ञांचें लक्ष ह्या प्रश्नाकडे वेधिलें गेलें. सनातनी व सुधारक यांमध्ये चुरस लागून अनेक शास्त्रार्थ प्रसिद्ध होऊं लागले. अस्पृश्यता ही ईश्वरकृत आहे असें म्हणणाऱ्यांपासून तों ती क्षणांत नष्ट झालीच पाहिजे असें म्हणणाऱ्यांपर्यंत जरी अनेक मतें निर-निराळ्या तऱ्हेने प्रतिपादन करण्यांत आलीं असलीं तरी शास्त्रवचनांतील

शब्दांच्या पलीकडे जाऊन ऐतिहासिक दृष्ट्या ह्या अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा विचार कोणीं केला आहे असें वाटत नाही. म्हणून ह्या दृष्टीने विचार करून गांधींच्या निर्णयाचा पुरस्कार करण्याचें येथे योजिलें आहे.

अस्पृश्य हा शब्द कांहीसा अर्वाचीन असावा. प्राचीन ग्रंथांतून चांडाल व अंत्यज हे शब्द वापरलेले आढळतात. त्यांतहि अंत्यजाहून चांडाल हा शब्द अधिक प्राचीन आहे. यजुर्वेद, बृहदारण्यक, वासिष्ठ-धर्मसूत्र, आपस्तंबधर्मसूत्र इत्यादि श्रुतिस्मृतींतून चांडाल हा शब्द आढळत असल्यामुळे त्याच्या प्राचीनत्वाबद्दल शंका घेण्यास जागा नाही.

चातुर्वर्ण्य स्थापन होण्याच्या पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्णांचे निरनिराळे समाज अस्तित्वांत होते. त्याबरोबरच दैत्य, दानव, राक्षस, दस्यु, यातुधान इ० समाजहि वावरत असल्याची साक्ष इतिहास देत आहे. या निरनिराळ्या समाजांना एकजीव करण्याचें काम चातुर्वर्ण्याने केलें. निरनिराळे असंख्य समाज हे चार वर्णांत कोठे तरी बसून त्यांची उपजीविका परस्परांवर अवलंबून ठेवून त्या सर्वांना शास्त्राने निगडित करून टाकलें. दानव, दैत्य, दस्यु, पिशाच, पितर, असुर, मनुष्य, यक्ष, गंधर्व इ० नांवांनी प्रसिद्ध असलेले वैदिक व अवैदिक समाज आज पूर्वीच्या स्वरूपांत अस्तित्वांत नाहीत ही गोष्ट कोणालाहि मान्य करावीच लागणार. हे समाज अजिबात नष्ट तरी झाले असले पाहिजेत अथवा चातुर्वर्ण्यांत तरी समाविष्ट झाले असले पाहिजेत. रामोशी, भिल्ल, डोम, धीवर इ० असंस्कृत व जंगली समाज जर आजपर्यंत टिकाव धरून राहिलेले दिसतात तर उपरिनिर्दिष्ट सुसंस्कृत व वैभवशाली समाज अजिबात नष्ट झाले असें म्हणणें धाडसाचें होईल. हा प्रश्न कितीहि महत्त्वाचा असला तरी त्याचा विचार आज कर्तव्य नाही. चातुर्वर्ण्यस्थापनेनंतर वरील सर्व समाजांचीं नांवें सुद्धा लुप्त झालीं ही गोष्ट मात्र येथे ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. अखिल पृथ्वीवरील मनुष्यांचा संघ चातुर्वर्ण्यांत कोठेना कोठे तरी बसवला गेला; परंतु सर्वच मानवजाति या चातुर्वर्ण्यांत अंतर्भूत झाली असें नाही. कांही लोक असे राहिले की, ते चातुर्वर्ण्यांत येण्यास पात्र नव्हते अगर कबूल नव्हते. या कारणास्तव चातुर्वर्ण्यांतर्गत समाज व चातुर्वर्ण्यबाह्य समाज असे मनुष्यजातीचे मुख्य दोन भेद पडले. याच

हेतूने पंचजन म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि पांचवे निषाद असे मानण्याचा प्रघात पडला. चातुर्वर्ण्य निर्माण होण्याच्या पूर्वी कोणत्याहि प्रकारचीं बंधनें असल्याचें आढळून येत नाही. हीं बंधनें विशेषतः वैवाहिक व भोजनविषयक स्वरूपाचीं असतात. हे दोन प्रकारचे निर्बंध चातुर्वर्ण्य-पूर्वकालांत नव्हते. एवढेंच नव्हे तर चातुर्वर्ण्योत्तर कालांतहि या दोन बाबतींत हल्लीसारखा कडकपणा नव्हता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांमध्ये अनुलोमपद्धतीने का होईना पण शरीरसंबंध होत, व कोणत्याहि वर्णाचे लोक दुसऱ्या कोणत्याहि वर्णाच्या लोकांच्या हातचें अन्न खात. राम वनवासास जातांना त्याला निषादाधिपति जो गुह त्याने आदरातिथ्य देऊं केलें होतें हें सर्वश्रुतच आहे.

**भक्ष्यं भोज्यं च पेयं च लेह्यं चैतदुपस्थितम् ।**
**शयनानि च मुख्यानि वाजिनां खादनं च ते ॥**

या शब्दांत गुहाने भोजनशयनाचा स्वीकार करण्याविषयी रामाला विनविलें आहे. हा निषाद चातुर्वर्ण्यांतर्गत होता असें कोणीहि म्हणणार नाही. रामाच्या कालीं चातुर्वर्ण्य कडक रीतीने पाळलें जात असे हें त्याने एका तपश्चर्या करणाऱ्या शूद्राला देहान्त शासन दिलें ह्या आख्यायिकेवरून सिद्ध होतें. ह्या आख्यायिकेवरून वर्णसंकरापेक्षाहि कर्मसंकर न होऊं देण्याविषयी रामायणकालीं अधिक दक्षता पाळली जात असे असें दिसतें. भक्ष्याभक्ष्याचे निर्बंध तर बिलकूल ठेविले जात नसत हें गुहाने रामाला देऊं केलेल्या पाहुणचारावरून व्यक्त होतें. कदाचित् असेंहि अनुमान करतां येईल की, रामायणकालीं असलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था ही स्मृतिकाला-पूर्वीची होती.

चंड, चंडी, चांडिका, चांडिळ, चंडाल या सर्व शब्दांचें बीज एकच असलें पाहिजे. हा तर्क जर अगदी त्याज्य नसेल तर शिवीदाखल प्रथम हा चांडाल शब्द उपयोगांत आणला असावा असें म्हणण्यास हरकत नाही. लिंगपूजा अथवा शिवपूजा हिच्याकडे वैदिक आर्य प्रथम तुच्छतेने पाहत असावे असें अनुमान करण्यास विपुल प्रमाण मिळूं शकेल. यापैकी मुख्य प्रमाण हें की, शिवाचा पुजारी जो गुरव त्याचा स्पर्श झाला असतां सचैल

स्नान करण्याविषयी शास्त्राची अनुज्ञा आहे. गुरव यांची उत्पत्ति वर्णसंकराने झाली असून शिवाच्या नैवेद्यावर त्याने उपजीविका करावी, अन्यथा करूं नये, असें अनेक निबंधांवरून दिसून येतें. '**शिवार्चनं तु तत्कार्यं शिवदायेन जीवनम्।**' चांडाल शब्दाची व्युत्पत्ति कांहीहि असो चातुर्वर्ण्याच्या बाहेरच्या लोकांना चांडाल, निषाद, अंत्यज इत्यादि शब्द लावीत. प्रथमतः तर यांना बाह्य हेंच विशेषण लावण्यांत येत असे. किंबहुना वर्णबाह्य हेंच चांडालाचें लक्षण असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. अनार्यता, निष्ठुरता, क्रूरता व निष्क्रियात्मता हे बाह्यांचे अवगुण मनूने वर्णिले आहेत.

**अनार्यता निष्ठुरता क्रूरता निष्क्रियात्मता ।**
**पुरुषं व्यंजयन्तीह लोके कलुषयोनिजम् ॥१०।५८**

याच्या उलट अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच आणि इंद्रियनिग्रह हे गुण सामान्यतः चार वर्णांत आढळतात असें मनूचें म्हणणें आहे.

**अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः ।**
**एतं सामासिकं धर्मं चातुर्वर्ण्येऽब्रवीन्मनुः ॥**

या मनुवचनांवरून ह्या बाह्यांच्या अपात्रतेमुळे ते चातुर्वर्ण्यांत येऊं शकले नाहीत असा तर्क वाहतो. चातुर्वर्ण्याची रचनाच अशी आहे की, निरनिराळ्या वर्णांतील लोक परस्परांच्या सांनिध्यांत राहणें अवश्य होतें. अर्थात् चातुर्वर्ण्यांत ज्यांना स्थान नाही, चातुर्वर्ण्याला ज्यांचा उपयोग नाही, असे लोक वाळीत टाकल्याप्रमाणे चार वर्णांनी वसाहत केलेल्या गांवाच्या बाहेर राहिले तर त्यांत आश्चर्य नाही. स्मृतिकार या बाह्यांसंबंधाने आचाराचे कोणतेहि नियम सांगत नाहीत ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. धर्मशास्त्र हें चार वर्णांकरिता आहे; निषादाकरिता अथवा पांचव्या वर्णाकरिता नाही. चातुर्वर्ण्य बनलें तेव्हा असल्या प्रकारची स्थिति होती.

चातुर्वर्ण्यस्थापनेनंतर अनुलोमप्रकाराने वर्णसंकर कायम होता. परंतु उलट प्रकाराने तो निषिद्ध मानला गेला. प्रतिलोमप्रकारांतील सर्वांत किळसवाणा प्रकार म्हणजे ब्राह्मण स्त्रीच्या ठिकाणीं शूद्रापासून झालेली संतति होय. ह्या संततीला चातुर्वर्ण्यांत स्थान मिळणें शक्य नव्हतें. ही वैवाहिक संतति नसून जारज संतति होती. ह्या कारणास्तव ही संततीहि

वर्णबाह्य समजण्यांत आली. आणि म्हणून त्यांना पूर्वीच्या वर्णबाह्यांत लोटावें लागलें. अशा रीतीने पूर्वीच्या जातिवंत चांडालांत पाठीमागून व्यभिचारोत्पन्न चांडालांची भर पडली. यांनाच नीच चांडाल म्हणत. कालान्तराने अनुलोमविवाहपद्धतीहि लोकांना अनिष्ट वाटूं लागली; आणि स्मृतिकारांचा सवर्णकुमारिकेबरोबरच विवाह करण्याचा नियम सुदृढ रीतीने प्रचारांत येऊं लागला. अर्थात् वर्णसंकर कोणत्याहि स्वरूपाने विहित म्हणून अवशिष्ट राहिला नाहीं. निरनिराळ्या वर्णांतील स्त्रीपुरुषसंबंध शास्त्राने जरी निषिद्ध मानले तरी प्रत्यक्ष व्यवहारांत असले संबंध घडल्याशिवाय राहत नाहींत हें सांगावयास नको. तेव्हा असले संबंध अपध्वंस किंवा व्यभिचार या सदराखाली येऊं लागले. निरनिराळ्या वर्णांच्या स्त्रीपुरुषांपासून झालेली संतति ही अमुक एका वर्णाची असें म्हणतां येणें अशक्य झाल्यामुळे ती वर्णबाह्य म्हणून गणली गेली. तात्पर्य, चांडालांच्या संख्येंत आणखी भर पडत चालली. चांडालांच्या अथवा अस्पृश्यांच्या उत्पत्तीचा अशा प्रकारचा इतिहास आहे. या दृष्टीने विचार केला असतां आम्ही आपल्या संततीला आपण होऊन हीन स्थितींत टाकलें या पापाचें प्रायश्चित्त आपण भोगलें पाहिजे हा गांधींचा आरोप अंशतः समर्थनीय ठरतो. अस्पृश्यांची संख्या सुमारें चार कोटि आहे असें म्हणतात. या लोकांना आमचें धर्मशास्त्र लागू नाहीं. कोणताहि दुसरा धर्म स्वीकारण्यास अथवा नवीन धर्म स्थापन करण्यास या लोकांना मोकळीक होती व आहे; आणि एवढ्याकरिता अस्पृश्यांवर मुसलमानांचा डोळा होता. ह्या चार कोटि लोकांनी निराळा धर्महि स्थापन केला नाहीं किंवा अन्य धर्म स्वीकारला नाहीं हें आपलें महद्भाग्य होय.

यानंतर लोकांच्या विचारांनी पुन्हा उसळी खाल्ली. व्यभिचारज समाजांना निरनिराळे धंदे देण्यांत आले हें स्मृतिग्रंथांवरून कोणासहि कळून येईल. या लोकांना ग्रामसंस्थेंत कायमचें स्थान प्राप्त झालें हें त्यांच्या धंद्यांमुळेच होय. अशा रीतीने हिंदूंशीं हे लोक अधिकाधिक संलग्न होत गेले. कांहींनी हिंदूंच्या देवता उपासनेसाठीं पसंत केल्या. रायपूर येथे इ. स. १४१५ मध्ये एका मोच्याने विष्णूचें देऊळ बांधलें या गोष्टीचा उल्लेख डॉ. घुर्ये यांनी आपल्या इंग्रजी पुस्तकांत केला आहे. व्यभिचारज

संततीला चातुर्वर्ण्योपयोगी असे धंदे करण्याची सवलत दिल्यामुळे त्यांचें अस्पृश्यत्व नाहींसें झालें. परीट, बुरुड, गुरव वगैरे अस्पृश्यांचे स्पृश्य झाले हें सर्वांस माहीतच आहे. परीट व बुरुड या दोहोंमध्ये बुरुड अद्यापि अर्ध्या अस्पृश्य स्थितींत आहेत; कारण ह्यांची हजामत न्हावी अजून कित्येक ठिकाणीं करीत नाहीत. देशावर कित्येक ठिकाणीं महार हे गवंडीकाम करीत असल्यामुळे स्पृश्यांचीं घरें बांधण्याचें काम महारांकडूनच करून घेतलें जातें. ह्यापुढे तर निबंधकारांनी ह्या सर्व वर्णबाह्य जातींचा शूद्रसम जाती या सदरांत अंतर्भाव केला. त्यामुळे शूद्रांचें धर्मशास्त्र ह्या वर्ण-बाह्यांनाहि लावण्याचा प्रघात पडत चालला. निबंधकारांपूर्वी कौटिल्याने मात्र या मिश्र जातींचे धर्म निश्चित करण्याचा प्रयत्न केला होता. वैण्याबद्दल कौटिल्य म्हणतो—

**कर्मणा वैण्यो रथकारः। तेषां स्वयोनौ विवाहः। पूर्वापर-गामित्वं वृत्तानुवृत्तं च स्वधर्मान् स्थापयेत्। शूद्रसधर्माणो वा अन्यत्र चण्डालेभ्यः॥** (अधिकरण ३; ६० प्रकरण)

पूर्वापार आचार पाळावे व योग्य ते नवीन आचार सुरू करावे अथवा शूद्रांचे आचार घ्यावे परंतु चांडालाचे घेऊं नये, तसेंच आपआपल्या जातींतच विवाह करावा, असें या मिश्र जातींसंबंधाने कौटिल्याने नियम घालून दिले आहेत. यांत 'चंडालेभ्य अन्यत्र' हे शब्द महत्त्वाचे आहेत. जातिवंत चांडालांचे मेलेल्या प्राण्यांचें मांस खाण्यासारखे हीनाचार या मिश्र जातींनी स्वीकारूं नयेत असा इशारा कौटिल्याने दिला हे योग्यच झालें.

**चण्डालश्चाधमो नृणाम् (वर्णसंकरात्)** । मनु. १०।१२

**शूद्राज्जातस्तु चाण्डालः सर्वधर्मबहिष्कृतः** । याज्ञ. ४।९३

हा संकरजातींपैकी एका चांडाल जातीसंबंधीचा मनु-याज्ञवल्क्यांचा कडक निर्बंध इतर संकरजातींसंबंधाने तरी शिथिल झाला यांत संशय नाही.

तात्पर्य, अस्पृश्य यांचा खरा व मूळ अर्थ वर्णबाह्य एवढाच आहे. पूर्वी चातुर्वर्ण्यसंस्थापकांनी ज्याप्रमाणे अनार्य असलेल्या शूद्रांना चातुर्वर्ण्यांत समा-

विष्ट केलें, त्याचप्रमाणे आता ह्या दुसऱ्या वर्णबाह्य अनार्यांना चातुर्वर्ण्यांत घेण्याचें महनीय कार्य म. गांधीच्या हातून होत आहे. ह्या कार्याचें महत्त्व जाणण्याची कुवत आमच्यांतील पुष्कळांत सध्या नाहीं ही अत्यंत दुःखाची गोष्ट होय. शूद्रांनाहि पूर्वी धर्म नव्हता. परंतु 'वर्णत्वात् धर्ममर्हति' या न्यायाने त्यांना वर्णत्व देऊन संस्कृतीच्या मार्गाला लावलें. त्याचप्रमाणे 'सर्वधर्म-बहिष्कृत' असे जे अस्पृश्य त्यांना स्पृश्य म्हणजे वर्णांतर्गत करून घेतल्याने आपण त्यांचा उद्धार करीत आहों याबद्दल खऱ्या हिंदुधर्माभिमान्यांना संतोपच वाटला पाहिजे. आज हजारों अस्पृश्य हे हिंदूंचे आचार पाळीत आले आहेत, हिंदूंच्या देवतांना भजत आहेत, हिंदूंचे सण पाळीत आहेत, आणि अशा रीतीने तीनचतुर्थांश हिंदु ते झालेलेच आहेत. तेव्हा त्यांना स्पृश्य करून न घेणें हा मूर्खपणाच नाही काय ?

## रजस्वलेचा विटाळ

अस्पृश्यता हा शब्द कसा रूढ झाला हें समजत नाही. परंतु या शब्द-प्रयोगाने सामान्य जनांत गैरसमज उत्पन्न होतो व झाला आहे यांत संशय नाही. अस्पृश्यत्व हें कारण नसून कार्य आहे, हें लक्षांत ठेविलें असतां ह्या विपयासंबंधाने आपल्या कल्पना कशा भ्रामक बनल्या आहेत तें सुलभ-तेने समजून येईल. कारणाकडे दुर्लक्ष करून कार्यालाच आपण महत्त्व देतों. अस्पृश्यत्व हा गुण निसर्गसिद्ध नाहीं; त्याचें कारण जेव्हा उद्‌भवेल तेव्हाच तो प्रकट होतो. कार्य हें कारणानंतर अस्तित्वांत येतें हें उघड आहे, म्हणून कार्याचें म्हणजे अस्पृश्यतेचें कारण आपण प्रथम पाहिलें पाहिजे.

कोणताहि पदार्थ अमेध्य, अशुचि अथवा अमंगळ असेल तेव्हा अशा पदार्थांपासून दूर राहणें हें ओघानेच प्राप्त होतें. दूर राहणें याचाच अर्थ त्या पदार्थाला स्पर्श न करणें. परंतु कळत न कळत घाणेरड्या पदार्थांचा संकर्प घडलाच तर ह्या संकर्पदोषाचें परिमार्जन करणें भाग आहे. ह्या

परिमार्जनाचे अनेक प्रकार आहेत. तात्पर्य, अपवित्र पदार्थ, त्याचा संपर्क आणि त्या संपर्काचें परिमार्जन अशा या तीन अवस्थांपैकी स्पर्शदोष ही मधली अवस्था होय.

जगांत घाणेरड्या अशा असंख्य वस्तु आहेत. धर्मशास्त्रकारांनी त्या सर्वांचा निर्देश केलेला नाही. परंतु अशा पदार्थांना अशुचि असें विशेषण त्यांनी लावलें आहे. अशुचि म्हणजे अशुद्ध. अशुचि शब्दावरून आशौच शब्द झाला असून त्याचा अर्थ अशुचित्व असा आहे. माझ्यामतें अमेध्य शब्द अशुचि शब्दाच्या पूर्वीचा असावा. यज्ञकर्मांत जें अग्राह्य तें अमेध्य. यावरून अशुद्धतेच्या कल्पनेचा उगम आपणांस समजण्यासारखा आहे. धर्मशास्त्रांत रजस्वला, चांडाल, पतित, विष्ठा, प्रसूता, पूप, चिता, प्रेत, कुत्रा, मांजर, सोम व वेद यांची विक्री करणारा, ग्रामयाजी, देवांच्या द्रव्यावर उपजीविका करणारा, माणसाचें ओलें हाड, प्रेताचा धूर इत्यादि पदार्थ अशुचि म्हणून सांगितले आहेत. ह्याशिवाय दुःस्वप्न व मैथुन त्याचप्रमाणे वांति, जुलाब, श्मश्रुकर्म, श्मशान हीं अशुद्ध समजून परिमार्जन-उपाय म्हणजे स्नान हा सांगण्यांत आला आहे. एवढेंच नव्हे तर शैव, पाशुपत, लोकायतिक, नास्तिक, निषिद्ध कर्मे करणारे ब्राह्मण यांचा संसर्ग झाल्यास शास्त्राने सचैल स्नान फर्माविलें आहे. त्याचप्रमाणे सूर्योदयीं व सूर्यास्तीं वीर्यस्कंदन अथवा केव्हाहि नेत्रस्पंदन होणें हें दोषास्पद मानलें असून त्याचें निराकरण स्नानानें होत असतें. ह्या व अशा दुसऱ्या कित्येक गोष्टी अशुद्ध ठरविल्या आहेत. परंतु आपणांस ह्या सर्वांचा विचार येथे कर्तव्य नाही. ध्यानांत ठेवावयाची गोष्ट ही की, शास्त्राने अपवित्र मानलेल्या पुष्कळ गोष्टी आज आपण तशा समजत नाही. 'मैथुनान्ते स्नानम्' हा विधि हिंदूंतून समूळ नष्ट झाला असून मुसलमानांकडूनच त्याचें परिपालन आज होत आहे. हा अशुद्धीचा प्रकार प्रसंगोपात्त व व्यक्तिगत आहे. याशिवाय जननाशौच व मृताशौच हा अशुद्धीचा दुसरा प्रकार कुटुंबव्यापी आहे. ह्या दुसऱ्या प्रकारांत मूलतःच भेद असल्यामुळे वास्तविक रीत्या प्रत्येकाची चर्चा स्वतंत्रपणें करणें अवश्य आहे. दोहोंचा संकर करून विचार करणें शास्त्रशुद्ध होणार नाही.

अशुद्धता घालविण्याचा उपाय स्मृतिकारांनी प्रायश्चित्त प्रकरणांत दिलेला

असला तरी स्पर्शानंतर करावें लागणारें स्नान हें अन्य प्रायश्चितांच्या जातीचें नाही हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

उदाहरणार्थ, हिंसा न करण्याविषयी शास्त्राचा दंडक आहे. ह्या दंडक मोडणारास शास्त्राने जें प्रायश्चित्त सांगितलें आहे तें शिक्षेच्या स्वरूपाचें आहे. हिंसा न करण्याचा नियम सामाजिक स्वरूपाचा आहे. उलट स्पर्शमूलक स्नान हें वैयक्तिक स्वरूपाचें आहे. रजस्वलेचा स्पर्श झाल्याने समाजाचा अपराध घडत नाही. मानलाच तर तो केवळ दूरान्वयाने मानावा लागेल. सर्व स्पर्शदोष हे वैयक्तिक स्वरूपाचे मानले जातात. अर्थात् सामाजिक अपराधापुढे वैयक्तिक अपराध पुष्कळच क्षुद्र समजला पाहिजे. आशौचविषयक चर्चेंत हें तारतम्य राखणें महत्त्वाचें आहे.

याप्रमाणे आशौचविषयक कांही मूलभूत तत्त्वांचा विचार झाल्यानंतर रजस्वला, जनन, मृताशौच व चांडाल यांच्या अस्पृश्यतेचा ऊहापोह करूं.

रजस्वलेचा विटाळ मानण्याची चाल सर्व असंस्कृत समाजांत दिसून येते, आणि सुसंस्कृत समाजांत ती नष्ट होत जाते ह्याचा ऐतिहासिक पुरावा देतां येईल. रजोदर्शन ही पिशाच्चबाधा आहे, ही असंस्कृतांची समजूत असल्यामुळे त्यांच्यांत अस्पृश्यतेची चाल कडकडीतपणें पाळली जाणें स्वाभाविक आहे. ह्यांत मूलभूत कल्पना अशुद्धतेची नसून भीतीची आहे. असंस्कृत समाज विटाळशीला अमंगळ समजत नाही. पिशाच्चाला भिऊन तो तिला दूर करतो अथवा तिचा संपर्क टाळतो.

विटाळशीच्या संबंधाने अनेक कल्पना आढळतात. सर्पाच्या चावण्यापासून विटाळ उद्भवतो अशी समजूत कित्येक ठिकाणीं आढळते. विटाळसपणीं अलौकिक सामर्थ्य प्राप्त होतें असें कित्येक समजतात. विटाळशीने जगाकडे अगर सूर्याकडे बघतां कामा नये, खाली मान घालून बसलें पाहिजे, अशीहि चाल आहे. कांही ठिकाणीं तिच्या तोंडावर कापड ठेवून डोळे झांकतात. विटाळशीने हाताने डोकें खाजवण्याचा निषेध कांही जातींत आढळतो. ब्रिटिश कोलंबियांत प्रथम ऋतु प्राप्त झाला असतां चार दिवस उपोषण करण्याची वहिवाट आहे. मांस खात नाहीतच.

कानडींत विटाळशीला कडिगागु म्हणतात. कडिग म्हणजे बाहेर. मला

वाटतें, कानडी लोकांच्या संपर्काने बाहेर बसण्याचा शब्दप्रयोग आमच्यांत आला असावा.

श्रौतस्मार्तवाङ्मयांत ही पिशाचकल्पना आढळत नाही. रजस्वला ही अशुचि असते असेंहि आमच्या धर्मशास्त्रकारांनी स्पष्ट म्हटलेलें दिसत नाही. द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीं द्रौपदी एकवस्त्रा होती. टीकाकारांनी एकवस्त्रा याचा अर्थ रजस्वला असा केला आहे. असें असून द्रौपदीला सभेंत आणिल्यावर विटाळ झाल्याचा आक्रोश कोणींहि केला नाही. यावरून भारतकालीं रजस्वलेला अस्पर्श समजत नसत असें म्हणतां येईल. विटाळशीला स्मृतिग्रंथांत रजस्वला अथवा उदक्या असें म्हटलें आहे. आता ही गोष्ट खरी की, भारतकालीं जरी रजस्वला अस्पर्श नसली तरी मनूने रजस्वलेचा स्पर्श झाला असतां स्नान करण्यास सांगितलें आहे. परंतु अस्पृश्यतेची कल्पना पाठीमागूनची असावी असा संशय घेण्यास जागा आहे. कारण अन्यत्र मनूने सोळा दिवसांच्या ऋतूंतील पहिले चार दिवस निंद्य आहेत एवढेंच म्हटलें आहे. तसेंच सर्व सूत्रकार रजस्वलेचा दोष सांगतातच असा नियम नाही, परंतु ज्या अर्थी रजस्वला स्त्रीच्या हातचें अन्न सेवन करण्याचा निषेध आवर्जून सांगतात त्या अर्थी, ते अस्पृश्यता मानीत नसावे असें वाटतें. कारण रजस्वलेला अस्पृश्य ठरविल्यानंतर अन्नग्रहणाचा प्रश्न उत्पन्न होत नाही. वसिष्ठाने आशौच सांगतांना उदकक्रिया, शौच हे शब्द योजिले आहेत. याचा अर्थ अशुचि माणसाने उदकाला शिवूं नये व देवकर्म करूं नये असा आहे. रजस्वलेची अशुद्धता उदकक्रियेपुरती मर्यादित केल्यास शास्त्रोल्लंघन होणार नाही.

संस्कृतांतील रजस्वला, उदक्या अथवा ऋतुमती ह्या शब्दांत कोणत्याहि वैगुण्याची छटा मारीत नाही. हे शब्द केवळ वस्तुस्थितिनिदर्शक आहेत. परंतु मराठींतील विटाळशी हा शब्द विष्ठा ह्या शब्दापासून निघाला असल्यामुळे त्यांत अशुचित्वाची कल्पना स्पष्ट दिसत आहे. विटाळशी हा शब्द विशेषतः पुरुषांच्या तोंडीं आढळून येतो. बायकांच्या वापरांतील शब्द 'बाहेरची बसणें' हा आहे. हा शब्द विटाळशी शब्दाच्या पूर्वींचा असावा आणि तो असंस्कृतांच्या विटाळशीला गांवाबाहेर ठेवण्याच्या कल्पनेला धरून आहे. यावरून विटाळशीने अस्पृश्य होऊन घरांतील एका कोपऱ्यांत

बसण्याची चाल असंस्कृत समाजापासून आम्हीं उचलली आहे असें दिसतें. इजिप्त देशांत विटाळशा माडीवर बसतात. हीहि चाल हिंदुस्थानांतील पश्चिम-किनाऱ्यावरील कित्येक ठिकाणीं आढळून येते. असो. सारांश हा कीं, रजस्वला, बाहेरची व विटाळशी हे तीन शब्द निरनिराळ्या तीन अवस्थांचे द्योतक आहेत व त्यांत पुष्कळ इतिहास भरलेला आहे.

विटाळशीचें अशुचित्व व्यक्तीपुरतें आहे. परंतु जननमरणाशौच हें कुटुंब-व्यापी आहे. स्त्री प्रसूत झाली असतां किंवा कोणी मेलें असतां सर्व कुटुंबच्या कुटुंब अशुचि मानण्यांत येतें.

मृत मनुष्य अथवा प्रसूता स्त्री ही अशुचि आहे ही गोष्ट निर्विवाद होय. परंतु कुटुंबांतील इतर माणसांत अशुचित्व वस्तुतः नसतें. स्वतः अशुचि नसून अशुचि पदार्थाचा अथवा व्यक्तीचा संसर्गहि घडला नसतांना हें आशौच मानण्यांत आलेलें आहे. ही गोष्ट कित्येक धर्मशास्त्रकारांच्या नजरेस येऊन अशा प्रकारच्या आशौचाला त्यांनी असंख्य अपवाद निर्माण केले आहेत. एवढेंच नव्हे, तर आशौचाचा काल वाढवूं नये, त्यामुळे कर्माची हानि होते, असें मुद्दाम बजावलें आहे. माझ्या मतें जननाशौचा-संबंधाने वसिष्ठाचा नियम पाळण्यांत यावा. तो म्हणतो, पुरुषांना बाळं-तिणीचा स्पर्श झाला नसल्यास आशौच नाही. ह्या अशुद्धीचें कारण रज हें आहे आणि तें पुरुषांत नसतें.

**नाशौचं सूतके पुंसः संसर्गं चेन्नावगच्छति ।**
**रजस्तत्राशुचिज्ञेयं तच्च पुंसि न विद्यते ॥**

जननाशौचाप्रमाणेच मृताशौच मर्यादित करण्याने कोणती सुद्धा हानि न होतां प्राचीन ऋषींच्याच धोरणाला आपण मान देत आहों. अशुचित्व नसतांना आशौच पाळण्याचा नियम दिला होणें साहजिक अहे. कदाचित् प्राचीन काळीं सांथीच्या रोगाने बरेच मृत्यु होत असल्यामुळे कौटुंबिक आशौच धरण्याची पद्धति रूढ झाली असावी. परंतु अर्वाचीन काळीं रोग्याची शुश्रूषा करतांना स्वच्छतेकडे चांगलेंच लक्ष पुरविलें जात असल्या-मुळे अंतकालीन अशुद्धि झपाट्याने कमी होत आहे, म्हणून आशौच्याचे दिवस कमी करण्यास प्रत्यवाय नसावा.

चांडाळाचें अशुचित्व एका काळीं समजण्यासारखें होतें. आज आपण ज्यांना अस्पृश्य म्हणतों त्यांना पूर्वी बाह्य ही संज्ञा होती. कारण ते 'वर्णानामाश्रमाणां च सर्वदा तु बहिः स्थिताः' असे होते. अर्थात् त्यामुळे 'सर्वधर्मबहिष्कृताः' मानले जात. पतितापेक्षाहि ते पतित होते. आता ही स्थिति राहिली नाही. ते वर्णाश्रमी हिंदूंत सामील होत आहेत. त्या कारणास्तव त्यांच्या ठिकाणीं असलेलें पूर्वीचें अशुचित्व आता राहिलें नाही. त्यामुळे त्यांची अस्पृश्यताहि आपोआप नष्ट झाली पाहिजे. असो. दुसऱ्या अनेक बाबतींतलें अशुचित्व आपण मर्यादित केलें आहे. ही स्थिति राहिलेल्या आशौच्यासंबंधाने होणार यांत संशय नाही.

# जगांतील कांही जातींची माहिती

## विटोटो

दक्षिण अमिरिकेंतील ब्राझिल देशांत अमेझॉन नांवाची नदी आहे. हिची लांबी चार हजार मैल असून सर्व जगांतील नद्यांत हिचा दुसरा नंबर तज्ज्ञांनी लाविला आहे. ह्या नदीचें वैशिष्ट्य हें की, तिला दुसऱ्या असंख्य नद्या येऊन मिळतात. ह्या सर्व उपनद्यांसह अमेझॉनने व्यापलेल्या प्रदेशाचें क्षेत्रफळ तेवीस लक्ष तीस हजार चौरस मैल आहे. इतका मोठा प्रदेश जगांतील दुसऱ्या कोणत्याहि नदीने व्यापला नाही. इसा नदी अमेझॉनला ज्या ठिकाणीं मिळते त्या ठिकाणीं तिचें पात्र शंभर मैल रुंद आहे.

पाण्याच्या विपुलतेमुळे पर्जन्यमानहि पंचाहत्तर इंचांच्या आसपास असल्याने ह्या प्रदेशांत दाट जंगल असणें स्वाभाविक आहे. विषुववृत्ताच्या दोहों बाजूंस हा प्रदेश पसरलेला असूनहि पाणी व झाडी ह्यांमुळे उष्णतेचा

ताप येथे होत नाही. हिंदुस्थानाइतक्या विस्तृत अशा ह्या जंगलमय प्रदेशांत नानाविध आणि अगणित लोक राहत आहेत. हे लोक ठेंगू पण घट्ट शरीराचे सुदृढ असून त्यांच्या अंगाचा रंग तांबूस किंवा तपकिरी असतो. केस सरळ, दाट पण कुरळे नसतात. डोळे काळे असून चेहरा चपटा असतो. छाती भरदार असून शरीराचा बांधेसूदपणा मनांत भरण्यासारखा आहे. ह्यांचे कान लांबट असल्यामुळे इतर लोकांपासून हे लोक तत्काळ ओळखूं येतात. ह्यांच्यापैकी कित्येक समाजांतील स्त्री-पुरुष नग्न स्थितींत वावरतात. कांही लोक असे आहेत की, त्यांच्या अंगावर पांढरे, तांबडे, काळे चट्टे अगर खवले असतात. पण आश्चर्य हें की, लहानपणीं अंग चांगलें असतें; मोठेपणीं ते उगवतात.

अशा ह्या नानाविध लोकांपैकी विटोटो नांवाचे एक लोक आहेत. आज ह्याच लोकांची माहिती आपणांस द्यावयाची आहे. साधारणपणें विटोटो पुरुषास एकच बायको असते. नोकरीकरिता सांप्रत आपणांस परीक्षा द्यावी लागते त्याप्रमाणे बायको मिळविण्यासाठी विटोटो पुरुषासहि परीक्षा ठेवलेली आहे. जंगल साफ करणें व मांडव उभारणें हीं कामें चोख रीतीने करून दाखविल्याशिवाय मुलीच्या बापाची संमति लग्नाला मिळत नाही. इतर समाजांतहि अशा तऱ्हेची कसोटी लावण्यांत येते: मुलाने अचूक नेम मारावा लागतो. तो नेम चुकला तर मुलगी त्याच्याबरोबर लग्न करण्यास नाकारते. अशा रीतीने नवरा आपली हुशारी सिद्ध करून बायको मिळवितो. त्याला मुलीच्या बापाला निराळे पैसे द्यावे लागत नाहीत. इतर कित्येक समाजांतील वहिवाटीप्रमाणे लग्नानंतर वर्ष दोन वर्षें नवऱ्यास सासुरवाडीस राहावें लागतें. ह्या लोकांत सलोखा असलेल्या दुसऱ्या समाजांतून मुलींची निवड करण्यांत येते. कांही अमेझोनिअन जातींत चुलतभावंडांत अथवा चुलत्या-पुतणीशीं लग्नें होतात, तसें ह्यांच्यांत नाही. लग्नाचा विधि म्हणून कांही नाही. ह्याच जंगलांतील दुसऱ्या समाजांत मुलगी जबरदस्तीने आणावी लागते. तसा प्रकार विटोटो समाजांत नाही. बलात्काराने मुलगी मिळविणें हेंच त्या समाजाचें धर्मशास्त्र होय. कारण जेथे परस्परांच्या संमतीने लग्न ठरतें तेथेहि हा बलात्काराचा दांभिक विधि करावा लागतो. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे एकाच समाजांत अथवा जातीच्या

लोकांत आपापसांत बेटीव्यवहार होत नाही.

स्त्रीला गर्भारपणांत बरेच निषेध पाळावे लागतात. बायको बहुधा घरांतच प्रसूत होते. इतर कांही जातींत रानांत जाऊन बाळंत होण्याची वहिवाट आहे. कांही जातींत प्रसूतीनंतर घरांतील सर्व सामान काढून एक दिवस बाहेर ठेवतात. बाळंतीण मुलाला नदीवर नेऊन स्नान घालते व आपणहि करते. स्त्री प्रसूत होण्याचा समय जवळ आला म्हणजे नवऱ्याने बाळंतपणाचे सर्व उपचार करून घेण्याची एक चमत्कारिक रीत विटोटो लोकांत आहे. नवरा बाजेवर निजतो. गर्भार स्त्रीला जीं फळें वर्ज्य असतात तीं तो खात नाही. तसेंच निदान एक आठवडा तरी कोणतेंच काम करीत नाही. असें केलें असतां बायकोचें बाळंतपण सुखावह होईल असें तो समजतो. बाळंतपण हें एक दैवी संकट आहे, त्यांतून निभावण्याचा हा एक उपाय आहे, अशी ह्या लोकांची समजूत. आपल्याकडेहि अशा समजुती नाहीत असें नाही. मनुष्य मेल्याची चुकीची बातमी पसरल्यास ती त्या माणसास हितकारक होते, त्याचें आयुष्य वाढतें, असें आपण मानतों.

लहान मूल आईच्या अंगावर दोन तीन वर्षे पीत असतें. ह्या मुदतींत पतिपत्नींत विषयसेवन होत नाही. लोकसंख्या कमी होण्याचें हें एक कारण आहे.

मुलांमुलींनी वयांत येईपर्यंत कोणत्याहि प्रकारचें मांस खावयाचें नाही असा निर्बंध आहे.

ह्यांच्यांत प्रेतें पुरतात; जाळीत नाहीत. आपल्याकडील लिंगायतां-प्रमाणे बसलेल्या स्थितींत प्रेत पुरतात. तिरडीच्याऐवजी पाळण्यांत घालून प्रेत नेण्याची वहिवाट आहे. मयताचे सर्व जिन्नस प्रेताशेजारीं खळग्यांत ठेवतात. खळग्याशेजारीं कित्येक दिवसपर्यंत अग्नि जळत ठेवण्याची दक्षता बाळगतात. अग्नि किंवा दीप किंवा ज्वाला हें प्राणाचें बाह्यचिन्ह आहे. आपल्याकडे कांही जातींत प्राण गेल्याबरोबर आधीच लावून ठेवलेली समय बुद्ध्या खाली पाडून विझवतात; आणि येथे तर अग्नि प्रज्वलित ठेवला जातो. अर्थात् ह्या विरोधी चाली दिसतात; तथापि ज्योत म्हणजे प्राण हा संकेत ह्या दोन चाली पाळणाऱ्या लोकांत एकच आहे. विटोटो लोकांच्या ह्या चालीचें कारण असें दिसतें की, प्राणोत्क्रमणानंतरहि मय-

ताचें स्मरण असेपर्यंत शरीरांतून आत्मा बाहेर पडला तरी तो नष्ट होत नाहीं अशी ह्यांची समजूत आहे. झोपेंत जीव तात्पुरता बाहेर पडतो तर मरतांना तो कायमचा देह सोडून जातो; तथापि मयताचें स्मरण लुप्त झालें म्हणजे आत्म्याचाहि लोप होतो ह्या समजुतीमुळें विटोटोंच्या मतें आत्मा अमर आहे असें ठरत नाहीं.

देवाची प्रार्थना करण्याचें ह्या लोकांस माहीत नाहीं. देवाची कल्पना उद्भवण्यास बराच काळ लोटतो.

विटोटो लोकांच्याइतकें मोठें कुटुंब एकत्र क्वचित् दृष्टीस पडतें. एका कुटुंबांत साठापासून शंभरापर्यंत माणसें असतात. आणि हीं सर्व एकाच घरांत राहतात. त्यांच्यामध्ये एक प्रमुख असतो तो त्यांचा नाईक. मासे मारण्याची व शिकारीची जागा सर्वां मिळून एक ठरलेली असते. अशीं निरनिराळीं कुटुंबें सलोख्याने शेजारीं राहतात. सर्वांची भाषा एक असते. मात्र प्रत्येक कुटुंबाचा नाईक व शमण स्वतंत्र असतो. रोग बरे करणाराला **शमण** म्हणतात. शंभर माणसें मावण्याकरता घर मोठें पाहिजे हें उघड आहे. हें घर म्हणजे एक मोठी थोरली खोलीच म्हणा ना. ह्या खोलीचा मध्यभाग नृत्य व बैठकी ह्यांकरिता राखलेला असतो. मागची बाजू नाइका-साठीं असते. भिंतीच्या बाजूने बाकीचीं माणसें राहतात. प्रत्येक समुहाचा विस्तव निराळा असतो. आपल्या इकडे भगतगिरी करणारा माणूस मद्यमांसापासून अलिप्त असतो त्याप्रमाणे शमणाला कांहीं पदार्थ निषिद्ध असतात.

शमण हा वैद्य व चेटक्या असतो. हिंदुस्थानांत भुतें काढण्याचें काम बायका करतात. पण विटोटो लोकांत हें पुरुषाचेंच काम समजलें जातें. शमणाला जादू करतां येते. वशीकरणशास्त्र त्याला अवगत असतें. त्याला विषारी पदार्थ करतां येतात; वनस्पतींचीं औषधें माहीत असतात; आपत्तीचें कारण त्यास समजतें; भविष्य वर्तवितां येतें; पुढे अमुक संकट कोसळणार हें तो आगाऊ सांगूं शकतो; जारणमारणविद्येंत प्रवीण असतो; भुतांबरोबर तो बोलूं शकतो; त्याला वाघाचें रूप घेतां येतें. तथापि त्याचें मुख्य काम म्हणजे रोग बरे करणें हें होय. शमणाच्या उपायांपेक्षा त्याच्या-वर लोकांचा विश्वास असतो, त्या विश्वासाने लोक बरे होतात. शमण

मेल्यावर तो जग्वार जातीच्या वाघाच्या जन्मास जातो असें म्हणतात.

शारीरिक यातना, आजार, मरण हीं सर्व दुष्ट पिशाच्चांकडून शत्रु करवितो अशी सर्व इंडिअन लोकांची समजूत असते. त्या कारणाने शमणावर लोकांची भक्ति मोठी. शत्रूने चेटक केलें तर उलट चेटक करून तें हाणून पाडणें हें शमणाचें काम. शमणाला आपल्या कामांत यश आलें तर त्याला बक्षिस मिळतें; परंतु अपयश आल्यावर तो कांही तरी सबबी सांगतो आणि ज्याने त्याला हारलें त्या त्याच्या प्रतिस्पर्ध्यावर जादुटोणा करण्याकरिता तो जंगलांत जातो. लहर लागेल त्याप्रमाणे शमण पोषाख करतो. शमणाच्या हातांत नेहमी सालीची अगर जनावराच्या कातड्याची पिशवी असते. ह्या पिशवींत खुळखुळा, धिप्पाड गिधाडाचा एक पंजा, कांचेच्या मण्यांची माळ, नदींतल्या एका ठराविक माशाच्या शिंपल्याचें बनविलेलें भांडें अशासारखे अनेक पदार्थ असतात.

शमणाचा हुद्दा वंशपरंपरा असतो. एखाद्यास पुष्कळ मुलगे असल्यास जो मुलगा केसाळ असेल तो शमण होतो. नाईक हा कुटुंबाचा नेता. तो सांगेल त्याप्रमाणें कुटुंबांतील माणसांना वागावें लागतें. लिहिण्याची कला अवगत नसल्याने कोणत्या वेळीं काय करणें योग्य आहे हें लिहून ठेवतां येत नाही. अशा वेळीं रूढि हाच कायदा असतो व ही रूढी नाइकाला सर्वांत अधिक माहीत असते. समाजाच्या चालीरीतींत बदल होण्याचे प्रसंग वारंवार येत नसल्याकारणाने रूढीचें बंधन चिरकाल राहतें.

ह्या लोकांची न्याय करण्याची पद्धति वर्णन करण्यासारखी आहे. निर्णयाकरिता जेव्हा एखादा सामाजिक प्रश्न उद्भवतो तेव्हा सर्व मंडळी एकत्र जमतात. जी तकरार असेल ती जमलेल्या मंडळीस प्रथम सांगण्यांत येते. नंतर त्याच्या संबंधाने मतें घेण्यांत येतात. मतनोंदणीचा प्रकार गमतीदार आहे. रिकाम्या नारळांत तंबाखूचें चाटण असतें. नारळावरील भोकांत काडी अडकवलेली असते. हा नारळ प्रत्येक सभासदापुढे ठेवण्यांत येतो. बोलणाराच्या बाजूने मत असेल तो काडीने तंबाखूचें चाटण घेऊन तें चाखतो. विरुद्ध मत असल्यास तो नारळ तसाच पुढे सारतो. विरोधकांना विरोधाचीं कारणें सांगावीं लागतात. अशा रीतीने सर्वांचीं मतें समजून घेतल्यावर बहुमत असेल त्याप्रमाणे निकाल सांगतात.

सर्व हीन लोकांप्रमाणे विटोटो लोकहि नृत्याने आपली करमणूक करून घेतात. रात्रीं फुरसतीच्या वेळांत स्त्रीपुरुष हातांत हात घालून नाचतात. त्या वेळीं स्त्रियांचा डावा हात पुरुषाच्या उजव्या खांद्यावर ठेवलेला असतो.

अमेझॉन नदीच्या कांठीं असलेल्या जंगलांत राहणाऱ्या लोकांना सामान्यतः इंडिअन म्हणतात. ह्या निरनिराळ्या समाजांच्या परस्परांशीं नेहमी मारामाऱ्या होत असतात. परंतु त्या स्वार्थ साधण्याच्या हेतूने होत नाहीत; तर एक समाज दुसऱ्या समाजाला भीत असतो. दुसऱ्यास खलास केल्याशिवाय आपण जिवंत राहूं शकणार नाही असें प्रत्येकास वाटत असतें. लढाईत पकडलेल्या माणसांना गुलाम करतात अथवा ठार मारतात व त्यांचें मांस खातात. ॲमेझोनिअन जंगलांतील बहुतेक समाज नरमांसभक्षक आहेत.

विटोटो बांबूच्या टोपल्या व पाळणे करण्यांत वाकबगार आहेत.

नदीच्या मुखाजवळील प्रदेशांत राहणाऱ्या जाती गोऱ्या लोकांच्या सहवासाने पुष्कळच बदललेल्या आहेत. खऱ्या हीन जाती मुखापासून दूर जंगलाच्या गर्भात व कोनाकोपऱ्यांतच आढळतात. अमेझॉन नदीच्या जंगलांत रबर पुष्कळ. तेथे रबराचे व्यापारी जातात. त्यामुळे ह्या प्रदेशांत उलथापालथ झाली आहे. इ. स. १९०३ ते १९१० पर्यंतच्या काळांत विटोटो लोकांची घडी मोडली. निर्दयतेने त्यांचा बळी घेतला. हीन लोकांना जनावरांप्रमाणे वागवण्याची सुधारलेल्या समाजाला सवयच लागली आहे. आपली तुंबडी भरण्याकरिता ह्या लोकांवर कोणताहि जुलूम करण्यास ते कचरत नाहीत. व्यापारी हीन लोकांचा उपयोग स्वतःला पैसा मिळविण्याकरिता करून घेतात तर मानवशास्त्राचे अभ्यासक आपल्या ज्ञानांत भर घालण्याकरिता त्यांचा उपयोग करून घेतात. त्यांची सुधारणा कशी होईल ह्याचा विचार कोणीच करीत नाहीत. मिशनऱ्यांच्यामध्ये धर्मप्रचाराची फक्त दृष्टि असते. निरपेक्षतेने व केवळ परोपकाराच्या बुद्धीने काम करणाऱ्या संस्था निघाल्यावांचून ह्या लोकांची धडगत दिसत नाही. परधर्म भयावह आहे हें ध्यानांत ठेवून एकदम परिस्थिति पालटण्याचा प्रयत्न अपायकारक ठरेल. योग्य उपायांच्या अभावीं हीन लोकांचा सारखा ऱ्हास होत आहे. विटोटो लोक आता शेजारच्या पेरु प्रांतांत राहावयास

आले आहेत. म्हणजे त्यांनी आपलें जंगल सोडलें आहे. स्वतःची भाषा त्यांनी सोडली आहे. आता ते स्पॅनिश भाषा बोलतात. हीन लोकांच्या सुधारणेचा प्रश्न अगदी निराळ्या दृष्टीने सोडवावा लागेल.

## एस्किमो

पृथ्वीच्या पाठीवर हवामान एकाच प्रकारचें नसतें. त्यामुळे कित्येक लोकांना कडाक्याच्या उन्हाळ्यांत तर कित्येकांना कडाक्याच्या थंडींत राहावें लागतें. बाकीच्यांना सुदैवानें समशीतोष्ण हवेचें सुख अनुभवतां येतें. पाणी गोठून बर्फ झालेलें असतें अशा ठिकाणीं राहणाऱ्या लोकांची माहिती आज सांगावयाची आहे. उत्तरध्रुवाजवळ हवा अतिशय थंड असते हें तुम्हांस ठाऊकच आहे. अगदी दक्षिणटोकाला ज्याप्रमाणे यहगण (Yahgans) नांवाचे लोक राहतात त्याप्रमाणे अगदी उत्तरटोकाकडे उत्तरध्रुवापासून हजार मैलांच्या आंत राहणारे एस्किमो नांवाचे लोक होत. उत्तरध्रुवाजवळील आर्क्टिक्ट महासागराच्या बेरिंग समुद्रापासून ग्रीनलंड व लॅब्रेडोर बेटापर्यंत पांच हजार मैलांच्या किनाऱ्यावर या लोकांची वस्ती आहे.

'एस्किमो' हें नांव पाश्चात्यांनी ठेविलें आहे. फ्रेंच भाषेंत त्याचा अर्थ 'कच्चें मांस खाणारा' असा होतो. हे लोक स्वतःला इन्यूत असें म्हणतात. वैदिक वाङ्मयांत विश शब्दाचा अर्थ मनुष्य किंवा लोक असा होतो. त्याप्रमाणे इन्यूत या शब्दाचा अर्थ आहे. एकंदर एस्किमो जातीचे लोक ४०,००० भरतील. अगदी उत्तरटोकाजवळील लोक खेरीज करून या लोकांत दुसऱ्या रक्ताची भेसळ झाली आहे. मंगोलियन वंशांतील हे लोक असावेत असा कित्येकांचा तर्क आहे.

या लोकांना ठेंगू म्हणतां येणार नाही. पांचपासून पावणेसहा फुटांपर्यंत यांची उंची असते. स्त्रियांची चारपांच इंच कमी असते. उंचीच्या मानाने स्त्री-पुरुषांचे हातपाय आखूड असून डोळे बारीक व किलकिले असतात; तोंड गुबगुबीत असतें. पुरुषांचे दाढीमिशांचे केस फारच कमी असतात. कोणाच्याहि कल्लेदार मिशा दृष्टीस पडत नाहीत. आणि जे थोडेसे दाढीमिशांचे केस असतात तेहि काढून टाकण्याची प्रवृत्ति असते. याचें कारण दाढीमिशांवर बर्फ पडून त्रास होऊं नये हें होय.

अगदी उत्तरेकडील प्रदेश बर्फमय असतो. हिवाळ्यांत थंडी इतकी कडक असते की, साधारणपणें पारा शून्याच्या खाली १८ अंशावर असतो, आणि एखादे दिवशीं तर तो ४०°।५०° पर्यंत जातो. अशा वेळीं किती थंडी असेल याची कल्पनाहि आपणांस करितां येणार नाही. नोव्हेंबर ते फेब्रुवारी अशी हवेची स्थिति असते. यांत आणखी भर म्हणजे रात्र मोठी व दिवस लहान. या चार महिन्यापैकीं बराच काल लोक सूर्योदयाला मुकलेले असतात. सूर्यप्रकाश नसला तरी काळोख असतो असें मात्र नाही. पुष्कळ वेळां चंद्राचें स्वच्छ चांदणें असतें. शिवाय उत्तरध्रुवमंडळांत आकाशांत प्रकाशाचे फवारे उडत असतात. नोव्हेंबरपासून हिवाळा सुरू होतो. याचा अर्थ असा की, त्या वेळीं समुद्राचें पाणी गोठून बर्फ इतकें घट्ट होतें की, समुद्र व जमीन एक होतात. आकाशांतून गारा पडण्यास अथवा पाणी गोठण्यास सप्टेंबरपासूनच सुरुवात होते. मे पासून पुढें दोन तीन महिने मात्र अक्षांशाप्रमाणें सूर्य कमी अधिक प्रमाणांत आकाशांत कायम असतो; त्या वेळेस जमिनीवर पाऊस पडून थोडेंफार गवत उगवतें.

बर्फाच्छादित प्रदेशांत मनुष्यप्राण्याचें जीवन कसें असतें याचा तर्क करणें अवघड नाही. धान्य पेरण्याची सोय नाहीं व झाडें वाढत नाहीत अशा स्थितींत मनुष्याला सर्वस्वीं मांसावर उपजीविका करणें भाग पडतें. आणि ते मांससुद्धां कच्चेंच खावें लागतें. कारण हिमप्रदेशांत विस्तव सहजासहजीं मिळण्यासारखा नसतो.

एस्किमो लोकांचें मुख्य खाद्य समुद्र व नद्या यांतील लहानमोठे मासे होत. कारण पशुपक्ष्यांचें मांस मिळणें सुलभ नसतें. उभ्या वर्षांत फारच थोडे महिने पक्षी बाहेरून उडत येण्यासारखी स्थिति आर्क्टिक्ट प्रदेशांत असते. त्याचप्रमाणें मुबलक खाद्य मिळण्याची सोय नसल्यानें पशूंचाहि तेथे भरणा असणें शक्य नाही.

नदीचें पाणी वाहतें असतें तेव्हा एस्किमो लोकांना मासे मिळूं शकतात. पण मुख्यतः समुद्रांतील सील व देव यांवर त्यांचा निर्वाह चालतो. हिवाळ्यांत पाणी गोठून बर्फ झालें म्हणजे सील माशांची शिकार करण्यास सुरुवात होते. त्या वेळीं हे लोक बर्फावरच घरें करून राहतात. पशूंमध्ये

सांबराच्या जातीचें 'रेनडियर' व 'केरीबू' नांवाचें जनावर यांची शिकार करणें हा एस्किमो लोकांचा आवडता व्यवसाय होय. उन्हाळ्यांत बर्फ वितळल्यानंतर भूभागावर आल्यावर वरील पशूंची शिकार करण्यांत येते. वसंत ऋतूंत सील प्राण्यांचा भरपूर पुरवठा करितां येतो; कारण त्या वेळीं त्यांची वीण असते व खडकावर उन्हामध्ये ते बसलेले आयते सांपडतात. कोणत्याहि कारणाने समुद्रांतील माशांचा पुरवठा कमी पडल्यास या लोकांवर मरणाची पाळी येते. या लोकांची संख्या घटण्याचें हें एक मुख्य कारण आहे.

समुद्रकिनाऱ्यापासून दूर जमिनीवर राहणाऱ्या लोकांच्या घराला दगडमातीचा स्पर्श असला तरी बर्फावर राहणारे लोक कसे राहत असतील हें जाणण्याची इच्छा होणें स्वाभाविक आहे. एस्किमो लोकांना कायमचीं घरें करून राहणें अशक्य. कारण वर्षांतून सहा महिने त्यांना बर्फावर राहावें लागतें; बाकीचे सहा महिने बर्फ वितळूं लागल्यावर समुद्र सोडून जमिनीवर यावें लागतें. जमिनीवर हे लोक केरीबूच्या कातड्याचे तंबू उभारून त्यांत राहतात. समुद्रांतून अथवा नदींतून वाहत येणारीं लाकडें पकडून त्यांचा उपयोगहि त्यांच्या या तात्पुरत्या घरांना होतो. यांचीं हिवाळी घरें बर्फाचींच असतात. जेथे बर्फ घट्ट बनलेलें असतें तीच घरें बांधण्यास योग्य जागा होय. घरें बहुधा वर्तुळाकार जागा करून बांधतात. मोठ्या सुरीने बर्फ कापून त्याच्या विटांनी घराच्या भिंती रचतात. दोन विटांच्यामधील पोकळ जागा मऊ बर्फाने भरून काढतात. भिंतीवरील छप्परहि बर्फाच्याच दगडांचें असतें. थंडी ओसरण्याच्या सुमारास पाझरण्याच्या भीतीने छपराचे दगड काढून त्यांऐवजी कातड्याचें आच्छादन करितात. अशा या वाटोळ्या घरांत शिरण्यास दहा बारा फुटांचा आच्छादित असा बोगद्यासारखा चिंचोळा रस्ता केलेला असतो. रस्त्याची उंची तीन फूटसुद्धा नसते. त्यामुळे घरांत शिरतांना या रस्त्यांतून रांगत जावें लागते. थंडगार हवा एकदम आंत येऊं नये म्हणून रस्त्यास तोंडाकडे बाक दिलेला असतो. मनुष्यास चांगलें उभें राहतां येईल इतकी घराची उंची ठेवतात. घरांत निजण्याबसण्यासाठी उंच जागा करितात. रस्त्याच्या समोरील बाजूला भिंतींला लागून दोन तीन फूट उंचीचा ओटा तयार करतात. या ओट्याने

घराची दोनतृतीयांश जागा अडविली जाते. हा ओटा जरी बर्फाच्याच दगडांचा असला तरी त्यावर हाताने केलेले तक्ते पसरून त्यावर केरीबूंचीं अथवा अस्वलांचीं कातडीं अंथरतात. या ओट्याच्या पुढल्या बाजूला लहानसें लाकूड बसवतात. या लाकडावर कातडें टाकलें की त्याचा उशी-प्रमाणे उपयोग करितां येतो. बोगद्यांतून घरांत शिरतेवेळीं दोन फूट उंचीचा एक चोरदरवाजा असतो. त्याकडे डोकें करून ओट्यावर निज-ण्याचा प्रघात आहे. घरधनिणीच्या उशागतीं दिवा असतो, त्यामुळे अंथ-रुणावर पडल्या पडल्या दिव्यांत तेल घालून तिला वात सारतां झाडतां येते. काळोखाच्या भीतीने दिवा न विझण्याची दक्षता घेतात. या दिव्याचा उपयोग तीन तऱ्हेचा होतो: घरामध्ये ऊब राहते, प्रकाश मिळतो व एखादे वेळीं त्यावर मांस शिजवितां येतें. चरबीच्या तेलाशिवाय दुसरें तेल मिळणे शक्य नाहीं. एस्किमोंचीं घरें जमिनींत अथवा बर्फ खोदून केलेलीं असतात.

उत्तरध्रुवाजवळील प्रदेशांत राहणारे लोक नेहमी कापडलेले असले पाहिजेत हें सांगावयास नको. आतापर्यंतच्या हकीकतीवरून आपल्या असें लक्षांत येईल की, जनावरांचीं कातडीं वापरल्याशिवाय एस्किमो लोकांना गत्यंतर नाहीं. हे लोक केरीबूच्या कमावलेल्या कातड्यांचे कपडे करितात. हीं कातडीं मऊ व सुबक असतात. आक्टोबर महिन्यांत मारलेल्या जनावरांचीं कातडीं वस्त्रें करण्यास पसंत करितात. कारण तेव्हा कातड्या-वरील केस रुफाईदार व मऊ असतो. हिंवाळ्यांत जोडपोशाखांची अवश्यकता असते म्हणजे एकावर एक कपडे घालणें भाग पडतें. अंगाजवळच्या कोटाचें कातडें पाडसाचें असतें. कधी कधी तर केरीबू मादी गाभण असतांच तिला मारून पिलाचें कातडें घेतात. स्त्री-पुरुषांचा पोशाख सारखाच असतो. कंबरेपासून गुडघ्यापर्यंत मांडचोळणें व पायापासून गुडघ्यापर्यंत बूट. गंजीफ्राकाप्रमाणे डोक्या-वरून घालण्याचा कंबरेपर्यंत लांबीचा एक कोट असतो. या कोटाला झुली-सारखी टोपी जोडलेली असते. ती डोक्याचें रक्षण करिते. स्त्रियांची टोपी फार मोटी असते, व त्यांचा कोटहि मागल्या बाजूस बराच सैल असतो. याचें कारण बायकांना आपलें मूल पाटीवर नेहमी बाळगावें लागतें. मूल

चालावयास लागेपर्यंत त्यास निराळे कपडे नसतात. आईच्या पाठीवर कपड्यांत जरी गुरफाटलेलें मूल असलें तरी त्याला हवा मिळण्याची सोय केलेली असते. खेळतांना बर्फ आंत शिरूं नये म्हणून मुलांच्या तुमानी व बूट एकसंध कातड्याचीं बनवतात. कपडे शिवणें हें बायकांचें काम. त्यांच्या सुया हाडाच्या असून दोरा केरीबू, सील अथवा देवमासा यांच्या आंतड्यांचा करतात. शिवणारास अंगुस्तानाची जरुरी भासते. ही अंगुस्तानाची युक्ति एस्किमोंची स्वतःची आहे; ती त्यांनी दुसऱ्या कोणापासून घेतली नाही.

विवाहसंस्कार हा प्रगतीचा निदर्शक आहे. ज्या समाजानें जगण्यापलीकडे कांही केलें नाही त्या समाजांत कोणताच विवाहसंस्कार नसणें स्वाभाविक आहे. एस्किमो लोकांत तरुण मनुष्य सरळ मुलीच्या बापाच्या घरीं जाऊन मुलीला आपल्या हातांत धरून घरीं घेऊन येतो. मुलगी जाणती असल्यास दोघेंजण एकत्र राहून संसार करितात. या प्रकारास पाहिजे तर विवाह म्हणावें. मुलीसाठी मुलास कांही तरी द्यावें लागतें. मुलीचें लग्न ऋतु प्राप्त होण्यापूर्वी अथवा मागूनहि होतें. प्रत्येक स्त्रीपुरुषानें लग्न केलें पाहिजे असा संकेत असला तरी कित्येक तरुणांस अविवाहित राहावें लागतें. याचें कारण असें की, एस्किमो लोकांत पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी असते. याशिवाय बहुपत्नीत्वाची चाल रूढ आहे. जातींत जो हुशार असतो, म्हणजे शिकारीचें कौशल्य ज्याच्या अंगीं आहे, तो दोन तीन बायका करूं शकतो. गाल व हनुवटी गोंदलेली असणें ही लग्न झालेल्या स्त्रीची ओळखण्याची खूण आहे. लग्न जसें सहज होतें तसें तें मोडण्यासहि उशीर लागत नाही. जमेनासें झालें कीं एक दुसऱ्यास सोडून जातो. पुरुषास बायको नको असल्यास तो तिची चीजवस्त घराबाहेर आणून ठेवतो. बायको समजते; आणि आपल्या जिनसा उचलून आईबापाच्या घरीं जाते. नवऱ्यानें सोडलेल्या अथवा नवऱ्यास सोडणाऱ्या बायकांचीं पुन्हा लग्नें होण्यास वेळ लागत नाही; मग विधवांचीं लग्नें होतात यांत नवल नाही. बहुपतित्वाचीहि चाल या लोकांत तुरळक आढळते. एखादा अविवाहित पुरुष प्रवासास निघाला तर त्याला उसनी बायको मिळायला अडचण पडत नाही, व आपली बायको उसनी देण्यांत काही गैर आहे

असें तिच्या नवऱ्यास वाटत नाही. मात्र त्याच्या संमतीवांचून बायको गेल्यास किंवा कोणीं नेल्यास तो त्याचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही. सुई, दोरा, दिवा व कपडे ही बायकोची जिन्दगी असते. ऋतूपूर्वी लग्न झाल्यास ऋतूद्यापर्यंत मुलगी बापाच्या घरीं राहते. लग्नाचीं पहिलीं एक दोन वर्षें जावयाने सासऱ्याच्या घरीं राहण्याची वहिवाट आहे मनुष्य मेल्यावर त्यास जाळण्यास लाकूड नाही; पुरावें तर कोरडी, खोल जमीन नाही. अशा स्थितींत नुसतें जमिनीवर अथवा बर्फावर जुन्या कातड्यांत प्रेत टाकून देतात. हीं प्रेतें कोल्हे खाऊन टाकतात. प्रेताशेजारीं मयताची चीजवस्त ठेवतात. यावरून मरणोत्तर जीवाचें अस्तित्व असतें असा या लोकांचा समज आहे असें दिसतें. मरणाचें सुतक तीन किंवा पांच दिवस धरतात. म्हणजे ह्या काळांत कामकाज कांही करीत नाहीत. अंत्यविधि पुरा होई-पर्यंत डाव्या नाकपुडींत गवत कोंबतात. असें केल्याने दीर्घायुष्य मिळतें अशी समजूत.

थंडीमध्ये राहणाऱ्या लोकांना पडसें संधिवातासारखे थंडीपासून विकार होणें स्वाभाविक आहे. कपाळ दुखवण्याचा उपद्रव पुष्कळांना सहन करावा लागतो. दमा अथवा क्षय हे रोग फारसे आढळत नाहीत. रोग होण्याचें आणखी एक कारण म्हणजे कुजलेलें मांस होय. खाण्याचे पदार्थ दुर्मिळ असल्याने मरून पुष्कळ दिवस झालेल्या प्राण्यांचें मांस खाण्याचा मोह एस्किमोंना आवरत नाही. सारांश, मृत्युसमयींचा विकार वगळला तर पुष्कळ रोगांपासून एस्किमो लोक मुक्त असतात असें म्हणावयास काही हरकत नाही. सुधारणा ही रोगांची जननी आहे. अर्थात् जेथे सुधारणा कमी तेथे रोगहि कमी. देवी-गोवराची सांथ व इतर रोग अलिकडे बाहेरील लोकांच्या संपर्काने आले आहेत. दुष्ट पिशाच रोग उत्पन्न करतें हा सार्वत्रिक समज असल्याने या समाजांत भगतांचें प्रस्थ माजलेलें असतें. शरिराचा जो भाग दुखत असेल तेथील रक्त काढून टाकण्याची वहिवाट आहे. असें केल्याने दुःख देणारें दुष्ट पिशाच बाहेर पडतें असें त्यांस वाटतें. यावरून असें दिसून येईल की, झाडपाल्याचें अथवा दुसरें कोणतेंहि औषध एस्किमो लोकांना ठाऊक नाही. एस्किमो लोकांची मूळची संख्या दीड लाख असून ती आता फक्त चाळीस हजारांवर आली आहे. याचें कारण परकी

लोकांच्या संसर्गाने आलेले सांथीचे रोग असें सांगण्यांत येतें.

एस्किमो लोकांना ईश्वरविषयक कल्पना नाहीत. तथापि वस्तुमात्रांत जीव असतो असें त्यांस वाटत असतें. समुद्र खळबळूं नये म्हणून आपण समुद्रांतून प्रवास करतेवेळीं समुद्रांत नारळ टाकतों तशाच कांहीशा प्रकाराने निसर्गदेवतांना संतुष्ट करण्याची वहिवाट या लोकांत आहे. निसर्गाची शक्ति उकलण्याइतकी बुद्धिमत्ता नसल्याने निसर्गाची म्हणजे त्यांतील जीवांची भीति त्यास वाटते. तेव्हा त्यांचा संतोष राखणें हाच काय तो एस्किमोंचा धर्म. सील मासा मारून जमिनीवर आणला म्हणजे मारणाराची बायको त्या माशाच्या तोंडांत दोन थेंब पाणी सोडते. तिला असें वाटतें की, समुद्रांतील माशाला गोडें पाणी कोठून मिळणार? तेव्हा असें पाणी मिळालें म्हणजे त्या माशाचा जीव बाकीच्या माशांना सांगेल की, आपणांस गोड पाणी मिळतें तेव्हा मरण्यास कांही हरकत नाही. एस्किमो पुढील दरवाज्याने घरांत प्रवेश करतात; परंतु घराबाहेर पडावयाचें झाल्यास मागल्या बाजूस द्वार पाडून त्यांतून बाहेर पडतात. असें करण्याचा हेतु असा की, एखाद्या खोडयाळ जीवाने त्यांच्या मागून नवीन घरीं येऊं नये. प्राणि मेला कीं त्याचा जीव मोकळा होतो; आणि तो नवीन ठिकाणीं जाऊन इतरांना उपद्रव देण्याचें कार्य करीत असतो अशी सर्वसाधारण समजूत असते. अस्वल वगैरे प्राणि मारल्यावर एक दिवस बायका शिवण्याचें काम करीत नाहीत. जमिनीवरील व समुद्रावरील मासे एकाच भांड्यांत व एकाच दिव्यावर शिजवितां कामा नये, दगडाचे दिवे आणि भांडीं हीं उन्हाळ्यांत केलीं पाहिजेत, बायकोने राहत्या घरांत बाळंत होतां कामा नये, अशा या लोकांच्या समजुती आहेत; व तदनुसार वागणें हाच त्यांचा धर्म मनुष्याचा जीव घेणें ही एकच शिक्षा त्यांच्या लहान मोठ्या अपराधाबद्दल देण्यांत येते. मरणाहून कमी असे शारीरिक कष्ट शासन म्हणून भोगावयाला लावणें याची त्यांना कल्पनाच होत नाही. त्यामुळे कोणत्याहि कारणाने दोन माणसें वर्दळीवर आलीं कीं त्याचें पर्यवसान एकाला दुसऱ्याने ठार मारण्यांत होतें.

अमेरिकेंतील इंडियन्स् आणि एस्किमो लोक एकमेकांस लागून अस-

लेल्या प्रदेशांत राहत असतांहि त्यांच्या भाषा अगदी विसदृश कां असाव्यात हें गूढ अद्याप भाषाभ्यासकांनी सोडविलें नाही.

एस्किमो भाषेंत वाङ्मय नाही हें सांगावयास नको. तथापि या भाषेचा कोश पांचपन्नास शब्दांहून अधिक नसतांहि तिच्यांत विचार प्रदर्शित करण्याची शक्ति चांगली आहे असें म्हणतात. शब्दांत मार्दव असल्यानें ती संगीतानुकूल आहे. खोलीभर माणसें कडाक्याचा वाद करीत असलीं तरी गोंगाट अथवा गलबला वाटणार नाही. आपल्या भाषेंत नाम, क्रियापद, विशेषण यांचे निरनिराळे शब्द आहेत परंतु एस्किमो भाषेंत या सर्वांची एक मालगाडी बनते; उदा० इग्लू = घर; इग्लूअ = त्याचें घर; इग्लूग= माझें घर; इग्लूमी = घरांत; इग्लूकुनक्तोक् = तो घरांतून गेला; इग्लूक्-तुंनितोक् सिकू = बर्फ घरासारखें दिसतें; इग्लूलिओक् सिमक्तोक् = त्यानें आपलें घर पुरें केलें.

एस्किमोंचीं नांवें पुष्कळदा क् व्यंजनान्त असतात; उ. क्करद्सुक्; तक्क्; असयुक्; इमररसुंग्वक्.

हिवाळ्यांत बर्फावरून प्रवास एस्किमो होडींतून करतात. हें होडकें सील किंवा देवमाशाच्या हाडाचें व कातड्याचें केलेलें असून तें कुत्रीं ओढून नेतात. नदींत व तळ्यांत मासे मारण्यास कयाक नांवाची कातड्याची होडी असते. जें होडकें बायका वल्हवतात त्याला उमियाक् म्हणतात. सील माशांची शिकार करण्यांत एस्किमोंना कुत्र्यांचा फार उपयोग होतो.

नाच करणें व गोष्टी सांगणें हा एस्किमो लोकांचा एक करमणुकीचा प्रकार आहे.

आतापर्यंत केलेल्या वर्णनावरून एस्किमो लोकांचें जीवन सामुदायिक स्वरूपाचें असलें पाहिजे हें समजण्यास अडचण पडणार नाही. एक मोठा व्हेल मासा पकडला म्हणजे तो ओढून आणण्यासच पुष्कळ माणसें लागतात. तसेंच त्या माशाचें मांस निराळें करणें, हाडें काढणें वगैरे क्रिया करणें हें एक दोन माणसांचें काम नव्हे. आणि यानंतर एवढ्या मोठ्या माशाचें खाद्य एका कुटुंबाच्या गरजेपेक्षा पुष्कळच अधिक असतें. या कारणास्तव सर्वांनी एकजुटीने काम करणें भाग पडतें. एकत्र काम करणारांना एकत्र

वास करणें सोयीचें असल्यामुळे एस्किमो लोकांचीं घरें एकाच इमारतींत असतात.

एस्किमो लोक आता पूर्वींचे राहिले नाहीत : त्यांच्या रक्तांत भेसळ झाली आहे. त्याप्रमाणे त्यांचे आचारविचार, उपकरणें यांतहि बदल झाला आहे. मिशनऱ्यांनी त्यांना ख्रिस्ती बनवलें आहे. त्यांच्या हातांत पूर्वीचा बाण जाऊन बंदूक आली आहे. त्यांच्या जुन्यापुराण्या दिव्याचें स्थान आता स्टोव्हने पटकावलें आहे. त्यांना खाण्याचे निरनिराळे पदार्थ आता मिळूं लागले आहेत. धर्मांतराप्रमाणे त्यांचें वस्त्रान्तर झालें आहे. पण इतकें होऊनहि पूर्वीपेक्षा ते सुखी झाले आहेत का या प्रश्नाचें तज्ज्ञांनी नकारात्मक दिलेलें उत्तर ऐकून वाईट वाटतें.

सुधारणा सुखाकरिता कीं दुःखाकरिता या एस्किमोंच्या प्रश्नाला त्यांचेंच उत्तर आपणांस मिळालें पाहिजे.

## बायगा

ज्या बायगा नांवाच्या लोकांची हकिगत मी आज सांगणार आहें ते आपल्याच देशांत मध्यप्रांतांत राहणारे आहेत. ह्या प्रांतांतील डोंगराळ प्रदेशांत जंगलांत हे लोक वस्ती करून राहतात. सुधारणेची झळ न लागलेल्या ह्या लोकांची हकिगत बोधप्रद झाल्याशिवाय राहणार नाही.

बायगांमध्ये अनेक पोटजाती आहेत. तथापि बायगा हीच जात भुईया ह्या नांवाच्या जातीची पोटजात मानतात. भुईया हे लोक बंगाल व बिहार ह्या प्रांतांत विशेषतः आढळतात. स्वतः बायगा लोक आपणांला भूमिराज किंवा भूमिजन म्हणजे जमिनीचे स्वामी अथवा भूमिपुत्र म्हणवितात. महाराष्ट्रांत जमिनीच्या सीमा ठरविण्यांत महार जातीचे लोक तज्ज्ञ म्हणून समजले जातात, त्याप्रमाणे बायगा लोकांचा लौकिक मध्यप्रांतांत आहे. आपल्या प्रांतांतहि महारांना भूमिपुत्र व भुयाळ अशीं दुसरीं नांवें आहेत.

बायगा शब्दाचा अर्थ भूतबाधा काढणारा असा आहे. गोंड लोकांचे हे पूर्वी उपाध्ये होते असें म्हणतात.

विंझवार, कुंडी, कुर्क, सावत् इत्यादि अनेक पोटजाती ह्या लोकांच्या आहेत. लग्नें पोटजातींतच होतात. अर्थात् प्रत्येक जात आपणांला श्रेष्ठ समजते. डोंगरावर दाट जंगलांत राहत असल्यामुळे त्या लोकांपैकी फारच थोड्यांना शेती करण्याचें माहीत आहे. बायूगा तांबूस काळ्या वर्णाचे असले तरी सशक्त असून सुरुपांत त्यांची गणना करण्यांत येईल. पण विशेष हें की, रुपांत पुरुषांपेक्षा बायका खाली लागतील. लहानपणीं मुलांचें नाक व डोकें माठरण्याची चाल असल्यामुळे त्याचा थोडासा संस्कार ह्यांच्या चर्येवर झालेला असतो.

उष्ण हवेंत मनुष्याला कपड्यांशिवाय राहतां येतें. तेव्हा बायूगा पुरुषाचें नुसत्या लंगोटीवर भागतें ह्यांत आश्चर्य नाही. 'भगवान् देवाने आम्हांला साडेनऊ हात कापड दिलें. त्यांतील दीड हात ठेवून बाकीचें निरुपयोगी म्हणून परत केलें' अशी एक दंतकथा ह्या लोकांत प्रचलित आहे. पुरुष डोक्याला फडकें गुंडाळतो. कित्येकांच्या अंगांत बंडी असते. बायकांच्या नेसूं लुगडें असतें. जागतेपणीं बायका पदर घेतात. मुली पदर घेत नाहीत. निरनिराळ्या प्रकारचे दागिने बायकांच्या अंगावर असतात व त्यांच्या दागिन्यांवरून कोणत्या जातीची ही स्त्री आहे हें ओळखतां येतें. पावसामध्ये आपल्या इकडील विरल्याप्रमाणे डोक्यावर घेण्याचें त्यांचें एक प्रकारचें विरलें असतें.

रानटी लोकांत स्वच्छता कमी. पिण्यापलीकडे पाण्याचा उपयोग करणें त्यांस माहीत नसतें. पाण्याची तहान लागते त्याप्रमाणे स्नानाची तहान लागत नाही. स्नान हें आरोग्याचें साधन आहे, हें समजण्यास मनुष्यजातीला बराच काळ घालवावा लागला. पूर्वी वर्षातून एकदा पुरुष स्नान करीत व बायका विटाळानंतर महिन्यांतून एकदा करीत. इकडील कातकरी-ठाकराप्रमाणे शौचाला पाणी वापरण्याचें ह्या लोकांस ठाऊक नाही; त्या कामीं झाडांचीं पानें वापरतात. प्रक्षालनाला पाणी वापरलें तर वाघ खाईल अथवा साप चावेल अशी त्यांना भीति वाटते. जे लोक अलीकडे पाणी वापरूं लागले आहेत त्यांची एक निराळीच जात बनली आहे. दांत धुण्याचेंहि ह्या लोकांस ठाऊक नव्हतें. वस्त्रहीन बायूगा वस्त्रविभूषित बायूग्यापेक्षा सुदृढ असतो.

दागिन्यांप्रमाणे गोंदून घेण्याची हाव बायूगा स्त्रियांना फार असते. पुरुष क्वचित् गोंदून घेतात. गोंदण ही एकच वस्तु अशी आहे की, ती मेल्या-वरहि आपल्याबरोबर येते असें ते म्हणतात. गोंदण्याने शरीर शोभिवंत दिसतें. मुलगी जाणती झाली म्हणजे तिच्या छातीवर व हातांवर गोंदून घेतात. तसेंच लग्नापूर्वी पायांवर गोंदण्याची वहिवाट नाही. पांचपासून पंचवीस रुपयांपर्यंत गोंदण्यासाठी खर्च करण्यास कमी करीत नाहीत. सापाने टाकलेली कात व काळे तीळ जाळून त्यांची राख करतात आणि हें राखेचें मिश्रण रामतीळाच्या तेलांत भिजवितात. हेंच गोंदण्याचें साहित्य. बायकोच्या अंगावर गोंदण्याचें काम चालू असतांना तें नवऱ्याने बघतां कामा नये अशी एक विलक्षण चाल ह्या लोकांत आहे गोंदल्यानंतर दोन दिवस विटाळशीप्रमाणे त्या बाईला वागविण्यांत येतें. दोन दिवसांनी अंगाला हळद तेल लावून ती स्नान करते. गोंदण्याची क्रिया नवऱ्याने पाहिल्यास अथवा एखाद्या स्त्रीने मुळीच गोंदून न घेतल्यास मेल्यानंतर सर्व अंगभर भगवान् देव लोखंडी काडीने भोकें पाडील अशी समजूत आहे. मुलगी पांच वर्षांची झाली म्हणजे तिच्या कपाळावर त्रिकोणाच्या आकृतीचें गोंदण काढतात. तिच्या उरावर मोराचा किंवा टोपलीचा आकार असतो व हातावर हळकुंडाचा आकार असतो. लग्न झाल्यानंतर गोंदण्याच्या आकृति निराळ्या प्रकारच्या असतात.

बायूगांसारख्या असंस्कृत लोकांचा धर्म ठरविण्याचें काम बहुधा शिर-गणतीचे अधिकारी करतात. ह्या महत्त्वाच्या विषयाची चर्चा समाज-नेत्यांना करावीशी वाटत नाही हें देशाचें दुर्भाग्य होय. बायूगा लोकांच्या गांवांत स्वतंत्र देवळें बांधलेलीं नसतात; परंतु घरोघर देवांच्या मूर्ति आहेत. भगवान् देव, बडा अथवा बुढा देव, ठाकूर देव वगैरे पुरुष देव असून धरित्रीमाता ही स्त्रीदेव होय. पांडवांपैकी बायूगा लोक भीमसेनाची पूजा करतात हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आणि विशेष हें की भीमसेन पर्जन्य-देवता समजला जातो. ह्याशिवाय गन्शाम (घनश्याम) देवाची पूजा हे लोक करतात. हे जातीचे देव झाले. ह्याशिवाय घरोघर असणारे देव निराळे. मेलेल्या पूर्वजांचे देव बनतात त्यांपैकी आजीदादी ही एक होय. हिचें स्थान चुलीमागे असतें. नारायणदेव हा उंबरठ्याचा देव. जातां येतां

त्याला लाथाडणें हें शुभदायक मानतात. रातमाई ही रात्रीची देवता घरांत राहून मुलांचें रक्षण करते. पाण्याच्या भांड्यांतील देवता पाणीहिरीण. हे सर्व देव कल्याणकारक आहेत; भूतपिशाच्चांप्रमाणें त्रास देणारे नाहीत.

ह्या लोकांस शकुनाची कल्पना बरीच विकास पावलेली दिसते. जंगलांत काम करण्यास शनिवार, रविवार शुभदायक समजतात. तेल काढण्याला सोमवार पसंत करतात. मंगळवारीं प्रवासास निघत नाहीत. परंतु लांबचा प्रवास करण्यास बुधवार प्रशस्त मानतात. आपल्या समजुतीच्या हें अगदी उलट आहे. प्रियकरांच्या भेटीला गुरुवार शुभदिन. शुक्रवारीं काम न करतां खेळावें, नाचावें– थोडक्यांत म्हणजे तो विश्रांतीचा दिवस समजतात. शनिवार हा लग्नाला अशुभ दिवस होय. बाहेर पडतांना एकदा किंवा तिनदा शिंक आली तर कोणताहि बायूगा पुढे पाऊल टाकणार नाही. उलट दोनदा शिंक आली तर तें प्रवास सुखाचा होण्याचें लक्षण मानलें जातें. रस्त्यावर साप आडवा गेला तर मागे फिरावें लागतें. डावा डोळा लवणें अशुभ होय. उजव्या हाताला कंड सुटली तर पैसा मिळणार असें समजावें. पाण्यामध्ये एकच कावळा अंग धुतांना दृष्टीस पडला तर दूर देशांत कोणी तरी आप्त मेला आहे ह्याची ती सूचना असते. बायूगा लोकांचा शकुनांपेक्षाहि स्वप्नांवर अधिक विश्वास आहे.

जंगलामध्ये राहणाऱ्या ह्या लोकांची उपजीविका जंगलावर असणार हें उघड आहे. कंदमुळें, फळें, शिकार व मासे हें त्यांचें खाद्य होय. झाडांवर मध मिळतो तो विकून व जंगलांत बांबू पुष्कळ असतात त्यांच्या हातऱ्या व टोपल्या करून त्यांच्या विक्रीने येणाऱ्या पैशाने अवश्यक असे इतर पदार्थ विकत घेतात. मोलमजुरीचा क्वचित् धंदा करतां येतो. नांगरून शेती करण्याचें ह्या लोकांस माहीत नाही. जमिनीवर नांगर धरणें म्हणजे आईचीं आंतडीं बाहेर काढणें असें ते समजतात. जंगलांत धान्य उगवण्याची ह्यांची तऱ्हा वेगळीच आहे. ह्या त्यांच्या पद्धतीला बेवार असें नांव आहे. बेवारासाठी कुटुंबांतील माणसें जंगलांत जातात व आपल्याला सोईची जागा निवडतात. उंच झाडांच्या दाट जंगलांत मोकळी जागा मिळणें अशक्य असतें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. जागेची निवड केल्यावर मध्यभागीं असलेल्या झाडावर तांदूळ टाकून कुऱ्हाडीच्या एका घावासरशी,

तें तोडून खाली पाडतात. कुटुंबांतील मुख्य माणूस त्या झाडाचें एक पान काढून त्याच्या चार घड्या करतो. आणि तें त्या झाडाच्या खुंट्याला बांधून ठेवतो. आता ह्या ठिकाणीं कोणीहि दुसरा बायगा पाऊल टाकणार नाही. झाड तोडणाराची मालकी बाकीचे लोक कबूल करतात. इतकें केल्यावर कांही दिवसांनी फिरून त्याच जागीं येऊन तेथील झाडझाडोरा व गवत कापून काढतात. नंतर पंधरा दिवसांनी कुऱ्हाडीची मंत्रोक्त पूजा करतात. पुढे सर्व मंडळी बेवारावर जाऊन जंगलदेवतांना नारळाने संतुष्ट करतात. नंतर झाडें तोडण्याचें काम सुरू होतें. एक फूट उंचीचा खुंट ठेवून झाड तोडतात. वाळलेला झाडोरा जाळून टाकतात. प्रथम तोडलेल्या झाडापासून जाळतांना आरंभ करावयाचा असतो. पाऊस पडल्यानंतर नानाप्रकारचें बीं एकत्र करून राखाडीवर फेकतात. ह्याचेंच पुढे रोप उगवून धान्य पिकतें. ही पिकाची जागा प्रत्येक तीन वर्षांनी तरी बदलावी लागते.

बायगा लोकांत लग्न फार करून मुलगा-मुलगी उपवर झाल्यानंतर होतें. लग्नाला मुलीची संमति घ्यावी लागते. मुलीची मागणी घालतात. लग्न-समारंभ मुलीच्या बापाकडे होतो. निरनिराळ्या जातींचे लग्नविधि स्वतंत्र असतात त्याप्रमाणे बायगांनीहि आपला स्वतंत्र विधि निर्माण केला आहे. लग्नाला ब्राह्मणाची अवश्यकता नसते. वाङ्निश्चयाच्या वेळीं मुलीचा बाप मुलाच्या बापाला पाठीवर घेऊन घरांत नेतो. आमच्या इकडील उंबऱ्या-उंबरीप्रमाणे लग्नांतील विधि करणारे लोक असतात. त्यांना डोशी म्हणतात. वधूवरांच्या करवल्यांना सुवासीन म्हणतात. डोशी हा बहुतकरून मामा असतो वधूवरांच्या अंगावरील वस्त्र पांढरें स्वच्छ असतें. वधूवरांना लग्न सुखावह होईल कीं नाही हें पाहण्याचा तोडगा करतात तो असा— रामतीळांनी भर-लेली पायली सुपांत घालून एकजण घेऊन येतो. मुलगा आईच्या मांडीवर बसलेला असतो. वधू व वर सुपामध्ये पायलींतले रामतीळ ओततात आणि शेजारीं बसलेल्या नऊ इसमांना ते वांटून देतात. ह्या इसमांनी आपापले तीळ परत पायलींत टाकावयाचे. पायली भरून वर शीग लागली म्हणजे लग्न यशस्वी होईल असें समजतात. कमी भरल्यास तें दुश्चिन्ह मानलें जातें. मुलीकरिता मुलीच्या बापाकडे नवऱ्याने नोकरी करण्याची ह्या लोकांत चाल आहे. बायकोकरिता नोकरी करणाऱ्या उमेदवाराला लामसेन म्हणतात.

ज्या मुलाचा बाप माहीत नाही त्याला भूल व त्याच्या आईला भुली अशा संज्ञा आहेत. लग्न झाल्यानंतर तीन घरें भिक्षा मागण्याची ह्या लोकांत चाल आहे. तसेंच वेणी सोडण्याचा गमतीदार खेळ खेळावयाचा असतो: लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं नवरानवरी नदीवर जाऊन नदींत उभीं राहून एकमेकांवर पाणी फेकतात व नंतर एकमेकांचे केस ओढतात. नवरा वेणी सोडतो आणि बायको नवऱ्याच्या शेंडीची गांठ सोडते. नंतर परस्परांस स्नान घालतात. मुलगी नवऱ्याच्या मांडीवर बसते. कांहीं वेळानें ती एका-एकीं तेथून उडी मारून धावत सुटते. धावतांना नवऱ्याकडून तिला टोले खावे लागतात. हें झाल्यावर मातीचें बायकोचें एक चित्र करून नदीच्या कांठावर ठेवतात. ह्या चित्राला नवऱ्यानें तीरकमठ्यानें नेम मारावयाचा असतो. पहिलाच नेम लागला तर बायको नवऱ्याजवळ राहील व चुकला तर पळून जाईल असें समजतात.

नवरा मेल्यावर बायकांना पाट लावतां येतो व काडीमोडीची चाल असल्यामुळे काडीमोड केलेल्या बाईलाहि पुन्हा लग्न करतां येतें. अशा बायकांच्या लग्नाला हळदीपाण्याचें लग्न म्हणतात. नवरा मेल्यावर दिरा-बरोबर लग्न करण्याची वहिवाट ह्या लोकांत आहे.

हे लोक मरणापेक्षा मरण्याच्या कारणालाच फार भितात. म्हणून मेल्या-वर मरण कशानें आलें हें शोधून काढण्याचा प्रयत्न करतात. नजिकच्या ओढ्यावर प्रेत नेल्यावर एक मनुष्य पाण्यामध्ये तेलाचे तीन थेंब टाकतो. एक ठाकूरदेवाचा, दुसरा भगवानाचा आणि तिसरा पापाचा. तेलाचा थेंब तांबडालाल झाला तर मयतानें जातिधर्म मोडण्याचें पाप केलें आहे असें समजतात. थेंब उलटगतीनें वर जाऊं लागला म्हणजे मयताला भगवानाचें बोलावणें आलें होतें असें समजावें. आडवातिडवा जाऊं लागल्यास पिशाचबाधा हें मरणाचें कारण अशी खात्री होते. सामान्यतः सुतक तीन दिवस पाळतात. मनुष्य आता मरणार असें दिसलें म्हणजे त्याची बायको पोतेऱ्यानें जमीन सारवते. ह्या सारवलेल्या जागेवर मरणाऱ्या माणसाला अंथरुणावरून काढून ठेवतात. त्याच्या तोंडांत गोड पदार्थ टाकतात. प्राण गेल्यावर बायको मयताचे कपडे काढून त्याला स्नान घालते. हें काम बायकोशिवाय दुसऱ्या कोणाला करतां येत नाहीं. बायको

नसेल तर मात्र मुलगा करतो. स्त्री मयत झाल्यास तिची आई किंवा बहीण स्नान घालते. स्नान घालून हळद-तेलाने शरीर माखतात व कोऱ्या कापडाने तें आच्छादितात. प्रेत तिरडीवरून नेतात. जीवाने पुन्हा घरीं परत येऊं नये म्हणून नागमोडीच्या चालीने स्मशानांत प्रेत नेतात. मनुष्य एकाएकीं थोडक्या आजाराने मेला असेल तर त्याला पुरण्याची चाल आहे. परंतु पुष्कळ दिवस मरत पडला असल्यास त्याला जाळतात. दक्षिणेकडे डोकें करून खळग्यांत प्रेत पुरतात. पण त्यापूर्वी खळग्याच्या अगर चितेच्या भोवतालीं खांदे घालणारे प्रेतासकट तीन प्रदक्षिणा घालतात. पुरुषाचें प्रेत उपडें ठेवतात व बायकाचें उताणें ठेवतात. प्रेत पुरलें असल्यास तेथील मूठभर माती घरीं आणून मयताच्या बायकोला अथवा आईला देतात. तिने मातीला स्पर्श केल्यावर ती पुन्हा थडग्यांत आणून टाकतात. थडग्यांत प्रेताशेजारीं तंबाकू, थाळी, चकमक इ० मयताचे जिन्नस ठेवतात. प्रेत जाळलें असल्यास दहाव्या दिवशीं राख भरतात. क्रिया करणारा एका भांड्यांत राख भरून नदींत स्नान करतांना नदीच्या पाण्याने तें भांडें भरून घरीं आणतो. त्या पाण्याने सर्व नातेवाइकांनी आचमन करण्याची वहिवाट आहे. सगळ्याच रानटी लोकांची आयुष्यमर्यादा कमी असते. चाळीस वर्षांवरचे पुरुष अथवा स्त्रिया क्वचित् दृष्टीस पडतात. त्यामुळे ह्या जाती हळू हळू नष्ट होत चालल्या आहेत. सामान्यतः मध्यप्रांतांत सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यांत मृत्युसंख्या अधिक असते. जन्महि ह्याच महिन्यांत पुष्कळ होतात. आणि बालमृत्यूचें प्रमाण जबर असल्यामुळे मृत्युसंख्येची वाढ होते. सर्वांत मृत्यूचें कमी प्रमाण म्हणजे डिसेंबर आणि फेब्रुवारी ह्या महिन्यांत होय.

बायगांना पिण्यास बहुधा दूध मिळत नाही. आईच्या अंगावर बालपणीं दूध मिळेल तेवढेंच. त्यांच्याकडे दुभतीं जनावरें बहुतेक नसतात म्हटलें तरी चालेल. गाई तुरळक बाळगतात. नांगराची शेती नसल्यामुळे बैलांची गरज त्यांना भासत नाही. कोंबडीं व बकरीं ह्यांची समृद्धि त्यांच्या घरांतून असते. तथापि डुकरें बाळगण्याचा त्यांस मोठा शोक. त्यांच्याकरिता स्वतंत्र स्वच्छ मोठाले गोठे बांधून त्यांच्या खाण्यापिण्याची फार काळजी घेतात. लग्नाकरिता, धार्मिक कृत्यांत, जातीला दंड म्हणून जेवूं घालण्यांत डुकरांचा फार उपयोग होतो.

सण हे अंशतः करमणुकीचे आणि अंशतः पौराणिक कथांतून उद्भवलेले असतात. बायूगाचे सण बऱ्याच अंशाने स्वतंत्र आहेत. दिवाळी-दसऱ्याचा सण ते पाळतात; परंतु ह्या सणांच्या त्यांच्या कल्पना अगदी निराळ्या आहेत. त्यांचा सांगण्यासारखा उत्सव म्हणजे चरता होय. हा जानेवारींत पडतो, आणि तो विशेषतः मुलांचा सण असतो. मुलगे साधूंचीं सोंगें घेऊन गांवांत भिक्षा मागावयास जातात. 'चरता चरता माई मुरगी मारतां कोठी की धान हरता' हें त्यांचें भिक्षेचें गाणें असतें. बरीचशी भिक्षा जमली कीं सर्व मुलें नदीकांठीं जातात, मुली भिक्षेच्या अन्नाचा स्वैंपाक करतात. एक मुलगा कावळा होतो. सगळ्यांचीं पानें वाढतात पण ह्या कावळ्याच्या पानावर फारच थोडें अन्न असतें. प्रथम कावळा जेवतो. तो जेवीत असतां एक मुलगी जळतें कोलीत त्याच्यावर फेकते. त्याबरोबर तो उठून पळत सुटतो. मग बाकीचीं मुलें जेवूं लागतात. आईबाप या दिवशीं घरीं उपवास करतात.

जंगलामध्ये राहणाऱ्या बायूगांना लाकडांची विपुलता असूनहि मोठमोठालीं घरें बांधण्याची कला साध्य कां होऊं नये हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. बायूगा लोक मूळचे ह्या जंगलांतील नसून बाहेरून येऊन येथे राहिले असें मानल्यास ह्यांची पूर्वीची संस्कृति काय होती ? होती ती नष्ट झाली का ? आणि नवीन संस्कृति त्यांनी घेतली कीं नाही ? वगैरे आनुषंगिक प्रश्नांचा विचार करावयास पाहिजे. परंतु तो बाजूस ठेवून सध्या सांगावयाचें तें इतकेंच की, अस्थाई लोकांप्रमाणे बायूगा लोक तात्पुरत्या झोपडींतून राहतात. त्यांच्या घराला कुडांच्या भिंती असतात. निरनिराळ्या ठिकाणीं राहून झाडें तोडण्याचें काम करावें लागत असल्याने जुजबी झोपडी बांधून राहणें त्यांना सोईचें आहे ह्यांत मात्र संशय नाही. पक्कें घर नसलें म्हणजे वस्तूंचा संग्रह करतां येत नाही हें उघड आहे. कोयता, कुऱ्हाड, बीं, एखादें औषध वगैरे थोड्याबहुत जिनसा फडकुळ्यांत गुंडाळून खोपटीच्या वळचणीला ठेवलेल्या आढळतील. एस्किमो लोकांप्रमाणे ह्यांचीं घरें वाटोळीं नसतात: चौकोनी पण लांबट अशा जागेवर झोपड्या उभारतात. आपल्याकडेहि कातकरी-ठकारांसारख्या वन्य जातींचीं घरें वाटोळीं आढळतील. बायूगा लोकांची जेवण करण्याची, जेवायला बसावयाची व निजा-बसावयाची एकच जागा असते असें म्हटलें तरी चालेल.

फार तर ज्याच्या घरांत धान्य असतें तो धान्याचे कणगे मधोमध घालून एका जागेचीं दोन दालनें करतो.

आईचा बाप व बापाचा बाप ह्या दोहोंना आपण आजाच म्हणतों. परंतु बायगा बापाच्या बापाला दादी व आईच्या बापाला बुड्डा म्हणतात. तसेंच, बापाच्या आईला आजी व आईच्या आईला बुड्डी म्हणतात. दादा शब्द पितृवाचक असून आईला दाई म्हणतात. बापाच्या बहिणीला व आईच्या भावाला मामा हा एकच शब्द आहे. डौका व डौकी हे शब्द अनुक्रमें नवऱ्याला व बायकोला लावतात. मुलाच्या बायकोला म्हणजे सुनेला वहू म्हणतात.

## सिमँग

जगाच्या अगदी कानाकोपऱ्यांत जेथे अन्न मिळण्याची मारामार अशा ठिकाणीं आजकाल हीन लोक आढळतात. ज्यांच्यावर विद्येचा, शास्त्राचा अथवा कलेचा जाणता संस्कार झालेला नाही, निसर्गाशीं जे अद्यापि संलग्न आहेत, अशा लोकांना इंग्रजींत 'प्रिमिटिव्ह' म्हणतात. यांनाच मराठींत 'हीन' या शब्दाने संबोधितां येईल.

उत्तरध्रुवाकडे बर्फाच्या प्रदेशात राहणाऱ्या एस्किमो लोकांची हकीगत आपणांस समजलीच आहे. आज 'सिमँग' नांवाच्या लोकांची ओळख तुम्हांला करून द्यावयाची आहे. हे लोक मलाया द्वीपकल्पांत राहतात. सिमँग लोकांपेक्षाहि हीन लोकांच्या अस्तित्वाच्या गोष्टी मलायी लोकात प्रचलित आहेत; उदा० बोर्निओ बेटांत मरुत् नांवाचे लोक आहेत. ह्यांच्या पाठीवर लांब शेपटीच्या वानरासारखें कातडें असतें. त्यामुळे ही कातड्याची शेपटी पाठीमागे लांबच लांब लोंबत असते. दुरून पाहणाराला असें वाटतें की, ते त्या माणसाचेंच शेपूट आहे. ह्या लोकांवरून आपल्या इकडील पौराणिक मारुतीची तुम्हांला आठवण होईल. दुसरे असे लोक आहेत की त्यांच्या अंगभर केस असतात व नखें प्रचंड लांब असतात. मलायी लोक म्हशी बाळगतात त्याप्रमाणे वाघ बाळगणें हा त्याचा धंदा. हे लोक मनुष्यभक्षक आहेत अशी समजूत आहे. असो. आज आपणांस सिमँग

लोकांविषयीच बोलावयाचें आहे. या लोकांना खुजे असें संबोधण्यांत येतें. खुजा माणसाची उंची सामान्यतः पावणेपांच फुटांहून अधिक नसते. परंतु सिमँग हा पांच फूट उंचीचाहि क्वचित् आढळतो. बायकांची उंची ३।४ इंचांनी कमी भरते. खुजे लोकांत स्त्रीपुरुषांच्यामध्ये उंचीचें अंतर अधिक असतें असें म्हणतात. खुजा शब्द संस्कृत 'कुब्ज' शब्दावरून निघाला असून त्याचा अर्थ पाठीवर आवाळू असलेला, कुबडा अथवा वाकलेला असा आहे. इंग्रजींत बुटक्या माणसाला पिग्मी असें म्हणतात. ज्या मूळ शब्दापासून पिग्मी शब्द बनला आहे तो शब्द मापवाचक आहे. हें माप साडेतेरा इंचांचें आहे. जगांत जसे अतिशय उंच लोक असतात तसेच अतिशय ठेंगू असतात. जगांतील सर्व वामनमूर्ति विषुववृत्ताच्या आसपास आढळतात हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. विषुववृत्तावरील प्रदेश उष्ण व पाऊस प्रचंड त्यामुळे तेथील डोंगरावर प्रचंड जंगल असतें. पांच फूट घेराचे व दोनशें फूट उंचीचे मोठमोठे वृक्ष एकमेकांस अगदी लागून असतात. या वृक्षांवर पुन्हा मोठमोठ्या वेलींचा वेढा असतोच. खालीं, तळाशीं व जमिनीवरहि झुडपांची इतकी गर्दी असते की जंगलांतून चालण्यास हीं झुडपें तोडीत बसण्याच्या भानगडींत न पडतां झुडपांवरूनच चालत जावें असेंच कोणासहि वाटेल.

सिमँग लोकांचे केस काळे लोकरीसारखे आणि आखूड असतात. कित्येक लोकांच्या डोक्यावर भरपूर केस असूनहि शरीराच्या बाकीच्या भागावर फारच तुरळक असतात. याचें कारण अद्याप समजलेलें नाही.

सिमँग लोकांना दाढीमिशा नसतात म्हटलें तरी चालेल. परंतु अशाच जातीच्या यांच्याचप्रमाणे जंगलांत राहणाऱ्या खुजे लोकांना दाढीमिशांचे केस भरपूर असल्याचें आढळून आलें आहे. म्हातारपणींसुद्धा ह्यांचे केस बहुधा पांढरे होत नाहीत. यांच्या अंगाचा रंग तपकिरी किंवा काळा असतो. हे लोक स्नान करीत नाहीत. ह्यांचे कान आखूड असले तरी ते तीक्ष्ण असतात.

आज सिमँग लोक दोन हजारांहून अधिक नाहीत. सांप्रत पर्वतावरील घनघोर अरण्यात जरी ते राहत असले तरी एके काळीं त्यांची वस्ती समुद्र-किनाऱ्यावर असावी असा तर्क आहे. मलायी, चिनी, युरोपियन वगैरे समुद्रा-

वरून आलेल्या लोकांनी त्यांना हुसकून लावलें असावें. परकीयांच्या संसर्गा-मुळे सिमँग लोकांच्या चालीरीती, त्यांची भाषा व त्यांचें रक्त मूळचें राहिलें नाही. बाहेरच्या जगाशीं संबंध न आलेल्या सिमँग लोकांची हकीगत अभ्यसनीय आहे. म्हणून अशाच लोकांची स्थिति वर्णन करणें युक्त होईल.

दाट जंगलांत सूर्याच्या किरणांचाहि प्रवेश होऊं शकत नाही, मग मोकळी जागा मिळणें शक्यच नाही. या कारणास्तव सिमँग शेती करीत नाहीत हें सांगावयास नको. त्याचप्रमाणे दुभतीं जनावरें ते बाळगीत नाहीत. कारण अशीं जनावरें जंगलांत जगूं शकत नाहीत. त्यामुळे या लोकांना जंगलांत आपोआप होणाऱ्या पदार्थांवर उपजीविका करावी लागते. अर्थात् या लोकांस शाकाहारी म्हणण्यास हरकत नाही. ते मांसाशन करीत नाहीत असें नाही; करतात; पण क्वचित्. असें सांगतात की, शाकाहार जेव्हा उपलब्ध नसेल तेव्हाच सिमँग हा शिकार करण्यास घर सोडील. या जंगलांत नाना जातींचीं झाडें विपुल असतात हें खरें पण विषुववृत्तावरील जंगलाचें हें वैशिष्ट्य आहे की, एका जातीचीं झाडें एकाच ठिकाणीं बहुसंख्य उगवत नाहीत. त्यामुळें या लोकांना आपली वस्ती वारंवार बदलावी लागते. तसेंच एकाच जागीं कंद किंवा फळें विपुल प्रमाणांत मिळण्याचा संभव नसल्याने लहान गट करूनच या लोकांना राहावें लागतें. हा गट फार तर पंचवीस तीस माणसांचा असतो.

या लोकांमध्ये नाईक असा कोणी नसतोच. वयाने मोठा असेल त्यालाच वडीलकीचा किंवा नाइकीचा मान मिळतो. विद्येच्या अभावीं वयस्करपणा हें शहाणपणाचें द्योतक समजलें जातें. माणूस जितका वयाने मोठा तितका त्याला अनुभव अधिक, आणि अनुभव हें ज्ञानार्जनाचें एकमेव साधन रानटी लोकांत असतें. या कारणास्तव जमातीचीं विशेष कामें जमातींत सर्वांत वयाने मोठ्या असलेल्या माणसाच्या सल्ल्याने चालतात. म्हणून मुक्काम कुठे करावयाचा, तळ केव्हा हलवायचा हें सर्वांत म्हातारा मनुष्य ठरवतो. हे राहतात त्या छपरांना घरें म्हणतां येणार नाही. कांही काठ्या उभारून व वर एक पान टाकून त्याच्या आसऱ्याने ते राहूं शकतात. हें मांडव घालण्याचें काम बायको करते. पुष्कळ कुटुंबें एकत्र राहावयाचीं असल्यास उभ्या खांबांना नारळाच्या झावळ्या घट्ट बांधतात.

जमिनीवर झाडांच्या तोडलेल्या फांद्या पसरतात व त्यांवर बांबूच्या कांबींनी विणलेली हातरी पसरली म्हणजे ती त्यांची निजायची जागा होते. अशा रीतीने जमिनीचा ओलसरपणा त्यांना बाधत नाही. निजण्याच्या बाजूला विस्तव सदा धुमसत असतो. सर्द हवेंत वाटेल तेव्हा विस्तव पेटवणें कठीण असल्याने खोपटांत रात्रंदिवस विस्तव बाळगणें अवश्य असतें. दोन वाळलेलीं लाकडें अथवा बांबू एकमेकांवर घासून विस्तव उत्पन्न करतात. कित्येकांच्याजवळ चकमकहि असते.

वृक्ष हीच सिमँगची संपत्ति. हत्यारें, तिरकमठ्यासारखीं अस्त्रें यांची जशी मालकी असते त्याचप्रमाणे या निसर्गदत्त वृक्षांवर निरनिराळ्या सिमँग लोकांचा हक्क असतो. मेल्यानंतर इतर जिनगीप्रमाणे या वृक्षांचाहि वारसा मयताच्या वंशजांकडे जातो. यांत विशेष हें की, पुरुषाचा वारसा त्याच्या बायकोकडे कधी जात नाही तसेंच बायकोच्या मिळकतीवर नवऱ्याला हक्क सांगतां येत नाहीं. बायको मेल्यावर तिची मिळकत तिच्या मुलांना मिळते. आणि मुलें नसल्यास तिचे आईबाप अथवा भाऊ त्या मिळकतीचे वारसदार होतात; पण नवऱ्याला ती मिळकत कधीहि मिळत नाही. 'दुरीअन' नांवाच्या झाडासंबंधाने विशेषतः मालकी हक्क सांगितले जातात. हे वृक्ष फार मोठे असतात. त्यांच्या एका फळाचें वजन कित्येक शेर भरतें.

फळें, पानें, कोंब व कंदमुळें तोडणें अथवा खणून काढणें हीं कामें बायका करतात. पुरुषांची फक्त त्यांना मधून मधून मदत होते. अगदी भाग पडल्याशिवाय सिमँग कधी शिकारीस जात नाही. हें जरी खरें असलें तरी बिनचूक नेम मारण्यांत त्यांचें कौशल्य असामान्य आहे यांत शंका नाही. शिकार करण्यास त्यांना कुत्र्यांची गरज लागत नाही. जंगलांत नद्या वाहतात त्यांतून ते तराफ्याने प्रवास करतात. होड्या बांधण्याचें त्यांना ठाऊक नाही.

यांचें मुख्य जेवण संध्याकाळचें असतें. सकाळीं न्याहारी करतात. दुपारींहि थोडेंसें खातात. मीठ दुर्मिळ असल्याने त्याची त्यांना फार आस असते. जेवण्याकरिता केळीच्या पानांचा उपयोग करतात. स्वयंपाक बायका करतात. पुरुष व मुलगे जेवल्यावांचून बायकामुलींनी जेवूं नये असा त्यांच्यांत निर्बंध आहे. बांबूच्या पोकळ नळयांत हे लोक भात शिजवतात. करवंट्या,

पानांचे द्रोण अथवा बांबूचीं केलेलीं भांडीं यांतून पाणी पितात. ह्यांच्या अभावीं आपल्या इकडल्याप्रमाणे ओंजळीने पाणी पिण्याची वहिवाट आहे. हे लोक तंबाखूचे मोठे शोकी आहेत. तांदूळ व तंबाखू हे पदार्थ त्यांना मलायी लोकांपासून मिळतात. पूर्वी एका ठरीव ठिकाणीं सिमँग लोक आपल्याजवळचे जंगली पदार्थ ठेवीत आणि परतत. कांही दिवसांनंतर त्याच जागेवर पुन्हा जाऊन तेथून मलायी लोकांनी ठेवलेले पदार्थ घेऊन येत. सिमँग लोकांना काय लागतें हें मलायी लोकांना माहीत असल्यामुळे ते पदार्थ तिथे ठेवायचे आणि सिमँग लोकानी ठेवलेले जिन्नस तेथून घेऊन जायचे अशी पद्धत असे. हें देवघेवीचें अत्यंत प्राचीन स्वरूप होय.

अठरा वर्षांचें वय झालें कीं मुलगा शेजारच्या जमातींतून एक मुलगी पसंत करतो व त्या मुलीच्या बापाकडे वर्ष दोन वर्षें राहतो. नंतर आपल्या बायकोला व मुलें झालीं असल्यास त्यांना घेऊन परत आपल्या आईबापांकडे राहण्यास येतो. जंगलांत या लोकांचे अनेक गट आहेत. परंतु एका गटाचा संबंध दुसऱ्या गटाशीं क्वचितच येतो. आपल्याहून दुसऱ्या तऱ्हेच्या लोकांशीं संबंध येत नसल्यामुळे हीन लोकांत सुधारणा होत नाही. अशा लोकांची बोलण्याची भाषा असली तरी लिपि नसते हें सांगावयास नकोच. एक, दोन आणि तीन याच्यापलीकडे त्यांना मोजतां येत नाही. अर्थात् शिक्षणाची गोष्ट बोलावयास नको. आईबाप करतात तें पाहून मुलें अनुकरणवृत्तीने शिकत असतात.

ज्यांना नाच ठाऊक नाही असे हीन लोक बहुधा आढळणार नाहीत. यावरून नृत्य ही परमेश्वराची जन्मजात देणगी आहे असें समजावयास हरकत नाही वास्तविक रानटी लोकांस दिवसभर काम असतें असें नाही. असें असून नाच हा सर्व जातींत बहुधा रात्रींच केला जातो. सामान्यतः दिवस कामाकरिता आणि रात्र करमणुकीकरिता ही कल्पना सार्वत्रिक असल्याचें दिसतें. सिमँग लोकांत बायकाच विशेषतः नाचांत भाग घेतात. त्या नाचत असतांना पुरुष ताल धरतात किंवा दुसरीं वाद्यें वाजविण्यांत गर्क असतात. इतर हीन लोकांत स्त्रीपुरुषांचा मिश्र नाच असतो हें आपण पाहिलेंच आहे.

एस्किमो लोकांप्रमाणे यांना वस्त्राने अंग लपेटण्याचें कारण नाही. म्हणून

यांच्या अंगावर जरुरीपेक्षा अधिक वस्त्र नसतें. मुलें तर नागवींच असतात. ह्यांना अन्न जसें वनस्पतींपासून मिळतें तसें वस्त्रहि तेथूनच मिळतें. हीं झाडाच्या सालीचीं वस्त्रें असतात. बायकांच्या कमरेभोंवतीं जें परकरासारखें गुंडाळलें असतें तें चिखलांत उगवणाऱ्या छत्रीसारख्या झाडाच्या पदराचें केलेलें असतें. हें वस्त्र तयार केलें म्हणजे काळें तुकतुकीत दिसतें. पुरुषांच्या नेसूं लंगोटी असते. गोंदून घेण्याची चाल ह्या लोकांत नाही. गोऱ्या कातडीवर गोंदण जसें उठावदार दिसतें तसें काळ्या कातडीवर दिसत नाही हें एक ह्या लोकांनी गोंदण्याची कला साध्य न केल्याचें कारण असावें. पुरुष डोक्याचे केस काढतात व पुढचे सहा दांत कानसून अणकुचीदार करतात. स्त्रिया आपल्या केसांत बांबूचे कंगवे घालतात. परतु ते शोभेकरिता नसून रोग न होऊं देण्याचे तोडगे म्हणून होत. कानाच्या पाळयांना भोकें पाडून त्यांत काड्या अडकवितात. नाक आणि कान टोचणें यांमध्ये कान टोचावयाची कल्पना प्रथम निघाली कीं काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. जंगलांत बांबू पुष्कळ मिळत असल्यामुळे बऱ्याचशा वस्तु बांबूच्या असतात. बांबूच्या कांबीच्या हातऱ्या व टोपल्या करतात. ढोलकीं बांबूचींच असतात व तीं वाजविण्याच्या काठ्याहि बांबूच्याच. सुया आणि आरी हीं जनावरांच्या हाडाचीं करतात. कापण्याकरिता दगडाचीं हत्यारें असतात. तीं फारच ओबडधोबड असतात. ह्या लोकांत सुंता करण्याचा प्रघात नाही.

सिमँग प्रेतें जमिनींत पुरतात. भुताना ते फारसे भीत नाहीत असें म्हणतात. जादूटोण्यावर त्यांचा विश्वास फार. रोगनिवारणार्थ आपण ज्याप्रमाणे ओलांडें, केसारी, ताईत, गंडे, दोरे, मंत्रतंत्र, दृष्ट, तीट वगैरे तोडगे करतों तशाच नमुन्याचे तोडगे सिमँग लोक करतात. भाल्यावर कांही सांकेतिक आकृति असल्या म्हणजे शिकार साधते व रोग होण्याची भीति नसते असें मानण्यांत येतें. जंगलांत राहणाऱ्या लोकांना जंगली वनस्पतींचा उपचार रोगांवर न सुचतां प्रथम हे तोडगे सुचावेत व ते अद्यापि उपयोगांत आणले जावेत याचें आश्चर्य वाटतें. कोणता तोडगा कोणत्या रोगावर लागू पडतो हें ज्याला समजतें त्याला शमण म्हणतात. यामुळे जातींत त्याला महत्त्व प्राप्त होतें. त्याचा पोषाख सर्वांहून वेगळा. हातांत अधिकारनिदर्शक छडी. यामुळे तो सहज ओळखूं येतो. मेल्यावर त्याची सन्मानाने प्रेतयात्रा काढण्यांत

येते. शमणाचा हुद्दा वंशपरंपरागत असतो. रोगांवर तोडगे माहीत असणें एवढीच ह्या लोकांची विद्या.

ह्यांचा लग्नविधि फारसा नाही. एकपत्नीत्वाची चाल आहे. त्यामुळेच पतिपत्नींतील निष्ठा वाखाणण्याजोगी आहे असें म्हणतात. जंगलांत लाकूड विपुल असूनहि प्रेतें न जाळतां पुरण्याची वहिवाट आहे. पूर्वी हे लोक मेलेल्या माणसाचें मांस खात असें मलायी लोकांचें म्हणणें आहे. एवढें मात्र खरें की, कांही कालापूर्वी सिमँग लोकांत पुरलेलें प्रेत पुन्हा उकरून काढण्याची रीत होती.

मेनिक, मेती अथवा मेंडी हीं सिमँग लोकांचीं दुसरीं नांवें आहेत.

## ब्रह्मदेशांतील नाग लोक

नाग लोक हे आशिक्षित असल्यामुळे त्यांच्यामध्ये लिपी नाही त्यामुळे हे लोक मूळचे कोणत्या ठिकाणचे याचा लेखी पुरावा मिळणें शक्य नाही. प्रचलित दंतकथांवरूनच त्यांच्याविषयी माहिती मिळवावी लागते. ब्रह्म-देशांत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं असें स्थलान्तर या लोकांनी केलें आहे, आणि तें केवळ नवीन नवीन शेत जमीन मिळावी म्हणून.

नाग लोक भूतांखेतांची पूजा करतात. मू (आकाश), ग (पृथ्वी), ब्रूँ (पर्वत), तसेंच सौं अथवा जौं या देवतांची त्यांना भीति वाटते. आसामांतील नाग लोकांच्या भाषेंतहि आकाशाला मूच, पृथ्वीला गौ, मेलेल्या माणसाच्या भूताला सौ असें म्हणतात. यावरून ब्रह्मदेशांतील व आसामांतील नागांचें साम्य दिसतें.

वरील देवतांचीं देवळें गांवठाणांत रस्त्याच्या बाजूने, वेशीच्या दर-वाज्यांत अथवा चवाठ्यांवर बांधतात. ही देवळें पक्कीं नसतात. जाणारा येणारा देवापुढे अंडें ठेवतो. पुष्कळ वेळां तर झाडाची फांदी खुडून ती ठेवली तरी काम भागतें. पुष्कळ गांवांतून नटाची देवळें असतात. मृतलोकांचा स्वामी याला नड असें म्हणतात. मनुष्याला जगविणें अथवा मारणें याच्या हातीं असतें. या देवतेनिमित्त करावयाचें हवन सर्व गांव-करी मिळून करतात. जेथे नटाचें देवालय नसेल तेथे एका नियमित स्थलीं

ग्रामयाग केला जातो. आजार येऊं नये म्हणून अथवा आला असल्यास जावा म्हणून, पीक चांगलें यावें म्हणून, गुरांढोरांचें कल्याण व्हावें म्हणून नट देवतेला उद्देशून हवन करण्यांत येतें. नाग लोकांच्या निरनिराळ्या जातींत निरनिराळे प्राणी बळी देण्याचा प्रघात आहे. गाई, बैल, म्हशी, डुक्कर, कुत्रा, बोकड, कोंबडीं, बदकें यांचा तर बलि देण्यांत येतोच पण कित्येक जातींत मनुष्ययज्ञ करण्याचीहि चाल आहे. शत्रूला मारल्यावर त्याचें डोकें, हात आणि पाय यांपैकी कांही तरी होमकुंडांत टाकून देवतांना संतुष्ट करण्यांत येतें. एका पडक्या गांवांत लिंगोपासनेचा दगड तीन-चार पिढ्यांपूर्वीं पुरलेला आढळला आहे. बाळंतपणांत ज्या घरांत बायको मेली असेल तें घर बलिदानानें शुद्ध होतें अशी समजूत आहे. म्हणून मनुष्याचें मांस या दगडासमोर ठेवण्यांत येतें.

सर्वस्वीं पिकांवर अवलंबून राहावें लागत असल्यामुळे शेतांत मुबलक धान्य व्हावें म्हणून नाग लोक देवतांना बलिदान करीत असतात. जमीन नांगरतांना किंवा पेरणीच्या वेळीं अथवा कापणीच्या हंगामांत देवतांना संतुष्ट करण्याची अवश्यकता त्यांना भासते. अशा प्रसंगीं अफू घेण्याची या लोकांना संवय आहे. देवांच्या संतोषाकरिता काय करावयाचें हें सर्व भगत सांगतो. देवाजवळ गाऱ्हाणें सांगणारा निराळाच मनुष्य असतो. त्याला बलिदानाच्या वेळीं रेड्याची पाठीमागची तंगडी मिळते. या लोकांत मनुष्याचा बलि देतात हें मागे सांगितलेंच आहे. या मनुष्ययज्ञाचें विलक्षण कारण देण्यांत येतें. असें सांगतात की, पूर्वी आजार नाहीसा होण्याकरिता, चांगलें पीक यावें म्हणून किंवा जनावरांना रोग होऊं नये म्हणून वानराला बलि देत असत; परंतु असें बलिदान केल्यावरहि इष्ट हेतु सिद्धीला जाईना अशा फिकीरींत असतां आकाशांतून मनुष्याचा हात गळलेला दृष्टीस पडला. तेव्हा सर्वांनी भाकीत केलें की, देवाचा संतोष होण्याकारिता मनुष्यालाच बळी दिला पाहिजे. मनुष्याला बलि देण्याचा नवस पांच दहा वर्षांत फेडला तरी चालतो. असा नवस केल्यावर जमातीच्या एका मुख्य घरावर तरवार अगर असेंच दुसरें कांही हत्यार खुणेदाखल लटकावून ठेवतात आणि बलि दिल्यानंतरच ही खूण काढली जाते. बलि द्यावयाचा तो मनुष्य शत्रूच्या गोटांतून आणलेला असतो

किंवा कर्जांत विकला जाणारा गुलाम खरेदी करून त्याला बलि देतात. पुरुष किंवा स्त्री कोणीहि या कामाला चालतें. बलि द्यावयाच्या माणसास तनिशे तें पांचशे रुपये पडतात. बलि द्यावयाच्या माणसाचे खाण्या-पिण्याचे हाल करीत नाहीत.

पुरुषांचें लग्न वीस ते चोवीसच्या आंत व बायकांचें सोळा ते वीसपर्यंत होतें. लग्नाच्या पूर्वी वधूवरांचा स्नेह जमतो; आणि तो जमावा म्हणून पुष्कळ ठिकाणीं स्वतंत्र घरें बांधलेलीं असतात. या घरात तरुण-तरुणी रात्रीचे वेळीं जातात.

कांहीं नाग जातींत अशी रीत आहे की, वाङ्निश्चय झाल्यावर वधूवर वधूच्या बापाच्या घरीं तिचे आईबाप व धाकटीं भावंडें जेथे निजतात तेथेच निजतात. ही निजण्याची जागा शेकोटीभोंवतीं असते हें सांगावयास नको. एका खोलीचेंच घर असल्यामुळे सर्व जणांस एकत्र निजावें लागते; आणि त्यांत त्यांना लाजहि वाटत नाही. मात्र कांहीं नाग लोकांच्या जातींत नातलगांच्या देखत शृंगारचेष्टा करण्यास त्यांना लाज वाटते म्हणून मोठमोठ्या गांवांत तरुण तरुणींना एकत्र जमण्याकरिता स्वतंत्र जागा केलेल्या असतात. या ठिकाणीं रात्रीं तरुण-तरुणींचीं जोडपीं जमतात; आणि दिशा फाकताच तेथून आपल्या घरीं जातात.

यांच्यांत लग्नविधि असा नसतो. मुलाच्या वतीनें मुलीकडे कोणीतरी मागणी करण्यास जातो. नंतर ती मुलगी वराच्या घरीं त्या दिवशीं येते. नंतर एक जेवणावळ घालतात. एवढें झालें की दोघेंजण नवरा-बायको म्हणून एकत्र राहतात. कांहीं जातींत लग्नाच्या मेजवानीकरिता जीं डुकरें मारतात त्यांच्या शेपटाच्या केसांच्या बांगड्या नवीन लग्न झालेल्या मुलीला घालाव्या लागतात. कांहीं जातींत नवरा-नवरीची लग्नापूर्वी ओळख नसली तर लग्न झाल्यानंतर महिनेच्या महिने एकमेकांशीं न बोलतां अथवा एकत्र न निजतां एकाच घरांत राहतात.

बहुतेक नाग जातींत हुंडा देण्याची वहिवाट आहे. कांहीं जातींत ही देजाची रक्कम ठरलेली असते. कांहीं जातींत ती कमजास्त होते. कांहीं नाग जातींत तीन म्हशी देज म्हणून एकदाच देण्याची वहिवाट आहे. लग्नापूर्वी व लग्नानंतर एक दोन वर्षे नवरा मुलगा सासुरवाडच्या माणसांना जमिनीची लागवड कर-

ण्याच्या कामीं मदत करतो. दुसऱ्या कित्येक नाग जातींत पासोडी, चार-पांच डुकरें व कांही कोंबडीं हीं देजादाखल दिलीं जातात. रास नांवाच्या नाग जातींत मुलें मोठीं होईपर्यंत देज देत नाहीत. मुलें मोठीं झाल्यावर तीं आपल्या आजोळच्या माणसांना तीन म्हशी देतात. मूल झालेंच नाही तर अर्थात् नवऱ्याला देज द्यावा लागतो.

नवऱ्यावर देज देण्याची पाळी आली म्हणजे तो गाय किंवा गाईची किंमत देतो. दुसऱ्या कित्येक जातींत देजाशिवाय नवऱ्याला बायकोच्या मोठ्या बहिणींना दहा रुपये व धाकट्या बहिणींना एक रुपया द्यावा लागतो. बहिणी नसल्यास आईबापाना ते पैसे मिळतात. सामान्यतः मुलीची मागणी घालण्यास मनुष्य जातो तेव्हा त्याच्याबरोबर अहेर आणि अफू पाठविण्यांत येतात. मुलीच्या आतांकडून जर नकार आला तर या नजराण्याची नुकसानभरपाई त्या माणसाला करून द्यावी लागते. बहुधा हें नुकसान अफू-पुरतें असतें; कारण मुलीच्या घरीं जमलेली मंडळी अफू खाऊन टाकते. पिलिम जातीच्या नाग लोकांत देजाची रक्कम तिसऱ्या पिढीला दिली जाते. लोंगरी नांवाचे नाग प्रत्येक मुलाच्या जन्माच्या वेळेस देजाची रक्कम देतात. असा प्रकार तीन पिढ्या चाललेला असतो.

संछी नागांत मुलीची रक्कम ठरलेली असते. आपल्या मुलीचें जें देज ते घेतात त्यापैकीं कांही भाग त्याना आपल्या बायकोच्या नातेवाइकांना द्यावा लागतो. देज देता येत नाही इतकी गरिबी असल्यास लग्नाच्या वयाची मुलगी झाली म्हणजे तिलाच बायकोच्या आतांच्या हवालीं करतात. या मुलीचें लग्न करून जे पैसे येतील ते तिच्या आईचे पैसे म्हणून समजण्यात येतें.

नाग लोकात लग्न झाल्यावर वधूवर स्वतंत्र बिऱ्हाड करून राहतात. कित्येक नाग जातींत दोन बायका करण्याचा रिवाज आहे. लकई नागांत दोन बायका करण्याचा मान फक्त जातीच्या नायकाचा असतो. मयत आसाची बायको पाट न लावतांहि जवळ ठेवण्याची चाल कित्येक नाग जातींत आहे. कित्येक नाग लोकांत सोडचिठ्ठीची चाल नाही व कित्येकांत ती आहे. कित्येकांत व्यभिचार हें एकटेंच कारण विवाहसंबंध तोडण्यास असावें लागतें. दुसऱ्या कित्येक नाग लोकांत ज्याला विवाहबंधन तोडण्याची इच्छा होईल तो दुसऱ्याला कांही पदार्थ नजर करतो. संबंध

सुटल्याची ही खूण समजली जाते. कांही जातींत घटस्फोट हवा असल्यास पन्नास रुपये द्यावे लागतात. बायकोच्या अपराधाने काडीमोडीचा प्रसंग आल्यास तिला देजाची रक्कम नवऱ्याला परत द्यावी लागते.

नवरा मेल्यावर त्याच्याजवळच्या आप्ताशीं मयताची विधवा पाट लावते. कित्येक जातींत ज्याच्याशीं पाट लावावयाचा त्याची लग्नाची बायको असली तरी चालते. दुसऱ्या कित्येक जातींत ज्याच्याशीं पाट लावावयाचा तो विधुरच असावा लागतो. लोंग्री नागांत अशी चाल आहे की, नवऱ्याचा आप्त जर कोणी विधुर नसला तर तिला पाट न लावतां विधवा स्थितींतच राहावें लागतें. ज्या नाग लोकांत लग्नाच्या पूर्वी तरुण तरुणींचा स्नेह होऊं शकतो तेथे बायकांना लग्नाच्यापूर्वी मुलें होणें हा सर्वसामान्य प्रकार घडतो. बहुधा अशा जोडप्यांचें पुढे लग्न होतें. परंतु जेथे लग्नाची सक्ति नसते तेथे बायकोला कायमचा काळिमा लागतो; फार तर पुरुषापासून दंड वसूल करून घेतात.

व्यभिचाराबद्दल स्त्री-पुरुषांना जात शिक्षा करते. कित्येक जातींत दंडाची रक्कम पांचशे रुपयेपर्यंत असते आणि ही न दिल्यास स्त्रीशीं व्यभिचार करणाऱ्या पुरुषास देहान्त शिक्षा होते.

कांही जातींत मुलीच्या जन्मानंतर दोन महिन्यांनी व मुलाच्या जन्मानंतर तीन महिन्यांनी नांव ठेवण्यांत येतें. या वेळेस मुलाच्या डोक्याचे केस काढले जातात. कित्येक नाग मुलगा असो कीं मुलगी असो पांच दिवसांच्यापुढे व महिन्याच्या आंत नांव ठेवतात. आजा आजी, चुलता चुलती, इत्यादि कुटुंबांतील वडीलधाऱ्या माणसांकडून मुलाचें नांव ठेवलें जातें तर दुसऱ्या कित्येक जातींत आई बाप किंवा दोघेंहि नांव ठेवतात. जेवणावळी होतात अगर होत नाहीत. 'संगताई' नाग हे नांव ठेवण्याचे दिवशीं कोंबडीं बळी देतात. त्या दिवशीं डुक्कर मारलें तर मूल मरतें अशी त्यांची समजूत आहे. सामान्यतः स्नान करण्याच्या दिवशीं कोंबडें किंवा डुक्कर मारण्याची वहिवाट आहे. परंतु रिसा नाग कधी कधी कुत्राहि मारतात.

यांच्यांत प्रेतें पुरण्याची चाल आहे. घरापुढे किंवा गांवाच्या शेजारीं नाट घरांत प्रेत पुरलें जातें. बाळंतपणांत बायको मेली असल्यास अपघाताने किंवा मारामारीने मृत्यु आल्यास किंवा क्रूर जनावरांकडून मारला गेल्यास जंगलांत पुरण्याची चाल आहे. टुलिन नांवाचे नाग लोक

अशीं प्रेतें पुरण्याचे वेळीं तीं जंगलांत आडोशाला झाकून ठेवतात. कांहीं नाग लोक प्रेताची विल्हेवाट लावल्यावर त्याच दिवशीं पशु मारून त्यावर ताव मारतात. पुरण्यापूर्वी एक दोन दिवस प्रेत तसेंच ठेवण्याची कित्येक जातींत चाल आहे. पेएंगु नागांत मयताला पुरल्यानंतर तिसऱ्या महिन्यापासून वर्षअखेरपावेतो कांहीं विधि करतात. हा विधि केला म्हणजे मयताचें भूत जें आसपास घिरट्या घालीत असतें तें त्या जातीच्या मूळ ठिकाणीं जातें अशी समजूत आहे. हा समारंभ दोन दिवस चालतो. घरांत व घराच्या बाहेर नाच व खाना चालू असतो. पुरुषाच्या प्रेताबरोबर त्याचे नेहमीचे वापरण्याचे पदार्थ पुरले जातात. बायकांच्या प्रेताबरोबर गळ्यांतील माळा, टोपल्या व टोपल्या विणण्याचीं हत्यारें पुरतात. फार थोड्या नागांत प्रेतें जाळण्याची वहिवाट आहे. तथापि तीहि सांथीच्या रोगानें मेलेल्या माणसाचें प्रेत पुरतातच. प्रेत जाळावयाचें असतें तेव्हां मृत्यूनंतर एका दिवसानें तें जाळतात. कुकू नांवाचे नाग आहेत त्यांच्यांत एक विलक्षण चाल आहे. मनुष्य मेल्यावर त्याचें प्रेत मंदाग्नीवर ठेवतात. नंतर तेथून तें काढून एका लाकडी पेटींत तें घालतात. पुढे गावाजवळ असलेल्या श्मशानगृहांत ती पेटी नेतात. वर्षांतला एक दिवस ठरलेला असतो त्या दिवशीं त्या सालांत जेवढे मेले असतील त्या सर्व प्रेतांचीं डोकीं कापतात आणि ऊन पाण्यानें तीं स्वच्छ धुवून साफ करतात. नंतर या स्वच्छ केलेल्या कवट्या जातीचे कांहीं लोक एका गुप्त ठिकाणच्या उतरत्या खडकांत नेतात आणि तेथे पूर्वीच्या कवट्यांत सामील करतात. ही जागा गुप्त ठेवण्यांत येते, म्हणजे जातीच्या फारच थोडक्या लोकांना माहीत असते. या जागेला गोलगोट म्हणतात. घडें श्मशानघरांतच राहतात आणि तेथे तीं हळूहळू कुजतात. कांहीं नाग लोकांत हातरींत प्रेत गुंडाळून तें एका लहानशा झोपडींत ठेवतात. पुढे त्याची कोणीहि वास्तपुस्त करीत नाहीं.

नागांची प्रेतें पुरण्याची जागा घराखाली अथवा घरासमोर असते. प्रेत पुरलेल्या जागेभोवतीं बांबू ठोकून त्याच्यावर सावली करतात. खळग्यांत प्रेत ठेवल्यावर खळगा पुरा भरीत नाहीत. ज्या हातरींत प्रेत गुंडाळलेलें असतें ती हातरी बाहेर उघड्यावर टाकून देतात. ते खळगे पुढे केव्हां तरी पूर्ण भरून टाकतात. यांचा गांव श्मशानासारखा दिसतो. घरासमोर

मयताचे जिन्नस बांबूच्या काठ्यांवर पसरून ठेवलेले असतात. पुढे ते आपोआपच कुजून जातात.

पुष्कळ नाग जातींत जातीच्या नाइकाची जागा वंशपरंपरागत असते. कांहींमध्ये नाइकाची निवड करतात. कांहींमध्ये मेलेल्या नाइकाच्या धाकट्या भावाकडे ती जागा जाते. नाइकाला धाकटा भाऊ नसल्यास मुलाकडे अगर दुसऱ्या जवळच्या नातेवाइकाकडे जाते. नाईक हा एकटाच किंवा जातींतील म्हाताऱ्या लोकांच्या सल्ल्याने जातींतील तंट्यांचा निकाल करतो. चौकशी चालू असतां एकीकडे अफू खात असतात आणि चौकशी संपल्यावर दारूचा भरलेला पेला जमलेल्या सर्व मंडळींत फिरवतात. नाईक म्हणजे जातीचा राजाच असतो. सर्व प्रकारच्या गुन्ह्यांना दंडाचीच शिक्षा बहुतकरून फर्माविण्यांत येते. परंतु चोरीच्या गुन्ह्याला कधी कधी जबरदस्त शिक्षा देतात. चोरी करण्यांत निर्ढावलेल्या बायकोला नवऱ्याने बलि देण्याकरिता विकल्याचें उदाहरण आहे.

# उपसंहार

हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या चालीरीतींचा संग्रह कधीकाळीं एकत्र करण्यात आल्यास समाजशास्त्राच्या अभ्यासाला कल्पनातीत सहाय होईल असें निःसंदिग्धपणें म्हणतां येण्यासारखें आहे. पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतच्या अफाट विस्तारावर ठिकठिकाणीं जमाव करून असलेल्या रानटी, अर्धरानटी अथवा असंस्कृत किंवा हीन लोकांचीं मनें संस्कृतीच्या सदृश परिस्थितींत एकाच तऱ्हेचा विचार करतात, सारख्याच भावनांनी व्याकुल झालेलीं असतात व समान सुखदुःखें अनुभवितात असें दिसून येईल. त्याचप्रमाणें, ह्या चालीरीतींच्या अभ्यासाने हिंदु धर्माचें बरबटलेलें स्वरूप धुऊन निघून यथार्थतेने प्रकट होण्यास बहुमोल मदत होणारी आहे. तसेंच, सुसंस्कृत समाजाला आपल्या प्रगतीचें मोजमापहि

करतां येण्यासारखें आहे.

प्रस्तुत पुस्तकांत सुमारें सत्तर निरनिराळ्या जातींची माहिती दिली आहे. ह्या जाती बडोदा, भावनगर व त्रावणकोर या तीन संस्थानांतील आहेत. तथापि त्या अन्यत्र नाहीत असें मानण्याचें कारण नाही, व तेथेहि त्यांचे रीतिरिवाज असेच असणार हें उघड आहे. या लोकांच्या चालीरीतींकडे अगदी उथळ दृष्टीने पाहिलें तर जी एक गोष्ट मनावर चटकन ठसते ती ही की, ह्या सर्व जाती मुसलमान व ब्राह्मण वगळून स्मृतिग्रंथांच्या कक्षेच्या बाहेर आहेत. हीन समाजांत विवाह व प्रेतविसर्जन हे दोन विधि प्रायः असतात. परंतु यांपैकी कोणत्याहि विधीस ब्राह्मणाची अवश्यकता लागत नाही: जातीचेच लोक दोन्ही संस्कारांत उपाध्येपण करितात. अशा लोकांचा विधि साधा असतो. आमच्या प्रयोगकारांनी भानगडीचें, खटाटोपाचें व खर्चाचें कर्म निर्माण करून ठेविलें आहे तसें कर्म असंस्कृत मनाला अपरिचित असतें. आमच्या संस्कारांत काय केलें जातें त्याचें सुशिक्षितांनाहि ज्ञान नसतें; उलट ह्या अशिक्षितास आपण काय करीत आहों हें पूर्णपणें समजतें. किंबहुना असेंहि म्हणतां येईल की, जें ह्या अशिक्षितांना समजतें तेंच ते करितात. स्मृतिकारांचें चार वर्णांचें शास्त्र हीन समाजास अपरिचित असून त्यांनी स्वतःकरिता स्वतःच शास्त्र निर्माण केलें आहे. ह्याला रूढिशास्त्र ही संज्ञा आहे आणि 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी' असा नियम करून आमच्या शास्त्रकारांनी ह्या हीनांच्या रूढीला आपली मान्यता दर्शविली आहे. वस्तुतः पाहता उपर्युक्त समाज शास्त्राच्या दृष्टीने चातुर्वर्ण्याच्या बाहेर आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही उपजीविकेच्या ज्या साधनांचा त्यांनी अवलंब केला आहे त्या साधनांच्या दृष्टीने ते चातुर्वर्ण्यांत समाविष्ट झाले आहेत. कालान्तराने ब्राह्मणांचा त्यांच्यांत प्रवेश होईल तेव्हा ते पूर्णपणें चातुर्वर्ण्यांतर्गत झाले असें म्हणतां येईल. तथापि अशा अर्धवट स्थितींतहि आपण त्यांस हिंदु समजतों हें विसरतां कामा नये.

आपल्याकडे कातकरी जातींत लग्नाला किंवा अंत्यविधीला ब्राह्मणाची गरज लागत नाही त्याचप्रमाणे गुजराथेंतील गामीट, भरवाड, कोतवालीया, वसवा व कोकणे ह्या जातींतील उपाध्येपण ब्राह्मणाविना उरकलें जातें.

भरवाड जातींत तर दर्जी जातीचा मनुष्य उपाध्येपण करतो. ह्यावरून चातुर्वर्ण्याव्यतिरिक्त व्यवस्थेंत पुरोहितत्व ब्राह्मणेतरांकडे असे हें स्पष्ट दिसतें. याच पुस्तकांत सोनार उपाध्या व न्हावी जोशी असा प्रकार असल्याचें आढळेल (पृ.१००). त्याचप्रमाणे या पुस्तकांत तंजावराकडील नमूद केलेल्या जातींत ब्राह्मणाचा प्रवेश झालेला नाही. सारांश, हिंदु म्हणून गणल्या जाणाऱ्या हिंदुस्थानांतील असंख्य जाती अद्यापि वर्णाश्रमधर्मांच्या बाहेर आहेत यांत संशय नाही.

ह्यानंतर दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की, बहुतेक जातींत सोडचिठ्ठीचा व विधवाविवाहाचा रिवाज आहे. हिंदूंचें लग्न वज्रप्राय अथवा अभेद्य असतें ही समजूत किती भ्रामक आहे हें दिसून येईल. कांही जातींत तर, उदाहरणार्थ चरोशी या श्रीमाळी सोनी जातींत, काडीमोड मागण्याचा हक्क बायकोला दिलेला आहे (पृ.४०). बरोत जातींत नवऱ्याला बायको सोडतां येते परंतु बायकोला नवरा सोडतां येत नाही (पृ.४९). ओड लोकांनी सोडचिठ्ठीचा सोपा मार्ग शोधून काढला आहे. बायकोला नवऱ्याने बहीण म्हटलें कीं तिचें पत्नीचें नातें सुटलें असें समजावें (पृ.४८). ह्याबरोबरच हीन समाजांत सुद्धा सुधारणेचें गाडें चालूच असतें. ह्या गोष्टीचें प्रत्यंतर कित्येक हीन समाजात विधवाविवाह निषिद्ध मानला जातो ह्यांत मिळण्यासारखें आहे; उदाहरणार्थ, गंध्रप व पोमला जातींत पाट लावण्याची बंदी आहे (पृ.३९,४७).

विधवा भावजयीचा दिराबरोबर पाट लावण्याची प्रथा सर्व देशांत निरनिराळ्या ठिकाणीं अनेक जातींत आढळते. सर्व भावांमिळून एक बायको असण्याच्या पद्धतीचा हा अवशेष असावा. व्यास व तपोधन हे आपणांस ब्राह्मण म्हणवतात तथापि त्यांच्यांत विधवाविवाहाची चाल रूढ आहे ही गोष्ट मनन करण्यासारखी आहे (पृ.३४व३९). अखिल ब्राह्मण जातींत एका वेळीं विधवाविवाह रूढ असावा व त्या चालीचा अवशेष तपोधन ब्राह्मणांत राहिला आहे असें अनुमान करणें अनुचित होणार नाही.

हीन समाज आपल्या परीने आपली सुधारणा करीत असतो त्याप्रमाणे स्मृत्युक्त धर्मांतहि ब्राह्मणसमाज प्रगतीचा प्रयत्न करीत असतो. एकाच वेळीं अनेक बायका करण्याचा निषेध कोणत्याहि स्मृतिकाराने केलेला

नाही; असें असूनहि वडनगर ब्राह्मण व भाटे ह्या दोन जातींत पहिली बायको जिवंत असतां दुसरी बायको न करण्याचा निर्बंध शास्त्रवचना-इतका पाळला जात आहे. ह्यावरून समाजाची उन्नति केवळ शास्त्रावर अवलंबून नाही हें स्पष्ट होतें. लोकांच्या कल्पनांचा विकास शास्त्राला पोषक होतो. शास्त्रवचनें झालींच तर तीं समाजाच्या उत्कर्षाला अंशतः कारणीभूत होतात.

ह्या पुस्तकांत नमूद केलेल्या चालींपैकी एक चाल लक्ष वेधण्यासारखी आहे. ती म्हणजे चुलतभावंडांत विवाह होणें ही होय. ही रूढि गंध्रप अथवा गंधर्व जातींत असलेली आढळते (पृ. ३९). गुजराथेंतच ही चाल आढळते असें नाही तर त्रावणकोरमधील बऱ्याच जातींत ही चाल प्रचलित असल्याचें दिसतें (पृ.६७,७०,७१,७३,७५). ह्यावरून असें दिसतें की, चुलतबहिणींशीं लग्न लावण्याकरिता मुसलमानच झालें पाहिजे असें नाही. इकडे अशी पद्धत असतांना गुजराथेंतील तरगळ जातीनें आईकडून तीन ते सात पिढ्यांच्या पुढे विवाहसंबंध घडून आणण्यावर निर्बंध घातला आहे (पृ.४३).

त्रावणकोर संस्थानांतील जातींसंबंधानें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांची कुटुंबव्यवस्था मातृप्रधान आहे. त्यामुळे पुरुषाला वारस त्याच्या बहिणीचा मुलगा होतो (पृ. ६७,७२,७७). ह्याच कारणा-स्तव बहुधा बहुपतित्वाची चाल आहे (पृ. ६८,६९). तसेंच अनेक भावांनी मिळून एक बायको करण्याचा रिवाज आढळतो (पृ. ७४,७५). वर हिमालयांत व खाली दक्षिणेंत हा एकच प्रकार दृष्टोत्पत्तीस आल्यावर मानवी मनाच्या समान धर्माची अटकळ करतां येते. ह्याच कारणास्तव कलियन जातींत वडील भावाच्या बायकोशीं धाकट्या भावाचा संभोग घडत असल्याचें वाचल्यास (पृ. ७०) त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. आते-मामे-भावंडांत लग्न लावण्याची चाल ह्या लोकांत बऱ्याच प्रमाणांत आढळते (पृ.६८).

आईनें मुलाचें लग्न न पाहण्याची चाल असल्याचीं अनेक उदाहरणें मीं 'बदलापूर' पुस्तकांत निर्दिष्ट केलीं आहेत. आता तीच रूढि मदुवन जातींत असल्याचें ह्या पुस्तकावरून दिसून येतें (पृ. ६०).

बडोदें संस्थानांतील पोमला जातींत बायकोची प्रसूति होण्याच्या वेळीं बाळंतिणीचे सर्व उपचार नवरा करून घेतो. अशा ह्या चालीचा निर्देश प्रस्तुत पुस्तकांत केलेला आढळेल (पृ.४७). अगदी अशीच चाल दक्षिण-अमेरिकेंतील ब्राझील देशांत अमेझॉन नांवाची नदी आहे तिच्या कांठच्या जंगलांत विटोटो नांवाचे लोक राहतात त्यांच्यांतहि आढळते.

पोमला लोक मद्रास इलाख्यांतून गुजराथेंत आले असा तर्क आहे. वर उल्लेखिलेल्या एका चालीच्या साम्यावरून पोमला यांचें मूळचें वसतिस्थान ब्राझील देश आहे असा तर्क करणें धाडसाचें असलें तरी तो करण्याचा मोह आवरत नाहीं.

त्रावणकोरकडील हीन समाजांत विटाळशा स्त्रियांबाबत फार कडक नियम असल्याचें दिसून येईल. विटाळशीला राहत्या घरांत न ठेवतां निराळ्या घरांत ठेवतात. विटाळशीच्या दिवसांची संख्या कांहीं जातींत ३, कांहींत ४, कांहींत ५, कांहींत ६ तर कांहींत ७ अशी निरनिराळी आहे. पहिल्या न्हाणाच्या वेळीं विटाळसपणाची मर्यादा फारच असते. पंटारम् व कन्नीयन् ह्या जातींत मासार्धाचें विटाळसपण असलें तर मलपुलय जातींत तें पुरा मास पाळावें लागतें. काठी जातीच्या लोकांत विटाळसपण धरीत नाहीत (पृ. ५०) हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

न्हाणोलीप्रमाणे बाळंतिणीकरिताहि स्वतंत्र घराची योजना असून सोयराचे दिवसहि निरनिराळे असतात.

पंचम साळी जातींत न्हाव्याचें प्रेत घराची मागील भिंत पाडून त्या बाजूने नेण्याची वहिवाट आहे (पृ.९८) हें वाचल्यानंतर एस्किमो लोकांच्या अशाच प्रकारच्या चालीची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या लोकांत पुढील दाराने घरांत प्रवेश करितात परंतु घर सोडतांना मागील बाजूची भिंत पाडून जातात. पिशाच्चांना चकविण्याच्या हेतूने ही चाल पडली असावी असा तर्क करण्यांत आला आहे. उत्तरध्रुवाजवळील एस्किमो आणि हिंदुस्थानांतील पंचम साळी यांच्यामधील ह्या रीतिसादृश्याचें कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं ?

त्याचप्रमाणे मध्यहिंदुस्थानांतील बायगा लोकांचा स्नेहभाऊ बनविण्याचा विधि (पृ.९८) व नेपाळांतील तत्स्थानीय लोकांचा लँडनने निर्दिष्ट

केलेला याच नमुन्याचा विधि* यांतील साम्य मानसशास्त्रज्ञांच्या विचारांना चालना देणारें आहे.

स्त्रीला पुरुषापेक्षा अधिक महत्त्व दिलेलें दिसतें. ह्याचें एक कारण असें की, ती शक्ति अथवा प्रकृति म्हणून समजली जाते. स्त्री म्हणजे मानवोत्पत्तीचें स्थान. बेळगांवास एका ब्राह्मणाच्या घरीं एक कुळंबीण होती तिला शक्ति मानून पूजेच्या वेळीं तिची पूजा केली जात असे ह्या गोष्टीचा उल्लेख बाबा पदमनजींनी आपल्या अरुणोदयांत केला आहे.

देशावळ वैश्यांत सप्तपदीच्या ऐवजी अष्टपदीची चाल आहे (पृ. ४२). ह्यावरून शास्त्राच्या पोटीं चालीचा जन्म आहे किंवा उलटा प्रकार आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न उद्‌भवतो.

ह्या पुस्तकांत मोमीन, मोलेसलाम, मातिया वगैरे जातींची माहिती दिलेली आहे (पृ. ४८). ह्या जाती अर्धवट हिंदु व अर्धवट मुसलमान आहेत. अशा जातीचा अभ्यास जातींच्या अभ्यासकाला अत्यंत उपयुक्त होतो. ह्याच संबंधाने बाबा पदमनजींनी एडनच्या हिंदूंची दिलेली माहिती विचार करण्यासारखी आहे. ते सांगतात, एडनला बिगारी म्हणून ब्राह्मण, भट, गोसावी वगैरे लोक गेले. त्यांनी तेथे देवीचें देऊळ बांधलें. ह्या देवीला दाखवावयाचा नैवेद्य सोमाली (मुसलमान)च्या डोक्यावर नेत. देवळांत नेऊन ठेवल्यावर मात्र त्या सोमालीला नैवेद्याला शिवूं देत नसत. ह्या हिंदूंकडे सोमाली लोक चूलचौका करीत. एवढेंच नव्हे तर पाणीहि भरीत. 'शास्त्र' बाजूस सारून समाज आपल्या सोयी पाहत असतो !

रानटी लोकांत विष्णूची उपासना फारशी दिसत नाही. ह्या पुस्तकांत दिलेल्या जाती शंकराच्या उपासकहि नाहीत. गुजराथेंत मातादेवी व त्रावणकोरकडे निरनिराळ्या अम्मा ह्यांचे भक्त पुष्कळ. अस्थंबा, गौळीमाता, हिंगळज, भेरोणमाता, चपळम्मा, करप्पूमारी अम्मा इत्यादि देवांचीं नांवेंसुद्धा त्यांतील माता शब्द काढला तर रानटी लोकांच्या भाषेंतलीं आहेत. आपल्या बाजूला हिंगुळजा देवीचें देऊळ आहे ही हिंगुळजा व भावसारांची हिंगळज ह्या दोनहि एकच देवता असाव्या. ह्या देवीच्या नांवाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. असाच एक गामिटांचा सम्ल देव आहे. देवांचीं

* हिमालयांत पृ.२५.

स्वरूपें समजून घेतल्याशिवाय त्यांच्याविषयी कांही न सांगणें बरें ! मन्ना व विषवन हे साष्ट किंवा सेष्ट देवाला भजतात. सटीसारखी ही एक पिशाच-देवता असल्यास न कळे ब्रह्मदेवांची पूजा कोंकण्यांत प्रचलित *आहे. तळाविया, काठी, मदुवन व तंडपोलय हे सूर्योपासक आहेत. सूर्याची निर्मळ उपासना खालच्या जातींत प्रथमपासून आहे असें रामायणावरून दिसतें. मलक्रन्, कणिक्कर, बंट ह्या जाती पितृपूजक आहेत. प्राचीनकालीं पितृ-पूजेकांची संस्कृति श्रेष्ठ प्रतीची होती. ज्यू लोकांत पूर्वीच्या हिब्रूंच्या पितृ-पूजेचे अवशेष अद्यापि राहिले आहेत. जपानी राष्ट्र तर पितृपूजक आहे हें सर्वांस माहीत आहे. आपल्या श्राद्धांतील कुश जपानी संस्कारांत आढळतो. कुशग्रास ह्या मथळ्याखाली बुई जपानीज ह्या पुस्तकांत जपान देशांतील कांही जिल्ह्यांत प्रचलित असलेल्या एका संस्काराचें वर्णन आहे. त्यावरून असें दिसतें की, मुलांच्या डोक्यावर केसांची वाढ झाली म्हणजे त्यांचे आईबाप चिनी लिपींत घोडा हें अक्षर केसांवर काढतात. ह्या केसांना जपानी भाषेंत कुश म्हणतात. कुश शब्दाचा दुसरा अर्थ गवत असा आहे. ह्यांत कल्पना अशी असते की, घोडा गवत खातो म्हणजे केस काढल्या-सारखें होतें. आपल्याकडेहि मुलां-मुलींचे जन्माचे केस काढून टाकण्याची वहिवाट आहे.

पितरांना रुपें प्रिय असतें†. माझ्या जातींत लग्नाच्या वेळीं मुलाच्या हातांत सोन्याच्या ऐवजीं रुप्याची आंगठी घालण्याची रीत आहे (पृ. ९७) ह्यावरून ही जात पितरसमाजांपैकी असावी असें अनुमान काढतां येईल काय ?

ह्या पुस्तकांत अस्पृश्यांविषयी मीं ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला आहे. हें विवेचन आजवर झालेल्या तद्विषयक विवेचनाहून वेगळें आहे असें वाटतें. तथापि त्या विवेचनांत एका गोष्टीकडे लक्ष वेधण्याचें राहिलें. माझ्या मतें महार जातीचा स्वतंत्र विचार होणें अवश्य आहे. इतर अस्पृ-श्यांत त्यांची भेसळ करणें समाजशास्त्राच्या दृष्टीने घातक आहे. महारांना ग्रामसंस्थेंत विशिष्ट स्थान आहे. आज त्यांचे सामाजिक व कायदेशीर सर्व

* ह्या देवाबद्दल चित्पावन पृ. १५२ पाहा.

† वैदिक निबंध पृ. २५८.

हक्क नष्ट झाले आहेत. ह्या लुप्ताधिकारांचें संशोधनपूर्वक संकलन झालें पाहिजे. परंतु अशा संशोधनाला महारांना अस्पृश्यांच्या घोळक्यांत काल-वल्याने व्यत्यय येतो. जुन्या चालीरीतींत महारांचें स्थान ठरविण्यास साधनें उपलब्ध होण्यासारखीं आहेत.

'बदलापूर' पुस्तकांत मीं गांवसईचें वर्णन केलें आहे (पृ. ३२०). त्यावरून ग्रामसंस्थेंत महाराला किती मान होता तें समजतें. अन्य ठिकाणच्या आणखी एका गांवसईची माहिती येथे देतों. मुहूर्त असेल त्या-प्रमाणे एक ते तीन दिवस गांवांतले सर्व लोक गांवाबाहेर राहण्यास जातात. परत येतांना वेशीवर प्रथम महाराचें जोडपें येतें; बायकोच्या हातांत दिवा असतो. वेशीवर होमहवन होतें. बोकडाचा बळी देतात. ह्या बळी दिलेल्या बोकडाची मुंडी व एक कासव वेशीच्या मधोमध पुरतात. ह्या जागे-वरून लोकांनी गांवांत प्रवेश करावयाचा असतो. गांवप्रवेशानंतर सर्वांनी आपापल्या घरचे दिवे महारणीच्या दिव्याने लावावयाचे व घरांतील विस्तवहि त्याच साधनाने पेटवावयाचे असा नियम आहे. ह्या चालींतील महारांचा मान ही महत्त्वाची बाब आहे. ह्या चालींतील दिवे लावण्या-प्रमाणे महारांच्या विस्तवाने गांवहोळी कित्येक ठिकाणीं लागते हें नमूद करणें जरूर आहे. महारांना मिराशी व वेसकर अशीं दोन नांवें आहेत तींहि साभिप्राय आहेत. महारांची गणना बाह्यांत करूं नये असें मला वाटतें.

देवदिवाळीला देवीच्या देवळाच्या पायरीपर्यंत महाराने जाण्याची वहिवाट आहे. तेथे जाऊन गुरवाने ठेवलेली तरवार तो उचलून घेतो असें दीक्षितांच्या आडिवऱ्याच्या इतिहासावरून दिसतें. अर्थात् महार चांडाळ नव्हे.

'जैनांच्या घरीं त्यांचा जती भोजनास आला असतां स्त्रियांनी नग्न होऊन स्वयंपाक करावा व सूप आड घेऊन यतीस वाढावें या चालीचा उल्लेख बाबा पदमनजींनी आपल्या अरुणोदयांत केला आहे. परंतु ही चाल दिगंबरी जैनांपुरतीच आहे असें दिसत नाही: वाणी जातींत अशाच प्रकारचा रिवाज असल्याचें या पुस्तकांत नमूद केलें आहे (पृ.१००). हिंदूंच्या अन्य कांहीं जातींतहि हीच रूढि असल्याचें कळतें. ब्रह्मा, विष्णु, महेश ह्या त्रिमूर्तींनी अनसूयेला नग्न होऊन वाढण्यास सांगितल्याची गोष्ट प्रसिद्धच

आहे. स्वयंपाक करून वाढणें हा अतिथिपूजन अथवा देवार्चन याचा भाग मानला तर स्त्रियांनी नग्नावस्थेंत पूजन करण्याचा पूर्वी नियम असावा. म. सा. पत्रिकेंत (वर्ष १ पान २७३) निंबसाड्याची माहिती दिली आहे तींत देशस्थ कुटुंबांत सुवासिनी स्त्रीने लुगडें सोडून निंबाचा पाला कमरे-भोवतीं गुंडाळून घेऊन देवीची पूजा करावयाची असते. ह्यावरून असें अनु-मान करतां येतें की, सदरहू रूढि बऱ्याच विस्तृत प्रमाणांत असली पाहिजे.

ब्राह्मणांच्या देवकांत ब्राह्मणेतर स्त्रीचीं शप्पें पुरुषाच्या वहिवाटीचा (पृ. १००) उगम कोणत्या कल्पनेंत आहे तें समजत नाही. ह्या चालींत कुंभारणीचीं शप्पें आहेत पण अन्यत्र कांहीं ठिकाणीं परटिणीच्या शप्पांना हा मान मिळतो. कामशास्त्रांतील कल्पनांनी ह्याचा कांहीं उलगडा झाल्यास न कळे.

जातींचीं नावें (पृ. ३२ ते ५० व ६५ ते ७७) दिलीं आहेत त्यांचे उच्चार बरोबर असतीलच असें सांगतां येत नाही. इंग्रेजीचें मराठी कर-तांना उच्चार चुकतात. मराठीचें इंग्रेजी करतांना तर चूक नव्हे तर चुकीचा बाप होतो. परंतु इंग्रेजी भाषेंत साहेबाने केलेल्या चुका खपल्या जातात. ब्राह्मणाचें ब्राम्हिन, वसईचें बेसीन, मोरया गोसावीचें मूऱ्या गोसीं असे उच्चार करणें दोषास्पद वाटत नाही; परंतु चूक ती चूक; "चूक झाली पदरीं घ्यावी हुजत न करावी" हा नियम सामान्य माणसाने स्वीकारणें बरें.

पुस्तकांत दिलेल्या नावाचे उच्चार ताडून पाहण्याच्या हेतूने मीं सुशिक्षित गुजराथी अधिकाऱ्याकडून तसेंच त्रावणकोरकडील जंगलांत काम करणाऱ्या सरकारी नोकरींत असलेल्या माणसाकडून उच्चार विचारून घेतले. तेव्हा अर्थात् उच्चारभेद आढळून आले. म्हणून पुस्तकांतील नांवें व वरील इसमांकडून समजलेलीं नांवें खाली देत आहें.

| पुस्तकांतील | तोंडीं घेतलेलीं |
|---|---|
| भवसार | भावसार |
| आनवळ | अनाविल |
| खेडवळ | खेडावाळ |
| मोध | मोढ |

| पुस्तकांतील | तोंडीं घेतलेलीं |
|---|---|
| रावडीया | रावळीया |
| देशवळ | देशावळ |
| भवाईय | भवाईया |
| तरगळ | तरगाळा |
| तळविया | तलाविया |
| गामिट | गामोत |
| वसवा | वसावडा |
| मातिया | मतिया-मत्या |
| बरोत | बारोठ-ट |
| मदुवण | मदुवन |
| मन्नान | मन्ना |
| उरळी | उराळी |
| मलपुलय | मलेपोलय |
| | (मले = टेकडी; पोलय=पारधी) |
| मलकुरवन | मलकुरुबन |
| मलअखन | मलकन |
| कणीकार | कणिक्करे |
| टंटपुलय | तंडपोलय |
| भंटु | बंट |

पान ७३ वर केट्टुकल्यनम् शब्द आलेला आहे त्या[illegible] रूप [illegible] कल्याणम् असें आहे. केतु म्हणजे मंगलसूत्र.

शब्द (पान ८९)

| | |
|---|---|
| धितणी | चे[illegible]णी |
| छईण | चईण |
| न्हीर | नीर |

REFBK-0006973